# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र–२ : पेपर क्रमांक SOE 017

# राजकीय समाजशास्त्र

## (Political Sociology)

**एम. ए. भाग–१ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१६
सुधारित आवृत्ती : २०१९
एम. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-588-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■**

प्रभारी अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,
  उंब्रज, जि. सातारा.
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शिवाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

एम. ए. भाग १ साठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे ऐच्छिक पेपर **राजकीय समाजशास्त्र** (Political Sociology) चा प्रमुख संपादक म्हणून मनःपूर्वक स्वागत करतो.

पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षाचा असून प्रथम वर्षासाठी चार पेपर आहेत. त्या चार पेपरपैकी दोन अनिवार्य (Compulsory) असून दोन ऐच्छिक आहेत.

ऐच्छिक पेपरमधील **राजकीय समाजशास्त्र** या पेपर अंतर्गत एकूण चार घटकांचा अभ्यास विद्यार्थ्यांना करावा लागणार आहे.

राजकीय समाजशास्त्र या पेपरचा संपादक (Editor) या नात्याने सदर पेपरची पुस्तिका तयार करण्यासाठी ज्या ज्या लेखकांनी मोलाचे योगदान केले अशा सर्वांचे मी सुरुवातीलाच आभार मानतो. सदर पेपरमध्ये ज्या चार युनिटचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने, राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप, राजकीय समाजशास्त्राचे सैद्धांतिक दृष्टिकोन, राजकीय सहभाग आणि राजकीय समाजीकरण आणि भारतातील राजकीय प्रक्रिया आणि पक्ष इत्यादी अभ्यासविषयाचा समावेश आहे. त्यामुळे एम. ए. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना समाजातील राजकीय अंगाचा परिचय होण्यास निश्चितच मदत होईल असे मला वाटते.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाने एम. ए. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्यासाठी संच अध्ययन पुस्तिका देण्याच्या हेतूने सर्व प्रथम अभ्यासक्रमानुसार लेखकांची सुची तयार केली. राजकीय समाजशास्त्र या एम. ए. भाग १ च्या पेपरसाठी प्रा. (डॉ.) सौ. दयावती पाडळकर, डॉ. खंडू संभाजी काळे, प्रा. व्ही. जी. पानस्कर, प्रा. पी. आर. निसर्गंध, प्रा. डॉ. विजय मारूलकर, श्री. बबन पाटोळे आणि चंद्रकांत खंडागळे या लेखकांनी मोलाचे योगदान दिले आहे.

शेवटी संपादक म्हणून मी सर्व प्रथम आदरणीय कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, शिवाजी विद्यापीठ, समाजशास्त्र विभाग प्रमुख व सामाजिक शास्त्र विद्या शाखेशी संबंधीत सर्व प्राध्यापक आणि दूरशिक्षण केंद्राचे सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच मला संपादकीय काम व्यवस्थीत पार पाडणे शक्य झाले आहे. या सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे**

मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**राजकीय समाजशास्त्र**
**एम. ए. भाग–१ : SOE 017**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. दयावती पाडळकर**<br>भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव | १ |
| **डॉ. खंडू संभाजी काळे**<br>कॉलेज ऑफ आर्टस, कोवाड | २ |
| **प्रा. व्ही. जी. पानस्कर**<br>के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर | ३ |
| **प्रा. प्रभाकर रामराव निसर्गंध**<br>श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय, पेठवडगांव | ३ |
| **प्रा. डॉ. विजय मारूलकर**<br>समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १, २, ३, ४ |
| **श्री. बबन पाटोळे**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **प्रा. चंद्रकांत खंडागळे**<br>कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे**
मंगलाताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,
उंब्रज

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप | १ |
| २. | राजकीय समाजशास्त्राचे सैद्धांतिक दृष्टिकोन | २८ |
| ३. | राजकीय सहभाग आणि राजकीय समाजीकरण | ६२ |
| ४. | समकालीन प्रश्न आणि आव्हाने | १११ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**घटक क्र. : १**

# राजकीय समाजशास्त्र

**(Political Sociololgy)**


१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्ट्ये

१.३ विषय विवेचन

- १.३.१ राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप आणि अभ्यास विषय
- १.३.२ राजकीय समाजशास्त्राचा विकास
- १.३.३ राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती
- १.३.४ इतर सामाजिक विज्ञानाशी असणारे संबंध
- १.३.५ राष्ट्राची संकल्पना - राज्य आणि राष्ट्रवाद

१.४ सारांश

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उतरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.१ प्रस्तावना (Introduction) :

समाजशास्त्र हे मानवी समाज जीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. म्हणजेच मानवाच्या सामाजिक संबंधांचा, मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास करते. 'मानवी वर्तन' हे समाजशास्त्राच्या अभ्यासाचे प्रमुख क्षेत्र आहे. समाजशास्त्र हे समाज व व्यक्ती वर्तनाशी संबंधित आहे. त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास समाजशास्त्र करते. तर राज्यशास्त्र हे समाजाच्या राजकीय क्षेत्राचाच फक्त अभ्यास करते आणि राजकीय समाजशास्त्र या दोन्हींचा अभ्यास करते. थोडक्यात, राज्यशास्त्र राजकीय घटनांचा अभ्यास करते व त्याचे राजकीय स्पष्टीकरण देते. तर राजकीय समाजशास्त्र राजकीय प्रश्नांचे मूळ सामाजिक रचनेत शोधण्याचा प्रयत्न करते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप पाहून नेमके त्यामध्ये कोणत्या घटकांचा अभ्यास केला जातो, हे समजून घेण्यासाठी राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासविषय आणि व्याप्तीबाबत सविस्तर स्पष्टीकरण पाहणार आहोत तसेच राजकीय समाजशास्त्र ही शाखा कशी अस्तित्वात आली त्याचा विकास कसा होत गेला हेदेखील अभ्यासणार आहोत.

## १.२ उद्दिष्ट्ये (Objectives) :

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टींचे आकलन होईल.

१) राजकीय समाजशास्त्राचा अर्थ व स्वरूप आपल्याला समजेल.

२) राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासविषय लक्षात येईल.

३) राजकीय समाजशास्त्राचा विकास कसा होत गेला हे समजेल.

४) राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती समजेल.

## १.३ विषय विवेचन :

**(Presentation of Subject Matter)**

या अध्ययन घटकात तुम्ही राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप अभ्यासणार आहात. त्यामध्ये प्रामुख्याने राजकीय समाजशास्त्राचा अर्थ समाजशास्त्राशी केलेल्या व्याख्यानुसार समजून घेणार आहोत. राजकीय समाजशास्त्रात नेमक्या कोणकोणत्या बाबींचा अभ्यास केला जातो याचे आकलन होण्यासाठी त्याचा अभ्यासविषय व व्याप्ती पाहणार आहोत. तसेच राजकीय समाजशास्त्राचा विकास कसा होत गेला हे देखील अभ्यासणार आहोत. या प्रकरणात तीन उपघटकानुसार त्यांचे सविस्तर स्पष्टीकरण दिलेले आहे.

### १.३.१ राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप (Nature of Political Sociology) :

राज्यशास्त्र समाजशास्त्राचा एक भाग आहे. शैक्षणिकदृष्ट्या तो विषय स्वतंत्रपणे विकसित झालेला आहे. समाजशास्त्रामुळे राज्यशास्त्राचा अभ्यास मोठ्या प्रमाणावर विकसित झालेला आहे. कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, मोस्का या समाजशास्त्रज्ञांनी राजकीय अभ्यासकांना प्रभावित केले.

'राजकीय समाजशास्त्र' हा एक नवीन अभ्यास विषय उदयाला येत गेला. राज्याचा विचार करणारे राज्यशास्त्र व समाजाचा विचार करणारे समाजशास्त्र या दोन्हींचा एकत्रित विचार करणारे राजकीय समाजशास्त्र असा सामान्य दृष्टिकोनातून त्याचे स्पष्टीकरण देता येईल.

प्राचीन काळी राज्य आणि समाज यात फरक केला जात नसे. मध्ययुगात प्रादेशिक सार्वभौमत्व राज्यसत्ता अस्तित्वात आली. त्यानुसार धर्म, वंश, जन्म या गोष्टींना सामाजिक एकात्मतेचा आधार समजू लागले. राज्याबाबत विविध विचार मांडले गेले. त्यामध्ये प्रामुख्याने राज्याबाबत आदर्शवादी भूमिका हे वेगळी मांडणी तर राज्यच नको असे अराज्यवादी म्हणू लागले. राज्य म्हणजे भांडवलदारांचे बटिक असे मार्क्स यांनी मत मांडले. राज्य आणि समाज या स्वतंत्र गोष्टी असून राज्याशिवाय समाज अस्तित्वात राहू शकेल. अशी भूमिका कार्ल मार्क्स आणि अराज्यवादी विचारवंतांनी मांडली तर व्हॉन स्टिन आणि मॅक्स वेबर यांच्या विचारातूनही राज्य आणि समाज या दोन भिन्न गोष्टी असल्याचे स्पष्ट केले. काहींनी दोन्हीतील फरक सांगितला तर काहींनी त्यातील परस्परावलंबित्व सांगितले. परंतु हळूहळू राजकीय घटना आणि राजकीय संस्था यामागील आशय अभ्यासकांच्या लक्षात येऊ लागला. आधुनिक काळात राज्य आणि समाज यातील भेद स्पष्ट झाले. राज्य व

समाज त्यातील घटक संस्था, व्यक्ती, व्यक्तीचा समाजावरील प्रभाव, समाजाचा व्यक्तीवरील प्रभाव, त्यांची सामाजिक संबंध, त्यांच्या निर्माण होणाऱ्या आंतरक्रिया यातून नवीन ज्ञानशाखेची गरज भासू लागली.

राजकीय संस्था, राजकीय व्यवस्था, राजकीय नेता वगैरे ज्या पद्धतीने काम करतात ते कसे आहे हे दाखविण्याचे काम समाजशास्त्र करते. समाजशास्त्र राज्यशास्त्राला अभ्यास करण्यासाठी आवश्यक ती सामाजिक स्थिती व तिच्या स्वरूपाची माहिती देते. राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना समाजशास्त्राचा मोठा उपयोग होतो. कारण समाजशास्त्र त्यांना समाजाच्या वर्तनाची, वृत्तींची माहिती पुरविते. ज्याप्रमाणे राजकीय संस्थांच्या अंतरंगाचा व त्यांच्या वर्तणुकीमागील सामाजिक संदर्भाचा अभ्यास महत्त्वाचा मानला जाऊ लागला. त्याप्रमाणे व्यक्तीच्या राजकीय वर्तणुकीचा अभ्यासही समाजशास्त्रज्ञ महत्त्वाचा मानू लागले. मानवाच्या सामाजिक संबंधाच्या मागे व्यक्ती व समाज आधारभूत असतात ही नवीन जाणीव निर्माण झाली. थोडक्यात, राजकीय रचना किंवा संघटना आणि त्यामागील किंवा त्यावर प्रभाव टाकणारे सामाजिक घटक यातील परस्पर संबंधाची जी जाणीव निर्माण झाली त्यातूनच राजकीय समाजशास्त्र पुढे विकसित होत गेली.

**राजकीय समाजशास्त्राची व्याख्या (Definition of Political Sociology) :**

राजकीय समाजशास्त्राचा अर्थ विविध समाजशास्त्रज्ञांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामधील काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे –

**१. एस्. एम्. लिपसेट :** ''समाज आणि राज्यव्यवस्था यातील व सामाजिक रचना आणि राजकीय संस्था यातील परस्पर संबंधांच्या अभ्यासाला राजकीय समाजशास्त्र असे म्हणता येईल.''

**S. M. Lipset :** "Political Sociology can be defined as the study of interrelationship between society and polity, between social structures and Political institutions."

**२. प्रा. ए. के. मुखोपाध्याय :** ''राजकीय समाजशास्त्र म्हणजे राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचे परस्परांवर वैचारिक अभिसिंचन असून त्यात समाजाचा राजकारणावर आणि राजकारणाचा समाजावर होणारा प्रभाव अभ्यासण्यात येतो आणि राजकीय तथ्यांकडे सामाजिक संदर्भातून पाहण्यात येते.''

**Prof. A. K. Mukhopadhyaya :** "Political Sociology may be defined as the product of cross-fertilization between sociology and Political Science that studies the impact of society on politics and also the reverse, although viewing the substance of Politics in a Social form."

**३. रश व अल्थॉफ :** ''राजकीय समाजशास्त्र म्हणजे राजकारण व समाज, राजकीय व सामाजिक रचना आणि राजकीय सामाजिक वर्तणुक यांतील संबंध अभ्यासणारे शास्त्र होय. राजकीय समाजशास्त्र म्हणजे समाजशास्त्र व राज्यशास्त्र यांना जोडणारा सैद्धांतिक पूल होय.''

**४. ससीमन :** ''राजकीय समाजशास्त्र हे राजकीय गोष्टींचा एक स्वतंत्र सामाजिक घटक म्हणून अभ्यास करणारे शास्त्र आहे.''

**५) डाऊझे :** ''समाजशास्त्राच्या चौकटीत केलेला राजकीय वर्तणूकीचा अभ्यास म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय.''

वरील व्याख्यांवरून राजकीय समाजशास्त्र म्हणजे राजकीय घडामोडींचे आणि सत्तासंबंधांचे समाजातील तत्संबंधी पायाभूत सामाजिक संबंध आणि प्रक्रियांच्या आधारे विश्लेषण व आकलन होय.

राज्यशास्त्र राजकीय घटनांचा अभ्यास करते व त्याचे राजकीय स्पष्टीकरण देते. तर राजकीय समाजशास्त्र राजकीय प्रश्नांचे मूळ सामाजिक रचनेत शोधण्याचा प्रयत्न करते.

राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप अधिक व्यापक आहे. मात्र राजकीय समाजशास्त्राच्या संदर्भात अभ्यासक्रमात एकवाक्यता नाही. त्यांनी मांडलेल्या मतांमध्ये विरोधाभासी आहे.

राजकीय समाजशास्त्राचे वेगळेपण स्पष्ट करताना बेंडिकस व लिपसेट हे 'दि फिल्ड ऑफ सोशियॉलॉजी' या पुस्तकात लिहितात की, ''राज्यशास्त्र अभ्यासाची सुरवात राज्यापासून करते व त्याचा राज्यावर काय परिणाम होतो इथपर्यंत येते तर राजकीय समाजशास्त्र हे समाजापासून अभ्यासाला सुरवात करते व त्याचा राज्यावर काय परिणाम होतो इथपर्यंत ते पोहोचते.''

थोडक्यात, राजकीय समाजशास्त्र राज्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करत नाही तर समाजाच्या संदर्भात राज्याचा अभ्यास करते. असेही मत लिपसेट यांनी व्यक्त केले आहे. पुढील मुद्द्यांवरून राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप अधिक स्पष्ट होईल.

**१. राजकीय समाजशास्त्र हे राज्याचे शास्त्र आहे :** काही विचारवंतांच्या मते, राजकीय समाजशास्त्र हे राज्याचे शास्त्र आहे. त्याचे स्वरूप राजकीय आहे. शाहूंचे राज्य व शासकीय किंवा सरकारी राज्य यांचा ते अभ्यास करते. शाहू राज्यात शास्त्रीय समाजाचा समोवश होतो तर सरकार राज्यामध्ये नेत्यांचा व सत्ताधिशांचा समावेश होतो.

**२. समाज व राजकारणातील आंतरक्रियांचा अभ्यास :** काहींच्या मते, समाज व राजकारण यांच्यात जी आंतरक्रिया निर्माण होते त्याचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. या संदर्भात लिपसेट व बेनडिक्स यांचे असे मत आहे की, राज्यशास्त्राच्या अभ्यासाची सुरवात राज्यापासून करते व त्याचा समाजावर काय परिणाम होतो, ते दाखविते आणि राजकीय समाजशास्त्र अभ्यासाची सुरवात राज्यापासून करते व त्याचा राज्यावर कसा परिणाम होतो, हे दाखविते.

**३. राजकीय समाजशास्त्राचे आंतरअभ्यासशास्त्रीय स्वरूप :** राजकीय समाजशास्त्र हे केवळ राज्यशास्त्राची शाखा नाही आणि केवळ समाजशास्त्राचीही शाखा नाही तर ती समाजशास्त्र व राज्यशास्त्राचे मिश्र स्वरूप आहे. त्या दोन्हींचा एकत्रित पद्धतीने अभ्यास करते. या दृष्टिने विचार केल्यास राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप हे आंतरअभ्यासशास्त्रीय (Interdisciplinarly) स्वरूप आहे.

**४. राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप अवलोकनात्मक व वर्तनवादी आहे :** राजकीय समाजशास्त्रात राज्यशास्त्रीय विषयांचा विशिष्ट सामाजिक संदर्भात अवलोकनात्मक अभ्यास केला जातो. त्यामुळे या शाखेचे स्वरूप वर्तनवादी बनते. कारण याला संख्याशास्त्र व समाजशास्त्राची मदत मिळते. त्याचप्रमाणे राजकीय व्यवस्था, प्रक्रिया, समाजीकरण, संस्कृती इ. संकल्पनाच्या विश्लेषणासाठी राजकीय समाजशास्त्रास समाजशास्त्र मोठ्या प्रमाणात मदत करते. त्यामुळेच या शाखेचे स्वरूप अवलोकनात्मक, वर्तनवादी असे आहे.

**५. राजकीय समाजशास्त्र हे सत्तेचे शास्त्र आहे :** राजकीय समाजशास्त्र सत्तेचा अभ्यास करते. ते शासनाचा अभ्यास करते. याबाबत लिओन डुगीट यांनी मत मांडले. ते म्हणतात, ''प्रत्येक समाजात काही शासक तर काही शास्त्रीय असतात. काही आज्ञा देतात तर काही आज्ञाचे पालन करतात. काही आदेश देतात तर काही त्यानुसार काम करतात म्हणजेच राजकीय समाजशास्त्र हे शासन, आज्ञा देण्याचा अधिकार याचे शास्त्र आहे.''

वरील स्पष्टीकरणावरून राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप स्पष्ट होते. त्याच्या अभ्यासाची व्यापकता लक्षात येते.

**राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासविषय (Subject Matter of Political Sociology) :**

राजकीय समाजशास्त्रात जो अभ्यास अभिप्रेत आहे त्यानुसार त्याचा अभ्यासविषय अधिक स्पष्ट होईल. अभ्यासण्यासंदर्भात काही महत्त्वाचे मुद्द्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे.

**१. राज्य व समाज यांच्या अभ्यासावर भर :** राजकीय समाजशास्त्र राज्य आणि समाज या दोन्ही गोष्टींचा एकत्रित म्हणजे त्यांच्या परस्पर संबंधांचा त्यांच्या परिणामांचा अभ्यास करते. याबाबत बेंडिक्स व लिपसेट म्हणतात की राज्यशास्त्रात राज्याचा व राज्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करते. परंतु इथे राजकीय समाजशास्त्र समाजाचा अभ्यास करून त्याचा राज्यावर काय परिणाम होऊ शकतो हे निदर्शनास आणून देते.

**२. राजकीय संस्था व इतर संस्थांचा अभ्यास :** मानवी जीवनामध्ये विविध प्रकारच्या सामाजिक संस्था आहेत. अर्थसंस्था, राज्यसंस्था, शिक्षणसंस्था, कुटुंब संस्था, विवाह संस्था अशा विविध सामाजिक संस्था आहेत. त्यापैकी राजकीय संस्था ही एक संस्था आहे. लिपसेट म्हणतात की, राज्य व समाज असा फरक करून कोणाचे महत्त्व किंवा वर्चस्व मोठे हे सांगणे चुकीचे आहे. कारण व्यक्तीसाठी किंबहुना समाजासाठी सर्व सामाजिक संस्था या परस्परांना पूरक आहेत. परस्परांशी संबंधित व एकमेकावर अवलंबून आहेत आणि राजकीय संस्था तर सामाजिक संस्थांच्या वरचे कवच आहे. त्यामुळे सर्व सामाजिक संस्थांचे संबंध हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे. आणि राजकीय संस्था व इतर सामाजिक संस्था हा राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे.

**३. सत्तावाटप व सत्ताकार्यवाहीचा अभ्यास :** राजकीय समाजशास्त्र ही केवळ समाजशास्त्राची शाखा नाही किंवा केवळ राज्यशास्त्राची ही शाखा नाही, असे मत मांडले गेले. अर्थात राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासविषय राज्यशास्त्रीयच असतो कारण राज्याप्रमाणे राजकीय समाजशास्त्र सत्तावाटप व सत्ता कार्यवाहीचा अभ्यास करते मात्र असे करत असताना सामाजिक संदर्भाचा विचार करूनच कार्य करते.

**४. संघटनांच्या औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही विभागांचा अभ्यास :** राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास विषय हा संघटनांच्या औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही विभागांचा आहे. शासन, नोकरशाही, विधी व्यवस्था, हितसंबंधी गट, मतदार या सर्वांशी संबंधित अभ्यास हा औपचारिक व अनौपचारिकरित्या केला जातो व हा अभ्यास संघटनात्मक दृष्टिकेनाचा असतो.

थोडक्यात, राजकीय समाजशास्त्राचा मुख्य उद्देश हा सामाजिक, मनोवैज्ञानिक व आर्थिक क्षेत्राशी संबंधित अशी परिस्थिती निर्माण करतात की ज्यामुळे राजकीय लोकशाही भक्कम होईल.

राजकीय समाजशास्त्राचा मुख्य उद्देश म्हणजे राजकीय व्यवस्थेतील स्थैर्य कोणत्या गोष्टीमुळे टिकून राहते किंवा कोणत्या गोष्टींमुळे धोक्यात येते याचा देखील अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. सत्ता, अधिकार व प्रभाव यामागे कोणते सामाजिक आधार असतात सनदशीररित्या ही व्यवस्थेच्या स्थिरतेसाठी कशी महत्त्वाची असते याचाही अभ्यास केला जातो. म्हणजेच राजकीय वर्तणुकीतील गुंतागुंत समजून येण्याच्या दृष्टीने राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास निश्चितच उपयोगी पडतो.

### १.३.२ राजकीय समाजशास्त्राचा विकास (Development of Political Sociology) :

मानव हा समाजशील प्राणी आहे. तसेच मानव हा गतिशीलही आहे. मानवाने आपले अस्तित्व टिकविण्यासाठी सामूहिक कृतीने जगण्यास सुरवात केली. त्याचबरोबर अस्तित्व दीर्घकाळ राहिले पाहिजे यासाठी काळानुसार व परिस्थितीनुसार बदलत गेला. परिवर्तनाशिवाय समाजाची / माणसाची प्रगती नाही, याचाही विचार करत आला. सामाजिक बदल हा प्रामुख्याने आर्थिक चळवळी व राजकीय जनजागृती या दोन क्षेत्रातून अधिक झाला.

प्राचीन काळी राज्य व समाज यात भेद स्पष्ट नव्हता. साधारणपणे मध्ययुगाच्या अखेरिस हा भेद स्पष्ट होऊ लागला. राज्याचा आधार केवळ धार्मिक नसून प्रादेशिक सार्वभौमत्त्व असतो ही संकल्पनाही स्थिर झाली. तेव्हापासून राज्य व समाज भेद स्पष्ट होऊ लागला. पुढे त्यामध्ये काही प्रश्न निर्माण झाले. राज्य व समाज यात संबंध काय? राज्याचा समाजावर प्रभाव पडतो की समाजाचा राज्यावर पडतो, राज्याचे व समाजाचे व्यक्तीशी संबंध कोणते? राज्याचे आर्थिक, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, सामाजिक स्तरीकरण, रुढी, परंपरा इ. शी राज्याचे काय संबंध? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यातून राजकीय समाजशास्त्राची शाखा उदयाला आली.

पुढे सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समाजवाद व राजकीय क्षेत्रात लोकशाहीचे प्रयोग सुरू झाले. राज्यशास्त्राच्या अभ्यासकाला सामाजिक प्रक्रियांकडे डोळसपणे पाहून त्यातून राजकीय तथ्ये टिपणे व उकलणे आवश्यक ठरते. परिणामी राजकारणाचे समाजशास्त्र (Sociology of Politics) किंवा राजकीय समाजशास्त्र (Political Sociology) ही आंतरशास्त्रीय (Interdisciptnang) अभ्यास विषय शाखा अस्तित्वात आली. या राजकीय समाजशास्त्राचा विकास कसा होत गेला हे पाहणे आवश्यक ठरते.

राजकीय समाजशास्त्राच्या विकासाचे स्थूल मानाने चार टप्पे करता येतील.

### १) राजकीय समाजशास्त्राचा सुवर्ण काळ :

पहिला टप्पा हा ग्रीक व रोमन काळाचा. यावेळी मानवाला राजकीय प्राणी समजले जात होते. पण पवित्र रोमन साम्राज्यात त्यास दैवी शक्तीचा भाग मानले जात होते. राजकीय विचारवंत प्लेटो, ॲरिस्टॉटल, सिसटो, सेंट ऑगस्टीन, सेंट थॉमस, ॲक्वीनास याचा काळ राजकीय समाजशास्त्राचा सर्वोत्तम काळ समजला जातो. या काळात विविध विचारवंतांनी विविध समाजातील फरकाचा अभ्यास केला व दोन भिन्न सामाजिक रचनेचा राजकारणावर कसा भिन्न परिणाम होतो हे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यातील प्रमुख विचारवंत पुढीलप्रमाणे -

**१. प्लेटो :** प्लेटोनी त्यांच्या ग्रंथात, ''राज्याचा उदय माणसाच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजेतून झाला असे मत मांडले. राज्याचा मुख्य उद्देश म्हणजे सर्वांचा विकास, न्याय व सुव्यवस्था समाजात निर्माण करणे हा आहे. म्हणजेच सामाजिक सुव्यवस्थेसाठी राज्याची निर्मिती झाली व तेच काम राज्याचे आहे. तत्त्वज्ञ राजा असावा. सर्वानुमते शासक ठरविला जाऊ नये, हे प्लेटोचे महत्त्व अधिक आहे.

**२. ॲरिस्टॉटल :** ॲरिस्टॉटलच्या मते, कुटुंबाचा जन्म झाला त्याचवेळी राज्य निर्मिती प्रक्रियेला सुरवात झाली. कारण तेव्हाच आज्ञा देणारा व पालन करणारा असे दोन वर्ग निर्माण झाले. कुटुंबातून जमात निर्माण झाली. जमातीतून टोळ्यांची निर्मिती झाली. टोळ्यांनी समाज निर्माण केला व समाजाद्वारे राज्याची निर्मिती झाली. राज्य हे नैसर्गिक आहे. कारण ते व्यक्ती प्रकृतीची निर्मिती आहे.

**३. सेंट ऑगस्टीन व ॲक्वीनास :** रोमन विचारवंतांच्या मते, समाजात 'विवेक' असतो. हा ईश्वरी अंश आहे. विवेकाने राज्य निर्माण केले. ऑगस्टीन व ॲक्वीनासच्या मते, दैवी शक्ती समाजात मार्गदर्शन करते. ही दैवी शक्ती चर्चमध्ये असते. मानवाचे भवितव्य राज्य व चर्चशिही जोडलेले असते. समाजाच्या उत्क्रांतीत नसते.

**४. गॅब्रिअल आलमंड :** आलमंड म्हणतात की, प्लेटो व ॲरिस्टॉटल आणि नंतरच्या रोमन शास्त्रज्ञांनी केलेली राज्याची राजकीय व्यवस्थांची - वर्गीकरणेही प्रामुख्याने तत्कालीन सामाजिक प्रशिस्तीकरण व त्याचे राजकीय व्यवस्थेत प्रतिबिंब यावर आधारित आहेत. राजकीय निर्णय-प्रक्रियेला त्यात दुय्यम स्थान आहे. म्हणून त्यांच्या मते (अभिजात - Classical) राजकीय सिद्धांत हे जास्त प्रमाणात राजकीय समाजशास्त्र, मानवशास्त्र आणि प्रामाण्यवादी (Normative) राजकीय सिद्धांताच्या स्वरूपात असून राजकीय प्रक्रिया सिद्धांतापासून दूर आहेत.

### २) भिन्न मतांवर / विचारांवर चर्चा :

दुसरा टप्पा महत्त्वाचा आहे कारण या काळात दोन भिन्न मतांवर वाद झाला. काहींच्या मते, व्यक्तीचा जन्म राज्य व समाजाची सेवा करण्यासाठी झालेला आहे. तर काहींच्या मते, व्यक्तीच्या विकासाला मदत करण्यासाठी राज्य निर्माण करण्यात आलेले आहे. लॉक, मॉन्टेस्क्यू, रूसो, मार्क्स यांच्या मते राज्य व समाज वेगळे आहेत तर हॉब्ज, बर्क, मॅकाव्हली यांनी राज्य व समाजात फरक केला नाही.

**१. लॉक :** लॉकच्या मते समाजात व्यक्तीला अधिकार होते. अधिकार समाजनिर्मिती आहेत तेव्हा

राज्याच्या निर्मितीनंतर ते नैसर्गिक अधिकार राहणारच.

२. **मॉन्टेस्क्यू :** मॉन्टेस्क्यूच्या मते जगमान्य शासनाचा आदर्श प्रकार असूच शकत नाही. कारण प्रत्येक शासनात त्या देशाची वैशिष्ट्यपूर्ण समाजरचना प्रतिबिंबीत झालेली असते. सामाजिक घटक राजकीय जीवनावर परिणाम करतात. राजकीय जीवनात स्थित्यंतरे घडवतात. लोकसंख्येत झालेल्या वाढीमुळे राजकीय जीवनात व रचनेत बदल झाले. मॉन्टेस्क्यूने या गोष्टीला महत्त्व दिले. मॉन्टेस्क्यूच्या या महत्त्वपूर्ण विश्लेषणामुळेच रेमांड अरान या अभ्यासकाने मॉन्टेस्क्यूला पहिला सामाजिक विचारवंत म्हणून संबोधले.

३. **हर्बर्ट स्पेन्सर (१८२०–१९०३) :** समाजशास्त्र विषयाची सुसुंगत बांधणी करणारा विचारवंत म्हणजे हर्बर्ट स्पेन्सर दी प्रिन्सिपल ऑफ सोशियॉलॉजी या त्रीखंडात्मक ग्रंथातून १८७६–९६ या कालावधीमध्ये त्यांनी समाजशास्त्राची बांधणी केली. मानवाच्या उत्क्रांतीविषयक डार्विनच्या सिद्धांताला पूरक असे विचार स्पेन्सरने मांडले. राज्याची सेंद्रिय उपपत्ती त्याने पुरस्कारली. शरीरासारखेच राज्यदेखील उत्पत्ती, स्थिती, लय या नियमांनी बद्ध असते, असे मत त्यांनी मांडले. निसर्गाला नीती नसते. गुणावगुणांची चाड नसते. म्हणून मानवी व्यवहारात निसर्ग नियम संस्कारित करून घ्यावे लागतात असे त्याचे प्रतिपादन होते. थोडक्यात स्पेन्सरच्या मते सामाजिक रचनेत अनेक सामाजिक संस्था असतात. त्या संस्था प्रभावीपणे सामाजिक व राजकीय कामे पार पाडत असतात.

४. **कार्ल मार्क्स (१८१८–१८८३) :** कार्ल मार्क्स या जर्मन विचारवंताने सामाजिक शास्त्रांच्या अन्योन्य संबंधाचा सूक्ष्म विचार केला होता. हेगेलचा 'विरोध विकास' सूत्रांचा अवलंब त्याने केला होता. भौतिक इतिहासाची वाटचाल ही वस्तुस्थिती (थेसीस) विरोधी स्थिती (अँटी थेसीस) व परिजत स्थिती (सिंथेसीस) अशा सूत्राने विकसीत होत असते, असे कार्ल मार्क्सने मांडले. यालाच डायलेटीकल मटेरियालिझम किंवा विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद असे संबोधले जाते. मार्क्सच्या मते, मानवाच्या ऐतिहासिक विकासामागील प्रेरक शक्तींचे रूपांतर आर्थिक रचनात होते. प्रत्येक देशाच्या त्या त्या काळच्या सामाजिक, राजकीय व वैधानिक रचना मुख्यत: आर्थिक व्यवस्थेवर आधारलेले असते. असे अनुमान त्यांनी काढले. राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टीने कार्लमार्क्सचे विचार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) विरोधाशिवाय विकास होत नाही. भांडवलदार मजूर यांचे संबंध विरोधाचेच त्यामुळे वर्गसंघर्ष निर्माण झाला. भांडवलदारी नष्ट करण्यासाठी कामगारांनी राजसत्ता हाशील करण्याची प्रेरणा बळावली. शोषणरहित समाजाचे स्वप्न रंगविले.

२) राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टीने मार्क्सने मांडलेला मुख्य विचार म्हणजे, सामाजिक शास्त्रे परस्परासंबंधी असतात. ती स्वतंत्र शास्त्रे म्हणून परिपूर्ण असत नाहीत. कारण समग्र मानवी व्यवहारांच्या विविध पैलूंचा एकत्रित विचार करणे राजकीय समाजशास्त्राला अभिप्रेत असते.

३) समाजातील एका भागातील दोष दूर करण्यासाठी दुसऱ्या भागातील साधन सामग्रीचा उपयोग होत असावा. तसे करावे लागते. उदा. वर्गसंघर्ष टाळण्यासाठी राजकीय सत्ता हस्तगत करावी लागते. आणि आर्थिक समता आणण्यासाठी राजकीय व्यवस्थेत क्रांती घडवून आणावी लागते.

थोडक्यात, राज्य आणि समाज या स्वतंत्र गोष्टी असून राज्याशिवाय समाज अस्तित्वात राहू शकेल अशी भूमिका कार्ल मार्क्स आणि अराज्यवादी विचारवंत यांनी घेतली.

कार्ल मार्क्सचे राजकीय समाजशास्त्राला व समाजशास्त्राच्या राजकारणाला मोठे योगदान आहे. त्यांच्या मते, समाजातच व्यक्ती इच्छित गोष्टींची पूर्तता करू शकतो. पण त्यासाठी राज्याची आवश्यकता नाही. राज्याला मार्क्स 'False Conciousness' म्हणतो. राज्याने व्यक्तीला गुलामगिरीच्या बेड्यात अडकविले, त्यास मुक्त केले नाही. मार्क्स समाजरचनेला महत्त्व देतो. समाजरचनेत झालेला बदल राज्यात व त्याच्या स्वरूपात बदल घडवून आणतो, असे मार्क्सचे मत आहे.

**५. डरखाईम (१८५०-१९१७) :** डरखाईमने काल्पनीक गोष्टींवर विश्वास न ठेवता त्यांनी सामाजिक रचनेचा व कामाचा प्रत्यक्ष अभ्यास केला व सामाजिक राजकीय सिद्धांत मांडला. त्यांनी सिद्धांत मांडण्यासाठी तार्कीक व कल्पनेचा आधार न घेता मोठ्या प्रमाणात माहितीचा आधार घेतला व त्याचे विश्लेषण करून सिद्धांत मांडले.

**६. मॅक्स वेबर (१८६४-१९२०) :** राजकीय समाजशास्त्राचा जनक असा दर्जा असलेला कार्ल मार्क्स खालोखाल महत्त्वाचा जर्मन विचारवंत म्हणजे मॅक्स वेबर तो ग्रॅहम कॅमेलचा समकालीन होता. वेबरच्या मते, राजकारण म्हणजे सत्ता वाटणाच्या खटाटोपातील भागीदारी अथवा सत्ताकरणावरील आपला प्रभाव वाढविणे. राज्य म्हणजे असा समाज ज्याकडे सत्तेचा वापर करण्याची अधिमान्यता आहे.

मॅक्स वेबरचा भर राज्याच्या सत्तेचा वापर समर्थनीय किंवा अधिमान्य होतो की नाही या तपासनीकडे जास्त आढळतो. यातूनच 'लेजिटीमसी' अधिमान्यता ही अभिनव राजकीय संज्ञा वापरात आणल्याचे श्रेय वेबरकडे जाते.

मॅक्स वेबर, रॉबर्ट मायलेक्स, विलफ्रेड पॅरेटो, एमिल डरखाईम यासारख्या समाजशास्त्रज्ञांनी राजकीय विश्लेषणाला समाजशास्त्रीय अध्ययनात महत्त्व दिले. मूल्यविरहित विश्लेषणाचा व रचनात्मक कार्यवादाचा पुरस्कार मॅक्स वेबरने केल्यामुळे राजकीय समाजशास्त्राच्या संदर्भात त्याचे कार्य पायाभूत समजण्यात येते. मात्र मॅक्स वेबर यांनी 'राजकीय' (The Political) चा अर्थ केवळ सामर्थ्य किंवा बाळाशी संबंधित असा केला आहे. अर्थात समाजातही अनेक सत्तास्थाने असून ती केवळ सामाजिकच नव्हे तर राजकीय प्रक्रियांचेही नियंत्रण करू शकतात.

**७. मॅकाव्हलि :** यांनी समाज व राज्याच्या संदर्भात मत व्यक्त करताना म्हटले की, समाजाने जर उदारता स्विकारली तर राज्य समाप्ती निश्चित आहे. सत्ताधिशाने राज्य करताना कोणत्याच नितीनियमांचा विचार करू नये, असा विचार मांडला.

**८. बर्क :** बर्कच्या मते वर्तमान समाज वर्तमान नसतोच. तो परंपरा, चालीरीती, संस्थांनी बांधलेला असतो. या परंपरा, संस्था संपविता येत नाहीत. त्याचा पगडा समाजाच्या सर्व अंगावर असतो. राज्य त्याला अपवाद नाही.

थोडक्यात, समाज, सामाजिक संस्था यांचा राज्यावर होणारा परिणाम तसेच राज्य निर्मितीमध्ये समाजाचा वाटा आणि त्यानंतर त्याचा समाजावर झालेला परिणाम याबाबत विविध विचारवंतांनी तार्कीक, प्रत्यक्ष पाहणी व समाज प्रवृत्ती लक्षात घेऊन विविध मते मांडली. यातूनच पुढे राजकीय समाजशास्त्राला आकार देण्याच्या विचारांची निर्मिती झाली.

### ३) अभिजनाची भूमिका :

तिसरा टप्पा अतिशय महत्त्वाचा आहे. १९ व्या शतकात श्रेष्ठजनाचा (Elites) विचार प्रभावीपणे मांडण्यात आला. आधुनिक समाजात श्रेष्ठजन / अभिजन याच्या भूमिकेला महत्त्व देण्यात आले. शासन कोणतेही असो अभिजनच नेहमी सत्तेवर असतात, असा विचार मांडण्यात आला. म्हणजेच साधारणत: प्रभावी व्यक्तींचा अभिजनात समावेश होतो.

पॅरोटो व मोस्का यांनी १९ व्या व २० व्या शतकात अभिजन केंद्र कल्पून सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, ज्यांना अभिजन म्हटले जाते ते समाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्याजवळ सत्ता असते, लष्कर असते, पैसा असतो. अभिजन वर्ग प्रत्येक समाजात सारखाच नसतो. परंतु हा वर्ग शासन करणारा असतो. राजेशाहीत मोजक्याच व्यक्तींच्या हातात सत्ता होती. महाजन सत्तेमध्ये तेच होते, अगदी लोकशाहीत देखील सर्वांच्या हातात सत्ता असते असे म्हटले जात असले तरीही प्रत्यक्षात मोजक्याच अभिजनांच्या हातात सत्ता असते. समाजातील हाच वर्ग सत्ताधीश असतो.

लोकशाहीमुळे परंपरागत समाजरचनेला धक्का बसला. परंपरागत अभिजन सत्तेवरून दूर फेकले गेले. याचा अर्थ राजकीय व्यवस्थेच्या स्वरूपात बदल झाला की समाजारचनेत बदल होतो व राजकीय अभिजनात देखील बदल होतो. लोकशाहीमुळे 'पारंपारिक अभिजन' संपले व गुणवत्तेच्या निकषावर समाजाला नियंत्रित करणारे अभिजन निर्माण झाले. मात्र लोकशाहीतही अभिजनच समाजाला, राज्याला नियंत्रित करतात.

अभिजन दृष्टिकोनामुळे राजकीय समाजशास्त्राच्या उत्क्रांतीत मोठा बदल झाला. राजकीय समाजशास्त्राने एक पाऊल पुढे टाकले. समाजाकडे पाहण्याचा अभिजन दृष्टिकोन एक महत्त्वपूर्ण सैद्धांतिक पाऊल आहे.

### ४) आधुनिक विचार प्रवाह :

यामध्ये वास्तविकतेवर आधारित विश्लेषणाला व संशोधनाला महत्त्व देण्यात आले. समाज व राजकारण यांची सांगड घालून काही सर्वसाधारण विधाने केली गेली. काही सिद्धांत प्रत्यक्ष पाहणी करून मांडले. त्यामध्ये पुढील विचारवंतांचा उल्लेख करावा लागेल.

**१. आर्थर बेंटले :** या विचारवंताने ग्रॅहम वॅलेसप्रमाणे वस्तुनिष्ठ दृष्टिकोन पुरस्कारला. आपला 'दी स्टडी ऑफ ग्रुप्स इन पॉलिटिक्स' या ग्रंथातून बेंटलेने राजकीय पक्ष, निर्वाचन पद्धती, लोकमत प्रभाव, दबाव गट इ. नव्याने निर्माण होत असलेल्या अनौपचारिक शक्ती संस्थांचा अभ्यास मांडला.

**२. रॉबर्ट ढॉल :** या विचारवंतांच्या मते ज्या मानवी संबंधात सत्ता, शक्ती किंवा अधिकार विशेष प्रमाणात

समाविष्ट असतात ती व्यवस्था राजकीय मानली पाहिजे. त्यांनी राजकीय स्तरालाच नव्हे तर कोणत्याही सामाजिक स्तरावर राजकीयत्व असू शकते असे मान्य केले आहे. दखल घेण्याइतपत प्रमाणात सत्ता, निगमन किंवा अधिकार ज्या मानवी संबंधाच्या आकृतीबंधात असेल तिथे राजकीय व्यवस्थाच मानावी लागेल असे ढॉलचे मत आहे.

**३. डेव्हिड ईस्टन :** 'दी पॉलिटिकल सिस्टिम' (१९५३) या आपल्या ग्रंथातून राजकीय व्यवस्थेत, अधिकारांची युक्तायुक्तता व मूल्यंची नियुक्ती यावर भर दिला. डेव्हिड ईस्टन हा आधुनिक व्यवस्था विश्लेषणाचा थोर पुरस्कर्ता मानला जातो. राजकीय व्यवस्थेचे घटक, तिची कार्य पद्धती इत्यादींची व्यापक संकल्पनात्मक चौकट त्यांनी पुरविली.

**४. डेव्हिड ॲप्टर :** या अमेरिकन विचारवंताने दी पॉलिटिक्स ऑफ मॉडनीयझेशन (१९६५) या ग्रंथात असे विचार मांडले की, आधुनिक विश्लेषणाला केवळ मूल्यरहित होणारे इतर परिणाम देखील लक्षात ठेवावे लागतात. त्याशिवाय धोरणांच्या निवडीचे विश्लेषण पोकळ ठरते.

या विचारवंतांबरोबरच लिपसेट, मुर, हंटर या महत्त्वाच्या अभ्यासकांचा समावेश होतो. राजकीय समाजशास्त्राला शास्त्राचा आधार देण्यासाठी या काळात अधिकाधिक वास्तविकतेची जोड देऊन राजकीय प्रक्रिया समाजशास्त्राच्या अभ्यास पद्धतीनुसार शोधण्याचा प्रयत्न झाला.

**सारांश :**

राजकीय समाजशास्त्र ही नवीन शाखेचा कशा पद्धती विकास होत गेला याचे स्पष्टीकरण वरील मुद्द्यांवरून लक्षात येते. राजकीय व सामाजिक या दोन्ही गोष्टी परस्परांशी पूरक आहेत. पूर्वी राज्य व समाज यात भेद मानला परंतु पुढे समाजाशिवाय राज्य होऊ शकत नाही हे स्पष्ट होत गेले. त्यानुसार विविध समाजशास्त्रज्ञांनी राजकीय समाजशास्त्राच्या विचार प्रवाहांचे परिस्थितीनुसार आपापले विचार मांडले ते वरील स्पष्टीकरणावरून लक्षात येते.

### १.३.३ राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती :

**(Scope of Political Sociology)**

राजकीय समाजशास्त्र ही समाजशास्त्रातील अभ्यासशाखा तुलनात्मक दृष्ट्या अगदी अलीकडची असल्यामुळे त्याच्या अभ्यासविषयाची व्याप्ती तशी गुंतागुंतीची आहे.

पारंपारिक राज्यशास्त्रात संविधानात्मक तरतुदींच्या आधारे खास राजकीय, शासकीय स्वरूपाच्या संस्थांचाच अभ्यास केला जाई. परंतु विकास पावलेल्या इतर सामाजिक शास्त्रांच्या प्रभावामुळे राजकीय पक्ष, दबाव गट, संयुक्त माध्यम ते, संप, निदर्शने, चळवळी, गट-संघर्ष यांचाही राजकीय व शासकीय क्षेत्राशी निकटाचा संबंध असतो. ही जाणीव झाली. राजकीय समाजशास्त्रात या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यात येऊ लागला.

राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्तीबाबत विविध समाजशास्त्रज्ञांनी स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला आहे त्यातील काही प्रमुख समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्तीचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे -

**(१) सेक्झनिक :** सेक्झनिक यांनी राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्तीबाबत पुढील पाच गोष्टींचे स्पष्टीकरण केले.

१. राजकीय व्यवस्थेच्या सामाजिक आधारांचा अभ्यास.

२. राजकीय वर्तणुकीमागील सामाजिक आधारांचा अभ्यास.

३. राजकीय प्रक्रियेच्या सामाजिक अंगाचा अभ्यास.

४. राजकीय निर्णयाचा सामाजिक प्रक्रियांवर कसा व कोणता प्रभाव पडेल याचा अभ्यास.

५. समाजातील किंवा गटातील संघर्ष राजकीय प्रक्रियेवर कसा प्रभाव टाकतात, त्यामुळे तडजोड व समन्वय कसा घडून येतो व कोणत्या प्रकारच्या संघर्षाची शक्यता निर्माण होते इत्यादींचा अभ्यास.

**(२) बेंडिक्स व लिपसेट :** यांनी राजकीय समाजशास्त्र पुढील गोष्टींचा अभ्यास करते असे म्हटले आहे.

१. लोकांची मतदान प्रवृत्ती.

२. अर्थसत्तेचे केंद्रिकरण व राजकीय निर्णय प्रक्रिया.

३. राजकीय चळवळीमागील विचारप्रणाली तसेच हितसंबंधी गटांच्या विचार प्रणाली.

४. राजकीय पक्ष, ऐच्छिक संघटना, अभिजनविषयक किंवा अल्पसत्ताक विषयक प्रश्न व वस्तुस्थिती आणि

५. शासनसंस्था व नोकरशाही.

**(३) ग्रीअर व ऑरलिन्स :** यांनी राजकीय समाजशास्त्राचा 'राज्य' या सामाजिक रचनेच्या अभ्यासाशी संबंधित असल्याचे सांगितले. त्यांच्या मते राजकीय समाजशास्त्राला पुढील गोष्टीत स्वारस्य असते.

१. राज्याची संरचना.

२. सनदशिरतेचे स्वरूप व त्यामागील परिस्थिती.

३. सक्तीच्या अधिकाराचे स्वरूप व राज्याकडून होणारा त्याचा उपयोग.

४. राज्याच्या उपघटकांचे स्वरूप व त्यांचा राज्याशी संबंध इ. हेच घटक सारांश रूपाने मांडताना त्यांनी राजकीय समाजशास्त्राबाबत समन्वय किंवा एकमत, सनदशिरता, सहभाग, प्रतिनिधीत्व आणि आर्थिक प्रगती व राजकीय बदल यांचा संबंध या संकल्पनांचा अभ्यास करतात.

अशा रीतीने राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती विशिष्ट अभ्यास विषयाच्या स्वरूपात सांगण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केल्याचे दिसते.

राजकीय समाजशास्त्राच्या वरील विविध समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्तीवरून राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट होते. त्याचबरोबर राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्तीबाबतीत आणखी

काही स्पष्टीकरण पुढे दिले आहे.

१. राजकीय सत्तेचे वितरण आणि सत्तेची संकल्पना तसेच सामाजिक प्रस्तरीकरण सत्ता यांचा परस्पर संबंधात्मक अभ्यास करण्यात येतो.

२. अधिकार व अधिमान्यता या दोन संकल्पना अभ्यासल्या जातात.

३. नोकरशाही – सत्ताधिष्ठित संघटित वर्ग म्हणून नोकरशाहीचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

४. राजकीय सामाजीकरण – राजकीय संस्कृती ज्या प्रक्रियेमुळे बदलते किंवा संचयी केली जाते म्हणजेच ज्या प्रक्रियेमुळे नागरिकांना राजकीय दृष्टिकोन मिळतो व त्यानुसार त्यांचे वर्तन घडते अशा राजकीय समाजीकरणाचा अभ्यास करते.

५. राजकीय संस्कृती – प्रत्येक समाजाची जीवनाची एक विशिष्ट संस्कृती असते त्यामध्ये व्यक्तीच्या श्रद्धा, प्रतिके, जीवनमूल्ये यांचा अंतर्भाव होणे. त्यानुसार व्यक्तीचे जीवन बनलेले असते अशी राजकीय संस्कृती अभ्यासली जाते.

६. राजकीय संसूचना – राजकीय संसूचना याचा अर्थ शासकीय यंत्रणा ज्या विविध वार्ताप्रवाहांवर आधारित असते त्यानुसारची निर्णय प्रक्रियेची व्यवस्था होय. म्हणजेच राजकीय व्यवस्थेला चेतना देणे, तिचे नियंत्रण करणे, मार्गदर्शन करणे इ. कार्य संसूचनात्मक करते याचा अभ्यास इथे केला जातो.

७. राजकीय भरतीचा अभ्यास या शाखेला अभिप्रेत आहे.

८. राजकीय सहभागांचा अभ्यास करून सामाजिक नियंत्रण साधण्याचा प्रयत्न केला जातो.

९. सामाजिक – राजकीय गतीक्षमता – राजकीय समाजशास्त्रातील हा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामध्ये स्थिरता, संघर्ष, राजकीय विकास, राजकीय बदल, आधुनिकीकरण विचारसरणी व कल्पिते या सर्वांचे राजकीय बदलातील योगदान अभ्यासले जाते.

१०. सामाजिक-राजकीय नियंत्रण –आधुनिक काळात हा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. या अंतर्गत हितसंबंधी, दबाव गट, राजकीय पक्ष, श्रेष्ठीजन इत्यादीचा अभ्यास केला जातो.

११. राजकीय व्यवस्थांचा अभ्यास – जगातील प्रमुख राजकीय व्यवस्थांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यांची उद्दिष्टे व कार्यपद्धती अभ्यासली जाते.

१२. राजकीय वर्तणुकीचा अभ्यास – निवडणुका, मतदान याप्रसंगी अभ्यासाला प्राधान्य दिले जाते.

याव्यतिरिक्त सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात ज्यांचा प्रभाव जाणवतो किंवा जे समस्या, गैरव्यवस्था निर्माण करतात अशा नियमित किंवा अचानक निर्माण होण्याच्या गोष्टींचा अभ्यासही केला जातो. उदा. धार्मिक गट, अल्पसंख्यांकांचे प्रश्न, एकात्मता वगैरे.

## १.३.४ इतर सामाजिक विज्ञानाशी असणारे संबंध

**प्रस्तावना :**

ज्ञानाच्या सर्वच शाखा मानवी प्रक्रियांचा अभ्यास करतात. यामध्ये राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, नीतीशास्त्र इ. सामाजिक शास्त्रांचा अंतर्भाव होतो. यापैकी प्रत्येक शास्त्र मानवी जीवनाच्या एकेक पैलूंचा सखोल अभ्यास करीत असते. म्हणूनच प्रत्यक्षात किंवा तत्वतः त्यांच्यामध्ये भेदरेषा आखणे शक्य नाही. किंग्जले डेव्हिस यांच्या शब्दात सांगायचे तर, ''ही शास्त्रे - शास्त्रशाखा - एकमेकात इतकी गुंतली गेलेली आहेत की, एकमेकांपासून त्यांना अलग करणे सहज शक्य नाही.'' अलेक्स इंकेल्स यांच्या मते ''आपला ज्ञान संपन्न समुदाय म्हणजे ज्ञानाचे निरनिराळे भाग केलेले जहाज नव्हे, तर या ज्ञानशाखांचे जाळे इतके दूरवर एकमेकात गुंतलेले आहे की, त्यांना अलग करणे म्हणजे निरर्थक प्रयत्न आहेत.''

तथापि, या ज्ञानशाखांच्या प्राथमिक अवस्थेत जरी असे वेगळेपण दाखविणे शक्य नसले तरीही काही विशिष्ट पैलुंबरच प्रकाश टाकणे आवश्यक ठरते. या ज्ञानशाखांच्या बाबतीत जेव्हा विचार केला जातो तेंव्हा त्यातील संकल्पनाच्या स्पष्टीकरणासाठी म्हणुन तरी असा भेद आहे हे दाखविणे आवश्यक ठरते. तथापि काळाच्या ओघात आता असे स्पष्ट झाले आहे की, मानवी आंतरसंबंधात सर्वच ज्ञानशाखांची फार जवळीक आहे.

या संदर्भात राज्यशास्त्राचे समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास आणि नीतीशास्त्र यांच्याशी असणारे संबंध आपण लक्षात घेणार आहोत.

- **राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र** (Political Science and Sociology) **:**

राज्यशास्त्र आणि समाजशास्त्रातील संबंध घनिष्ठ स्वरूपाचे आहेत हे यावरून स्पष्ट होते की, समाजशास्त्राचा बाल्यावस्थेतील कालखंड राजनीती शास्त्रज्ञांच्या संरक्षणातच व्यतीत झालेला होता. समाजशास्त्र जेंव्हा उदयास आले तेंव्हा राजकीय विचारवंतांचे वर्चस्व वैचारिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर होते. साहजीकच ही दोन्ही विज्ञाने प्रथमपासुनच परस्पर प्रभावित झालेली आहेत.

''राज्यशास्त्र म्हणजे राज्याच्या परस्पर सार्वभौमत्वाखाली संघटीत झालेल्या सामाजिक समुहांचा अभ्यास.'' राज्यामध्ये कुटुंब, व्यापारी संघटना इ. छोट्या समुहांचाही अंतर्भाव होतो. समाजशास्त्रातही सामाजिक समुह आणि सामाजिक संस्था हेच अभ्यासाचे विषय असतात.

राज्यशास्त्राचा संबंध प्रामुख्याने शासनसंस्थेशी आहे. यात प्रशासन, कायदा, निरनिराळ्या देशांचे परस्परसंबंध इ. प्रश्नांचा उहापोह करण्यात येतो. एका विशिष्ट राजकीय अशा दृष्टिकोनातुन राज्यशास्त्र समाजाच्या एका भागाचा विचार करते. पॉल जॅनेट यांनी असे म्हटले आहे की, ''राज्यशास्त्र म्हणजे सामाजिक विज्ञानाचा असा घटक भाग की जो शासनाची मुलतत्वे आणि राज्याच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण करतो.'' यावरून राज्यशास्त्र हे एक विशेष असे सामाजिक विज्ञान आहे, हे स्पष्ट होते.

- **परस्परसंबंध :**

राज्यशास्त्र असे सामाजिक विज्ञान आहे की, ज्यामध्ये मनुष्याच्या राजकीय कृतींचा अभ्यास केला जातो. राज्य अथवा शासनसंस्था हाच मुख्यतः राज्यशास्त्राचा अभ्यासविषय आहे. राज्याची निर्मिती, विकास, राज्याची वैशिष्ट्ये, राज्य संघटन, शासनप्रणाली व तिच्याशी संबंधित अनेक संस्था समित्यांचे अध्ययन राज्यशास्त्रात केले जाते. राजकीय प्रभुत्व, सत्ता, अधिकार यांचे अध्ययन केले जाते. तसेच कायद्याचे स्वरूप व पद्धती, मर्यादा यांचा प्रत्यक्ष राज्यशास्त्रात विचार केला जातो. प्रत्यक्षात हे सर्व समाजाचेच घटक भाग आहेत. जेम्स गार्नरच्या शब्दात, राज्याशी संबंधित सर्व घटकांचा राज्यशास्त्रात विचार होतो. तर समाजशास्त्रात सर्व प्रकारच्या सामाजिक संबंधाचा विचार केला जातो. आज जे समाजशास्त्रज्ञ राज्यशास्त्रात विशेष रस घेणार आहेत, ते जे संशोधन करतात, त्यात प्रामुख्याने राजकीय वर्तनाचा विचार करतात. मतदारांचे वर्तन, लोकांची प्रवृत्ती, मुल्ये, राजकीय चळवळींचे सभासदत्व, निर्णयप्रक्रिया इ. विषयांचे संशोधन समाजशास्त्रज्ञ करतात आणि अशा पद्धतीने 'राजकीय समाजशास्त्र (Political Sociology) या नवीन शाखेचा उदय झाला असे अलेक्स इंकेल्स म्हणतात. मुनष्य हा राजकीय प्राणी आहे. असे जरी राज्यशास्त्राला वाटत असले तरी, तो मुळात एक सामाजिक प्राणी असल्याने या दोन्ही विज्ञानात जवळचे संबंध आहेत. ही दोन्ही विज्ञाने परस्परावलंबी आहेत. कारण समाजशास्त्राने मांडलेल्या सिद्धांतावर आधारित मानवी संबंधाचेच राजकीय दृष्टीने समाजशास्त्रात अध्ययन केले जाते.

- **दोन्ही शास्त्रातील फरक :**

ही दोन्ही विज्ञाने परस्पर संबंधित असली तरी ती एक नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. या दोन शास्त्रात काही मुलभुत फरक आहेत ते पुढीलप्रमाणे -

१) समाजशास्त्र समग्र सामाजिक संबंधांचे अध्ययन करते. तर राज्यशास्त्र सामाजिक संबंधाच्या केवळ राजकीय संबंधाच्या एका भागाचे अध्ययन करते.

२) राज्यशास्त्रात केवळ औपचारिक संघटनेचा म्हणजे सत्तेचा अभ्यास केला जातो. तर समाजशास्त्रात सामाजिक संस्थांचे आंतरसंबंध (शासकीय संबंधासहित) विचारात घेतले जातात.

३) समाजशास्त्र एक सामान्य सामाजिक विज्ञान आहे. तर राज्यशास्त्र हे विशेष सामाजिक विज्ञान आहे.

४) समग्र समाज हा समाजशास्त्राचा अभ्यास विषय असतो तर केवळ राजकीय प्रक्रिया हा राज्यशास्त्राचा अभ्यासविषय ठरतो.

५) रूढी, प्रथा, परंपरा, संस्था, कायदा या सर्व सामाजिक नियंत्रणाच्या साधनांचा समाजशास्त्रात विचार केला जातो. तर राज्यशास्त्रात केवळ राज्याने संमत केलेल्या नियंत्रण साधनांचाच अभ्यास केला जातो.

अर्थात, प्रो. गिलख्रिस्त यांनी असे म्हटले आहे की, ''दोन्ही विज्ञानांच्या सीमारेषा निश्चित करता येत नाहीत कारण काही वेळा त्या एकमेकांचे उल्लंघन करतात. पण सामान्यपणे त्या दोन्हीत स्पष्ट असे भेद आहेत.''

- **राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र** (Political Science and Economics) **:**

'संपत्तीचे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र' अशी अर्थशास्त्राची व्याख्या केली जाते. यामध्ये संपत्तीच्या तीन पैलुंचा म्हणजे उत्पादन, वितरण आणि उपभोग यांचा अभ्यास अंतर्भुत आहे. दुसऱ्या अर्थाने, ''मनुष्याच्या गरजांच्या पुर्ततेसाठी साधनसंपत्तीचा उपयोग करून घेण्याचे मानवाचे प्रयत्न व त्यासंदर्भातील त्याची कृती याला अर्थशास्त्र म्हटले जाते.'' थोडक्यात, मानवाचे आर्थिक संबंध आणि मानवाच्या आर्थिक कृती यांचे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र असे म्हणता येईल. अर्थशास्त्र मानवाच्या आर्थिक व्यवहारातील व संबंधातील किंमत, पुरवठा, मागणी, पैसा अशा फक्त आर्थिक घटकांचाच पुर्णपणे विचार करते. परंतु आर्थिक कृतीच्या मागे सामाजिक संबंध असतात आणि सामाजिक संबंधातही आर्थिक घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते. अर्थशास्त्रज्ञांच्या मते, त्यांच्या संकल्पना अचुक असतात. संख्याशास्त्रीय पद्धतीमुळे त्यांच्यात अचुकता येते आणि त्यांची सैद्धांतिक तत्वे ते प्रत्यक्षात योग्य रितीने अमलात आणू शकतात.

- **परस्परसंबंध :**

राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा परस्परसंबंध आणि परस्पर प्रभाव समाजजीवनात महत्वाचा ठरलेला आहे. हा संबंध स्पष्ट करणारी एक विधाशाखा Political Economy या नावाने विकसित होत आहे. ही दोन्ही शास्त्रे परस्पर प्रभावी तर आहेतच, शिवाय आपापल्या क्षेत्रातील प्रश्नांची उत्तरे शोधताना एकमेकांना पुरकही ठरतात. आर्थिक व उत्पादनाच्या क्षेत्रात झालेली १७७० ची औद्योगिक क्रांती संपूर्ण नवसमाजनिर्मितीला कारणीभुत ठरली. त्यातुन अनेक सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण झाल्या. पण त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न मात्र राज्यशास्त्राच्या मदतीने झाला. नियोजन ही केवळ आर्थिक प्रक्रिया नाही. तसेच सार्वजनिक उफक्रम हे केवळ आर्थिक उपक्रम नसतात. त्यांची आखणी आणि अंमलबजावणी शासन निर्णयानुसारच होत असते. तसेच वित्तसंस्थांचे व्यवहार आणि त्यांच्यावरील नियंत्रणे सामाजिक जीवनाच्या संदर्भात राज्यालाच निर्माण करावी लागतात. कल्याणकारी राज्याची (Weffare State) कल्पना आणि त्यासाठी करावी लागणारी साधनसामग्रीची जुळवाजुळव या गोष्टी अर्थशास्त्राच्या मदतीनेच कार्यान्वीत होत असतात. राज्याचे स्वरूप, राज्याची धोरणे आणि राज्याच्या क्षमता या सर्वांवर आर्थिक घटकांचा मोठा प्रभाव असतो. क्रांतीकारी परिवर्तनाच्या मुळाशी आर्थिक बळच प्रामुख्याने असते. तसेय आर्थिक शक्तीची पाळेमुळे ही राजकीय शक्तीतच सामावलेली असतात. पण हेही तितकेच खरे आहे की, 'जसे सैन्य हे पोटावर चालते' तसे 'राज्य हे आर्थिक शक्तीवर चालते.' बडे उद्योजक आणि उद्योगधंदे यांच्या पाठबळावरच राज्य मार्गक्रमण करीत असते. बहुतांश राजकीय विचारप्रणाली उदा. साम्यवाद, लोकशाही समाजवाद, भांडवलवाद इ. ही आर्थिक संदर्भावरच आधारलेली असते. साहजीकच राज्यव्यवस्थेला प्रामुख्याने आर्थिक संपन्नतेचा वा सामाजिक स्थैर्याचाच विचार करावा लागतो. अन्यथा आर्थिक व

सामाजिक आव्हानांना तोंड द्यावे लागते.

- **दोन्ही शास्त्रातील फरक :**

राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या दोन्ही सामाजिक विज्ञानातील फरक पुढील गोष्टीवर आधारित आहेत.

१) आयव्हर ब्राऊन यांनी असे म्हटले आहे की, अर्थशास्त्र हे वस्तुशी निगडीत आहे (Concerned with things), तर राज्यशास्त्र हे लोकांशी संबंधित आहे. (Concerned with People).

२) राज्यशास्त्र हे आदर्शदर्शी शास्त्र (Normative Science) आहे. तर अर्थशास्त्र हे अधिकाधिक वास्तववादी व वर्णनात्मक शास्त्र आहे. तसेच ते सांख्यिकीशी निगडीत आहे.

३) अर्थशास्त्र हे वस्तु, किंमत, नफा-तोटा यांच्याशी संबंधीत असते. तर राज्यशास्त्र हे बहुतांशी मानवी व नैतिकमुल्याशी संबंधित असते.

- **राज्यशास्त्र आणि इतिहास** (Political Science and History) **:**

घटनातील अनुक्रम प्रस्थापित करण्याचे काम इतिहास करीत असतो. इतिहासाचा संबंध भुतकाळाशी असतो. भुतकाळामध्ये ज्या घटना घडून गेलेल्या असतात. त्यांचा कालानुक्रमे अन्वयार्थ लावण्याचे आणि संबंध जोडण्याचे कार्य इतिहासकार करीत असतो.

प्राचीन इतिहासात समाजाचा विचार प्रवाह काय आहे. याकडे लक्ष न देता असामान्य प्रसंगावरच जोर देण्यात येत असे. पण आधुनिक इतिहासकार या गोष्टीवर अधिक भर देत नाहीत. ते समाजातील विचार प्रवाहासच महत्व देतात. म्हणुनच इतर घटनांचे वर्णन विषय समजण्यास मदत करतात. त्यामुळे हल्ली सांस्कृतिक इतिहासाला महत्व प्राप्त झाले आहे. अशा रीतीने इतिहास आधुनिक समाजातील व्यवहारात आपल्याला मदत करतो आणि याच दृष्टिने राज्यशास्त्राला इतिहासापासुन मदत होते.

राज्यशास्त्र आणि इतिहास या दोन्ही विधाशाखा एकमेकांत मिसळलेल्या आहेत. इतिहास म्हणजे कालचे राजकारण आणि आजचे राजकारण म्हणजे उद्याचा इतिहास असतो. एखाद्या देशाच्या राजकीय संस्कृतीच्या जडणघडणीत इतिहासापासुन जमा केलेली माहिती महत्वाची ठरते.

- **परस्परसंबंध :**

राज्यशास्त्र व इतिहास ही दोन्ही विज्ञाने परस्परपुरक आहेत. तसेच परस्परावलंबीही आहेत. एकाशिवाय दुसऱ्याचा अभ्यास आकारहीन व आशयहीन बनेल. म्हणुनच लॉर्ड ॲक्टन यांनी असे म्हटले आहे की, "The Science of Politics is the gold deposited by the stream of history."

राज्यशास्त्राला आशय पुरविण्याचे काम इतिहास करीत असतो. घटनांच्या कारणांचे विश्लेषण करण्यासाठी राज्यशास्त्राला मदत करण्याचे कार्य इतिहासकरीत असतो आणि असा इतिहास म्हणजे, कालानुक्रमावर आधारित घटनांचे स्पष्टीकरण असते. ऐतिहासिक तथ्यांच्या आधारे राज्यशास्त्र राजकीय जीवनासाठीची तत्त्वे आणि नियम अथवा कायदे मांडण्याचे कार्य करीत असते.

राजकीय संस्था आणि विचार यांची निर्मिती आणि विकास याविषयीची माहिती इतिहास पुरवीत असतो. वर्तमान आणि भविष्याला आकार देण्याचे तसेच वर्तमान कालीन घटनांचे विश्लेषण करण्याचे व त्या समजुन घेण्याचे ज्ञान राज्यशास्त्र इतिहासाच्या मदतीने करीत असते. यातील अनुभव आणि प्रयोगशीलता चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासापासून आपल्याला परावृत्त करीत असते आणि चांगली राजकीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी आपल्याला प्रवृत्तही करीत असते.

या दोन्हींच्या परस्परसंबंधाबाबत सर जॉन सीली यांनी असे म्हटले आहे की, "History without Political Science has no Fruit and Political science without history has no root."

लिप्सन यांनी असे विधान केले आहे की, "History offers to the students of politics a sense of growth and devlopment, and thus affords insight, into the processes of social changes."

प्रो. फ्रीमन यांनी असे म्हटले आहे की, "History is the past, politics and politics is the present history."

तथापी, अशा घनिष्ठ संबंधा बरोबरच राज्यशास्त्र व इतिहास या दोन्हीत काही बाबतीत फरकही आहे आणि तो पुढीलप्रमाणे लक्षात घेता येतो.

**दोन्ही शास्त्रातील फरक :**

१) इतिहास हा प्रामुख्याने भुतकालीन घटनांशी संबंधित असतो. तर राज्यशास्त्र हे वर्तमान व भविष्याशी निगडीत असते.

२) इतिहासात घटनांची कालानुक्रमे मांडणी केलेली असते या उलट, घटनांचा कार्यकारणसंबंध (Cause-effect relationship) जाणुन घेऊन त्यांचे विश्लेषण करण्यावर राज्यशास्त्रात भर दिला जातो.

३) मुर्त घटनावर इतिहासात भर दिला जातो, तर राज्यशास्त्र हे बऱ्याच अंशी तात्विक स्वरूपाचे असते.

४) राज्यशास्त्र हे आदर्शदर्शी (Noramative) असते तर इतिहास हा खास करून वर्णनात्मक असतो.

५) सामाजिक जीवनाच्या सर्वच घटकांशी इतिहास जोडला गेलेला असतो, तर राज्यशास्त्र हे राजकीय घटनांशी संबंधीत असते.

६) घटना जशा घडल्या तशी त्यांची इतिहासात नोंद होते. राज्यशास्त्रात मात्र मुल्यभारीत गोष्टीवर भर दिला जातो.

- **राज्यशास्त्र आणि नितीशास्त्र** (Political Science and Ethics) **:**

मनुष्याचे वर्तन कसे असले पाहिजे आणि मनुष्याचे अधिकाधिक कल्याण कसे हाईल याचे अध्ययन नीतीशास्त्रात केले जाते. त्यामुळे नीतीशास्त्राला नैतिक मुल्ये, नैतिक रीतीरिवाज आणि आदर्श यांचे विज्ञान मानले जाते. नितीशास्त्र हे आदर्श आणि शुद्ध आचरणाचे विवेचन करते. अर्थात नैतिक मुल्ये ही

समाजसापेक्ष असतात, ती समाजानुरूप भिन्न भिन्न असतात. पण ती समाजमान्य असतात. नीती ही एक सामाजिक कल्पना आहे. त्यामुळेच मॅकआयव्हर यांनी असे म्हटले आहे की, 'मुल्यांशिवाय समाज समजावुन घेणे शक्य नाही.' (Society without value cannot be understood.)

नितीशास्त्र हे आदर्शदर्शी विज्ञान (Normative science) आहे. कसे असले पाहिजे (What ought to be) यांचे वर्णन नितीशास्त्रात केले जाते. समाजाच्या नैतिक बाजुचे अध्ययन नितीशास्त्रात केले जाते.

राज्यशास्त्र जरी राज्यसंस्थेचे यथार्थ वर्णन करीत असले तरी आदर्श राज्याचे स्वरूप, आदर्श राज्यकर्त्याचे गुण, आदर्श नागरिकांकडून अपेक्षा या विषयीची चर्चा त्याकडून अपेक्षित असते. प्रत्येक राज्याच्या राज्यघटनेत ती तत्वे निर्देशित असतात आणि त्या दिशेने राज्यव्यवहार चालावा अशी अपेक्षा असते.

- **परस्परसंबंध :**

सर्वच सामाजिक विज्ञानांच्या तुलनेत नीतीशास्त्राशी राज्यशास्त्राचे अधिक जवळचे संबंध आहेत. कारण 'चांगले आणि वाईट' या संकल्पनेशी दोन्ही शास्त्रे निगडित आहेत. या दोन्ही शास्त्रांच्या वेगळेपणाबाबत ॲरिस्टॉटलने आग्रह धरला असला तरी माणसाच्या नैतिक मुल्य निर्धारणावरच राजकीय प्रश्नांना सामोरे गेले पाहिजे असे तो सांगतो. नैतिक सिद्धांत हे राजकीय सिद्धांताशिवाय अपुर्ण असतात. ते परस्परावर आधारित असतात. राज्याचे कायदेकानुन तयार करताना नैतिक मुल्यांचाच आधार घेतला जातो.

राजकीय जीवनात महात्मा गांधीनी नेहमीच सत्य, अहिंसा, प्रेम इ. नैतिक मुल्यांचा अवलंब करण्याचा आग्रह धरला होता. 'जे नैतिकदृष्ट्या गैर आहे ते राजकीय दृष्ट्या योग्य असूच शकत नाही.' असेही महात्मा गांधीनी म्हटले आहे. राज्याचे अधिष्ठान नैतिक असले पाहिजे हा तत्ववेत्यांचा आग्रह आजही प्रभावी आहे. कारण 'राज्याचा हेतू जीवन चांगले करावे' (State continues for the betterment of life) असा आग्रह ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राच्या सुरूवातीपासून धरलेला आहे. राज्याचा आधार कायदा असला तरी राज्याने नीतीमुल्यांची कदर करणे अपेक्षित आहे. प्रत्यक्ष व्यवहारामध्ये कायद्याचे वर्तन आणि नैतिक वर्तन यातील अंतर कमी असणे राजकीय समाजाच्या स्थैर्याच्या दृष्टीने आवश्यक असते. नैतिक जीवन जगता येईल असे कायदे करणे राज्याकडून अपेक्षित असते. नितीबाह्य वर्तनाला समाजमान्यता कधीच मिळत नाही. राज्यशास्त्राचा हेतू शासन काय करते याची माहिती देण्यापेक्षा शासनाने काय करावे हे सांगणे हा आहे. राज्याचे मोठेपण भौतिकतेत नसून त्याच्या चांगला नागरिकात आहे. नितीशुन्य राजसत्ता भौतिक संपन्नता असूनही कोसळून पडतात. असे इतिहास सांगतो. म्हणुनच ॲरिस्टॉटलने असे नमुद केले आहे की, 'The state will get perverted if moral values are jettisoned.' (जर नैतिक मुल्ये झुगारून दिली तर राज्यात दुरूपयोग वाढेल.)

अधिक संख्येने आणि अधिक चांगले हे राजकारणाचे मुख्य सुत्र आहे. त्यामुळे नीतीशास्त्र आणि

राज्यशास्त्र यांचे आदर्श आणि तत्वे ही सारखीच असली पाहिजेत. तथापी राज्यशास्त्र ही नंतरची विकासाची अवस्था आहे. कारण त्याआधीपासूनच नीतिशास्त्र अस्तित्वात आहे.

- **राज्यशास्त्र आणि कायदा** (Political Science and Law) :

कायद्याद्वारे नियंत्रित केल्या जाणाऱ्या राज्य आणि शासन यांच्या अध्ययनाचे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय. साहजीकच कायदा आणि राज्यशास्त्र परस्परप्रभावी आहेत. यामध्ये न्यायतत्वशास्त्र (Jurisprudence) याला कायद्याचे विज्ञान असे म्हणतात. राज्यशास्त्राचाच तो एक उपविभाग मानला जातो. कारण राज्यच कायद्याची निर्मिती करते आणि अंमलबजावणीही करते. वैधानिक व्यवस्थेची भुमिका ही राजकीय संस्थेच्या अभ्यासाच्या दृष्टिने प्राथमिक महत्वाची असते. राजकीय संरचना आणि विकास यातील फरक कायद्याद्वारेच स्पष्ट करता येतो. राज्यघटना आणि लोकप्रशासनाच्या विद्यार्थ्यांनाही तो महत्वाचा असतो.

राज्यशास्त्र हा कायद्याच्या अभ्यासाचाच एक भाग मानला जातो. शासनातील न्यायव्यवस्थेची भुमिका समजुन घेण्यासाठी कायद्याचे ज्ञान आवश्यक असावे लागते. कायद्याचा राजकीय घटनांवर आणि राजकीय घटनांचा कायद्यावर असा परस्परप्रभाव असतो. लोकशाही राज्यातील घटनात्मक कायदा हा हुकूमशाही व्यवस्थेतील घटनात्मक कायद्याहुन वेगळा असतो. त्यांच्या दृष्टिकोनातही फरक असतो. तसेच कायदेतज्ञांचा दृष्टिकोन हा वेगळा म्हणजे आदर्शदर्शी असू शकेल पण राज्यशास्त्रज्ञाचा दृष्टिकोन मात्र आदर्शदर्शी तसेच वर्णनात्मक असा दोन्हीही असू शकतो.

या दोन्ही विद्याशाखात परस्परपूरकता आणि परस्परावलंबन सातत्याने वाढत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. गतिमान आणि आधुनिक व गुंतागुंतीच्या समाजात दोन्ही विज्ञानांचे महत्व वाढत आहे आणि आवश्यकताही वाढत आहे.

सर्वच विघाशाखा महत्वाच्या आहेत. प्रत्येक विघाशाखेचे अभ्यासविषय वेगळे असले तरी प्रत्येक विद्याशाखेतील संकल्पना आणि संशोधनावर आधारित निष्कर्ष हे सर्वच विघाशाखाना साहाय्यभुत ठरतात. परस्परपुरक अशी भुमिका ठेवल्यास सर्वच विद्याशाखांचा विकास होण्यास मदत होणार आहे.

**१.२.३ राष्ट्राची संकल्पना : राज्य आणि राष्ट्रवाद** Concepts of Nation - State and Nationalism

राष्ट्र या शब्दाला इंग्रजीमध्ये Nation म्हणतात. Nation हा शब्द मुळ लॅटिन मधील Nasci शब्दापासून बनत आहे. याचा अर्थ 'जन्माला येणे' असा होतो. त्यामुळेच अशी समजूत आहे की एखाद्या राष्ट्राच्या लोकांमध्ये वांशिक व सांस्कृतिक संबंध आहेत.

अनेस्ट बार्कर – ''एका निश्चित प्रदेशता, जरी वेगवेगळ्या वंशाचे लोक असले तर ऐतिहासिक परंपरेद्वारे समान विचार आणि भावना, समान धर्म आणि भाषा असलेले लोक म्हणजे राष्ट्र.''

''राष्ट्र ही एक संघटनात्मक संकल्पना आहे. राष्ट्र सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय ओळख निमाण करणाऱ्या लोकांचा समुदाय.'' राष्ट्र या संकल्पनेत एकात्मतेला केंद्रीय महत्त्व आहे. राष्ट्र ही जात, धर्म, वंश, सांस्कृती, कला, भाषा, प्रथा, रूढी आदीमुळे आपले स्थान मजबूत करत असते. राष्ट्र या

संकल्पनेचा उदय या सर्व घटकाना धरून सामूहिक आत्मीय भावनेने होत असतो. ही भावना प्रदेश, सांस्कृती, कला, धर्म, भाषा यांच्याशी संलग्नीत असते. राष्ट्र ही अमूर्त संकल्पना ठरते. कित्येकदा राष्ट्र ही संकल्पना राज्य आणि देश या अर्थाने वापरली जाते. भारतामध्ये राष्ट्र ही संकल्पना प्राचीन काळापासून रूजली आहे. भारतामध्ये प्राचीन काळात मगध, गांधार, कोसल, वत्स, पाल, अवंती, राष्ट्रकूट, गुप्तसम्राज, पांड्य साम्राज्य, मुगल साम्राज्य त्याचबरोबर ही सत्ताकेंद्रे एकाच केंद्रशासनाखाली राहीली. राष्ट्र ही संकल्पना संदिग्ध आहे. कारण जेव्हा राष्ट्राला वैधानिकता प्राप्त होते तेव्हा राष्ट्र अस्तित्वात येत असते. सार्वभौमत्त्व, सीमाक्षेत्र आणि लोकसंख्या, त्याचबरोबर प्रभाविपणे शासन करणारे न्याय संमत राज्य गतिमान औद्योगिक अर्थव्यवस्था ही आधुनिक राष्ट्राची वैशिष्ट्ये आहेत. राष्ट्र निर्मितीमध्ये सार्वभौमत्त्व हा सर्वात महत्त्वाचा राष्ट्र आणि राज्याचा ही निकश आहे. हाच सार्वभौमत्त्वाचा अधिकार राज्याला सर्वोच्च अधिकार प्रदान करतोच त्याचबरोबर हा अधिकार राजकीय स्वायत्तता ही मिळवून देतो. वास्तविकपणे सार्वभौमत्त्व ही वैधानिक संज्ञा तर आहेच पण स्वातंत्र्य ही एक राजकीय आणि उपयोजित संज्ञा आहे. राष्ट्र अनेक राज्यात विभागले जाऊ शकते. सामाजिक एकात्मतेची भावना हीच राष्ट्राला एकत्रीत बांधू शकते. त्यामुळे राष्ट्र अस्तित्वात राहणेसाठी लोकसंख्या हा निर्णायक आणि महत्त्वाचा लक्षणीय घटक ठरतो. वांशिक आणि संस्कृतीक भिन्नता त्यायोगे चालणारे राजकारण हे राष्ट्राच्या प्रगतीवर विपरीत परिणाम करते. राष्ट्र हे अनेक भाषा, धर्म, जाती, वंश, परंपरा, सांस्कृती यांना सामावून घेण्याची क्षमता ठेवते. राष्ट्र ही एक विचारसरणी आहे. राष्ट्र ही संकल्पना स्पष्ट करताना तिची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

**१) लोकसंख्या आणि सांस्कृतिक समानता :**

राष्ट्र संकल्पनेचे वैशिष्ट्य स्पष्ट करताना भाषा, धर्म, वंश किंवा लोकसंख्या या आधारीत संपूर्ण समुहाअंतर्गत समानता असू शकते. किंवा ऐतिहासिक घटकामुळेही ती उदयास येऊ शकते. उदा. लोकराजा छत्रपती शिवाजी महाराजानी 'स्वराज्याची' शपथ घेतल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातील मावळे एकजूट होऊन त्यांच्या कार्यास पुढे नेले व स्वराज्याची स्थापना केली. ब्रिटीशांविरुद्धच्या स्वातंत्र्य लढ्यात संपूर्ण भारतीय उपखंडातील नागरीक वसाहतवादाविरुद्ध स्वातंत्र्य ह्या अमूर्त कारणासाठी एकजूट झाली.

**सामुदायिक सद्भावना :** लोकसंख्या आणि सांस्कृतिक समानतेचे सामुदायिक सद्भावनेत परिवर्तन होऊन राष्ट्रीय एकात्मतेचा उदय त्या समुदायातील लोकांमध्ये होणे महत्त्वाचे आहे.

राजकीय वैचारीक भिन्नता : लोकसंख्यांक आणि सामाजिक सांस्कृतिक तसेच ऐतिहासिक घटनांवर आधारीत सामुदायिक सद्भावनेच्या बरोबरीने राजकीय ओळखीच्या गरजेचीसुद्धा आवश्यकता असते. अशी भावना राजकीय पातळीवर स्वशासन आणू इच्छिणाऱ्या स्वयंनिर्धाराच्या आवश्यकतेतून निर्माण होते. भावनीक गुणंतागुंतीतूनच ऐक्याची भावना वाढीस लागते व एकराष्ट्र आहोत असा समज निर्माण होतो.

**राज्य** State

अर्थ शासनयुक्त समाज या अर्थाने राज्य स्टेट या शब्दाचा उपयोग प्रथम इटलीत करण्यात आला. ''हेगेलने ही राज्य म्हणजे ईश्वराचे पृथ्वीवरील अस्तित्व असे उदात्तीकरण करतो. सर्व प्रकारे जीवन सुरक्षीतपणे सिद्ध होईल अशी एकत्रीत येऊन कार्य करणाऱ्या मानवांची संघटना म्हणजे 'राज्य' असे समाजशास्त्रज्ञ मानतात. राज्याच्या आधीसत्तेखाली असणारा प्रदेश राज्य मानण्यात येईल म्हणजेच राज्य राजकीय दृष्ट्या संघटीत समाज होय.

**राज्याच्या व्याख्या :**

**ॲरिस्टॉटल** ''राज्य हा परिपूर्ण आणि स्वावलंबी आयुष्य असलेल्या कुटुंबांचा आणि खेड्यांचा संघ असतो. यात आनंदी आणि प्रतिष्ठित आयुष्य असणे अपेक्षित असते.''

**जॉंबोडीन** ''राज्य हे कुटुंबाचे संघटन आहे. ज्यात कुटुंबे आणि त्यांच्या मालकीची साधने सर्वोच्च शक्तीने तसेच तर्कानें शासित असते.''

**वूड्रोविल्सन** ''एका विशिष्ट भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटीत केलेले लोक म्हणजे राज्य होय.''

**हॉरोल्ड लास्की** ''वाटून दिलेल्या भौतीक क्षेत्रात, सर्व संस्थांवर श्रेष्ठत्वाचा दावा करणारे लोक आणि शासन यांत विभागलेला भूप्रदेशात्मक समाज म्हणजे राज्य.''

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक असे शब्द उपयोगात आणले आहेत. राज्याच्या अनुषंगाने सार्वभौमत्व म्हणजे राष्ट्राला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. म्हणजेच राष्ट्र अथवा राज्य कोणत्याही इतर राष्ट्रावर निर्णय घेण्याबाबत अवलंबून नाही. म्हणजेच राज्याला आपले निर्णय घेण्याचा कायदे करण्याचा आणि राज्यकरण्याचा अधिकार आहे. जेव्हा एखादे राष्ट्र सार्वभौम होण्याची इच्छा दाखवते तेव्हा ते स्वयंनिर्णयाच्या हक्काची मागणी करते. राजकीय स्वयंनिर्णय हा एखाद्या राष्ट्राला किंवा राज्याला राज्यस्थापनेच्या दिशेने घेऊन जातो. राष्ट्राला राज्याचा दर्जा प्राप्त होण्यासाठी सार्वभौमत्त्व, स्वतंत्र शासनव्यवस्था, भूप्रदेश आणि लोकसंख्या हे घटक आवश्यक असतात. राज्याला राजकीय समुदाय म्हणून संबोधित केले जाते. राज्याचे अस्तित्व आपणास सातत्याचे जाणवत असते. शिक्षण, समाजकल्याण, संरक्षण, कायदा आणि सुव्यवस्था यांसारखी कार्ये राज्य करत असते. जन्म-मृत्यू नोंदणी आधारकार्ड मिळवणे महत्त्वाच्या नोंदी अशी वैयक्तिक कार्ये देखील राज्यातर्फे केली जातात. राज्य नागरीकाला मुलभूत हक्क प्रदान करते, न्याय देते, समानता ठेवते त्याचबरोबर स्वातंत्र्याची हमी देते.

**राज्याचे घटक**

१) **सार्वभौमत्त्व :** सार्वभौमत्त्वामध्ये कायदेमंडळ, नोकरशाही न्यायमंडळ शासन व्यवस्थेच्या घटकाचा समावेश होतो. यामध्ये धोरण निर्मिती, कायदे करणे व निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे ही जबाबदारी सार्वजनिक संस्थांची असते. सर्व नागरीक राज्याचे सभासद असतात. राज्याचे निर्णय हे जनहिताच्या दृष्टीने होत असतात. राज्याला जनहितासाठी निर्णय घेण्याची अधिमान्यता असते.

२) **शासनसंस्था :** प्रत्येक सार्वभौम राज्याला त्याची शासनसंस्था असणे आवश्यक असते. शासन हे सार्वभौम आणि स्वतंत्र असणे गरजेचे आहे. उदा. ब्रिटिश राजवटीत भारतात शासनव्यवस्था होती, परंतु ती स्वतंत्र व सार्वभौम नव्हती. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी भारत हे राज्य नव्हते.

३) **भूप्रदेश :** राज्याच्या सिमेअंतर्गत असलेला भौगोलिक प्रदेश म्हणजे भूप्रदेश होय. राज्याला भूप्रदेश असणे आवश्यक असते. ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार आहे त्याला त्याचे अधिकार क्षेत्र म्हणतात. या अधिकार क्षेत्राबरोबर राज्य कायदेशीर निर्णय घेते.

**४) लोकसंख्या :** राज्य अस्तित्वात हे लोकसंख्येवर अवलंबून असते. राज्यामध्ये भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक, वांशिक विविधता असू शकते. या विविधतेनेच राज्यात अनेक राष्ट्राचा समावेश होऊ शकतो. उदा. सोव्हिएट रशियात अनेक राष्ट्रीय लोकांचा समावेश आहे. त्यामध्ये रशियन, लिथुअनियन, इस्टोनियन, युक्रेनियन.

राज्य ही अमूर्त संकल्पना असून राज्याचे स्वरूप व्यापक असते. राज्यात सार्वजनिक संस्था तसेच समाजातील सर्वांचाच नागरीक म्हणून समावेश होतो. राज्य हे कायमस्वरूपी असते. राज्य हे व्यक्ती निरपेक्ष असते ते राजकीयदृष्ट्या तटस्थ असते. राज्य हे सार्वभौम असते.

**राष्ट्रवाद** (Nationalizm)

राष्ट्रवाद ही एक विचारधारा असून ती लोकाना राष्ट्र-राज्याशी राजकीय दृष्टीने जोडून ठेवते. राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय पणाली व त्यावरच आधारलेला ध्येयवाद होय. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातूनच भारतीय राष्ट्रवादाची भावना व्यक्त होत होती. ही एक राजकीय अस्मीता म्हणता येईल. ''राष्ट्रीय भावनिकतेच्या आधारे समान पातळीवर राष्ट्रप्रेम यावर आधारलेली असते. यातूनच भावनाचे प्रकटीकरण होत असते. उदा. भारतीय क्रिकेटसंघ हा पाकिस्तानच्या क्रिकेट संघाला पराभूत करतो तेव्हा भावनीक उद्दीपकता निर्माण होत असते. या वेळी भारतीय नागरीक आपल्या भारतीय संघाचा जयजयकार करत असतो. त्याच भावनेतून राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहतो किंवा आपल्या आपण सैन्य दलाला पाठिंबा देतो. राष्ट्रवाद हा तारक आणि संघरक असा दोन्ही प्रकारचा असू शकतो. राष्ट्रवाद ह्या संकल्पनेने राष्ट्र राज्यांच्या व्यवस्थेसाठी नवी मुल्ये आणि वैधता दिली तसेच लोकांना नवी सामाजिक जाणीव करून दिली. १७८९ साली फ्रान्स मध्ये क्रांती झाली या क्रांतीलाच फ्रेंच क्रांती असे म्हटले जाते. या क्रांतीतूनच स्वातंत्र्य, समता, बंधूता ही मानवतावादी तत्त्वे पुढे आली. अमेरिकेच्याही स्वातंत्र्यात याच मुल्यांचा स्विकार केला गेला. यातूनच राष्ट्रवादाचा अविष्कार आढळतो. यामुळे सार्वभौमत्त्वाची संकल्पना दृढ झाली. सार्वभौमत्त्व कल्पनेने राष्ट्रीय स्वशासनाची संकल्पना पुढे आणली. त्यातूनच राष्ट्र राज्याची निर्मिती झाली. राष्ट्रवाद ही केवळ एक मानसीक संकल्पना असल्याचे पाश्चात्त्य अभ्यासक प्रो. झिरमन यांनी म्हटले आहे. अनेक देशामधील विचारवंतांना धर्म, शिक्षण, कला, साहित्य, संस्कृती व इतिहासाच्या पुनर्मांडणीसाठी राष्ट्रवाद हे प्रभावी साधन वाटत आले आहे. राष्ट्रवाद या संकल्पनेला देशकाल स्थितीनुसार अनेक परिणाम आणि अर्थछटा लाभल्या आहेत. भारतीय संदर्भात बोलायचे तर राष्ट्रवादाचे तीन अंतःप्रवाह आपल्याला जाणवतात. समृद्ध भूतकाळ, श्रद्धा आणि अस्मिता यांची धर्मनिष्ठ गोळाबेरीज मांडणारा हिंदूत्वाची दिशा घेऊन निघालेला राष्ट्रवाद हा एक प्रवाह होय.

डॉ. बाबासाहेबांचा राष्ट्रवाद हा विवेकनिष्ठ होता. त्यांना भारतीय समाजव्यवस्थेच्या विषममोलांची आणि गुण मर्यादांची प्रगल्भ जाण होती. भारतीय समाजजीवन, इतिहास, कला, संस्कृती, विद्याक्षेत्र या सर्वांचे त्यांना आकलन होते. त्यांच्या मते, ''केवळ भौगोलिक आकार असलेला देश म्हणजे 'राष्ट्र' नव्हे.'' समान भाषा, वंश, जात श्रद्धा व अस्मीता म्हणजे राष्ट्र नव्हे. उलट ''राष्ट्र ही एक वस्तुनिष्ठ समुहभावना आहे. ती सद्सद्विवेक शक्तीची भावना आहे. (लेखन आणि भाषणे, खंड ३, पृ. ३०८-०९)

राष्ट्रवाद हा नागरीकात, बंधुता, त्याग राष्ट्रहित निर्माण करतो. त्याचबरोबर देशाचे सार्वभौमत्त्व अबाधित ठेवण्यास सहाय्य करतो. राष्ट्रवाद हा सामूहीक भावनेतून उदयास येतो म्हणजेच समान इतिहास, परंपरा, भाषा, वंश आणि संस्कृती हे मुख्य घटक असतात. सामान्यतः ऐकोणिसाव्या शतकापासून राष्ट्रवाद या संकल्पनेचा प्रसार जगभर होऊ लागला.

राष्ट्रवादाची व्याख्या :

१) एच. एफ. हिन्से यांच्या मते ''आपल्या राष्ट्राप्रती असणाऱ्या राजकीय निष्ठेची जाणीव असणारी मनःस्थिती म्हणजे राष्ट्रवाद होय.''

२) सी. जे. एच. हायेस यांच्या मते, ''राष्ट्रवाद म्हणजे देशाभिमान आणि राष्ट्रीयतेचे उत्कट आणि एकत्व होय. राष्ट्रवाद आधुनिक संकल्पना आहे.'' साधारण, सोळाव्या शतकात युरोपाात ही संकल्पना उदयास आली. युरोपात मध्ययुगाचा अंत होऊन आधुनिक जगाची सुरवात होताना ही संकल्पना उदयास आली. राष्ट्रवादाच्या उदयाने सर्वच क्षेत्रामध्ये उलथापालथ झाली. मध्ययुगाच्या अस्थापूर्वी ते अंधकारमय होते. राष्ट्रवादाच्या आगमणामुळे समाजपरिवर्तनास चालना मिळाली.

**राष्ट्रवादाचे प्रकार :**

१) उदारमतवाद : उदारमतवादाचा उगम फ्रेंच राज्यक्रांतीत झाला. राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या चौदा मुद्द्यांमध्ये देखील याचा उल्लेख आहे. प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचा अधिकार आहे. हे उदारमतवाद राष्ट्रवाद मानतो.

२) परंपरावाादी राष्ट्रवाद : हा समाजाला अंतर्मुख करतो. राष्ट्र आणि समाज यांच्या जवळच्या संघाचे मूल्यमापन करतो. स्वदेशाभिमानाला हा राष्ट्रवाद खूप महत्त्व देतो.

३) प्रसारवादी राष्ट्रवाद : या प्रकारचा राष्ट्रवाद हा आक्रमक स्वरूपाचा असतो. राष्ट्रीय गौरवासाठी राष्ट्रे आक्रमक होतात. आणि साम्राज्य निर्मितीसाठी प्रयत्न करतात. वसाहतवाद हे प्रसारवादी राष्ट्रवादाचे एक उदाहरण आहे.

४) वसाहतवादाविरोधी राष्ट्रवाद : हा राष्ट्रवाद राष्ट्राच्या स्वातंत्र लढ्याच्या संदर्भात बघितला जातो. भारताला स्वातंत्र्य मिळवण्याच्या दरम्यान या राष्ट्रवादाचा प्रत्यय येतो.

## १.४ सारांश :

राजकीय समाजशास्त्रामध्ये केल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय परिस्थितीशी संबंधित असलेल्या विविध गोष्टींचा व्यापक अभ्यास या शाखेत केला जातो. विविध समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याप्तीचे स्पष्टीकरण पाहता राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यास किती व्यापक व विशाल आहे हे लक्षात येते.

समाजाचे आधुनिकीकरण व देशाचा आर्थिक विकास या गोष्टी साध्य करण्यासाठी त्यांचा राजकीय दृष्टिकोणातून अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. थोडक्यात राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्तीमध्ये राजकीय पक्ष दबाव गट, संसूचना, माध्यम ते, संप, निदर्शने, चळवळी, निवडणूका, मतदान, गट संघर्ष, राजकीय पक्ष सदस्यता शासकीय संस्था, राजकीय अभिजन, राजकीय संस्कृती, राजकीय सत्ता, अधिकार, अधिमान्यता,

राजकीय समाजीकरण, राजकीय भरती, सहभाग, राजकीय गतीक्षमता, नियंत्रण, वर्तणूक, व्यवस्था या सर्वांच्या अभ्यास राजकीय समाजशास्त्राला अभिप्रेत आहे. यावरून राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती लक्षात येते.

एकूण प्रस्तुत प्रकरणामध्ये राजकीय समाजशास्त्राच्या व्याख्येनुसार दिलेला अर्थ व त्यानुसार त्याचे स्वरूपात्मक स्पष्टीकरण व अभ्याविषय लक्षात येतो. तसेच राजकीय समाजशास्त्राचा विकास कसा होत गेला हे देखील स्पष्ट होते. वरील अभ्यासावरून राजकीय समाजशास्त्र मानवी जीवनाच्या दृष्टिकोणातून समाजशास्त्रीय दृष्ट्या किती विशाल व महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) एस्. एम्. लिपसेट यांनी केलेल्या राजकीय समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

२) राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे ?

३) राज्यावर समाजाचे नियंत्रण असले पाहिजे असे मत कोणी मांडले आहे ?

४) लिपसेट यांनी त्यांच्या कोणत्या ग्रंथात राजकीय समाजशास्त्राची व्याख्या दिली ?

५) राजकीय समाजशास्त्राच्या विकासाच्या पहिल्या टप्प्यात म्हणजे ग्रीक व रोमन काळात कोणत्या दोन प्रमुख समाजशास्त्रज्ञांनी विचार मांडले ?

६) प्रा. ए. के. मुखोपाध्याय यांनी केलेल्या राजकीय समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

७) प्राचीन राष्ट्रे कोणती

८) कोणत्या आत्मीय भावनेने राष्ट्र या भावनेचा उदय होत असतो.

९) राष्ट्राची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती.

१०) हेगेलची राज्याची व्याख्या सांगा.

११) एका विशिष्ट भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटीत केलेले लोक म्हणजे राज्य होय ही संकल्पना कोणाची.

१२) भारतीय राज्य घटनेच्या सरनाम्यात कोणते शब्द उपयोगात आणले आहेत.

१३) फ्रेंच राज्य क्रांतीतून कोणती मानवतावादी तत्त्वे मिळाली.

१४) विवेकनिष्ठ राष्ट्रवाद कोणी मांडला.

१५) राष्ट्रवादाचे प्रकार किती.

१६) एच. एफ. हिन्से यांची राष्ट्रवादाची व्याख्या.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) एस्. एम्. लिपसेट यांच्या मते, ''समाज आणि राज्यव्यवस्था यातील व सामाजिक रचना आणि राजकीय संस्था यातील परस्पर संबंधाच्या अभ्यासाला राजकीय समाजशास्त्र असे म्हणतात.''

२) राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप आंतरअभ्यासशास्त्रीय प्रकारचे आहे.

३) 'राज्यावर समाजाचे नियंत्रण असले पाहिजे' असे मत कार्ल मार्क्स यांनी मांडले.

४) The field of Sociology या ग्रंथात लिपसेट यांनी राजकीय समाजशास्त्राची व्याख्या दिली.

५) प्लेटो व ॲरिस्टॉटल या दोन प्रमुख समाजशास्त्राांनी राजकीय समाजशास्त्राच्या पहिल्या टप्प्यात म्हणजे ग्रीक व रोमन काळात आपले विचार मांडले.

६) प्रा. ए. के. मुखोपाध्याय यांच्या मते, राजकीय समाजशास्त्र म्हणजे राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचे परस्परांवर वैचारिक अभिसिंचन असून त्यात समाजाचा राजकारणावर आणि राजकारणाचा समाजावर होणारा प्रभाव अभ्यासण्यात येतो आणि राजकीय तथ्यांकउे सामाजिक संदर्भातून पाहण्यात येते.

७) मगध, गांधार, कोसल, वत्स, पाल, अवंती, राष्ट्रकूट, पांड्य साम्राज्य

८) जात, धर्म, वंश, संस्कृती, कला, भाषा, प्रथा, रूढी आदिमुळे राष्ट्र या भावनेचा उदय होत असतो.

९) १) लोकसंख्या आणि सांस्कृतिक समानता

   २) सामुदायिक सद्भावना

   ३) राजकीय वैचारीक भिन्नता

१०) हेगेल ने राज्य म्हणजे ईश्वराचे पृथ्वीवरील अस्तित्व असे उदात्तीकरण करतो.

११) वूड्रोविल्सन

१२) सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक

१३) स्वातंत्र्य, समता, बंधुता

१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१५) १) उदारमतवाद, २) परंपरावादी राष्ट्रवाद, ३) प्रसारवादी राष्ट्रवाद, ४) वसाहतवादाविरोधी राष्ट्रवाद

१६) ''राष्ट्रवाद म्हणजे देशाभिमान आणि राष्ट्रीयतेचे उत्कट आणि एकत्व होय.''

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) राजकीय समाजशास्त्राची व्याख्या देऊन राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करा.

२) राजकीय समाजशास्त्राचा अर्थ सांगून राजकीय समाजशास्त्राचा विकास कसा होत गेला याचा आढावा घ्या.

३) राजकीय समाजशास्त्राची व्याख्या देऊन राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्तीचे स्पष्टीकरण द्या.

४) राजकीय समाजशास्त्र ही संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

५) राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यातील परस्पर संबंध व भेद स्पष्ट करा.

६) राज्यशास्त्र आणि नीतिशास्त्र यांतील परस्परसंबंधांचे विवेचन करा.

७) राष्ट्राची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये लिहा.

८) राज्याची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये लिहा.

९) राष्ट्रवाद म्हणजे काय हे सांगून राष्ट्रवादाच्या प्रकाराची चर्चा करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) Jangam R. T. - Political Sociology

२) Sharma R. K. / R. N. - Political Sociology

३) डॉ. राजेंद्रकुमार शर्मा - राजनितीक समाजशास्त्र

४) कुलकर्णी बी. वाय. - राजकीय समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर (२००३)

५) डॉ. इनामदार एम. आर. व डॉ. पुराणिक एस. एन - राजकीय समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे (१९८४)

६) डॉ. देवगांवकर एस. जी. - मंगेश प्रकाशन, नागपूर (१९९०).


❑❑❑

घटक–२

# राजकीय समाजशास्त्राचे सैद्धांतिक दृष्टिकोन

## (Theoretical Approaches to Political Sociology)

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्ट्ये

२.३ विषय विवेचन

२.४ राजकीय समाजशास्त्राचे दृष्टिकोन

२.४.१ व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोन

२.४.२ सत्ता विभाजनाचे सिद्धांत (विल्फ्रेड पॅरोटो, सी. डब्लू मिल्स, गिटानो मोस्का)

२.४.३ आदान प्रदान दृष्टिकोन

२.७ स्वाध्याय / गृहपाठ

२.८ चिंतन व कृती

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

### २.१ प्रस्तावना (Introduction) :

आधुनिक काळात राज्यशास्त्राच्या आणि समाजशास्त्राच्या अभ्याविषयक दृष्टिकोणात अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. विशेषकरून दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात राज्यशास्त्र आणि समाजशास्त्राच्या अभ्यासाला वेगळेच वळण मिळाले. अनेक राजकीय व सामाजिक शास्त्रज्ञांनी या दोन्ही शास्त्राच्या अभ्यास पद्धतीचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यातूनच या विषयाच्या अध्ययनाचे नवे-नवे दृष्टिकोन पुढे आले. या नव-नवीन दृष्टिकोणामध्ये वर्तनवादी दृष्टिकोन व्यवस्था व व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोन हे दोन दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचे मानले जाते. वर्तनवादी दृष्टिकोनाने राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासात मोठीच क्रांती घडवून आणली असे त्यांचे पुरस्कर्ते समजतात. तरीपण नव-नवीन दृष्टिकोणाच्या प्रभावामुळे राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासाला जे काही वेगळे वळण लाभले. त्याला उद्देशून वर्तनवादी व व्यवस्था विश्लेषण दृष्टिकोणाची क्रांती राजकीय समाजशास्त्रात महत्त्वाची समजली जाते.

या घटकामध्ये आपण वर्तनवादी किंवा व्यवहारिक दृष्टिकोन आणि व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोन म्हणजे काय इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील बाबी समजणे सुलभ होणार आहे.

१) भारतातील राजकीय विचारप्रणाली समजून घेणे.

२) व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनाचे महत्त्व समजून सांगणे.

३) सत्ता विभाजनाचा अभिजन दृष्टिकोन समजून घेणे.

४) आदानप्रदान दृष्टीकोन समजून घेणे.

## २.३ विषय विवेचन :

### (Presentation of Subject Matter)

या घटकात आपण भारतातील राजकीय विचारप्रणाली, तिचा अर्थ, वैशिष्ट्ये, साधने, विचारप्रणालीची भूमिका आणि अभ्यासाची आवश्यकता याचा आढावा घेणार आहोत. त्याचबरोबर राजकीय समाजशास्त्रामध्ये अनेक दृष्टीकोन असून त्यापैकी येथे आपण पुढील दृष्टीकोन अभ्यासणार आहोत.

**भारतातील राजकीय विचारप्रणाली**

माणूस हा जसा समाजशील प्राणी आहे तसाच तो विचारशील प्राणीही आहे. माणसाला वैचारिक बुद्धिमत्ता लाभल्यामुळे मानवाने विचार, चिंतन, प्रथा, परंपरा, नियम व शेवटी समाज निर्माण केला. समाजामध्ये सर्वांना सुख-शांतीने जीवन जगता यावे म्हणून राजकीय विचार प्रणालीचा जन्म झाला. १९ व्या शतकात सर्वप्रथम फ्रान्समध्ये जन्मास आलेली ही संकल्पना आज राजकीय चिंतनाचा विषय ठरली आहे. विचार प्रणालीचा इतिहास पहावयाचा झाला तर प्राचीन कालखंडात मानवाच्या बुद्धीचा मनावा तेवढा विकास झाला नव्हता. त्यामुळे या काळातील मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर विचार करून आत्मा, देव इ. संकल्पना विकसीत केल्या. मध्ययुगीन काळातील मानव स्वतःच्या प्रश्नांची उत्तरे स्वतः शोधत नसत तर धर्मगुरूंनी दिलेली उत्तरे ते स्विकारीत असत. समाजातील राजकीय समुदायांना संघटीत व सुव्यवस्थीत ठेवण्याचे कार्य करण्यास धर्मसंस्था पुरेशी होती. नंतर प्रबोधनकाळामध्ये माणसे स्वतःच विचार करू लागली.

जगाची लोकसंख्या वाढली आणि वाढत्या लोकसंख्येला अनुसरून औद्योगिक क्रांती घडून आली. या औद्योगिक क्रांतीने माणसासमोर अनेक नवनवीन प्रश्न निर्माण झाले आणि हे प्रश्न सोडविण्यासाठी समाजातील विद्वान व तज्ञ अनुभवी माणसांनी वैचारिक योगदान देण्यास सुरुवात केली आणि या वैचारिक योगदानातून विविध विचारप्रणाली उदयास आली. धर्मगुरू, ज्या प्रश्नांची उत्तरे देण्यास असमर्थ होते. त्या प्रश्नांची उत्तरे विविध विचारप्रणाली देऊ लागली. जेंव्हा समाजधारणेसाठी धर्माचे बळ अपुरे पडू लागले तेंव्हा ते बळ भरून काढण्याचे काम विचारप्रणाली करू लागली. या विचारप्रणालीतून समाजाचा विकास जसजसा होत चालला तसतस्या प्रकारे या विचारप्रणालीचे महत्त्व वाढत गेले.

आज समाजात विचारप्रणालीचे महत्त्व सर्वांत जास्त आहे. किंबहूना संपूर्ण समाजाची प्रगती ही या विविध विचारप्रणालीवरच अवलंबून आहे. जेंव्हा जेंव्हा समकालीन प्रश्नांची किंवा समस्यांची तिव्रता

मानवाला भेडसावते तेंव्हा तेंव्हा विचारप्रणाली मानवाच्या उपयोगी पडते. म्हणून वर्तमानकाळात सुखी व समृद्ध जीवन जगायचे असल्यास विचारप्रणाली हे साधन खूप महत्त्वाचे आहे.

**विचारप्रणालीचा अर्थ :**

प्राचीन कालखंडातील इतिहास पाहिला तर जेंव्हा मानवी समाजाला स्थिर अवस्था आली तेंव्हा मानवांनी समाजात शांतता, सुव्यवस्था रहावी, सर्वांना चांगल्या प्रकारे जीवन जगता यावे म्हणून समाजात वेगवेगळे नियम अस्तित्वात येण्यास सुरुवात झाली म्हणजे राजकीय संकल्पना अस्तित्वात आली. उदा. समता, न्याय, बंधुत्व कायदा इ. विचारधारेची व्यवस्थाबद्ध मांडणी समाजात उदयास आली म्हणून टॅसी म्हणतो, ''विचारप्रणाली हे विचारांचे शास्त्र आहे.'' म्हणजेच विचारांचा जन्म भौतिक प्रक्रियेमधून कसा होतो हे अनुभवसिद्ध पद्धतीद्वारे शोधणे एवढेच विचारप्रणालीचे प्रयोजन असते अशी ट्रॅसीची कल्पना होती. थोडक्यात समाज म्हटला की विचारप्रणाली आलीच आणि विचारप्रणाली म्हटले की पर्यायाने समाज आलाच म्हणून विचारप्रणालीतील विचार स्थूलमानाने परस्परांना पुरक असले पाहिजेत तरच त्यातून एक प्रकारची निश्चित दिशा मिळते व विचारकारणी संकल्पना पूर्णत्वास येते.

**विचारप्रणालीच्या व्याख्या :**

विचारप्रणालीचा अभ्यास आजपर्यंत अनेक विचारवंतांनी केलेला आहे. परंतु त्यातील काही विचारवंतांनी केलेल्या व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतात.

**१) मॅक आयव्हर :**

उद्दिष्टांना जन्म देणाऱ्या राजकीय, आर्थिक व सामाजिक मुल्यांची आणि विचारांची पद्धती म्हणजे राजकीय व सामाजिक विचारप्रणाली होय. ही उद्दिष्ट्ये राजकीय कार्यक्रमाचा केंद्रबिंदू असतात.

**२) एस. ई. फायनर :**

राजकीय विचारसरणी म्हणजे विचारांची अशी व्यवस्था जी अत्यंत बौद्धिक कुशलतेने तयार केलेली असते. अशा प्रकारची व्यवस्था बुद्धिवंत अभ्यासकांनी लिहिलेली असते. ही व्यवस्था विचार करण्याची पद्धती दर्शवते. या व्यवस्थेत असणारे विचार बहूतेक भावनात्मक असतात व तेथे विवेकाचा अभाव असतो.

**३) कार्ल फेडरिक :**

एखादी राजकीय व्यवस्था कशी बदलायची, सुधारवायची आणि टिकवायची यांचा व्यवहारिक साधनांशी संबंधीत बरीचशी सुसंगत विचारसंहिता म्हणजेच विचारप्रणाली होय.

**४) डॅनियल आयव्हर :**

प्रत्येक विचारप्रणालीमध्ये वर्तमानस्थितीचे मूल्यमापन आणि भविष्याची दूरदृष्टी यांचा समावेश असतो.

**५) डेव्हीड ईस्टन :**

ज्या आदर्शांच्या, साध्यांच्या व हेतूच्या आधारावर वर्तमान व भूतकाळाचा अर्थ लावता येतो व भविष्याचा वेध घेता येतो त्याला विचारप्रणाली म्हणतात.

थोडक्यात राजकीय सत्ता कोणत्या हेतूंनी व कोणत्या मर्यादेत वापरावी याचे निर्धारण विचारप्रणाली करतात. काहीजण तिला पोकळ प्रचाराचे साधन मानतात म्हणून कार्ल मार्क्स विचारप्रणालीला 'स्वामित्व गाजवणाऱ्या वर्गाचे किंवा त्यांच्या अधिपत्याखाली चाललेले धार्मिक-वैचारिक चिंतन मानतो. कोणत्याही समाजातील राजकीय लोक विचारप्रणालीचा उपयोग स्वतःचे हितसंबंध जपण्यासाठीच करतात म्हणून रॉबर्ट डहाल म्हणतात, ''राजकारणाच्या आधी राजकारणाच्यावर आणि राजकारणाच्या सभोवती त्याला नियंत्रित करण्याचे व घडवण्याचे कार्य विचारप्रणालीच करीत असतात.''

**विचारप्रणालीची वैशिष्ट्ये**

१) विचारप्रणालीची भूमिका राजकीय व इतर संदर्भात वापरली जात असली तरी विचारप्रणालीची भूमिका नेहमीच ऐतिहासिक राजकीय राहिली आहे.

राजकीय चळवळीचे ध्येय, गृहीतके, हेतू व समर्थने विचारप्रणालीतून निर्धारीत झाली आहे.

२) अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा शोध संरचनांची टीका व असहकार आणि परिवर्तनांच्या वारांचा शोध नेहमी विचार-प्रणालीतूनच घेतला जातो.

३) विचारप्रणालीत राजकीय परिवर्तन, राज्यव्यवस्था कायम टिकवण्यासाठी लोकांना प्रवृत्त करून वर्तमान वाटचाल चालू असते.

४) सामान्य समाजातील राजकीय व्यवस्थेत वास्तव्य करणाऱ्या लोकांना आकर्षित करण्यासाठी घोषणा, प्रतिके विचारप्रणालीत असतात.

५) विचारप्रणालीमध्ये राजकीय वाटचाल साकार व्हावी म्हणून चळवळीचे धोरण, युक्त्या, प्रयुक्त्या, अनेक प्रकारचे उपक्रम मार्गदर्शन विचारप्रणालीत असते. प्रत्येक विचारप्रणाली तिच्या मूल्यांशी बांधील असते.

**विचारप्रणालीची साधने :**

**१) आकर्षक घोषवाक्ये :**

विचारप्रणालीत प्रामुख्याने भाषेच्या माध्यमातून समाजात स्थिरता, परिवर्तन व विकास करण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून अनेक प्रकारच्या घोषणा तयार कराव्या लागतात. अशा घोषणा कृतीप्रणव होण्यासाठी विचारांची प्रभावी मांडणी व भावनिक आव्हान करणाऱ्या शब्दात मांडतात. उदा. २०१८ मधील होय, मी लाभार्थी, हे माझे सरकार.

**२) आदर्शात्मक बोध :**

विचारप्रणालीमधून माणसाने माणसाशी कसे वागावे, काय वाईट-काय चांगले, योग्य-अयोग्य, पाप-पुण्य इ. आदर्शात्मक तत्त्वाची निर्मिती राजकीय व्यवस्थेमधून केली जाते. ती लोकांना मार्गदर्शक ठरते. समाजातील सर्व लोकांना सुसंगत वागण्याची प्रेरणा देण्यासाठी आदर्शात्मक बोध उपयुक्त ठरतात. विचारप्रणालीत वर्तमान परिस्थितीत जीवन जगत असताना भविष्यातील स्वप्न दाखविता येते. आदर्शात्मक बोध बुद्धीच्या कसोटीवर टिकत नसली तरी त्यातील प्रेरणा, सामर्थ्य खूप मोठे असते.

### ३) वैज्ञानिक मांडणी :

वैज्ञानिक आधार घेऊन प्रत्येक विचारप्रणालीची मांडणी केली जाते. परंतु सर्वच विचारप्रणाली सामाजिक, आर्थिक, राजकीय वास्तवासंदर्भात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून केलेल्या अभ्यासावर आधारित असतात असे नाही. बऱ्याचदा त्यामध्ये सरमिसळपणा दिसून येतो. त्या आपल्या अंदाजाने शास्त्रीय सत्य म्हणून मांडल्या जातात. कोणत्याही विचारप्रणालीत काय आहे हे सांगण्यापेक्षा, काय असावे हे सांगितले जाते.

### ४) सर्व प्रश्नांची सुलभ उत्तरे :

विचारप्रणालीचे श्रद्धावान अनुयायी असतात त्यातून एकमेकांविषयी आत्मीयता निर्माण होते जे सहजासहजी समर्थन देत नाहीत त्यांना वेगवेगळ्या मार्गाने स्वीकृतीसाठी कार्यप्रवृत्त केले जाते. ज्यांना भविष्याची वाट दिसते ते त्या मार्गाने जातात. जे प्रयत्न करून विरोधात वागतात त्यांना नविन विचारप्रणालीचे दरवाजे कायम मोकळे असतात. उदा. हिटलरने अनुक्रमे शुद्ध वंशाचे आर्य लोक आणि खलनायक ज्यू लोक अशी विभागणी आपल्या विचारप्रणालीतून केली होती.

### विचारप्रणालीची भूमिका :

देशातील प्रत्येक राजकीय वर्तनाला एक विशिष्ट विचारप्रणाली प्रभावित करीत असते. विचारप्रणालीच्या प्रभावाखाली व्यक्त चळवळीमध्ये आपले सर्वस्व झोकून देतात. प्राणासहित सर्वस्व त्याग करतात. कारण प्रत्येक संघर्षाच्या मुळाशी विविध विचार अंतर्भूत असतात. म्हणून विचारप्रणालितील भूमिका विचारात घेणे आवश्यक आहे.

### १) वैचारिक बांधिलकी :

विचारप्रणालींना महत्त्वाचे व्यवहारिक संदर्भ असतात. एका विशिष्ट प्रकारच्या विचाराच्या बांधिलकीला महत्त्व असते. व्यक्ती कसे वागेल? काय करेल? अमुक एका राजकीय प्रश्नांवर व्यक्ती कोणती भूमिका मांडेल हे विचारप्रणालिशी असलेल्या तिच्या बांधिलकीनुसार ठरत असते. त्यानुसार व्यक्ती व राष्ट्र आपापल्या प्रतिक्रिया व्यक्त करीत असतात. विशिष्ट विचारप्रणालितून त्यांची भविष्यातील भूमिका काय असू शकते याची कल्पना येते.

### २) बौद्धिक भूमिका :

मानव हा जसा समाजशील प्राणी आहे. तसाच तो बौद्धिक प्राणी ही आहे. इतर प्राण्यांमध्ये आणि मानवामध्ये केवळ बौद्धिक फरक असल्यामुळे मानवांनी समाज निर्माण केला. बुद्धिच्या आधारे विचारप्रणालीच्या त्यामध्येही जीवनमूल्य स्विकारली जातात. आपले ध्येय निश्चित करून जीवन जगण्याची खरी प्रेरणा त्यामधून त्याला मिळते. आज आधुनिक युगात शिक्षणाच्या प्रगतीमुळे विचारप्रणालीच्या आधारावर त्याला भूमिका करावी लागते. आपल्या भूमिकेवर श्रद्धा ठेवून त्यासाठी जगण्याची व मरण्याची प्रेरणा विचारप्रणाली देत असते.

### ३) विश्वाचे आकलन :

विचार करण्याच्या क्षमतेमुळे विश्वाचे व विविध प्रक्रियांचे आकलन व निर्वचन करून घेण्याची क्षमता निर्माण होते. विचारप्रणालीमुळे जगाचा प्रवाह कोणत्या दिशेने वाहत आहे का व कसा वाहणार आहे इ. प्रश्नांचा उलगडा होण्यास मदत होते. परंतु विचारप्रणालीतील विचार अशास्त्रीय सत्य व आदर्शापासून दूर जाणारे नसावेत असे कार्ल मार्क्स म्हणतो तर ते प्रत्यक्ष परिस्थिती व गरजांवर आधारित असावेत म्हणून अशा विचाराच्या आकलनासाठी विचारप्रणाली समजून स्विकारली पाहिजे.

### ४) विवेकी संघर्षाचा वापर :

समाजातील विविध वर्गांमध्ये वर्गीय जाणिव आणि या जाणिवेतून समाजात इतरांशी आलेले संबंध व्यक्तीला स्ववर्गाची जाणीव करून देत असते. कारण मार्क्सच्या शब्दांत सांगायचे झाले तर प्रत्येक व्यक्तीला जाणिवेनुसार त्यांचे अस्तित्व निर्धारित होत नाही तर अस्तित्वानुसार जाणीव निर्धारित होत असते. व्यक्तीला तिच्या वर्गीय चष्म्यातून जे दिसते ते प्रत्यक्ष वास्तवापेक्षा निराळीच असते यालाच मार्क्स भ्रांत जाणिव असे म्हणतो. त्यामुळे कोणत्याही विचारप्रणालीचे विश्लेषण करताना तिचे वर्गीय संदर्भ, सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी विचारात घ्यावी लागते. समाजात प्रत्येक कालखंडात परस्परविरोधी विचारधारेचे दोन वर्ग निर्माण होतात. जसे-शोषक-शोषित या दोन्हीची ही विचारप्रणाली वेगवेगळी असते. भांडवलदारी समाजामध्ये कामगार वर्गाचे हितसंबंध व भांडवलदार वर्गाचे हितसंबंध वेगवेगळे असल्यामुळे या संघर्षाला वैचारिक अस्त्रे पुरवणारी विचारप्रणाली मार्क्सच्या विचारधारेतून जगासमोर आली.

### ५) प्रभावी संघटन कौशल्य :

विशिष्ट विचारप्रणालीचा स्विकार करून ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी संघटनात्मक कौशल्य व शिस्त महत्त्वाची आहे. कोणत्याही विचारप्रणालीचा स्विकार करणारा व्यक्ती संघटनेच्या शिस्तिला अनुसरून आपले वर्तन करीत असतो. त्यामधून त्याला प्रेरणा मिळते. ध्येय प्राप्त करण्यासाठी नेतृत्वाची सत्ता स्विकारली जाते व त्याला समाजात अधिमान्यता प्राप्त होते. विचारप्रणालीत स्वहिताला कोणत्याही प्रकारची किंमत नसते. फक्त विचारप्रणालीला अनुसरून जीवन जगले जाते. अशा कृतिशिल विचारप्रणालीच्या भूमिकेतून समाजात इतरांसाठी नवचैतन्य निर्माण होण्यास हातभार लागतो.

### ६) राजकीय सहभाग :

लोकशाहीमध्ये लोकांनी-लोकांसाठी-लोकांकडून-लोकांकरिता चालविलेले राज्य असल्यामुळे निवडणूक लोकसहभाग अस्विकाराचे संघटन स्वातंत्र्य इ. मुळे राजकीय सहभागाचे प्रमाण वाढते परंतु ही विचारप्रणाली सदोष असेल तर त्यातून भावनाविवश, अविवेक व विध्वंसक झुंडशाहीचा धोका अटळ ठरतो. राजकीय सहभागातून जाणिव जागृती झालेले शोषित घटक जेंव्हा आपले हक्क, अधिकार मागण्यासाठी संघटितपणे उभे राहतात तेंव्हा संघर्ष अटळ ठरतो. हे संघर्ष विचारप्रणालिच्या आधारावर योजनापूर्वक लढवले गेले नाहीत तर अराजकता माजण्याच्या व राज्यव्यवस्थेचे स्थैर्य डोलायमान होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. विचारप्रणाली भिन्न भिन्न स्तरावरील भिन्न भिन्न व्यक्तींना एकत्र आणते. समविचारी व्यक्ती जेंव्हा एकजुटीने राजकीय सहभाग घेतात तेंव्हा त्यांच्या न्याय मागण्या लवकर पूर्ण होतात व त्यांना हवी असलेली समाजव्यवस्था निर्माण करू शकतात.

### ७) राजकीय शिक्षण :

विचारप्रणालीला लाभणारा विश्वासू राज्यव्यवस्थेतील प्रकियेवर अवलंबून असतो. त्यामुळे त्यामधील योग्य-अयोग्य, चांगले-वाईट यांचे राजकीय प्रशिक्षण विचारप्रणालीमुळे होत असते. हे राजकीय शिक्षण, राजकीय पक्ष, त्या पक्षाचे उमेदवार, पक्षाच्या कार्यक्रमाद्वारे मिळते तसेच प्रत्येक राज्ययंत्रणाही हे शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत असते. विचारप्रणालीच्या आधारावर घेतल्या गेलेल्या निर्णयाच्या विरोधात व समर्थनार्थ कांही गोष्टी केल्या जातात यामुळे राजकीय शिक्षण घडून येते, थोडक्यात आपली राजकीय भूमिका वेळोवेळी कशी असावी व आपण कोणत्या बाजूने उभे रहावे हे विचारप्रणालीच्या आधारे व्यक्ती ठरवू शकते हे एक प्रकारे विचारप्रणालीतून होणारे सामाजिकरण असते.

### ८) सत्तेला अधिमान्यता :

विचारप्रणालीच्या माध्यमातून सत्तेला अधिमान्यता मिळते. तिच्यामुळे सत्ता संबंध अधिक मजबूत होतात. त्यासाठी लोकहिताच्या इच्छेचे प्रतिबिंब विचारप्रणालीद्वारे सत्तेला जनमानसात उमटवावे लागते. तरच स्वइच्छेने लोक त्याचा स्विकार करतात. म्हणून राजकीय प्रणालीत विचारप्रणालींना संविधानिक महत्त्व असते. विचारप्रणालीमुळे राष्ट्राच्या विचारसरणीला जोपासण्याचे सामर्थ्य मिळते. आणि या आधारावर केलेल्या सत्तेलाच अधिमान्यता मिळते.

थोडक्यात विचारप्रणालीच्या वरील भूमिकेचे विश्लेषण पाहिले तर व्यक्तीची प्रत्येक कृती विवेकावर आधारित असावी लागते. चिंतनवादी सिद्धांतानुसार लोक जे राजकीय विचार ग्राह्य मानतात तेच राजकीय संस्थांना व राजकीय वर्तनाला आकार देत असतात. मार्क्सने विचारप्रणालीवर टीका केली असली तरी विचाराचे महत्त्व अमान्य केले नाही कारण कार्यवाही विचारवंताच्या मते राजकीय विचारप्रणाली हा सामाजिक व्यवस्थेचा अविभाज्य भाग असतो. आणि त्यामुळे त्या व्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करीत असतो.

### विचारप्रणालीच्या अभ्यासाची आवश्यकता :

राजकीय विचार हे राजकीय संस्था व राजकीय वर्तनाला आकार देतात. त्यासाठी प्रत्येक विचारप्रणालीची बांधिलकी आवश्यक असते. या वैचारिक बांधिलकीमुळे व्यक्ती राजकीय व्यवस्थेला स्थैर्य देऊ शकते. म्हणून अलिकडील काळात विचारप्रणालीला राजकीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते.

१) प्रत्येक राज्यव्यवस्थेतील विचारसरणी एका गटाला दुसऱ्या गटापासून अलग करते. गटांचा वेगवेगळेपणा समजून घेण्यासाठी विचारसरणीच्या अभ्यासाची आवश्यकता असते.

२) राज्यव्यवस्थेतील प्रत्येक गटाचे वेगळेपण, स्वतंत्र ओळख विचारसरणी दाखविते. हे वेगळेपण समजण्यासाठी तिच्या अभ्यासाची आवश्यकता असते.

३) राज्यव्यवस्थेतील कोणतीही विचारप्रणाली कायम नसते. ती नेहमी काळानुरूप बदलत असते. कोणतीही विचारप्रणाली स्विकारताना कोणताही देश ती आहे तशी न स्विकारता तिच्यात बदल करून स्विकारत असतो. हे बदल का करता हे अभ्यासण्यासाठी विचारप्रणालीचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

४) प्रत्येक विचारसरणीच्या ध्येयप्राप्तीसाठी निश्चित आराखडा आखन असते. उदा. साम्यवादी विचारसरणी एक पक्षपद्धतीची रचना सुचवते तर उदारमतवादी अनेक विचारसरणींना मान्यता देते. त्यामुळे प्रत्येक राजकीय व्यवस्थेत हा रचनात्मक बदल असतो. त्यासाठी विचारप्रणालीच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

५) काही विचारसरणीच्या अग्रहीभूमिकेमुळे अनेक राजकीय व्यवस्थांचे नुकसान झालेले आहे. उदा. फॅसिझम व नाझीझमच्या अतिरेकी भूमिकेमुळे इटली व जर्मनीचे आतोनात नुकसान झाले. आज अनेक देशात धार्मिक कडवेपणा वाढत चालला आहे. तेंव्हा अशा विचारसरणीमुळे संभाव्य देशावर काय परिणाम होतील हे पाहण्यासाठी विचारसरणीचा अभ्यास आवश्यक आहे.

थोडक्यात कोणतीही व्यवस्था कोणत्या ना कोणत्या विचारप्रणालीला स्विकारत असते. त्या विचारप्रणालीनुसार त्या देशाची वाटचाल चालू असते. उदा. भारताची समाजवादी विचारधारा, अमेरिकेची उदारमतवादी तर चिनची साम्यवादी विचारधारा आढळून येते. यावरून विचारसरणीच्या विविध अंगांचा अभ्यास होणे ही आज काळाची गरज आहे. विचारसरणीत सातत्याने बदल घडून येत राहतात. जुन्या विचारसरणीची जागा नवीन विचारसरणी घेते. कालांतराने ती जुनी होते परत नवीन हे चक्र समाजात सातत्याने चालू राहते. त्यामुळे विचारसरणींचा केंव्हाही शेवट होत नाही. जोपर्यंत समाजात आदर्श राजकीय व्यवस्था, आदर्श सामाजिक रचनेचा शोध चालू राहील तोपर्यंत समाजात नवनवीन विचारसरणी जन्म घेत राहील.

या घटकात आपण राजकीय समाजशास्त्राचे दृष्टिकोन अभ्यासणार आहोत. या घटकात राजकीय समाजशास्त्रात विविध दृष्टिकोनाच्या अभ्यासाची गरज का भासू लागली आणि तो अभ्यास केव्हा पासून केला जावू लागला. त्यांची आवश्यकता काय आहे हे समजून येणार आहे. तेव्हा राजकीय समाजशास्त्राच्या विविध दृष्टिकोनाचे आकलन होण्यासाठी हा घटक दोन उपघटकात विभाजीत केला आहे हे घटक पुढीलप्रमाणे -

१) व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोन.

२) सत्ता विभाजनाचा अभिजन दृष्टीकोन

३) आदान-प्रदान दृष्टीकोन

## २.४ राजकीय समाजशास्त्राचे दृष्टिकोन :

समाजशास्त्र हे सामाजिक घडामोडीचा अभ्यास करीत असल्यामुळे राजकीय संस्था आणि त्यामागील सामाजिक आशय अभ्यासण्यासाठी राजकीय समाजशास्त्राची निर्मिती झाली. आधुनिक काळामध्ये जगाची वाढती लोकसंख्या, लोकशाहीचा विकास इत्यादी कारणांमुळे जगातील संपूर्ण देशामध्ये निवडणूका, राजकीय पक्ष, प्रचार मोहिमा, प्रातिनिधिक संस्था यांचे महत्त्व वाढत आहे. वैज्ञानिक विकास आणि औद्योगिक प्रगती यामुळे लोकांना रिकामा वेळ आज मोठ्या प्रमाणात मिळू लागला आहे. शिक्षणाच्या आणि दळणवळणाच्या सोई-सुविधात झपाट्याने वाढ झाली. दळणवळणाच्या क्रांतीमुळे लोकांना विविक्ष क्षेत्रातील माहिती घरबसल्या मिळू लागली. या जाणीव-जागृतीमुळे लोकांचा शासनाकडे, स्वत:कडे आणि

समाजकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. ज्ञानाच्या नवनवीन सिमा निर्माण झाल्यामुळे नव-नवीन विचार दृष्टिकोनाचा उगम झाला. वाढत्या दळणवळणामुळे प्रादेशिक अलगपणा संपुष्टात येऊन राष्ट्रव्यापी आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या जाणिव निर्माण झाल्या. त्यामुळे राजशास्त्रज्ञांना आणि समाजशास्त्रज्ञांना नव-नवीन अभ्यास विषय मिळू लागले. बदललेल्या किंवा बदलत चाललेल्या भौतिक परिस्थितीचे समाजव्यवस्थेवर झालेले परिणाम अभ्यासण्याचे कार्य संख्याशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, मानसशास्त्र व समाजशास्त्र या अभ्यासशाखांनी केले. राज्यशास्त्राने याबाबतीत प्रामुख्याने समाजशास्त्र, मानसशास्त्र व संख्याशास्त्र यांची मदत घेतली व त्यांच्या अभ्यास पद्धती आणि दृष्टिकोण यांचे योग्य व आवश्यक तेथे अनुकरण करून नवनवीन आचरण पद्धतीचे अवलोकन व विश्लेषण करण्यास सुरुवात केली व त्यामधून राजकीय समाजशास्त्रात समाजातील विविध दृष्टिकोणाचा अभ्यास केला जावू लागला. राजकीय समाजशास्त्राचे अनेक दृष्टीकोन असून त्यापैकी येथे आपण पुढील दृष्टीकोनाचा अभ्यास करणार आहोत. उदा. (१) व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोन. (२) सत्ता विभाजनाचा अभिजन दृष्टीकोन. (३) आदान-प्रदान दृष्टीकोन इत्यादी.

### २.४.१ व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोण (System Analysis Approach) :

राजकीय समाजशास्त्रामध्ये व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनाला अलिकडे खूप महत्त्व आले आहे. राजकीय व्यवस्थाही संज्ञा तुलनात्मक राज्यशास्त्राच्या अभ्यासात आज सामान्यपणे रूढ होऊ लागली आहे. राजकीय समाजशास्त्राच्या जुन्या अभ्यासामध्ये राज्य, राष्ट्र, शासन या संज्ञा प्रचलीत होत्या. आज त्यांची जागा राजकीय व्यवस्था या संज्ञेने घेतल्या आहेत. आधुनिक विवेचनामध्ये काही जुन्या गोष्टींना नव्या संज्ञा दिलेल्या आहेत. परंतु त्याचबरोबर पूर्वी राज्यशास्त्राच्या अंगभूत न मानल्या गेलेल्या प्रक्रिया आणि कृती यांचेही विश्लेषण आणि विवेचन नव्या संज्ञांच्या रुपाने व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनात केलेली आहे.

व्यवस्था हा मुळात जीवशास्त्रीय शब्द पण मानवशास्त्र, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र विषयांच्या अभ्यासकांनी वापरलेल्या, संकल्पनेचा राज्यशास्त्राच्या अभ्यासात सर्वप्रथम वापर करण्याचे श्रेय डेव्हिड ईस्टन या शास्त्रज्ञानाला जाते. गेब्रियल आल्मंड आणि कार्ल डायश यांनी व्यवस्थात्मक पद्धतीचा वेगळ्याप्रकारे अवलंब केला. आल्मंडनी संरचना कार्यवादाच्या स्वरूपात तर डॉयश यांनी कम्युनिकेशनवादी संशोधनात व्यवस्थात्मक दृष्टिकोन अवलंबला. खऱ्या अर्थाने कोणतीही व्यवस्था म्हणजे परस्परसलग्न व परस्परांशी आंतरक्रिया करणाऱ्या घटकांचा संच असते. आपल्या अभ्यासाचा विषयही एक व्यवस्था आहे. म्हणजेच एकमेकांशी संबंधित घटकांचा संच आहे, असे समजून विश्लेषण करणे म्हणजेच व्यवस्थात्मक विश्लेषण म्हणतात. १९५० साली डेव्हिड ईस्टनने राज्यशास्त्रात व्यवस्थात्मक विश्लेषण या दृष्टिकोनाचा खुलासा करून या अभ्यास पद्धतीचा आग्रह धरला. त्यांच्या मते, राज्यशास्त्रातील शास्त्रशुद्ध सिद्धांताची मांडणी करणे यादृष्टिकोनाचा अवलंब करूनच शक्य आहे.

### व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोणाचा अर्थ :

डेव्हिड ईस्टनने मुख्यत्वे राज्यव्यवस्था आणि तिचे विविध अंग यांच्यातील आंतरसंबंधाचा विश्लेषणावरच आपले लक्ष केंद्रीत केले आहे. राज्यव्यवस्थेच्या कक्षा संकल्पनात्मक पातळीवर स्पष्ट करण्यासाठी तो

राजकीय जीवनाची पुढीलप्रमाणे व्याख्या करतो. ''समाजासाठी अधिकारपूर्ण धोरण ठरविणे आणि ते अमलात आणणे या प्रक्रिया ठळकपणे प्रभावित करणाऱ्या सर्व प्रकारच्या कृती राजकीय जीवनात सहभागी असतात. समाजासाठी होणारी धोरणाची निर्मिती व अंमलबजावनी यांच्याशी आपल्या हालचाली ज्या ज्या वेळी संबंधित असतात तेंव्हा आपण राजकीय कृती करीत असतो.''

संपूर्ण समाजासाठी अधिकारयुक्त मूल्य निर्धारण करणे हे राज्यव्यवस्थेचे सर्वात महत्त्वाचे कार्य असते. म्हणजेच या कार्याशी ज्या ज्या कृतींचा संबंध येतो त्या सर्वांना मिळणूच राज्यव्यवस्था ही संज्ञा वापरली जाते आणि अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण हा राज्यशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय ठरतो. अधिकारयुक्त धोरणांची निर्मिती करणे हा प्रत्येक समाजापुढे महत्त्वाचा प्रश्न असतो. मौल्यवान वस्तूंचे वितरण सत्ताधारी व्यक्ती समजात करतात किंवा वस्तूंचे मूल्य ठरवून देतात किंवा मूल्यवान मानल्या गेलेल्या वस्तूंच्या संदर्भात उद्‌भवलेल्या तंटेबखेड्यांचा निवाडा करतात. या सर्व कामांना उद्देशूनच ईस्टनने अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण असा शब्दप्रयोग केला आहे.

समाजात हे कार्य करणाऱ्या राज्यव्यवस्थे बरोबरच इतरही भौतिक, सामाजिक, मानसिक, जैविक व्यवस्था असतात. त्यासुद्धा मूल्यनिर्धारण करतात पण त्या मूल्यनिर्धारणाची अधिकारयुक्तता सीमित असते. अधिमान्य बळाचा वापर करणे किंवा तसे करण्याचा धाक दाखवणे हे फक्त राज्यव्यवस्थेलाच करता येते यातच तिचे वेगळेपण सामावलेले असते.

आल्मंड म्हणतो, ''दंडशक्तीचा अधिमान्य वापर करुन किंवा त्याचा धाक दाखवून ऐक्य आणि संतोषणाची कार्य पार पाडणाऱ्या आंतरक्रियांचा संच म्हणजे राज्यव्यवस्था होय.''

समाजातील इतर गैर-राजकीय संरचनाही जेव्हा राजकीय प्रक्रियांमध्ये सहभागी होतात तेव्हा त्या सहभागापुरत्या राज्यव्यवस्थेत अंतर्भूत होतात. राज्यव्यवस्था व तिचे विविध भाग यांच्यातील सीमारेषांमधून राज्यव्यवस्थेच्या संकल्पनात्मक सरहद्दी निर्धारित होत असतात. दंडशक्तीच्या अधिमान्य वापराशी संबंधित कृती, भूमिका व संरचना यांचा त्या सरहद्दीमध्ये समावेश होतो.

**व्यवस्था विश्लेषणात्मक विश्लेषण :**

व्यवस्था विश्लेषणात्मक संकल्पना ही पुर्णत: हा पर्यावरण व राज्यव्यवस्था यांच्यातील देवाण-घेवाणीवर आधारित आहे. पर्यावरणाकडून राज्यव्यवस्थेकडे इनपूटस येत असतात. राज्यव्यवस्थेने अमूक प्रकारे मूल्य निर्धारण करावे किंवा करू नये मागण्यांचे स्वरूप असते. अनेकदा काही मागण्या प्रमाणाबाहेर मोठ्या असतात किंवा वेळ आणि उपलब्ध साधनांच्या मर्यादामध्ये त्या पूर्ण करता येण्याजोग्या नसतात. हे आव्हान पेलण्यासाठी राज्यव्यवस्था अनेक मार्ग अवलंबत असते. काही मागण्या आविस्क्रत होऊ देत नाही. तर काही मागण्या समाजाच्या सांस्कृतिक आदर्शाशी विसंगत ठरवून निकालात काढते किंवा अनेक उपाय योजून काही मागण्यांची तीव्रता कमी करते. तर काही मागण्या पूर्ण करणे अशक्य आहे हे स्पष्ट करते. तर शिल्लक मागण्यांचे रूपांतर अधिकारयुक्त निर्णयांच्या स्वरूपात परिवर्तन करते तेव्हा मागण्यांची अशी परिपूर्ती करण्यावरच राज्यव्यवस्थेचे अस्तित्व टिकून राहणे अवलंबून असते. पर्यावरणाकडून पाठिंबाच्या रूपाने मिळणारे पाठबळही राज्यव्यवस्थेला उपयुक्त ठरत असते. संपूर्ण राजकीय समुदाय, राजवट आणि राजकीय अधिसत्ता या तिन्ही बाबींबद्दल किमान पातळीवरची आत्मीयता त्यासाठी

लोकांमध्ये असावीच लागते. बहुसंख्य लोक जर राज्य व्यवस्थेविषयी असंतुष्ट राहिले तर त्यांचे पाठिंबे क्षीण होण्याचा धोका संभवतो.

ईस्टन म्हणतात, राज्यव्यवस्थेतून समाजात प्रस्तुत होणारी निर्गते आणखी नव्या मागण्यांना जन्म देतात. एक प्रकारे प्रत्यादान प्रक्रिया ही राज्यव्यवस्थेला वाढीव पाठिंबा निर्माण करते तसेच नवी आव्हानेही उभी करते. आगते-निर्गते-प्रत्यादान-पुन्हा आगते... असे वर्तुळ सर्व राज्यव्यवस्थांमध्ये अखंड सुरू राहते. राज्यव्यवस्थेचा एखादा चल जेव्हा धोक्याची पातळी ओलांडून पलीकडे जातो तेव्हा राज्यव्यवस्थेमुळे अरिष्ट उभे राहते. ज्या परिस्थितीमुळे हे घडते ती आटोक्यात ठेवण्यात राज्यव्यवस्था किती व कशी यशस्वी होते यावरच तिचे भवित्य अवलंबून असते. आगतांचे रूपांतर निर्गतात करणे हे राज्यव्यवस्थेचे मौलिक कार्य असले तरी राज्यव्यवस्था म्हणजे काही ते कार्य करणारी कायम यंत्रणा नाही. तिला स्वत:चे असे प्रयोजन व साध्य असते. त्या साध्याच्या दिशेने वाटचाल करताना पावलोपावली तणाव येतात, तेंव्हा प्रसंगी नियंत्रणात्मक अधिकार वापरून तर प्रसंगी पाठिंबे बळकट करण्यातून राज्यव्यवस्था त्या तणावावर मात करीत असते. राज्य व्यवस्था तणावावर नियंत्रण करण्यासाठी वेळ पडल्यास आपल्या अंतर्गत रचनेत बदलही करते. तसेच माहितीची देवाण-घेवाण अधिक प्रभावी पद्धती अवलंबिते. राज्यव्यवस्था नुसती टिकून राहणे नव्हे तर कार्यक्षम राहणे आवश्यक असते तिच्या हातून 'अधिकारयुक्त मूल्यनिर्धारण होत राहते. तो पर्यंत तिची कार्यक्षमता कायम राहते असे मानले होते. प्रत्येक समाजात राज्यव्यवस्था असतेच. तिच्या वाचून समाजाचे अस्तित्वच संभवत नाही.

**संरचना-कार्यवाद :**

प्रसिद्ध विचारवंत आल्मंडने व्यवस्थापक दृष्टिकोनाचा अवलंब तौलनिक शास्त्राच्या अध्ययनासाठी केला. त्यासाठी संरचना कार्यवाद ही संकल्पना त्याने वापरली. राज्यव्यवस्थेतील संरचनांचा विचार त्यांच्या कार्याच्या माध्यमातून करणे अभिप्रेत असते. आल्मंडच्या मते, प्रत्येक राज्यव्यवस्थेला काही कामे पार पाडावीच लागतात ती कामे एखादी राज्यव्यवस्था किती कार्यक्षमपणे पार पाडते यावरून ती राजकीय विकासाच्या कोणत्या पायरीवर आहे हे ठरवितायेते. प्रत्येक राज्यव्यवस्थेत विशिष्ट संरचना विशिष्ट कार्ये पार पाडतात. ठराविक संरचनेला आपले नियत कार्ये करता आले नाही तर इतर किंवा नव्या संरचेनमार्फत ती केली जातात. राज्यव्यवस्थेचे अस्तित्व, ऐक्य व स्थैर्य यांना पोषक ठरणाऱ्या कार्यांना विधायक कार्य तर मारक ठरणाऱ्या कार्यांना घातक कार्ये असे म्हणता. अलमंडने विधायक कार्यचे सात प्रकार सांगितले आहेत ते खालीलप्रमाणे -

१) राजकीय सामाजिकरण व भरती

२) हितसंबंधाचे अभिव्यक्तीकरण

३) हितसंबधाचे समुच्चयन

४) राजकीय संसूचन

५) नियमनिर्मिती

६) नियमांची अंमलबजावणी

७) नियमांबाबत अभिनिर्णय.

आगत-कार्ये गैर शासकीय उपव्यवस्थांमार्फत तर निर्गत कार्ये शासकीय उपव्यवस्थांमार्फत पार पाडली जातात. शिवाय कोणत्याही राज्यव्यवस्थेच्या ठिकाणी पुढील तीन पुकारच्या क्षमता असाव्याच लागतात. उदा. साधन सामुग्री काढून घेण्याची, व्यक्ती व समूहांवर नियंत्रण करण्याची आणि वस्तू व सेवा वितरीत करण्याची. याशिवाय देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातून येणाऱ्या मागण्यांना प्रतिसाद देण्याची. तसेच आकर्षण व निष्ठा टिकवून ठेवणारी प्रतिके निर्माण करण्याची क्षमताही असावी लागते. या क्षमतांची कसोटी पाहणारी आव्हाने कधी खुद्द त्या राज्यव्यवस्थेतील अभिजनांकडून म्हणजेच सामाजिक समूहांकडून तर कधी इतर राज्यव्यवस्थांकडून उभी केली जातात.

**व्यवस्थावादी दृष्टिकोनाची समीक्षा :**

व्यवस्थाविश्लेषण हा अधिक व्यापक विषय असून त्याच्या आधारानेच कार्यवादाचे आणि आदान-प्रदानाचे अध्ययन करता येते. सर्वसाधारण समज असा की व्यवस्थाविश्लेषण हा काही मूलभूत सिद्धांत नसून राज्यशास्त्रीय विवेचनाला नवी शास्त्रीय दिशा देणारा तो एक दृष्टिकोन आहे.

व्यवस्थाविश्लेषण आणि व्यवस्थात्मक दृष्टिकोन हे दोन्ही दृष्टिकोन वरपांगी जर एकच वाटत असले तरी या दोन्ही मध्येही सूक्ष्मरित्या भेद आहेत. उदा. व्यवस्था-विश्लेषण हे उद्दिष्ट आहे तर या विश्लेषणांचे व्यवस्थात्मक दृष्टिकोन हे एक साधन आहे. व्यवस्थाविश्लेषणाचा कार्यपद्धतीवर भर आहे. विविध राजकीय व्यवस्थांचे स्वरूप, त्यांची वैशिष्ट्ये, विविध बाजू, परस्परसंबंध इत्यादींचा विचार करूनच त्या संदर्भात या व्यवस्थांची क्षमता, त्यांची एकात्मता, यशस्वितता, स्थिरता इत्यादी गोष्टींचा अभ्यास व्यवस्थाविश्लेषणामध्ये अपेक्षित आहे. याशिवाय व्यवस्थात्मक दृष्टिकोनामध्ये विविध घटनांचा अथवा कार्याचा एकात्म पद्धतीने अभ्यास करण्यासाठी व्यवस्थात्मक दृष्टिकोनामध्ये विश्लेषणात्मक रचनेवर भर दिला जातो. उदा. खूर्ची ही एक रचना आहे. तिचे लाकडी हात, पाय, पाठ ही भौतिक रचना झाली तर तिची वजन सहन करण्याची क्षमता आल्हाद किंवा सुख देण्याची पात्रता ही विश्लेषणात्मक रचना आहे.

**व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनाच्या मर्यादा :**

राज्यशास्त्राच्या अभ्यास पद्धतीमध्ये व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोन कितीही उत्तम प्रतीचा असला तरी या दृष्टिकोनाच्या काही मर्यादाही आहेत त्या खालीलप्रमाणे -

**१) जैसे थे चे समर्थन :** व्यवस्थावादाचा एक महत्त्वाचा दोष असा की त्याच्या पायाशी व्यवस्थेचे स्थैर्य गृहीत धरलेले असते त्यामुळे जैसे थेचे समर्थन आणि परिवर्तनशिलतेकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. शिवाय अखिल मानवी समाजाप्रमाणेच त्यातील कोणत्याही व्यवस्थेत परिवर्तन घडून येणे केवळ नैसर्गिकच नव्हे तर प्रसंगी आवश्यकही असते. स्थितिशीलतेवर अवास्तव भर दिल्यामुळेच या महत्त्वाच्या अंगाकडे दुर्लक्ष होण्यचा संभव जास्त असतो.

**२) विकसनशील समाजापुढील प्रश्न :** आर्थिक विकास म्हणजे काय ? आर्थिक विकास कसा साधावा? राष्ट्राचे उत्पन्न वाढले आणि उत्पादनाची गती वाढली म्हणजे खरा विकास झाला का ? उत्पन्नाचे न्यायदान पूर्णपणे वाटप झाले काय ? देशाचा विकास साधत असताना व्यक्तिगत स्वातंत्र्य महत्त्वाचे की

सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यावर भर द्यावयाचा ? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे समर्थपणे द्यावयाची असतील तर अविकसित समाजांना आपापल्या व्यवस्थांचे पूर्ण आकलन झाले पाहिजे आणि या कामी व्यवस्थाविश्लेषणाचे किती महत्त्व आहे हा एक गूढ प्रश्न आहे.

**३) सत्ता आणि व्यवस्थावाद :** व्यवस्थाविश्लेषणामध्ये विशेषत: रचनात्मक कार्य वादामध्ये रचनेच्या कार्यावर भर दिला जातो. हे कार्य एका रचनेकडून दुसऱ्या रचनेपर्यंत होणाऱ्या सत्ताप्रवाहामुळे घडून येत असते. उदाहरणार्थ, एखाद्या कायद्याची कार्यवाही प्रशासन करीत असते त्यावेळी सत्तेचा प्रवाह विधीमंडळाकडून प्रशासन यंत्रणेकडे वाहात असतो. या सत्ता प्रवाहाचे सम्यक् ज्ञान होण्यासाठी व्यवस्थाविश्लेषण पुरेसे उपयोगी ठरणार नाही. कारण असे की सत्तेच्या प्रवाहाची व्याप्ती, खोली, दबाव इत्यादींबाबत आपणास पुरेशी माहिती मिळणार नाही. सत्ताधाऱ्यांच्या अपेक्षा, त्यांच्या जाणीवा याबाबत पुरेशी माहिती उपलब्ध असणार नाही. राजकीय व्यवस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये सत्तेचे स्थान महत्त्वाचे असते. परंतु व्यवस्थाविश्लेषणाच्या आधारे हे महत्त्व विशद करता येणार नाही. कारण व्यवस्थावादाची वरील मर्यादा लक्षात घेतली पाहिजे. विविध व्यवस्थाच्या विश्लेषणातून तसेच अशा परस्परसंबंधित व्यवस्थांच्या तुलनातून बरेच शिकण्यासारखे आहे.

**४) उद्दिष्टांचे आकलन :** खऱ्या अर्थाने कोणत्याही व्यवस्थेतील उद्दिष्टे कशी घडविली व निश्चित केली जातात हे समजणे त्या व्यवस्थेचे सर्वांगीण ज्ञान होण्यासाठी आवश्यक आहे. परंतु व्यवस्थाविश्लेषणाच्या आधारे उद्दिष्टांचे आकलन होत नाही किंवा उद्दिष्ट ठरविण्याच्या प्रक्रियेचे स्पष्टिकरण मिळत नाही. म्हणजेच व्यवस्थाविश्लेषणाची ही एक महत्त्वाची मर्यादा सांगता येते.

**५) व्यवस्थावाद आणि राजकीय परिवर्तन :** राजकीय व्यवस्थांच्या अध्ययनात समतोलाच्या अभ्यासाबरोबरच विविध परिवर्तनाशी मिळते-जुळते घेणे महत्त्वाचे असते. विकसनशील समाजाच्या समस्या अगदी वेगळ्या स्वरूपाच्या असल्यामुळे कमीत कमी कालावधीत पाश्चात्य, विकसीत, समाजाइतकी मजल तर त्यांना गाठावयाची आहेच. परंतु त्याचबरोबर विकास साधत असताना आपली अस्मिताही दाखवून द्यावयाची आहे. तेंव्हा राजकीय विकास म्हणजे काय ? राजकीय विकासाचे पाश्चात्य तसेच साम्यवादी नमुने लक्षात घेता त्यापैकी कोणता नमुना परवडेल ? सांसदीय लोकशाही कि अध्यक्षीय लोकशाही ? असे अनेक प्रश्न आज विकसनशील समाजसमोर आहेत.

**६) गृहीतांचे स्वरूप :** व्यवस्थाविश्लेषणामुळे सत्ता, प्रभाव, अधिकार या सारख्या महत्त्वाच्या राज्यशास्त्रीय संकल्पनांचे आकलन करता येत नाही. व्यवस्थाविश्लेषणाचा आणखी एक गंभीर दोष असा की, निरनिराळ्या व्यवस्थाची तुलना करताना एक तर वास्तवात नसलेली समरूपता गृहीत धरली जाते. अथवा शोधण्याचा प्रयत्न होतो. बहुतेक व्यवस्था परस्परावलंबी असतात. या परस्परावलंबनाचे स्वरूप निश्चित करण्यासाठी योग्य निकष मात्र सहज सापडत नाहीत. त्यामुळे खरी शास्त्रीय तुलना करणे कठीण जाते.

थोडक्यात वर उल्लेखिलेल्या दोषांचा विचार करूनही आधुनिक राजकीय विश्लेषणातील व्यवस्थाविश्लेषणाचे महत्त्व नाकारता येत नाही. व्यवस्था विश्लेषणाने राज्यशास्त्रीय विवेचनात क्रांतीकारक बदल घडवून आणली आहेत. यात कोणतीच शंका नाही.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**(Check your progress - 1)**

**पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) राज्यव्यवस्था म्हणजे काय ?

२) व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनाच्या मर्यादा सांगा.

### २.४.२ सत्ता विभाजनाचा अभिजन सिद्धांत (Power Elite theory)

**प्रस्तावना (Introduction) :**

कोणत्याही प्रकारच्या लोकशाहीमध्ये सत्ता विभाजन होणे खूप महत्त्वाचे असते. प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या अनेक विचारवंतांनी सत्तेच्या विभाजनाचे अनेक सिद्धांत मांडलेले दिसते. या सत्तेच्या विभाजनामध्ये मॅक्सवेबर, विल्फ्रेडो पॅरेटो, सी. डब्लू मिल्स व मोस्का या विचारवंताचे विचार अतिशय महत्त्वाचे आहेत. तेव्हा या घटकामध्ये वरील विचारवंताचे सत्ता विभाजनाचे विचार पाहणार आहोत.

**उद्दिष्ट्ये :**

१. सत्ता विभाजनाच्या अभिजनवादी सिद्धांताची ओळख करून घेता येईल.

२. सत्ता विभाजनाच्या अभिजनवादी सिद्धांताविषयीचे विचारवंतांचे योगदान पाहता येईल.

३. सत्ता विभाजनाच्या अभिजनवादी सिद्धांताविषयीच्या विचारवंतांच्या मताचे आकलन करून घेता येईल.

४. अभिजन वर्ग व सामान्य जनता याविषयी राजकीय व्यवस्थेतील स्थानासंदर्भात विचारवंतांची मते जाणून घेता येतील.

**विषय–विवेचन :**

सत्ता विभाजनाचे अभिजन सिद्धांत समजून घेण्यासाठी वरील चार विचारवंतांचे विचार आपण पाहणार आहोत. वरील चारीही विचारवंतांनी समाजातील पारंपारिक, मध्यमयुगीन व आधुनिक काळातील सत्ता कशा पद्धतीची होती याचे वर्णन केले आहे. या घटकात राजकीय अभिजन अर्थ, व्याख्या आणि अभ्यासाचे महत्त्व विषद केले आहे.

**सत्ता विभाजनाचा अभिजन सिद्धांत :**

''मानवी समाज आणि सामाजिक जीवन याबद्दल कोणताही शास्त्रीय किंवा अशास्त्रीय; पण पद्धतशीर सिद्धांत विकसित करण्याचा प्रयत्न म्हणजे सामाजिक विचार होय.'' सामाजिक विचार हे माणसांच्या गरजेतून निर्माण होतात. मानवी गरजा व त्याविषयी निर्माण होणारे प्रश्न सोडविण्यासाठी सामाजिक विचारवंत समाज आणि सामाजिक संबंध याविषयीचे अनेक विचार मांडतात व नंतर अनेक अंगांनी त्याचे मूल्यमापन होऊन त्याचे

सिद्धांत प्रस्थापित होतात किंवा संकल्पना विकसित होतात.

राजकीय अभिजन ही राजकीय समाजशास्त्राची मूलभूत संकल्पना होय. विशिष्ट क्षेत्रातील श्रेष्ठ व्यक्तींचा उल्लेख करण्यासाठी 'अभिजन' या संकल्पनेचा सुरुवातीच्या काळात उल्लेख करण्यात आला; परंतु १९ व्या शतकानंतर ज्या सामाजिक व राजकीय प्रक्रिया बदलल्या त्यांचा अभ्यास अनेक समाजशास्त्राच्या व राज्यशास्त्राच्या विचारवंतांनी घेतला. त्याद्वारेच 'राजकीय अभिजन' या संकल्पनेला एक निश्चित अर्थ प्राप्त झाला. त्यानुसार ''सर्व राजकीय व्यवस्थेत सर्व महत्त्वाचे निर्णय एक लहान गट घेत असतो.' लासवेल यांनी विवेचन केले. याचे स्वरूपाचे चिंतन मोस्का, पेरेटो, गासेट, बुर्नहॅम, सी. राईट मिल्स मॅक्सवेबर इ. विचारवंतांनी केले. राजकीय अभिजनाद्वारेच सर्व राजकीय क्रिया-प्रतिक्रिया पार पडत असतात या अर्थाने 'राजकीय अभिजन' हे राजकीय व्यवस्थेचे मुख्य सूत्रधार असतात. त्यांच्या अर्थाविषयीचे शास्त्रीय विवेचन विविध विचारवंतांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

### 'राजकीय अभिजन' अर्थ-व्याख्या :

सर्वसाधारणपणे १७ व्या शतकात 'राजकीय अभिजन' ही संकल्पना राज्यशास्त्रामध्ये वापरली जाऊ लागली. अभिजन म्हणजे त्या-त्या क्षेत्रातील श्रेष्ठ व्यक्ती असा अर्थ सुरुवातीला अभिप्रेत असला तरी त्या विषयीचे अर्थ विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

Elite हा शब्द Eligere या शब्दापासून विकसित झालेला आहे. या शब्दाचा अर्थ 'पसंतीनुसार निवड' (Sclection by choice) दुसऱ्या शब्दात काही लोकांची निवड' नेतृत्व (Leadership) यासाठी अभिजन शब्द वापरला जातो.

'राजकीय अभिजन' म्हणजे काय? या विविध विसणविध विचारवंतांनी पुढील विवेचन केलेले आहे.

**१) टी. बी. बोटमोरे** : ''समाजात कितीही स्थित्यंतरे झाली तरी जे समाजात प्रभावी व वरच्या स्थानावर असतात त्यांना राजकीय अभिजन म्हणतात.''

**२) सी. टी. मिल्स** : ''समाजातील सर्वोत्कृष्ट वर्ग ज्यांच्या जवळ पैसा, शक्ती, प्रतिष्ठा असते व जो स्वतःची इच्छा, कितीही विरोध झाला तरी इतरांवर लादण्यात यशस्वी होतो असतो, असा वर्ग राजकीय अभिजन असतो.''

**३) गिटानो मोस्का** : ''मागासलेल्या किंवा पूर्णतः विकसित समाजात दोन वर्ग असतात. शासक व शाशित, पैकी शासक हा राजकीय अभिजन असतो.''

**४) डी. एच. कोल** : ''समाजाच्या प्रत्येक स्तरावर अधिसत्ता निर्माण करणारा आणि ती बाळगणारा असा समूह म्हणजे राजकीय अभिजन होय.''

**५) डॉ. राम आहुजा** : ''राजकीय व्यवस्थेत जी राजकीय संरचना असते, त्या संरचनेच्या वरच्या पदावर ज्या प्रभावी शक्तिशाली व्यक्ती असतात त्या राजकीय अभिजन असतात.''

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, अभिजनाचा वर्ग अतिशय प्रभावी असतो व त्यांच्याकडे नेतृत्व असते. विविध हितसंबंधी दबाव गट, आर्थिक प्रतिष्ठाप्राप्त प्रमुख व्यक्ती इ.चाही समावेश या वर्गामध्ये करता येतो. आधुनिक काळात लोकशाही राजकीय व्यवस्थेत लोकांचा सहभाग किंवा लोकांची सत्ता असा विचार मांडला जात असला तरी राजकीय अभिजनाचा सिद्धांत मांडणारे विचारवंत या संकल्पनेचा स्वीकार करण्यास तयार नाहीत. बाल या अभ्यासकाच्या मते, अप्रत्यक्ष लोकशाही किंवा प्रातिनिधीक लोकशाहीमध्येदेखील अल्पजनांचीच सत्ता असते. लोकसार्वमताचा बुरखा असतो'' या व्यवस्थेत प्रत्यक्षात अल्पसंख्याक जनसमूहावर नियंत्रण ठेवत असतात. जनसमूहाला या अल्पसंख्याकांवर नियंत्रण ठेवता येत नाही. अप्रत्यक्ष लोकशाहीत अल्पसंख्याकांची सत्ता ही त्या व्यवस्थेची मर्यादा असते. मात्र अल्पसंख्याकांची सत्ता ही वास्तविकता आहे.

थोडक्यात राजकीय अभिजनाच्या सिद्धांतानुसार ''जनतेवर नेहमीच अभिजनांचे राज्य असते.'' व्यक्ती-व्यक्तीत असमानता ही नैसर्गिक आहे. त्यामुळेच ही बाब जागतिक आहे. म्हणूनच सर्व काळात सर्व देशात अभिजन, सत्ता पाहावयास मिळते. काही व्यवस्थेत अभिजनांची संख्या अतिशय कमी असते, तर त्या तुलनेत काही व्यवस्थेत जास्त असते.

'राजकीय अभिजन' व सत्ता विभाजन या विषयी अनेक विचारंतांचे सिद्धांत पुढीलप्रमाणे पाहता येतील.

**विलफ्रेडो पॅरेटो (Vilfredo Pareto)**

समाजाचे शास्त्र तर्क व प्रयोग यावरच आधारलेले असले पाहिजे, असा आग्रह धरणारा व तर्कशुद्ध विचार, तथ्याचे निरीक्षण आणि प्रयोगात्मक पडताळा हेच समाजशास्त्राच्या सिद्धांताचे आधारस्तंभ असले पाहिजेत, असे मूलभूत विचार मांडणारा समाजशास्त्रज्ञ म्हणजे विलफ्रेडो पॅरेतो हा होय. युरोपात प्रबोधन युगाला सुरवात झाली आणि त्याचा परिणाम सामाजिक विचारांवर पडू लागला. विलफ्रेडो पॅरेतो या काळातच आपले संशोधन जगापुढे मांडतो आहे. त्यामुळे त्या काळाच्या विचारांचा प्रभाव त्याच्या विचारावर असणे नैसर्गिकच आहे. डार्विनवादी काँत, सिमाँ, इटालीयन विचारवंत मॅकिव्हॅली यांचा प्रभाव पॅरेतोच्या विचारांवर दिसतो.

'बळी तो कान पिळी' हाच मानवसमाजातील मूलभूत न्याय आहे. पॅरेतोच्या काळापर्यंत याच विचारांची पकड मानवी स्वभावाविषयी इटालियन लोकांवर होती. 'समाजातील अल्पसंख्य पण बलदंड समाज बहुजन समाजावर कशी सत्ता गाजवतो व ती त्याला कशी प्राप्त होते' हाच त्याच्या सामाजिक चिंतनातील प्रमुख विचार होता. हाच विचार त्याच्या सर्व सिद्धांत व दृष्टिकोनाचा आधार होता. मानवी वर्तनाचे उगमस्रोत शोधतांना त्याच्या विचारांवर इटालीयन परंपरेची स्पष्ट छाप दिसून येते. माणसाचा मूळ स्वभाव कसा आहे. अल्पसंख्य लोक बहुसंख्याकांवर सत्ता का गाजवतात या इटालीयन परंपरेतील प्रश्नाचा विचार करतांना त्याने 'अभिजन' सिद्धांत मांडला.

**सत्ता विभाजनाचा अभिजन सिद्धांत :**

कोणत्याही समाजामध्ये विविध गुणधर्माच्या अथवा कर्तृत्वाच्या व्यक्ती आढळून येतात. त्यानुसार समाजात वेगवेगळे स्तर निर्माण झालेले दिसून येतात. सर्वसाधारणपणे समाज हा उच्च व कनिष्ठ अशा दोन गटात विभाजित झाल्याचे आढळते. यातील उच्च वर्ग शक्तीमान तसेच समर्थ असल्याने या वर्गाकडे समाजाच्या

नियंत्रणाची सूत्रे केंद्रीत झालेली असतात, अशी समाजाची धारणा असते. सामान्यपणे हा वर्ग सत्ताधारी असतो व समाजावर आपली अधिसत्ता गाजवतो. या दृष्टीने विचार करता प्रत्येक मानवी समाजात या उच्च सामाजिक वर्गाचे प्रभुत्व आढळून येते. याचा सरळ अर्थ अशा उच्च वर्गाकडे समाजातील सत्ता व अधिकार एकवटलेले असतात. अशा सत्ताधारी व अधिकारप्राप्त वर्गाच्या संदर्भात पॅरेतोने 'अभिजन' ही संकल्पना वापरली.

**अभिजनांची तार्कीक व अतार्कीक कृती :**

पॅरेतोच्या मतानुसार, जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात जे सर्वोच्च पदावर असतात त्यांना 'अभिजन' या वर्गात समाविष्ट केले जाते. हा अभिजनवर्ग तार्कीक व अतार्कीक कृतीद्वारे सत्ता संपादन करीत असतो. अभिजन वर्ग हा हुशार असतो. त्याला तार्कीकतेचे महत्त्व माहिती असते. तो अतिशय कौशल्याने आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करतो. तो आपल्या बुद्धिमत्तेच्या आधारावर आपले प्रत्येक वर्तन तर्कसंगत असल्याचे दाखवित असतो. अभिजन वर्ग हा सत्ता प्राप्त करतांना विशेषत: तर्क विसंगत कृतीने सत्तेवर येतो. परंतु तो सत्तेवर आल्यानंतर आपली सत्ता ही तर्कसंगत कृतीची कशी फलनिष्पत्ती आहे हे सिद्ध करतो.

**अभिजनांचे प्रेरक (अविशिष्टांचे) :**

पॅरेतो स्पष्ट करतो की, अभिजन वर्गाजवळ सत्ता प्राप्तीसाठी व सत्ता स्थान टिकविण्यासाठी विशिष्ट गुणांची आवश्यकता असते. या गुणास पॅरेतो 'प्रेरक' (Residues) असे संबोधतो. अशा प्रेरकांची व्याख्या केली जाऊ शकत नाही; परंतु या प्रेरक गुणांमुळेच अभिजनवर्ग शासीत वर्गात जातो व तिथे स्थिरावतो. 'प्रेरक' ही अभिजनाच्या गुण कौशल्य व क्षमतेची अभिव्यक्ती असते. अशा प्रेरकांचे तीन वैशिष्ट्ये आहेत.

१) प्रेरके स्थिर असतात.

२) प्रेरक मूळ प्रवृत्ती नाही तर मूळ प्रवृत्तीची अभिव्यक्ती असते.

३) प्रेरकांचे तार्कीक तत्त्व नसते.

अभिजनांच्या अभिसरण प्रक्रियेमध्ये शासन, अशासक किंवा नवअभिजनांकडे या प्रेरक वैशिष्ट्यांचा अंतर्भाव असेल असा वर्ग सत्ताधारी वर्ग असतो.

**प्रेरकांचे प्रकार (अवशिष्टांचे) :**

पॅरेतोने सहा प्रकारच्या प्रेरकांची चर्चा केलेली आहे. त्यापैकी प्रमुख प्रेरक पुढीलप्रमाणे -

१) एकत्रीकरणाचे प्रेरक

२) समूहाच्या स्थायीत्वाचे प्रेरक

प्रेरकांचे वर्गिकरण करतांना तो स्पष्ट करतो की, शासनाच्या स्वरूपात बदल होतो. त्याच्या आधारभूत कल्पनाही बदलतात आणि परिणाम स्वरूप शासकीय संघटनही बदलते; परंतु लोकांमधील श्रद्धा, धर्म आणि आचरण यावर त्याचा परिणाम होण्याचा संभव कमी असतो. तो पुढे स्पष्ट करतो की, राजकारण्यांना अभिप्रेत

असलेले क्रांतिकारक- बदल आणि 'जैसे थे' म्हणजे स्थिती टिकवून धरण्याचा प्रयत्न यात संघर्ष निर्माण होतो. उदा. बुद्धिप्रामाण्यवादी सनातन्यांचा उपहास करतात. तर सनातनी स्वतंत्र विचार मांडणाऱ्यांना बंडखोर ठरवतात.

**अभिजनांचे वर्ग :**

पॅरेतो अभिजनांचे दोन वर्ग आहेत असे सांगतो -

**१) शासक अभिजन :** समाजातील सर्वात प्रभावशाली व्यक्तींचा समावेश या वर्गात होतो. हा वर्ग सत्ताधिश असतो. या वर्गातील व्यक्ती बुद्धिमान, चतूर, कुशल, समर्थ असतात. याच गुणांमुळे ते वरच्या पदावर आसनस्थ झालेले असतात व समाजात सत्ता गाजवत असतात.

**२) अशासक अभिजन :** या अभिजन वर्गाला सत्ताविहीन अभिजन किंवा सामान्य अभिजन असेही म्हणतात. या वर्गातील अभिजनात शासक अभिजनापेक्षा कमी कर्तृत्व असते. या अभिजन वर्गाचा राजकारण व अर्थकारण यावर विशेष प्रभाव नसतो. या प्रकारच्या अभिजन वर्गात सेनाधिकारी, व्यापारी, धार्मिक क्षेत्रातील वरिष्ठ व्यक्ती इ. समावेश होतो.

**अभिजनाच्या अभिसरणाची प्रक्रिया :**

अभिजन वर्गाचे पतन अथवा सामान्य वर्गाचे अभिजनवर्गात रूपांतर होणे ही प्रक्रिया प्रत्येक समाजात नेहमीच चालू असते. त्यालाच पॅरेतोने 'अभिसरण प्रकिया' किंवा 'सामाजिक गतिमानतेची प्रकिया' असे संबोधले आहे. अशा अभिसरण प्रक्रियेमुळे ज्यांच्या अधिकारांना अथवा प्रतिष्ठांना धोका निर्माण होतो अशा व्यक्ती अभिसरण प्रक्रिया रोखण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी प्रसंगी बळाचा अथवा सामर्थ्यांचा वापर करतात. परंतु या बाबीमुळे अभिजनांचे अस्तीत्व धोक्यात येते, कारण सत्तेला अथवा अधिकाराल चिटकून राहण्याची त्यांची वृत्ती सर्वसामान्यांना मान्य नसते. अशा वृत्तीचा सामान्यांकडून निषेध केला जातो. त्यांचे श्रेष्ठीजनत्व संपुष्ठात आणण्याचा प्रयत्न केला जातो. याचा अर्थ 'अभिजन वर्ग हा स्वत:च्या नाशाला स्वत:च कारणीभूत ठरतो' या पार्श्वभूमीवर पॅरेतोने म्हटले आहे की ''इतिहास हा कुलीन लोकांचे कब्रस्थान (स्मशान) असतो.'' या संदर्भात पॅरेतोने घराणेशाही, भारतीय समाजातील जाती, प्रथा इ. उदाहरणे दिली आहेत.

**अभिजनांचे गुण व कौशल्य :**

समाजात सुरवातीच्या काळात उच्च पदावर येणाऱ्या व्यक्ती या गुणवान असतात. त्या स्वत:च्या गुणाच्या जोरावर उच्च पदावर आलेल्या असतात. साहजिकच त्यांच्याकडून अशा उच्चपदाची प्रतिष्ठा  जोपासण्याचा काटेकोर प्रयत्न केला जातो. परंतु कालांतराने अशी पदे आनुवंशिक होतात. व्यक्तीच्या अंगी असलेले गुण हळूहळू कमी होतात. त्याजागी येण्याचा कनिष्ठ वर्गाकडून प्रयत्न केला जातो. विशेष म्हणजे शासक किंवा अशासक अभिजनांकडून कनिष्ठ वर्गातील गुणी व्यक्तींना किंवा त्यांच्या गुणांना डावलण्याचा प्रयत्न झाला किंवा त्यांना उच्चपदे भूषविण्यास विरोध केला; तर समाजाचा समतोल बिघडेल. कनिष्ठ वर्गातील गुणसंपन्न व्यक्ती संघर्ष मार्गाचा अवलंब करतील. सर्व बळानिशी अभिजनांची मिरासदारी संपवतील व शेवटी अपात्र अभिजनांच्या ऐवजी पात्र असे अभिजन येतील.

## मूक्त समाजरचनेचा पुरस्कार :

मानव समाजात सुरवातीला सेनाधिकारी, पुरोहित व व्यापारी इ. वर्गाचे वर्चस्व होते. या तीन वर्गातूनच अभिजन वर्ग अस्तित्वात येत होता. काळाच्या ओघात त्यांच्या अंगभूत गुणाऐवजी जन्म, संपत्ती, घराणे यांना जास्त महत्त्व प्राप्त झाले. परिणाम स्वरूप अभिजनात 'अपात्र' व्यक्तीची भरती झाली. समाजाची सत्ता अशा अपात्र व्यक्तींच्या हातात गेली तर समाजव्यवस्था कोलमडून पडेल. म्हणून पॅरेतो सूचित करतो की, मूक्त समाजरचनेसाठी बहुजन समाजातील अपात्र व्यक्तींची हकालपट्टी करून त्यांच्या जागी सत्ताविहीन वर्गातील पात्र व्यक्तीची नियुक्ती करणे हेच योग्य आहे. यामुळे पॅरेतोला 'मुक्त समाजरचनेचा कट्टर पुरस्कर्ता' म्हणून ओळखले जाते.

## अभिजन वर्ग आणि लोकशाही :

लोकशाही व्यवस्थेत अभिजन वर्गात अभिसरण मोठ्या प्रमाणात, विशिष्ट कालावधीनंतर पहावयास मिळते. कारण तेथे सत्तेसाठी खुली स्पर्धा असते. या व्यवस्थेत जनसंपर्क लोकांच्या भावनांना संघटीत करण्याच्या कौशल्यावरच अभिजन वर्गात जाता येते. साधारणत: निवडणुकीद्वारे किंवा क्रांतीद्वारे अभिजन वर्गात लक्षणीय बदल होत असतो.

वरील विलफ्रेडो पॅरेतोच्या अभिजन वर्गाविषयीच्या सिद्धांताच्या विश्लेषणातून काही ठळक बाबी स्पष्ट करता येतील त्या पुढीलप्रमाणे -

१) पॅरेतोने प्रारंभी उच्च व कनिष्ठ अशा दोन वर्गात विभाजन केले व बुद्धी, चारित्र्य व कौशल्य या आधारावर गुणांनी संपन्न व्यक्तींना अभिजन वर्ग मानले.

२) अभिजन वर्गात नेहमी अभिसरणाची प्रक्रिया होत असते. गुणाच्या आधारावर अशा वर्गाचे पतन झाले की, कनिष्ठ वर्गातून अभिजन वर्ग तयार होतो. गुणांच्या आधारावर ही जी प्रक्रिया होते त्यास तो 'उर्ध्वगामी व अधोगामी वक्र' असे संबोधतो.

३) अभिजन वर्गातील परिवर्तनता लक्षात घेऊन तो स्पष्ट करतो की, अभिजन वर्ग जेंव्हा कनिष्ठ वर्गाला नियंत्रीत करण्याची शक्ती गमावतो. तेंव्हा कनिष्ठ वर्गातून आलेले लोक अभिजन वर्गाची जागा भरून काढतात.

४) पॅरेतोचा सिद्धांत लक्षात घेता भारतात वर्तमानात राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात 'श्रेष्ठीजन अभिसरण प्रक्रिया' सुरू असल्याचे आढळून येते.

## पॅरेतोच्या सिद्धांताचे मूल्यमापन :

पॅरेतोच्या अभिजन अभिसरण सिद्धांत हा समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण सिद्धांत मानला जातो, असे असले तरी त्याची 'अभिजन' ही संकल्पना संदिग्ध स्वरूपाची वाटते. त्याचप्रमाणे तो शास्त्रीय सत्य आणि सामाजिक उपयुक्तता यांच्यात मूलभूत विरोध आहे असे मानतो. हे जर खरे असले म्हणजे उपयुक्त आहे ते शास्त्रीय नाही किंवा उपयुक्त असेल, त्यात भ्रम असेल तर प्रत्येकजन स्वत:च्या मनाला येईल त्याला सत्य

मानेल किंवा स्वत:च्या संदर्भात त्याची उपयुक्तता ठरवेल. अशा उलट सुलट विधानांमुळे पॅरेतोच्या विचारात स्पष्ट राजकीय पाठ मिळत नाही, अशी टिका त्याच्या विचारावर केली जाते.

### पॅरेतोच्या सिद्धांताचे महत्त्व :

पॅरेतोच्या सिद्धांताचे महत्त्व स्पष्ट करतांना कोझर म्हणतो, ''सुरवातीस असणारे सैनिक, धर्मगुरू व व्यापारी यांच्या सारखे श्रेष्ठीजन मुक्तस्वनेमुळे अथवा अभिसरण प्रक्रियेमुळे संपुष्ठात आले'' तर बोगार्डसच्या मते, ''वर्तमान काळातील तथाकथीत श्रेष्ठीजन सरकार लवकरच संपुष्ठात येईल आणि त्यातून नवीन शक्तीशाली श्रेष्ठीजन वर्गाची निर्मिती होईल. हा वर्ग अर्थातच खालच्या वर्गातून अभिसरण प्रक्रियाद्वारा आलेला असेल.'' या दोन सामाजिक विचारवंतांच्या मतातूनच पॅरेतोच्या सिद्धांताचे महत्त्व स्पष्ट होते.

### सी. राईट मिल्स (C. W. Mills)

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उदारमतवादी समाजात काही व्यक्तीच्या, मोजक्याच व्यक्तीच्याच हातात सत्ता असते. या प्रश्नावर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली, तेव्हा समाजशास्त्र व राजकीय समाजशास्त्रज्ञांनी या विचारावर लक्ष केंद्रीत केले. यातूनच पुढे सत्ता विभाजनाच्या अभिजन (श्रेष्ठजन) सिद्धांताची निर्मिती झाली. विलफ्रेडो पॅरेतो, गिटानो मोस्का, रॉबर्ट मिचेल, ओ. वाय. गासेट इ. विचारवंतांनी या संबंधाने आपले संशोधन मांडले. युरोपातील या संशोधनाप्रमाणेच अमेरिकेतील राजकीय सत्तेला अनुसरून संघर्षवादी दृष्टीने सी. राईट मिल्स यांनी सत्ता विभाजनाच्या अभिजन सिद्धांताचे महत्त्वपूर्ण विवेचन केले आहे.

अभिजन हे समाजातील काही सधन आर्थिक ताकद असलेल्या संस्थाचे अपत्य आहेत. आधुनिक समाजात संस्थेचे संस्थिकरण झालेले आहे (Institutionalised). त्याचा परिणाम समाजातील काही संस्था व त्यातील महत्त्वाची पदे यांचा समाजातील महत्त्वाच्या पदांवर प्रभाव असतो. परिणामत: सत्ता वर्गाच्या किंवा व्यक्तीच्या हाती नसते तर ती संस्थेच्या हातात असते. अशा स्वरूपाचे विचार सी. राईट मिल्स यांनी या सिद्धांताच्या विवेचनात स्पष्ट केल्याचे दिसतात.

अमेरिकन समाजव्यवस्था व राजकीय व्यवस्थेच्या अभ्यासातून सी. राईट मिल्स यांनी सत्ता विभाजनाच्या 'अभिजन' सिद्धांताविषयी खालील विवेचन केलेले आहे.

### तीन प्रमुख अभिजन :

समाजातील आर्थिक सत्ता, सामाजिक सत्ता आणि राजकीय सत्ता या प्रामुख्याने परस्परांच्या शक्तीच्या अनुरोधाने कार्यरत होतात. या तीन सत्तामधील परस्परांची शक्ती परस्पर संबंधीत असते व त्यानुसार समाजात या तीन प्रकारच्या सत्ता उपभोगणारे तीन वर्ग अस्तीत्वात असतात. हे तीन वर्गच अमेरिकन समाजात सत्ता उपभोगतात. ते वर्ग पुढीलप्रमाणे -

१) लष्करी (सेनापतींचा वर्ग)

२) औद्योगिक (विविध औद्योगिक संस्थांचे मालक)

३) राजकीय (राजकीय नेते)

मिल्स यांच्या मते, वरील तिन्ही प्रकारचे गट प्रतिष्ठा संपन्न असतात. हे गट अमेरिकेतील उच्च वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. हेच तीन वर्ग शासक वर्गाची निर्मितीही करतात व त्यांचा सामाजिक स्तर सारखाच असतो. या तिन्ही गटांना स्वतंत्रपणे आपआपली कार्ये पार पाडावी लागातत. लष्करी गटामध्ये विविध विभागाचे प्रमुख, सेनापती यांचा समावेश होतो. औद्योगिक स्वरूपाच्या गटामध्ये श्रीमंत व्यक्ती व उत्पादन व साधनांची मालकी असणारे लोक असतात तर राजकीय गटामध्ये राजकीय सत्ता व राजकीय हुकुम गाजविणारे हुकुमशहा असतात. हे तिन्ही प्रकारचे संपन्न लोक सर्व प्रकारच्या सत्ता आपल्याकडे केंद्रीत करतात व आपल्या मतानुसार सत्ता गाजवत असतात.

**तीन वर्गाचे सहसंबंध :**

लष्करी, औद्योगिक व राजकीय वर्ग हे जसे सामाजिक स्तरावर असतात, त्याचप्रमाणे ते एकमेकांशी परस्परसंबंधीत असतात. त्यांचे व्यक्तीगत व कौटुंबिक पातळीवरचे संबंध असतात. या तिन्ही क्षेत्रातील प्रमुख एकत्र येवून विनिमयाद्वारे निर्णय घेतात. याद्वारे एक प्रकारे ते हुकुमच प्रस्थापित करीत असतात. सामान्य जनतेला ते अनुनयाद्वारे, विश्वासघात करून किंवा मनोरंजन करून गप्प बसवत असतात व स्वत: सत्ता गाजवित असतात.

**शक्तिशाली अभिजन व त्यांचे सहकारी :**

मिल्सच्या मते, आर्थिकदृष्ट्या बलवान असणारेच खऱ्या अर्थाने सत्ताधीश असतात. हा शक्तीशाली अभिजन वर्ग स्वतंत्र नसतो तर त्याच्या सहकार्यासाठी दोन स्तरावर सहकारी असतात. पहिल्या स्तरामध्ये त्याच्या जोडीला सल्लागार, विचारवंत, प्रवक्ता व धोरण निश्चित करणारेदेखील असतात. यानंतर अभिजन वर्गाचा दुसरा स्तर असतो. त्यात व्यापारी, दबाग गट, व्यावसाईक, राजकारणी व आर्थिक मजबूत स्थिती असणारा वर्ग असतो.

**उच्चशिक्षण आणि अभिजनांचा वर्ग :**

मिल्स अमेरिकेतील मालक वर्गाविषयी विवेचन करतांना त्यांचा आणि शिक्षणाचा संबंध स्पष्ट करतो. तो सांगतो की, हे लोक उच्च व श्रेष्ठ वर्गातील असतातच तसेच त्यांनी प्रसिद्ध आणि विख्यात विद्यालयात उच्च शिक्षण घेतलेले असते. त्यांचे अनेक उच्च संस्था बरोबरचे संबंध असतात. ते मुत्सद्दी असतात व मुत्सद्दी लोकांबरोबर त्यांचे संबंध असतात. अशाप्रकारे अमेरिकेतील लष्करी, औद्योगिक व राजकीय वर्ग उच्च व संपन्न बनून शिक्षणाच्या आधारावर सत्ता गाजवत असतो.

**आर्थिक व्यवस्था आणि अभिजन :**

मिल्स यांच्या 'अभिजना'च्या सिद्धांतात आर्थिक तत्त्वाला अधिक महत्त्व देतो. त्याच्या मते अभिजन हा 'राजकीय आर्थिक' स्थिती दर्शविणारा आहे. तर 'शासक' हा राजकीय स्थिती दर्शविणारा आहे. 'शासक वर्गाचा' या दृष्टिकोणातून अर्थ असा होतो की, एक आर्थिक वर्ग राजकीय दृष्टिकोणातून शासन करीत आहे. या विषयी मिल्स म्हणतो की, ''आर्थिकदृष्ट्या बलवान असणारेच खरे सत्ताधिश असतात व असे लोक राष्ट्रीय (सत्ताधाऱ्यांना) पुढाऱ्यांना सत्तेचे मुख्याधिकारी मानतात.'' म्हणूनच मिल्स यांच्यासाठी 'शक्तीशाली अभिजन वर्ग' (Power Elite Class) अशी संकल्पना वापरतो. याच आधारावर तो लष्करी, औद्योगिक व राजकीय

लोकांचा शक्तीशाली अभिजन वर्गात समावेश करतो.

**भ्रष्टाचार आणि अभिजन :**

मिल्सने सत्तावादाबाबत विवेचन करताना म्हटले आहे की, जे १९ व्या शतकात असमाधानी होते ते नंतर २० व्या शतकात भ्रष्टाचाराच्या ठिकाणी सत्ताकांक्षी लोक आले. भ्रष्टाचार नाहिसा झाला नाही किंवा प्रतिष्ठाप्राप्त व्यक्ती सत्तास्थानी येवू शकल्या नाहीत. त्यामुळे सत्तेपासून भ्रष्टाचारापर्यंत सत्ता ही दृश्य घटकापासून अदृश्य घटकापर्यंत सरकत असते. तसेच ती निश्चित व्यक्तीपासून अनिश्चित व्यक्तीपर्यंत सरकत असते. अशा रीतीने जसजशी भौतिकता वाढत जाते तसतशी लुबाडणूक होत जाते.

**लोकशाही : अभिजन आणि नोकरशाही :**

आधुनिक लोकशाही राष्ट्राच्या नोकरशाही प्रवृतीद्वारे वरील विचारप्रवाह निर्माण होत असतात आणि प्रस्थापित होत असतात. मिल्सच्या विचारानुसार, नोकरशाही वर्गावरच्या अधिष्ठांनामुळे त्यांच्यामध्ये सत्ताविषयी चळवळ निर्माण होते. ही चळवळ समाजातल्या विविध वर्गाअंतर्गत विचारात घ्यावी लागते. सत्ता विभाजनाच्या अभिजन सिद्धांतानुसार सामान्य समाजव्यवस्था आणि भांडवलशाही राष्ट्रांत प्रतिष्ठीतांचा सत्ता गट अधिक शक्तीशाली असतो. हे आंशिक सत्ताधारी असले तरी त्यांचा गट अधिक प्रभावी असतो.

मिल्सने कार्लमार्क्सच्या वर्ग संघर्षाचे समर्थन काही प्रमाणात केले असले तरी त्याच्या मते, वर्ग संघर्ष हा आधुनिक नोकरशाहीच्या अधिकार परंपराभोवती फिरत असतो. आधुनिक नोकरशाही ही अवैयक्तीक स्वरूपाची औपचारिक संबंध असणारी व कायदेशीर प्रमाणकांना महत्त्व देणारी असते. अशा स्वरूपाच्या नोकरशाहीतील व्यक्तीकडून कामाची अपेक्षा व्यक्त केली जाते. ती अपेक्षा ते पूर्ण करतीलच असे नाही. या प्रक्रियेत व्यक्तीला अवैयक्तिक स्थान प्राप्त होते, अशा प्रक्रियेत नोकरशाहीच्या अधिकार परंपरेत संघर्ष निर्माण होतो.

**सिद्धांताचे मूल्यमापन :**

सी. राईट मिल्स यांने मांडलेला सिद्धांत हा अमेरिकन समाजाला गृहीत धरून मांडलेला असल्याने त्याच्या सर्वव्यापकतेविषयी स्पष्टीकरण करताना मर्यादा पडतात. त्याप्रमाणेच त्याच्या विचारांवरही काही प्रमाणात मर्यादा पडतात. 'काही विशिष्ट प्रतिष्ठीतांच्या हातात सत्ता केंद्रीत होते' हा विचार बहुवादी विचारसरणीच्या विचारवंतांना मान्य नाही. त्यांच्या मते, समाजात जे नकारवादी गट असतात. त्यांच्यात सत्तेची स्पर्धा चालू असते आणि या कार्यात त्यांना कधी कधी यश प्राप्त होते. अशा वेळी मिल्सचा सिद्धांत एकांगी वाटतो.

सी. राईट मिल्सने हा सिद्धांत मांडत असतांना अमेरिकेतील उच्च किंवा मध्यम वर्गाचे विश्लेषण करणे हा हेतू दिसतो. त्या अर्थाने या सिद्धांताच्या मर्यादा स्पष्ट होतात. आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये सत्ता केंद्रे व त्यातील अभिजन वर्ग बदलत आहेत अशा वेळा मिल्सने मांडलेले आर्थिक तत्त्व व समाजातील लष्करी, व्यापारी व राजकीय गटाविषयीचे विवेचन जशास तसे लागू होत असतांना दिसत नाही.

**सिद्धांताचे योगदान :**

सामाजिक स्थिती जाणून घेण्यासाठी, राजकीय, आर्थिक व सामाजिक विश्लेषण करण्यासाठी सिद्धांताची मौलीक अशी उपयुक्तता आहे. सामाजिक परिवर्तन होत असताना व्यक्ती किंवा गटाचे जे वर्चस्व निर्माण होते ते जाणून घेण्यासाठी हा सिद्धांत उपयुक्त ठरतो. सी. राईट मिल्सचा सिद्धांत हा अभ्यासकांना एक नवी दृष्टी देतो. आजची नोकरशाहीची स्थिती जाणून घेत असताना, त्यांची अधिकार केंद्र शोधत असताना या सिद्धांताचा आधार घ्यावा लागेल. याशिवाय व्यक्तीगत अभ्यासकाला आपल्या खाजगी जीवनातील प्रश्नांना वस्तुनिष्ठ स्वरूप देण्यासाठी हा सिद्धांत उपयुक्त ठरू शकतो.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, मर्यादित समूहाला गृहीत धरून या सिद्धांताची मांडणी झालेली असली तरी या सिद्धांतावरील विचार अभ्यासकांना नवी दृष्टी देणारे आहेत. त्याचप्रमाणे आधुनिक काळातील अभिजन वर्गाचे मूल्यमापन करण्यासाठी हा सिद्धांत मुलभूत आधार ठरेल.

**गिटानो मोस्का :** (Gitano Mosca)

'मानवी समाजाच्या इतिहासात व्यक्तीचे हित जपण्याच्या दृष्टीने निर्माण झालेली सर्वात उत्तम पद्धती म्हणजे लोकशाही होय, लोकशाहीवादी अभिजन हे व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वात कमी धोकादायक असतात' अशा स्वरूपाचे महत्त्वपूर्ण विचार मांडणारा विचारवंत गिटानो मोस्काने आपल्या 'The Ruling Class (1939) या ग्रंथाद्वारे सत्ता विभाजनाच्या अभिजनवादी सिद्धांत प्रतिपादन केला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पुर्वार्धात या इटालियन विचारवंताने 'राजकीय अभिजन' संकल्पनेला खऱ्या अर्थाने सैद्धांतिक स्वरूप प्राप्त करून दिले.

इटालियन विचारवंत विलफ्रेडो पॅरेतो प्रामणेच गिटानो मोस्कानेही राजकारण आणि लोकशाही यांचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रीय पद्धतीवर भर दिला. पॅरेतो हा सामाजिक विश्लेषणात रस घेतांना दिसतो, तो सर्व सामाजिक प्रश्नांचा एकत्रीत अभ्यास केला पाहिजे अशी भूमिका घेतो; तर गिटानो मोस्काला राजकीय विश्लेषणात रस दिसतो. मोस्का हा 'लोकांचे शासन' हा पारंपारिक लोकशाहीचा सिद्धांत नाकारतो आणि लोकशाहीच्या राजकीय व्यवस्थेची अभिजन वर्गाला अनुसरून मांडणी करतो. गिटानो मोस्काने अभिजन वर्ग व त्यांच्या विषयीचा सत्ता सिद्धांत याविषयी अतिशय महत्त्वपूर्ण विवेचन केले आहे. ते थोडक्यात पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**राजकीय व्यवस्थेतील वर्ग :**

गिटानो मोस्का त्याच्या 'शासक वर्ग' या शिर्षकाखाली लिहिलेल्या ग्रंथामध्ये 'अभिजन वर्गा'चा सिद्धांत मांडतो व त्यामध्ये तो सर्व राजकीय व्यवस्थेत दोनच वर्ग असतात, असे प्रतिपादन करतात. ते वर्ग पुढीलप्रमाणे होत–

**(A) शासक वर्ग** (Ruling Class) **:** शासक वर्ग हा सत्तेत असतो त्याच्या जवळ शक्ती निर्धारण करणारे घटक एकवटलेले असतात. हा वर्ग बहुसंख्यांकावर राज्य करत असतो. त्याच तो सर्वोच्च पदावर असणारा व्यक्ती समूह असतो.

**अभिजन वर्गाची वैशिष्ट्ये :**

१) अभिजन वर्ग हा संघटित स्वरूपाचा असतो.

२) अभिजन वर्ग हा श्रेष्ठ व विशेष गुणसंपन्न बसतो.

३) बुद्धिजीवी व कुशल वर्गातूनच राजकीय अभिजन निवडले जातात.

४) राजकीय अभिजन हे अल्पसंख्याक असतात.

५) समाज नियंत्रीत करण्याची शक्ती अभिजन वर्गाकडे असते.

६) राजकीय अभिजन वर्ग हा साधने व सुविधाचा उपभोग घेत असतो.

७) अभिजन वर्गाकडे विशेषअधिकार असतात.

८) अभिजन वर्ग हा चपळ व सतर्क असतो व साधनांचा योग्य वापर करून सत्ता टिकवत असतो.

**(B) शासीत वर्ग** (Ruled Class) **:** शासीत वर्ग हा बहुसंख्यांक असतो. तो सत्तेमध्ये अतिशय मर्यादित अर्थाने सहभागी असतो. तो स्वत:च्या नव्हे तर शासक वर्गाच्या तंत्राने काम करत असतो. हा वर्ग शासक वर्गाने दिलेल्या कायदेशिर किंवा बेकायदेशिर आज्ञा पाळत असतो.

**शासक व शासीत यांच्यातील फरक :**

मोस्का शासक व शासीत वर्गात पुढीलप्रमाणे फरक करतो.

१) शासक वर्ग हा अल्पसंख्य असतो त्यामुळे तो लवकर संघटित होतो. तर शासीत वर्ग हा संख्येने अधिक असतो, त्यामुळे त्याला संघटित होणे शक्य होत नाही.

२) सर्व राजकीय निर्णय शासक वर्ग घेतो. तो परस्परांत विचारांची देवाण-घेवाण, सल्लामसलत करत असतो; तर शासीत वर्गाची राजकीय निर्णयातील भूमिका नगण्य असते. तो परस्परामध्ये विचाराची देवाण-घेवाण करतांना दिसत नाही.

३) सत्तेचे केंद्रीकरण शासक वर्गाच्या हातात झालेले असते. संकटाच्या वेळी हा वर्ग लवकर उपस्थित होतो. याचा मोठा अभाव शासीत वर्गात आढळतो. हा वर्ग शासक वर्गाकडून नियंत्रीत व निर्देशित केलेला असतो.

शासक वर्गात असलेले निश्चित गुणवैशिष्ट्ये त्याला शक्ती प्रदान करीत असतात म्हणूनच ते अभिजन म्हणून कार्यरत असतात.

**अभिजनाच्या श्रेष्ठत्वाचे आधार :**

१) अभिजन वर्ग हा अतिश्रीमंत वर्ग असतो त्याची संपत्ती हा त्याच्या अभिजन होण्यासाठी आधारभूत घटक बनतो.

२) अभिजन वर्गाच्या हातामध्ये लष्करी शक्ती असते. प्रसंगी स्वत: सत्ता टिकविण्यासाठी ते त्याचा उपयोग करत असतात.

३) धर्म हा अभिजन वर्गासाठी सहाय्यभूत घटक असतो. मुख्यत: धर्माने श्रेष्ठ मानलेले लोकच अभिजन असतात.

४) अभिजन वर्ग हा उच्च शिक्षित, बुद्धिमान असतो. तोच त्याच्या अभिजन बणण्यासाठीचा महत्त्वाचा आधार बनतो.

५) अभिजन वर्ग हा त्याची सत्ता टिकविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार घेत असतात.

**शासक वर्गात बदल :**

मोस्काच्या विचारानुसार कोणतीही राजकीय व्यवस्था ही स्थिर आणि कायम नसते. म्हणजेच शासक वर्गात बदल हा होतच असतो; परंतु हा बदल अभिजन वर्गांतर्गत बदल असतो. याचा अर्थ अभिजन वर्गातील दुसरा गट शासक वर्ग होतो व एक गट विरोधक होतो. अभिजन वर्गात शासक वर्ग असतोच. फक्त व्यक्ती बदलतात. वर्ग बदलत नाही. उदाहरणर्थ, भारतात सर्वच राजकीय पक्षाचे प्रमुख व प्रतिनिधी अभिजन वर्गात येतात. जेंव्हा सरकार बदलते तेंव्हा केवळ अभिजन बदलतात. या बदलास मोस्का 'अभिसरण' असे म्हणतो.

**शासक वर्गात बदल होण्याची कारणे :**

१) समाजात संपत्तीचा नवीन स्रोत निर्माण झाल्यामुळे.

२) ज्ञानाचे व्यवहारिक महत्त्व वाढल्यानंतर.

३) जुन्या धर्माची समाप्ती झाल्यानंतर व नव्या धर्माच्या उदयानंतर.

४) नवीन विचारसरणी समाजात निर्माण झाली व प्रभावी बनली तर.

५) सत्ताधारी वर्ग अत्याचारी झाल्यानंतर.

६) समाजात स्वातंत्र्याची व नव्या विचारांची तिव्रता वाढल्यानंतर.

शासन वर्गात बदल होतो व अभिजन वर्गातील दुसरा गट सत्ताधारी बनतो.

**सत्तेस अधिमान्यता प्राप्त होण्याचे मार्ग :**

मोस्काच्या मते अभिजनाजवळ जी सत्ता असते त्यास अधिमान्यता असते. ही अधिमान्यता प्राप्त होण्याचे दोन मार्ग आहेत.

**१) अधोगामी मार्ग** (Downward Flow) **:** या मार्गानुसार सत्ता वरून खाली वाहते. उदाहरणार्थ, राजेशाही किंवा महाजन सत्तेत राजा किंवा महाजन निर्णय घेतो व त्यामुळे इतरांना सत्ता प्राप्त होते त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी राजा किंवा महाजन एकाधीकाराचा वापर करतो, त्यास मोस्का 'एकाधीकार सत्तातत्व' असे संबोधतो.

**२) उर्ध्वगामी मार्ग** (Upward Flow) **:** या मार्गानुसार सत्ता प्रवाह खालून वर जातो. लोकशाही व्यवस्थेत नागरिक मतदानाद्वारे सत्ताधारी वर्गाची निवड करत असतो. यास मोस्का 'उदारमतवादी' तत्त्व म्हणतो.

राजकीय अभिजन वर्ग हा कोणत्याही सत्तेला अधिमान्यता मिळविण्यासाठी कायदेशिर, नैतिक, लोकप्रिय

परंपरा, श्रद्धा इ. तत्त्वाचा आधार घेतो. लोकशाही पद्धतीमध्ये तो निवडणुकीच्या शांततेच्या मार्गाने व हितसंबंधी गटाच्या माध्यमाद्वारे सामान्य जनतेवर आपला प्रभाव निर्माण करत असतो व आपल्या सत्तेस अधिमान्यता मिळवत असतो.

**अनियंत्रीत सत्ता आणि बंड :**

सर्वच अभिजन वर्ग आपले शासन (सत्ता) टिकावी यासाठी प्रयत्नशिल असतात. ते यासाठी वारसा हक्क, विचारधारा व बळाचा वापर करू शकतात. ते गरजेनुरूप दबावासाठी हिंसक बंड किंवा संघर्षाचा ही मार्ग स्वीकारू शकतात. तरी सुद्धा कोणत्याही अभिजन वर्ग कायम सत्ताधारी राहत नाही. सत्तेच्या अनियंत्रीत वापरामुळे अभिजन वर्ग आळशी, कमजोर, ऐश आरामी बनतो. त्यामुळे हुशार लोक, उद्योगी लोक बंड करतात आणि त्याच्या हातातून सत्ता हिसकावून घेतात. प्रत्येक सत्ताधारी हा आपली सत्ता स्थिर ठेवण्यासाठी 'राजकीय सुत्रा'चा वापर करीत असतो.

**अभिजनाची राजकीय भरती :**

मोस्काच्या मते, सत्तेच्या प्रवाहावरच राजकीय भरती अवलंबून असते. एकाधिकार तत्त्व असेल तर तेथे श्रीमंत, महाजन, सामंत वर्णी राजकीय भरतीत लागते. मात्र उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेत उदारमतवादी तत्त्व असेल तर तेथे राजकीय भरती मूक्त असते. सर्वांसाठी खुली असते. अभिजन वर्ग हा चतुर असल्याने तो त्याच वर्गातील नवीन सदस्यापैकी गुणवान व बुद्धिमानांची भरती करीत असतो.

**सिद्धांताचे महत्त्व :**

२० व्या शतकाच्या प्रारंभी मोस्का यांनी मांडलेला सत्ता विभाजनाचा अभिजन सिद्धांत हा राजकीय अभ्यासकांसाठी एक अमूल्य असा सिद्धांत आहे. कोणतीही राजकीय व्यवस्था असो अशा व्यवस्थेतील अभिजनाचे मुल्यमापन करण्यासाठी या सिद्धांताचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. पॅरेतो व मोस्का यांच्या अभिजन सिद्धांतामध्ये अनेक अर्थाने साम्य असले तरी एक राजकीय विश्लेषण म्हणून मोस्काच्या सिद्धांताचे विशेष योगदान आहे. मोस्काने प्रतिपादीत केलेले राजकीय व्यवस्थेतील शासक व शासीत यांच्या विषयीचे विवेचन आजही लागू पडते. यावरूनच या सिद्धांताचे महत्त्व लक्षात येते.

**२.४.३ आदान – प्रदान दृष्टिकोन** (Input-output Approach)

**प्रस्तावना :**


राजकीय व्यवस्थेविषयी डेव्हिड ईस्टन यांनी मांडलेला हा एक व्यवस्थात्मक दृष्टिकोन (System approach) आहे. यालाच आदान – प्रदान प्रतिमान (Model) या सर्वमान्य नावाने ओळखले जाते. या दृष्टिकोनाचे वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या राजकीय विचारवंताने मांडलेला अशा स्वरूपाचा हा पहिलाच दृष्टिकोन आहे. राजकीय घटनांच्या संदर्भात मांडण्यात आलेली ही पहिलीच विचारसरणी मानली जाते. राजकीय व्यवस्था हा या विश्लेषणाचा मुलभुत घटक मानण्यात आला आणि अशा मुख्य व्यवस्थेच्या

अंतर्गत असणाऱ्या इतर सर्व व्यवस्थांवर लक्ष केंद्रीत करून त्याविषयी संशोधन करण्यात आले. ओ.आर.यंग यांनी अशा तऱ्हेने हा व्यवस्थात्मक दृष्टिकोन विकसित केल्याचे सर्व श्रेय ईस्टन यानाच दिले आहे.

परिस्थितीच्या अनुषंगाने राजकीय व्यवस्था कशी कार्यरत असते याचे विश्लेषण ईस्टन यानी केले आहे. त्यांच्या मते, राजकीय व्यवस्था म्हणजे अधिकारात्मक मुल्यांची निर्मिती व अंमलबजावणी करणारी एक व्यवस्था आहे आणि या व्यवस्थेमध्ये सातत्याने आदान- प्रदान होत असते. आदानाचा प्रवाह नेहमीच प्रदानात रूपांतरित होत असतो. आदान आणि प्रदान ही राजकीय व्यवस्थेची कार्ये असतात. या दृष्टिने ही एक आंतरक्रियात्मक व्यवस्था असते. या व्यवस्थेमध्ये आदान हे प्रदानात रूपांतरीत होत असते. म्हणजेच प्रदानामध्ये प्रत्याभरण (Feed back) असते की ज्यामुळे आदानाला अधिक चालना मिळते. ही प्रक्रिया मागणी आणि पुरवठा (Demand and Supply) अशा स्वरूपाची असते. या दोन्हीमध्ये परस्परावलंबन असते तसेच परस्परपुरकताही असते. आदान आणि प्रदान या एकाच नाण्याच्या दोन बाजु असतात आणि दोन्ही राजकीय व्यवस्थेसाठी कार्यरत असतात. एक प्रकारे ही राजकीय व्यवस्थेची कार्यात्मक बाजूच (Fumtional aspect) असते.

**ईस्टनचे आदान – प्रदान प्रतिमान**

(Easton's Input-Output Model)




- **ईस्टनच्या प्रतिमानातील चल अथवा घटक** (Variables) **:**

ईस्टनच्या आदान – प्रदान प्रतिमानाचे विश्लेषण त्यातील मुख्य घटकानुसार करता येते. ओरान यंग यांच्या मते, ईस्टनचे हे प्रतिमान प्रामुख्याने दोन घटकांवर आधारित आहे.

१) **व्यवस्थेतील सातत्य आणि ताणतणाव** (Systemic persistence and sources of

stress):

सातत्य हे राजकी व्यवस्थेतील प्रमुख वैशिष्ट्य आहे. कोणत्याही प्रकारच्या अव्यवस्थेवर मात करण्याची क्षमता राजकीय व्यवस्थेमध्ये असावी लागते. राजकीय व्यवस्था ही नेहमीच ताणतणावाखाली, दबावाखाली असते. पण या सर्वावर यात करून ती आहे तशीच टिकविण्याचे आव्हान राजकीय व्यवस्थेमध्ये असावे लागते.

२) **संक्षेप घटक** (Summary Variable) **:**

प्रतिमानातील हा घटक आदानातून प्रदानाकडे होणारी प्रक्रिया आणि रूपांतर यांच्याशी निगडीत आहे. म्हणजेच मागणी नुसार होणारे राजकीय निर्णय आणि अधिकारानुसार केली जाणारी कृति यावर आधारित आहे. आदानाला प्रत्याभरणावर आधारित प्रदानातुन मिळणारा प्रतिसाद म्हणजेच आदानावर प्रदानाचा असणारा प्रभाव यामुळे (म्हणजेच त्यांच्यातील परस्पर पुरकतेमुळे) व्यवस्थेतील संतुलन टिकण्यास मदत होते.

ईस्टनचे हे प्रतिमान आणि चल राजकीय व्यवस्थेच्या पर्यावरणाशी संबंधीत आहेत. राजकीय व्यवस्थेचे पर्यावरण म्हणजे, सामाजिक, जैविक, राजकीय व आर्थिक आणि व्यक्तीगत घटक असतात. या सर्व घटकांची एकत्रित व्यवस्था म्हणजेच राजकीय व्यवस्था असते. समाजांतर्गत व समाजबाह्य अशा दोन्ही घटकांचा त्यात समावेश होत असतो. या सर्व घटकांचा राज्यव्यवस्थेवर आणि राज्य व्यवस्थेचा या सर्व घटकांवर असा परस्पर प्रभाव पडत असतो. पण प्रत्यक्षात हे सर्व घटक आणि राज्यव्यवस्था परस्पराहून वेगळे, स्वतंत्र असतात हे लक्षात घेतले पाहिजे. राजकीय व्यवस्थेचे पर्यावरण हे दोन प्रकारचे असते.

१) **आदानात्मक पर्यावरण :**

म्हणजे ज्यापासुन राजकीय आंतरक्रियेची सुरूवात होत असते.

२) **प्रदानात्मक पर्यावरण :**

म्हणजे ज्याद्वारे राज्यवस्थेअंतर्गत होणारे निर्णय व ध्येय धोरणांची अंमलबजावणी होत असते. राजकीय व्यवस्थेच्या पर्यावरणाचे पुन्हा दोन प्रकार ईस्टनने सांगितले आहेत.

१) **समाजांतर्गत पर्यावरण** (Intra-Societal environment) **:**

हे पर्यावरण समाजव्यवस्थेतील उपव्यवस्थानी बनलेले असते. या सर्व उपव्यवस्था आदान प्रक्रियेत प्रभावी असतात. यामध्ये अर्थव्यवस्था, संस्कृती, संरचना, व्यक्ती, श्रेष्ठीजन, पक्ष, समुह, मंडळे इत्यांदीचा अंतर्भाव होतो. राजकीय व्यवस्थेला कार्यरत ठेवण्याची भुमिका या सर्व उपव्यवस्था पार पाडीत असतात.

२) **समाजबाह्य पर्यावरण** (Extra-societal environment) **:**

विशिष्ठ राजकीय व्यवस्थेच्या बाहेर कार्यरत असणाऱ्या व्यवस्थांचा यात अंतर्भाव होतो. इतर

राज्यांची राज्यव्यवस्था, प्रामुख्याने शेजारील राज्यांची राज्यव्यवस्था, युनोसारखी सर्वश्रेष्ठ संघटना आणि अन्य आंतरराष्ट्रीय संघटना या सर्वांचा समाजबाह्य पर्यावरणात समावेश होतो. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था, नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक लोकमत, आंतरराष्ट्रीय कायदा या सर्वांचाही राज्यव्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रभाव पडत असतो.

थोडक्यात, राजकीय व्यवस्थेच्या पर्यावरणातुन तिच्यात आदान (Input) होते. त्या आदानाचे रूपांतर (Conversion) होते व त्यानंतर जे उत्पादन म्हणजेच जे निष्पन्न होते त्याला प्रदान (Output) म्हणतात. प्रदानामुळे पर्यावरणात परिवर्तन होते. ज्याला प्रत्यादान अथवा प्रत्याभरण (Feedback) म्हणतात. विचारांती प्रत्यादानाचे आदानात परिवर्तन करता येते व मागण्याचे आधिक चांगल्या प्रकारे समाधान करता येते.

● **राजकीय व्यवस्थेचे आदान** (Input of Political System) **:**

**आदान म्हणजे काय?**

आदान म्हणजे अशी क्रिया असते की, जी राजकीय व्यवस्थेत प्रवेश करून अधिकारात्मक मुल्यामध्ये परिवर्तीत होत असते. हा प्रवाह पर्यावरण म्हणजेच व्यवस्थात्मक परिस्थितीतून राजकीय व्यवस्थेकडे होत असतो. ''पर्यावरणातील ज्या घटना राजकीय व्यवस्थेवर आपला प्रभाव पाडून त्याद्वारे काही प्रतिसाद अपेक्षित करतात त्याला आदान म्हणतात.''

डेव्हिड ईस्टन यांनी आदान दोन प्रकारचे सांगितले आहे.

**अ) मागण्या** (Demands) **आणि ब) आधारभुत गोष्टी** (Supports).

**१) मागण्यांचे स्वरूप :**

वस्तु आणि सेवांच्यासाठी मागण्या असू शकतात. उदा. काम, रोजगार, वेतन, सवलती, पायाभुत सुविधा, अन्नधान्य, करमणुकीची साधने, आरोग्य इत्यादी.

२) नियमनात्मक मागण्या उदा. वाहतूकविषयक नियम, विवाहविषयक नियम, मालमत्ताविषयक नियम, आरोग्य व स्वच्छते संबंधीचे नियम, बाजार विषयक नियम, उद्योग व्यवस्थेविषयीचे नियम इत्यादी.

३) राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्यासाठी मागण्या असू शकतात. उदा. मतदानाचा अधिकार (१८ वर्षे वयानंतर मतदानाचा अधिकार), एखादे पद धारण करण्याची संधी, माहितीचा अधिकार, राजकीय संघटना स्थापन करण्याची मागणी इ.

४) संसुचन (Communication) आणि माहिती उपलब्ध व्हावी यासाठी देखील मागण्या असू शकतात. उदा. काही गोष्टींचे प्रमाण ठरविण्यासाठी, धोरण निश्चित करण्यासाठी, उद्दिष्ट निश्चितीसाठी, राजकीय शक्तीप्रदर्शन इ. तसेच औद्योगिक धोरण, लोकसंख्या विषयक धोरण, आपत्ती विषयक मदतीचे धोरण इ.

तेंव्हा मागण्यांचे स्वरूप हे स्वतंत्र अथवा संमिश्र असु शकते. तसेच मागण्या विविध स्वरूपाच्या असू शकतात आणि त्या कमी अधिक तीव्रतेच्याही असू शकतात.

**ब) आधारभूत गोष्टी** (Supports) **:**

मागण्या म्हणजे एक प्रकारचा कच्चा मालच असतो. त्यामुळे केवळ मागण्या करून कार्य होत नाही. मागण्यांची पुर्तता होण्यासाठी त्यांना ऊर्जा असावी लागते. तसेच व्यवस्थेला पुढे नेणाऱ्या किंवा गतिरोध करणाऱ्या गोष्टीतूनही मागण्या व निर्णय यांचे आदान होत असते. उदा.

१) करभरणे, सार्वजनिक कार्यास मंजुरी देणे.

२) कायदे व नियमांचे पालन करणे.

३) मतदानाचा हक्क बजावणे, राजकीय सहभाग घेणे.

४) शासकीय आदेशांचे पालन करणे, सार्वजनिक प्रतिके (ध्वज, मंदिर, संस्था) आणि कार्यक्रमांचा आदर करणे.

मागण्या व्यवस्थेचे उद्देश प्रभावित करतात तर आधार त्या उद्देशाना अंमलात आणण्यास उपयुक्त ठरतात. तसेच मागण्या ह्या केवळ सभोवतालच्या समाज व्यवस्थेतुनच येतात असे नाही तर राजकीय व्यवस्थेतूनही त्या येत असतात. उदा. लोकप्रतिनिधी, मंत्री, न्यायाधीशही मागण्या करीत असतात. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतूनही अशा मागण्या होत असतात. या सर्वाला आदान म्हटले जाते.

आदान म्हणजेच मागण्या पुढे आल्यावर त्यावर मंत्रिमंडळ विचारविनिमय करते व नंतर निर्णय घेते. त्याबाबत कायदेशीर सल्ला घेतला जातो. चर्चा केली जाते. आवश्यकतेनुसार त्याबाबत कायदा केला जातो. म्हणजेच मागण्यांचे रूपांतर (Conversion) केले जाते. हे रूपांतर एक किंवा अनेक संरचनामध्ये होत असते. यामध्ये वरील सर्व आधारभुत गोष्टी महत्वाची भूमिका बजावतात.

ईस्टनने आधार तीन स्तरावर असतो असे म्हटले आहे.

१) समुदाय पातळीवर

२) व्यवस्थेतील मुल्य पातळीवर

३) सत्ताधारी किंवा आधिकारी पातळीवर.

अशातऱ्हेचा आधार असेल तर राजकीय व्यवस्था स्थिर राहु शकते. चांगल्या प्रकारे कार्य करू शकते. हा आधार जितका अधिक तितका अधिक तितकी राजकीय व्यवस्था मजबूत होत असते.

तेंव्हा मागण्या आणि आधारभुत गोष्टी हे राजकीय व्यवस्थेचे दोन आदान असतात. म्हणुनच ईस्टनने असे म्हटले आहे की, ''मागण्या म्हणजे एक प्रकारे कच्चा माल असतो, त्याचे पक्क्या मालात म्हणजेच निर्णयप्रक्रियेत म्हणजेच उत्पादनात रूपांतर होत असते.'' ''आधारभुत गोष्टी म्हणजे एक प्रकारे ऊर्जा असते, क्रिया असते. तिच्यातून राजकीय व्यवस्थेला कार्यप्रवृत्त केले जाते. त्यातुनच मागण्यापुढे येतात आणि निर्णयप्रक्रिया अस्तित्वात येते.'' राजकीय व्यवस्था ही याप्रकारे आदानावर आधारलेली असते असे ईस्टनचे प्रतिपादन आहे.

- **राजकीय व्यवस्थेचे प्रदान** (Output of Political Sytem) **:**

अधिकारी वर्गाचे निर्णय, नियम, कायदे आणि ध्येयधोरणे अशा प्रकारातून राजकीय व्यवस्थेतील प्रदान सुरू असते. आदानाच्या रूपांतरातुन प्रदानाची निर्मिती होत असते. ईस्टनने असे म्हटले आहे की, ''आधिकारी वर्गाकडून घेतले जाणारे निर्णय आणि कायदे, नियम व निर्बंध, धोरणे, बक्षीस व शिक्षा, योजना या प्रकाराद्वारे व्यवस्थात्मक पर्यावरणावर परिणाम करणारी जी क्रिया राजकीय व्यवस्थेकडून केली जाते तिला प्रदान म्हणतात.''

प्रदान हे सामान्यतः चार प्रकारचे असते.

१) वसुली : उदा. करवसुलीतून व्यक्तींची सेवा करणे.

२) वर्तणुकीचे नियमन : मानवी संबंधाना प्रभावित करण्यासाठी.

३) वितरण अथवा वाटप : सन्मान, संधी, सवलती, वस्तु, सेवा, दर्जा या सारख्या गोष्टी.

४) प्रतिकात्मक प्रदान : मुल्य निश्चिती, सरकारी कार्यक्रमांची जाहिरात, धोरणात्मक विधाने इ.

अर्थात ही प्रक्रिया इथेच संपत नाही. कारण प्रदान म्हणजे एका व्यवस्थेने दुसऱ्या व्यवस्थेला दिलेला प्रतिसाद असतो. मागणीप्रमाणे हा प्रतिसाद असतो. त्यानंतर पुन्हा आदानाकडे व आदानकडून प्रदानाकडे असा हा प्रवास सतत चालूच असतो. नवे आदान व परत नवे प्रदान अशी ती प्रक्रिया चालू असते. यातुन एक नवीन संकल्पना उदयास येते व तिला प्रत्यादान अथवा प्रत्याभरण (Feedback) असे म्हटले जाते.

- **राजकीय व्यवस्थेची प्रत्यादान प्रक्रिया** (Feedback process of a Politiacal System) **:**

प्रत्यादानाची संकल्पना ही ईस्टनच्या आदान प्रदान प्रतिमानातील एक महत्वाची संकल्पना आहे. या प्रक्रियेत प्रदानावरील प्रतिक्रीया पुन्हा आदानाकडे परततात आणि पुन्हा नव्याने प्रदानाकडुन प्रतिसादाची अपेक्षा करतात. नव्या मागण्या नवा बदल असे हे चक्र अव्याहतपणे चालू राहते. प्रत्येक वेळी प्रदानाला आवश्यक तो बदल घडवून आणावा लागतो. आदान-प्रदान पुन्हा आदान पुन्हा प्रदान या प्रक्रियेलाच प्रत्यादान असे म्हटले जाते. यामध्ये संसुचन व्यवस्था (Communication System) जितकी सुरळीत व कार्यक्षम असेल तितके आदान प्रदान व प्रत्यादानाचे कार्य उत्तम प्रकारे चालते. प्रत्यादान प्रक्रियेमुळे प्रदान हे आदानाच्या स्वरूपात पुन्हा व्यवस्थेत समाविष्ट होते व अशा रितीने चक्राकार कार्य पुर्ण होते. आदान प्रदानातील ही एक संसुचन व्यवस्थाच असते. तसेच ही एक गतिशील प्रक्रिया असते.

यासंदर्भात मागण्याच मर्यादित राहाव्यात म्हणून काही यंत्रणा कार्यरत असतात व त्या यंत्रणा मागण्यांचे नियंत्रण व नियमन करीत असतात. अशा यंत्रणा नसतील तर मागण्यांचा व्यवस्थेवरील ताण वाढत जाईल. ही नियंत्रणे चार प्रकारची असतात.

**१) संरचनात्मक यंत्रणा** (Structural Mechanism) **:**

यालाच द्वारपाल (Gate Keeper) म्हटले आहे. उदा. दबाव गट, राजकीय पक्ष.

२) **सांस्कृतिक यंत्रणा** (Cultural Mechanism) **:**

मागण्यांची इष्टअनिष्टता ठरविण्यासाठी काही सांस्कृतिक प्रमाणकांचा वापर करण्यात येतो.

३) **संसुचन व्यवस्था** (Communication System) **:**

ही अधिक गतिमान करण्यात येते.

४) **रूपांतर प्रक्रियेतच** (Conversion Precess) **:**

मागण्यांचे नियंत्रण होते. पण लोकांना नाराज करणारे निर्णय घेतले जात नाहीत.

प्रत्यादानाची प्रक्रिया ही एक व्यवस्थाबद्ध प्रक्रिया असते. व्यवस्थेमध्ये समायोजन, संतुलन राखणे व व्यवस्थेचे अस्तित्व राखण्यासाठी प्रत्यादानाची प्रक्रिया साहाय्यभुत ठरते.

व्यक्तिगत अथवा सामुहिक पातळीवर सर्व चलांचा अवलंब करून ईस्टनचे प्रतिमान वापरता येऊ शकेल.

या प्रतिमानाविषयी रॉजर स्कॉटने असे म्हटले आहे की, ''ईस्टनचा हा दृष्टिकोन म्हणजे, एका राजकीय व्यवस्थेतील व राजकारणाच्या संकल्पनेतील संबंध आणि कार्ये यांचे एक महत्वाचे सूत्र आहे.''

● **दृष्टिकोनाचे महत्व :**

ईस्टनच्या या दृष्टिकोनातील काही मर्यादा, तसेच त्यावर घेण्यात आलेले काही आक्षेप जरी असले तरी हा एक उपयुक्त दृष्टिकोन आहे, हे नमुद करावे लागते. ओरान यंगने या दृष्टिकोनाची दोन वैशिष्ट्ये सांगितली आहेत. १) प्रमाणबद्ध संकल्पनांचा संच आणि वर्गवारीची तुर्कशुद्ध मांडणी ईस्टनने केली आहे. २) कोणत्याही एकाच राज्य व्यवस्थेला अनुसरून ही मांडणी न करता अमूर्त पातळीवर सर्वव्यापी दृष्टिकोन मांडला आहे. राजकीय दृष्ट्या महत्वाच्या व्यक्तींवरच यामध्ये प्रामुख्याने भर देण्यात आला आहे.

विविध राजकीय व्यवस्थांच्या अभ्यासासाठी तुळनात्मक दृष्टीने विचार करता हा दृष्टिकोन आजही महत्वाचा वाटतो. राजकारणाच्या अभ्यासाला हा दृष्टिकोन एक चांगली चौकट प्राप्त करून देणारा आहे. आजही ईस्टनचा हा दृष्टिकोन एक महत्वाचा अभ्यासविषय ठरतो.

● **दृष्टिकोनाच्या मर्यादा :**

या दृष्टिकोनावर जे आक्षेप घेण्यात आले आहेत ते असे,

१) हे प्रतिमान म्हणजे एक प्रकारची उसनवारी केली आहे.

२) आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला हा सिद्धांत लागू होत नाही.

३) यातील आशय हा संदिग्ध आहे.

४) व्यवस्थेच्या अस्तित्वा विषयीची संकल्पनाच दोषपुर्ण आहे.

५) राज्यव्यवस्थेत व्यक्तीची भुमिका काय हे सिद्धांतात मांडलेच नाही.

६) विकसनशील राज्य व्यवस्थेला सिद्धांत लागू पडत नाही.

७) राजकीय विकास आणि सामाजिक परिवर्तनाचा यात विचारही केला नाही.

## २.५ सारांश :

राज्यशास्त्रातील व्यवस्था विश्लेषण दृष्टिकोनाप्रमाणेच इतर शास्त्रांतील दृष्टिकोनाशी तुलना करताना राज्यशास्त्रज्ञांना आपल्या क्षेत्रातील अध्ययनाच्या मर्यादा जाणवत होत्या. कित्येक बाबतीत असमधान होते. राज्यशास्त्र हे शास्त्रीय अभ्यासाच्या कसरतीत उतरत नव्हते. या असमाधानातूनच एक प्रकारे व्यवस्थाविश्लेषणाचा उदय झालेला आहे. विशेषत: खालील गोष्टींची कमतरता प्रकर्षाने जाणवत होती उदा. भौतिक शास्त्रांप्रमाणेच सामाजिक शास्त्रांच्या बाबतीतही प्रत्येक शास्त्राने आपला सवतासुभा स्थापन केला होता. प्रत्येक शास्त्राचे स्वत:चे विश्व होते. स्वत:ची भाषा होती. त्यामुळे त्यांच्यात परस्परसंपर्क नव्हता. त्यांना एकत्र सांधणारा दूवा नव्हता. त्यामुळे अनावश्यक पुनरावृत्ती होत होती. सर्व सामाजिक शास्त्रांना एकत्र आणू शकणारे सर्वसंग्राहक सूत्र हवे हेते. व्यवस्थावादाच्या रूपाने हे सूत्र सापडले होते. सामाजिक शास्त्रज्ञ सर्वसामान्य अशा सूत्रांचा वापर करू शकत नसल्यने निरनिराळ्या विषयांचा अभ्यास होत असला तरी हा अभ्यास एकांगी स्वरूपाचा होता. विशिष्ट विषयाचा विशिष्ट दृष्टिकोनातून केलेला अभ्यास असे त्याचे स्वरूप होते. त्यामुळे शास्त्रीय ज्ञानाचे अपेक्षित एकसंधीकरण साधत नव्हते आणि सर्वज्ञान एकसंध आहे हे शास्त्रीय चिकित्सेचे मूलभूत गृहीत आहे. सामाजिक शास्त्रांचे अध्ययन यादृष्टिकोनातून होत नसल्याने शास्त्रीय विवेचनासाठी आवश्यक अशी शास्त्रीय अभ्यासपद्धतीही नव्हती. सर्व शास्त्रांना एकसंध बनवावे आणि शास्त्रीय विश्लेषणांचे एकसुत्रीकरण करावे, या प्रयत्नातूनच व्यवस्था विश्लेषणाचा उदय झाला आहे.

थोडक्यात व्यवस्थावादाने राज्यशास्त्रीय विवेचनात लक्षणीय भर टाकली आहे. व्यवस्थाविश्लेषणामुळे राज्यशास्त्राला नवी दृष्टी तर प्राप्त झाली आहेच एक नवे तंत्रदेखील उपलब्ध झाले आहे. जगाच्या विविध भागातील राजकीय व्यवस्थांच्या समग्र अध्ययनासाठी काही गमकेही व्यवस्थावादाने निर्माण केली असून राज्यशास्त्राच्या अध्ययनास अधिक शास्त्रीय स्वरूप देण्यात अधिक यश संपादन केले आहे. एखाद्या राजकीय व्यवस्थेच्या भौतिक रचनेपेक्षा तिच्या विविध पैलूंच्या विश्लेषणावर व्यवस्थावाद्यांनी भर दिला असून राजकीय प्रक्रियेतील गुंतागुंत स्पष्ट केली आहे.

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – १

**(Answers of check your progress -1)**

१) ''दंडशक्तीचा अधिमान्य वापर करून किंवा त्याचा धाक दाखवून ऐक्य आणि संतोषणाची कार्ये पार पाडणाऱ्या आंतरक्रियांचा संच म्हणजे राज्यव्यवस्था होय.''

२) जैसे थेचे सर्मन, विकसनशील समाजापुढील प्रश्न, सत्ता आणि व्यवस्थावाद, उद्दिष्टांचे आकलन, व्यवस्थावाद आणि राजकीय परिवर्तन, आणि गृहीतांचे स्वरूप इत्यादी व्यवस्था विश्लेषणाच्या मर्यादा आहेत.

## २.७ स्वाध्याय / गृहपाठ (Exercise and Home Assignment) :

१) व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनाचा अर्थ सांगा.

२) व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोन म्हणजे काय ?

३) व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनाच्या मर्यादा विषद करा.

## २.८ चिंतन व कृती (Reflection / Action) :

राजकीय समाजशास्त्रातील व्यवस्थावादी दृष्टिकोनाचा अभ्यास करून व्यवस्थावादी दृष्टिकोनाचे राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासातील दोष कशा प्रकारे काढून टाकता येतील आणि व्यवस्थावादी दृष्टिकोन आणखीन जास्तीत जास्त कशा स्वरूपात पारदर्शक बनविता येईल त्यासाठी कोण-कोणते प्रयत्न केले पाहिजेत हे समजून घ्या. वेगवेगळ्या अभ्यासाच्या पद्धती शोधून काढा आणि राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी व्यवस्था विश्लेषणात्मक दृष्टिकोनाबरोबरच इतर सामाजिक शास्त्रातील अभ्यासाचे वेगवेगळे दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या अभ्यासाला कसे वापरता येतील त्याचा अभ्यास करा.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके :


1) Bhambri C. P. - Bureauracy and Politics in India, Vikas Publications, Mumbai.

2) Verinder Grover - Elections and Politics in India, Deep and Deep Publications, New Delhi.

3) S. Kashyap - Indian Political Partles, the Institute of Constitutinal and Pallamentry Studies, Published by Research Delhi.

4) R. K. Sapru - Administrative Theories and Management Thought Prentice Hall of India (1998)

5) Shum Snu Nisa Ali - Eminent Administrative Thinkers Associated Publishing House.

6) P. K. Druker - The Practice of Management Murcury Book, London (1961)

7) Allex Currey - The Howthorn Studies, Radical Criticism, American Sociological Review Vol -32, No. -3 (June 1967)

8) Amitai Etzioni - Modern Organsation, Prentice Hall of India (1964)

9) Bendix and Fisher - The prespective of Elton meyo The Review of Economics and Statistics Vol.-31, No. 4 (Nov. 1964)

10) S. R. Maheshwari - Administrative Thinkers Macmillain India Ltd, New Delhi (1998).


❑❑❑

घटक – ३

# राजकीय सहभाग आणि राजकीय समाजीकरण

## (Political Participation and Political Socialisation)

३.१ प्रस्तावना

३.२ उद्दिष्ट्ये

३.३ विषय विवेचन

- ३.३.१ राजकीय समाजीकरण – अर्थ, महत्त्व, साधने
- ३.३.२ दबावगट आणि हितसंबंधी गट
- ३.३.३ राजकीय नोकरशाही : वैशिष्ट्ये, प्रकार आणि महत्त्व
- ३.३.४ राजकीय समावेशन आणि राजकीय संस्कृती – व्याख्या, अर्थ, आधार, प्रकार, महत्त्व

३.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

३.५ सारांश

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उतरे

३.७ स्वाध्याय

३.८ चिंतन व कार्य

३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

### ३.१ प्रस्तावना :

जगभरातील सर्व देशात विविध प्रकारच्या राजकीय व्यवस्था प्रचलीत आहेत. राजेशाही, हुकुमशाही, लष्करशाही आणि लोकशाही अशा त्या अनेक व्यवस्था आहेत. प्रत्येक देशाची संस्कृती आणि लोकांचा जीवनविषयक दृष्टिकोण यातही भिन्नता दिसते. त्यामुळे राजकीय व्यवस्था आणि राजकीय संस्कृती यांचा अभ्यास करावा लागतो. जगातील सर्व देशांची स्थूलमानाने प्रगत, अप्रगत, विकसनशील अशी वर्गवारी सामान्यता केली जाते.

समाजाचे स्थैर्य आणि विकास हे आधुनिक काळातील राजकीय व्यवस्थांचे उद्दिष्ट बनले आहेत. देशातील लोकांवर ज्या मूल्यांचे संस्कार झालेले असतात आणि ज्या पद्धतीने त्यांचे समाजीकरण झालेले असते. त्यानुसार लोकांचे राजकीय वर्तन घडत असते म्हणूनच राजकीय प्रणालीचे अभ्यासक राजकीय संस्कृती

व समाजीकरणाच्या अभ्यासाला महत्त्व देतात. आधुनिक काळात राजकीय समाजशास्त्र या शाखेला आणि त्यात राजकीय संस्कृती व राजकीय समाजीकरण यांच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## ३.२ उद्दिष्ट्ये :

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणास,

१) राजकीय संस्कृतीचा अर्थ आणि राजकीय संस्कृतीचे प्रकार समजून येतील.

२) राजकीय संस्कृतीचे आधारभूत घटक आणि राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाचे महत्त्व समजून घेता येईल.

३) राजकीय समाजीकरणाचा अर्थ आणि साधने स्पष्ट करता येतील.

४) राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाचे महत्त्व जाणून घेता येईल.

## ३.३ विषय विवेचन :

राजकीय संस्कृती व समाजीकरण ही संकल्पना समजून घेण्यासाठी दोन घटकात विभाजन केले आहे. पहिल्या घटकात राजकीय संस्कृतीच्या व्याख्या, अर्थ, आधारभूत घटक, राजकीय संस्कृतीचे प्रकार आणि अभ्यासाचे महत्त्व विषद केले आहे. दुसऱ्या घटकात राजकीय समाजीकरणाचा अर्थ, महत्त्व, साधने (माध्यमे) यांचे विश्लेषण केले आहे.

### ३.३.१ राजकीय समाजीकरण (Political Socialization)

प्रत्येक समाजाला स्वतःची अशी वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. ज्ञान, श्रद्धा, मूल्ये व नियमने, भाषा, प्रतीके असे संस्कृतीचे घटक असतात. त्या त्या कळात समाजाने आदर्श मानलेले वर्तन प्रकार ही संस्कृतीचे भाग मानले जातात; मात्र संस्कृतीतल्या सर्व बाबी व्यक्तीला आनुवंशिकतेनुसार प्राप्त होत नाहीत, तर व्यक्तीला त्या शिकून घ्याव्या लागतात. ज्ञान, कौशल्ये, प्रवृत्ती या सर्व बाबी शिकून घेऊन त्या आत्मसात करण्याच्या प्रक्रियेला समाजीकरण म्हणतात. या प्रक्रियेत व्यक्तीला ज्या समाजात आपले संपूर्ण जीवन जगावयाचे आहे त्याची ओळख होते. समाजाचे सातत्य स्थैर्य, समाजातील व्यवस्था, व्यक्तींच्या वर्तनावरील नियंत्रण, संस्कृतीचे संक्रमण या संपूर्ण समाजाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या गोष्टी समाजीकरणाच्या प्रक्रियेमुळेच साध्य होतात.

आधुनिक काळात सर्वच समाजात राजकीय व्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले असून या व्यवस्थेच्या विश्लेषणात राजकीय संस्कृती व राजकीय समाजीकरणाचा अभ्यास महत्त्वाचा मानला आहे. राजकीय संस्कृतीचे स्वरूप ठरविण्यासाठी आणि राजकीय व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया आवश्यक असते. राजकीय संस्कृतीची मूल्ये, श्रद्धा, दृष्टिकोन नवीन पिढीकडे हस्तांतरति करण्यासाठी राजकीय समाजीकरणाची गरज असते.

राजकीय समाजीकरण या संकल्पनेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करताना असे आढळून यते की, ग्रीक विचारवंत प्लेटोने आपल्या रिपब्लिक या ग्रंथात आदर्श राज्य निर्माण करण्यासाठी नागरिकांना राजकीय

शिक्षण देण्यासंबंधी विचार व्यक्त केले आहेत. प्राचीन काळात कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात राजपुत्रांचे शिक्षण, राजाची व प्रजेची कर्तव्ये याबाबतचे विचार मांडले आहेत. मध्ययुगीन काळात मॅकियाव्हेलीने 'प्रिन्स' या ग्रंथात राजा व प्रजा यांची नीती व कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. रूसोने आपल्या 'सामाजिक करार' या ग्रंथात सामूहिक इच्छा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा यांचे विवेचन केले. आधुनिक काळात मार्टिन ल्यूथर किंग, महात्मा गांधी यांनी जनतेत राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान या भावना जागृत केल्या.

**राजकीय समाजीकरण – व्याख्या व अर्थ (Political Socialization-Definition and Meaking):**

आधुनिक राजकीय विचारवंतांनी राजकीय समाजीकरणाच्या व्याख्या व अर्थ स्पष्ट केला आहे.

**१) ईस्टन व डेव्हिस** : राजकीय समाजीकरण म्हणजे अशा विकासात्मक प्रक्रिया की, ज्याद्वारे व्यक्ती राजकीय प्रवृत्ती आणि राजकीय वर्तन याबाबतचे ज्ञान प्राप्त करतात.

**२) ॲडलर आणि हॅरिंग्टन** : राजकीय समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारा राज्यातील मुलांना राजकीय घटना, संस्था पद्धती या बाबतची समाजाची मूल्ये, भावना व दृष्टिकोन यांचे ज्ञान होऊन ती त्यांचा स्वीकार करतात.

**३) आल्मंड व पॉवेल** : ज्या प्रक्रियेद्वारे राजकीय संस्कृतीची अंगभूत मूल्ये, श्रद्धा, संकेत व दृष्टिकोन भावी पिढ्याकडे संक्रमित होतात, तिला राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया म्हणतात.

**४) सिगल** : राजकीय व्यवस्थेला पूरक व्यक्ती पुरविणारी व तयार करणारी प्रक्रिया म्हणजे राजकीय समाजीकरण होय.

**अर्थ :**

वरील व्याख्यांच्या अभ्यासावरून राजकीय समाजीकरणाचा अर्थ स्पष्ट होतो. याबाबत असे म्हणता येईल की, सर्वच समाजात राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया सातत्योन सुरू असते. राजकीय समाजीकरणाद्वारे लोकमताची जडणघडण केली जाते. समाजाचा ऐतिहासिक, सामाजिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केला जातो. औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही पद्धतीने ही प्रक्रिया सुरू ठेवता येते. राजकीय समाजीकरणाच्या साहाय्याने नवी राजकीय संस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे नवीन पिढी काही नवीन राजकीय मूल्ये स्वीकारीत असते.

**राजकीय समाजीकरणाचे महत्त्व (Significance of Political Socialization) :**

विसाव्या शतकातील राजकीय विश्लेषणात राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाला महत्त्व दिले आहे. राजकीय स्थैर्य आणि विकास याचा अभ्यास करताना जे दृष्टिकोन महत्त्वाचे मानले जातात. त्यापैकी राजकीय समाजीकरण हा एक दृष्टिकोन आहे. राजकीय विचारवंत प्रगत राष्ट्रातील स्थैर्य आणि विकास यांचा जसा अभ्यास करतात तसाच अप्रगत व विकसनशील राष्ट्रातील राजकीय अस्थिरता आणि राजकीय बदलाचा अभ्यास करतात. राजकीय समाजीकरणामुळे राजकीय संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन होते. राजकीय संस्कृतीची मूल्ये, दृष्टिकोन, श्रद्धा, प्रवृत्ती यांचे हस्तांतर नवीन पिढीकडे राजकीय समाजीकरणाद्वारेच होते. राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाचे महत्त्व पुढील मुद्द्यावरून स्पष्ट होईल.

**१) राजकीय वर्तनाचे अध्ययन :** व्यक्तीच्या मनावर काही राजकीय मूल्ये, दृष्टिकोन, श्रद्धा निष्ठा यांचा प्रभाव असतो. व्यक्तीवर जे राजकीय संस्कार झालेले असतात, त्यानुसार व्यक्तीचे राजकीय वर्तन होत असते. मतदारांचे वर्तन, सत्ताधाऱ्यांचे वर्तन यामध्ये जो फरक दिसून येतो त्याबाबतचे विश्लेषण राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासाच्या साहाय्याने करता येते.

**२) व्यक्तीचा राजकीय सहभाग :** समाजातील प्रत्येक व्यक्तीचा राजकारणाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध येतो. राजकीय व्यवस्था आणि शासनाकडून व्यक्तीच्या संरक्षणाचे व कल्याणाचे कार्य केले जाते. राजकीय व्यवस्थांचा महत्त्वाचा घटक म्हणजे व्यक्ती होय. व्यक्ती राजकारणात सहभागी होतात, त्याचप्रमाणे व्यक्ती प्रचलित राजकारणाच्या विरोधी भूमिकाही घेतात. त्यामुळे व्यक्तीचे राजकीय व्यवस्थेतील वर्तन समजून घेण्यासाठी राजकीय समाजीकरणाचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**३) सामाजिक व्यवस्था आणि राजकीय व्यवस्था :** सामाजिक व्यवस्थेचा एक भाग म्हणजे राजकीय व्यवस्था होय. या राजकीय व्यवस्थेवर सामाजिक, धार्मिक व आर्थिक दृष्टिकोनाचा प्रभाव निर्माण होतो. राजकीय समाजीकरणातून व्यक्तीची राजकीय भूमिका बनत असते. राजकीय व्यवस्थेबाबतचा व्यक्तीचा दृष्टिकोन, श्रद्धा, निष्ठा यावर राजकीय व्यवस्थेची स्थिरता अवलंबून असते. थोडक्यात राजकीय व्यवस्था व सामाजिक व्यवस्था यांच्यातील परस्पर संबंधांची माहिती राजकीय समाजीकरणाच्या अभ्यासातून मिळते.

**४) लोकमताची जडणघडण :** आधुनिक काळात सर्वच राज्ये प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करीत आहेत. त्यासाठी लोकांमध्ये राजकीय जागृती करून त्यांचे सहकार्य मिळविणे गरजेचे असते आणि त्या दृष्टीने लोकमताची जडणघडण करावी लागते. राजकीय समाजीकरणाच्या प्रक्रियेद्वारे अपेक्षित लोकमत घडविता येते. आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव लोकांवर पाडण्यासाठी अनेक देशांनी राजकीय समाजीकरणाचा मार्ग स्वीकारला आहे. लोकात राजकीय जागृती करून त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा तो एक चांगला मार्ग सर्वत्र मान्य झाला आहे.

**५) विकसनशील राष्ट्रांच्या प्रगतीसाठी साहाय्य :** आर्थिक व राजकीयदृष्ट्या मागासलेल्या देशात राजकीय समाजीकरणाची गरज असते. विकसनशील देशात उद्योगधंद्याचा विकास होऊन नागरीकरण आणि आधुनिकीकरणाचा अनुभव येत असला तरी तेथे राजकीय परिवर्तन गतिशील नसते. कारण तेथे लोक धार्मिक व परंपराप्रिय वृत्तीचे असतात, त्यामुळे तेथे परिवर्तनाचा स्वीकार करण्याची गती मंद अशीच असते. त्यामुळे देशाच्या विकासात अडथळे निर्माण होतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात पंडित नेहरूनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब करून आधुनिक भारताची जडणघडण करण्यासाठी कष्ट घेतले आणि आता मात्र भारतीय राजकारणात धर्म आणि जात यांचा प्रभाव वाढत चालला आहे. भारतासारख्या विकसनशील देशात लोकांचा धार्मिक दृष्टिकोन बदलून त्यांनी वैज्ञनिक व तर्कशुद्ध दृष्टिकोनाचा स्वीकार करावा यासाठी राजकीय समाजीकरणाची आवश्यकता आहे.

**६) सामाजिक शास्त्रातील परस्पर संबंधाचा अभ्यास :** विविध सामाजिक शास्त्रांचा एकमेकांशी जवळचा संबंध असतो. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र व मानसशास्त्र या शास्त्रांचा अभ्यास आणि व्यक्तींचे राजकीय समाजीकरण यांचा परस्पर संबंध असतो. ऐतिहासिक घटना, स्वातंत्र्याच्या चळवळी, कौटुंबिक,

सामाजिक परिस्थिती, शिक्षण व्यवस्था यांच्या प्रभावातूनच लोकांचे राजकीय व्यक्तिमत्त्व घडते. विविध सामाजिक शास्त्रे, त्यांच्या दृष्टिकोनातून मानवी वर्तनाचे विश्लेषण करतात म्हणून सामाजिक शास्त्रातील आंतरसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी राजकीय समाजीकरणाचा अभ्यास महत्त्वाचा मानला जातो.

**राजकीय समाजीकरणाची साधने–माध्यमे (Agencies of Political Socializzation) :**

राजकीय समाजीकरणाची प्रक्रिया प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष स्वरूपात व्यक्तीच्या बालपणापासून आयुष्यभर चालू असते. व्यक्ती ज्या समाजात राहते तो संपूर्ण समाजच समाजीकरणाचे माध्यम असते. समाजातील विविध संस्था, कुटुंब, शाळा महाविद्यालये, राजकीय पक्ष, व्यवसाय क्षेत्र, ऐच्छिक संघटना, जनसंपर्क साधने या सर्वांद्वारे व्यक्तींचे समाजीकरण होत असते. त्याबाबतचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :

**१) कुटुंबसंस्था** : कुटुंबसंस्था हे राजकीय समाजीकरणाचे सर्वात मूळचे, महत्त्वाचे आणि सामर्थ्यवान असे माध्यम आहे. श्रद्धा आणि मूल्ये यांचे अधिष्ठान कुटुंबातच तयार होते. सत्ता, अधिकार आणि कर्तव्ये याबाबतची जाणीव मुलांच्या मनात कुटुंबामार्फत होते. कोणत्याही पिढीतील बहुसंख्य मुलांचा राजकीय दृष्टिकोन त्यांच्या आई–वडिलांच्या भूमिकेशी सुसंगत असाच दिसून येतो. राजकीय समाजीकरणात कुटुंबाचा प्रभाव अनेक कारणामुळे निर्माण होतो. एकतर मुले तरुण वयापर्यंत सर्व गरजांच्या पूर्ततेसाठी कुटुंबावरच अवलंबून असतात आणि आईवडील हेच मुलांचे आदर्श असतात. त्यामुळे त्यांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती मुलांमध्ये दिसते. कुटुंबातील सर्व सदस्य एकाच आर्थिक व सामाजिक वातावरणात वाढतात, त्यामुळे त्यांच्या राजकीय विचारात साम्य आढळते; मात्र विशिष्ट कौटुंबिक परिस्थितीमुळे मुलीमध्ये राजकीय उदासीनता आढळते. कुटुंबाचा प्रभाव मुलावर साधारण वयाच्या दहाव्या वर्षांपर्यंत दिसून येतो. तरुणपणी क्वचितप्रसंगी मुलांचा राजकीय दृष्टिकोन आपल्या कुटुंबीयांच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळे बनल्याची उदाहरणे आढळतात.

कुटुंब ही व्यक्तीच्या नागरी जीवनाची पाठशाळा मानली आहे. व्यक्तीच्या मनात त्याग, बंधुभाव, शिस्त, वरिष्ठाविषयी आदरभाव, सहिष्णुता इ. गुणांची जोपासना कुटुंबामार्फतच होते. संयुक्त कुटुंबात मुलांवर जे संस्कार होतात तेही महत्त्वाचे असतात. कारण आईवडील आणि भावंडाबरोबरच इतर अनेक नातेवाइकांशी आलेल्या संबंधातून त्याचा दृष्टिकोन व्यापक बनतो. निर्णयक्षमता आणि समाजातील इतर लोकांशी वागण्याच्या खूप चांगल्या पद्धती मुलांना कुटुंबाकडून शिकता येतात. पिढ्यान पिढ्या एकाच पक्षाशी बांधीलकी मानणारी अनेक कुटुंबे भारतात दिसून येतात.

**२) शिक्षणसंस्था** : शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन व प्रशिक्षण केंद्रे यासारख्या शिक्षण संस्थांचे व्यक्तींच्या राजकीय समाजीकरणात महत्त्वपूर्ण योगदान दिसून येते. कुटुंबात होणाऱ्या समाजीकरणाला काही मर्यादा असतात. शेती व्यवसायावर आधारलेल्या ग्रामीण समाजात साक्षरतेचे प्रमाण जेव्हा फार कमी होते तेव्हा तर या मर्यादा ठळकपणे दिसून येत होत्या. शाळेतच मुलांना विविध विषयांचे ज्ञान मिळते. विज्ञान, गणित, देशाचा इतिहास आणि भूगोल, थोर विचारवंत व नेते यांची चरित्रे यांच्या अभ्यासामुळे मुलांचे अनुभव विश्व व्यापक बनते. शाळा ही आदर्श समाजाची प्रतिकृती मानली जाते. शिक्षण संस्थातून मिळणाऱ्या ज्ञानातून आणि माहितीतून मुलांचा वैचारिक विकास होतो. देशात सुशिक्षित व जबाबदार नागरिक शिक्षणातूनच तयार होतात आणि तेच देशाच्या राजकीय स्थैर्याला आणि राजकीय विकासाला साहाय्य करतात.

शिक्षणाचे धोरण व शिक्षणपद्धती यात शासनाची भूमिका महत्त्वाची ठरते. विशिष्ट राजकीय मूल्ये व तत्त्वप्रणाली मुलांमध्ये रुजविण्यासाठी शिक्षण संस्थांचा वापर करून घेतला जातो. उदा. इंग्लंडमधील शिक्षणपद्धतीतून मुलांना उदारमतवादी लोकशाहीचे शिक्षण दिले जाते. रशियातील शिक्षणातून साम्यवादी विचारावर विश्वास असणारी मुले तयार होतात, तर अमेरिकेत मुलांना लोकशाही, मुक्त अर्थव्यवस्था आणि साम्यवादाविरोधी विचारांचे शिक्षण दिले जाते. उच्च शिक्षणामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. स्वावलंबन, शिस्त, त्याग, चारित्र्य, राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधीलकी याबाबतची जाणीव उच्च शिक्षणातून होते. भारतात इंग्रजाच्या काळात निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे होते; पण त्या काळात इंग्रजी शिक्षण घेतलेल्या तरुणांना स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या विचारांची ओळख झाली. त्यांनी देशाच्या राजकीय व सामाजिक सुधारणेसाठी स्वतःला झोकून दिले. स्वातंत्र्याच्या आंदोलनात आणि सामाजिक सुधारणेच्या चळवळीत अग्रभागी असलेले सर्व नेते उच्चशिक्षित होते आणि लाखो अशिक्षित लोकांनी त्यांचे नेतृत्व स्वीकारले होते. अनेक देशात विद्यार्थ्यांच्या संघटना आणि चळवळी यांनी चांगली कामगिरी करून दाखविली आहे. थोडक्यात शिक्षण आणि शिक्षणसंस्था यांचा राजकीय समाजीकरणात महत्त्वाचा सहभाग असतो.

**३) समवयस्क मित्रमंडळी** : कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य आणि शाळा-कॉलेजातील शिक्षक यांच्यामार्फत होणाऱ्या समाजीकरणापेक्षा गुणात्मकरीत्या वेगळ्या पद्धतीचे समाजीकरण समवयस्क मंडळींच्या समूहाकडून होते. समवयस्क व्यक्तीमध्ये मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध निर्माण होतात. कुमारावस्थेत कुटुंबापेक्षा मित्रपरिवाराचा प्रभाव मुलामध्ये अधिक प्रमाणात दिसतो. समवयस्क मित्रमंडळींच्या समूहात अनेक बाबतीत समानता आढळते. समान वय, समान आर्थिक दर्जा आणि समान कार्ये यातूनही समानता निर्माण होते. तरुणांमध्ये राजकीय सहभागाची आणि राजकीय परिवर्तनाची आकांक्षा निर्माण होते. आधुनिक काळातील गतिशीलतेमुळे व्यक्तींचा अनेक लोकांशी प्रत्यक्ष संबंध येतो. कुटुंबाचा संबंध आणि प्रभाव कमी होत असताना समवयस्क मित्रमंडळीशी संपर्क वाढत जातो. समान पार्श्वभूमी, समान दृष्टिकोन व समान मूल्ये मानणाऱ्या व्यक्तीत मित्रत्वाचे संबंध निर्माण होतात. तरुण मंडळींना कुटुंबाबाहेरील समूहात वावरण्याची संधी मिळते. तेथे नवीन विचारसरणी नवीन कल्पना यानुसार वर्तन करण्याच्या दृष्टीने समाजीकरण होते. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्याशी येणाऱ्या व्यक्तिगत संबंधाचा व्यक्तीच्या राजकीय दृष्टिकोनावर व मतावर प्रभाव पडतो. औद्योगिक शहरात कामगारांना संघटित होण्याची संधी मिळते. कामगार संघटनेशी संलग्नता आणि सहभाग यामुळे कामगारात राजकीय जागृती होते. थोडक्यात समवयस्क, समव्यवसायी मित्रमंडळीचे समूह हे व्यक्तीच्या राजकीय समाजीकरणाचे महत्त्वाचे माध्यम आहे. याशिवाय व्यक्तीच्या राजकीय समाजीकरणात शेजारी, आसपास लोकांची भूमिकादेखिल महत्त्वाची ठरते.

**४) राजकीय पक्ष** : सत्ता मिळविणे हे सर्वच राजकीय पक्षांचे उद्दिष्ट असते. राजकीय पक्ष व त्यांच्या संघटना आणि शाखा राजकीय समाजीकरणाचे प्रभावी माध्यम मानल्या जातात. महिला, विद्यार्थी, शेतकरी, कामगार यांच्या आघाड्या राजकीय पक्षाशी संलग्न असतात. त्यांच्या माध्यमातून आपल्या समर्थकांची संख्या वाढविण्यासाठी राजकीय पक्ष प्रयत्नशील असतात. सर्वच देशातील सत्ताधारी पक्ष त्यांनी केलेल्या कामाबाबतची माहिती प्रसिद्धी माध्यमाद्वारे लोकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी राजकीय समाजीकरण हाच उद्देश दिसून येतो. राजकीय पक्ष आपल्या पक्षाची तत्त्वे लोकांमध्ये बिंबविण्याचा प्रयत्न करतात. निवडणुकांच्या

काळात तर मोठ्या प्रमाणात असे समाजीकरण घडवून आणले जाते. भित्तीपत्रके, घोषणा, मिरवणुका, प्रचारयंत्रणा, जाहीर सभा याद्वारेही समाजीकरण होत असते. राजकीय पक्षाशी संबंधित संघटनातूनच पक्षाला समर्थक आणि कार्यकर्ते मिळतात. भारतात सेवादलासारख्या संघटना सदस्यांचे चारित्र्य संवर्धन आदर्शवाद व संघटनात्मक प्रशिक्षण यावर भर देतात. व्याख्याने, नियमित बैठका, चर्चासत्रे व सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे सदस्यांचे राजकीय समाजीकरण अशा संघटनामार्फत सुरू असते. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रात लोकशाही रुजविण्यासाठी लोकशाही मूल्यांचे समाजीकरण राजकीय पक्ष करतात. राजेशाही आणि पारतंत्र्याचा अनुभव घेतलेल्या आपल्या देशात लोकशाही पद्धतीचे महत्त्व लोकांना समजले आहे. त्यामागे राजकीय पक्षांनी केलेले समाजीकरण हे महत्त्वाचे कारण आहे.

**५) जनसंपर्क व प्रसारमाध्यमे** : राजकीय समाजीकरणाचे अत्याधुनिक, प्रभावी आणि व्यापक माध्यम म्हणजे प्रसारमाध्यम होय. यात वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ व दूरदर्शन या माध्यमांचा समावेश होतो. प्रसारमाध्यमात झालेल्या अभूतपूर्व तांत्रिक विकासामुळे अलीकडे त्याचे महत्त्व फारच वाढले आहे. अर्थात या माध्यमांचा प्रभाव त्या त्या समाजाचे स्वरूप आणि त्यातील स्तर यावर अवलंबून असतो. या माध्यमाद्वारे प्रसारित होणाऱ्या काही कल्पना आणि मूल्ये त्या समाजातील सदस्यांशी संबंधित नसतात, तर बाहेरून आलेली असतात. अनेक देशात प्रसारमाध्यमावर सरकारचे नियंत्रण असते. त्यामुळे ही माध्यमे सरकारला अनुकूल असतात किंबहुना सरकारच्या विरोधी नसतात. त्यामुळे प्रसारमाध्यम म्हणजे राजकीय समाजीकरणाचे माध्यम असले तरी ते एक हत्यारही आहे असे म्हटले जाते. प्रसारमाध्यमांचा लोकांवर प्रत्यक्ष परिणाम होत नसला तरी त्यांच्याद्वारे व्यक्त केली जाणारी मते, कल्पना व मूल्ये त्यांचा प्रेक्षकांवर व वाचकांवर प्रभाव टाकतात.

शिक्षणाचे प्रमाण ज्या देशात अधिक आहे त्या देशात या साधनांचा प्रभाव राजकीय समाजीकरणात अधिक दिसून येतो. लोकशाही व्यवस्थेत प्रसारमाध्यमे मुक्त असतात. वेगवेगळ्या वैचारिक बैठकीवर आधारलेल्या राजकीय पक्षांना तेथे आपली भूमिका मांडता येते. त्यामुळे लोकांना त्यातून निवड करणे शक्य होते. लोकशाहीसाठी अनुकूल वातावरण या जनसंपर्काच्या साधनाद्वारे निर्माण केले जाते. दूरदर्शनवर होणाऱ्या राजकीय चर्चा, निवडणुका व मतदानाबाबतच्या मुलाखती व अंदाज यांचा लोकमताच्या जडणघडणीत सहभाग असतो. आजच्या काळात वर्तमानपत्रे व दूरदर्शन यांना राजकीय समाजीकरणाचे चांगले माध्य म्हणता येईल.

## ३.३.२ दबावगट आणि हितसंबंधी गट

**प्रस्तावना :**

समुह अथवा गट ही संकल्पना सार्वत्रिक, विश्वव्यापी स्वरूपाची आहे. तसेच ही एक सार्वजनिक संकल्पना आहे. समूह हा समाजातील एक महत्वाचा घटक आहे. समाजशास्त्रीय अध्ययनातील एक मुलभुत आणि महत्वाची अशी ही संकल्पना आहे. समूह हा सर्व सामाजिक प्रक्रियांचा मुळ आधार आहे. दोना पेक्षा अधिक अशा कितीही  व्यक्तींचा गट होऊ शकतो आणि सामाजिक आंतरक्रियेतूनच समुहाची निर्मिती होत असते. अर्थात मानवी समूह हा वेगळेपणावर आधारलेला असतो. प्रत्येक मानवी समुहाची भिन्न भिन्न अशी वैशिष्ट्ये असतात आणि त्यानुसार त्यातील वेगळेपण स्पष्ट होत असते. असे वेगळेपण जपणाऱ्या लोकांच्यात परस्पर संबंध प्रस्थापित होत असतात. आंतरक्रिया होत असते. भिन्न उद्दिष्टातून असे

लहान मोठे सामाजिक समुह निमार्ण होत असतात. म्हणुनच ऑगबर्न आणि निमकॉफ यांनी सामाजिक समुहाची अशी व्याख्या केली आहे की, ''जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येतात आणि परस्परांवर प्रभाव पाडतात तेंव्हा सामाजिक समुह निर्माण होतो.''

राजकीय प्रक्रियेत अशी समुहवादी विचारसरणी असते. स्वतंत्र राजकीय विचारांचा वेगळा गट स्थापन करण्याची प्रवृत्ती असते. अशा गटवादी दृष्टिकोनाचा राजकीय प्रक्रियेतील अभ्यास हा एक स्वतंत्र विचार म्हणून पुढे आला. परंपरागत सत्तावादी विचारवंतानी राजकारणात अशा विविध गटांचे, संघटनाचे महत्व स्पष्ट केले आणि त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात राज्याच्या बरोबरीने महत्व असावे असे सांगितले. सत्ता केवळ राज्याच्या किंवा काही व्यक्तींच्या नव्हे तर गटांच्या, संघटनांच्या हाती केंद्रीत असते असा सत्तेच्या बाबतचा सांघिक दृष्टिकोन त्यांनी स्पष्ट केला. आधुनिक विश्लेषणातही गटाला प्राधान्य दिले असून गट हा राजकीय व्यवहारांच्या विश्लेषणाचा पाया समजला जातो.

● **राजकीय प्रक्रियेतील गट संकल्पना :**

आर्थर बेंटले यांनी १९०८ मध्ये The Process of Government हे पुस्तक प्रकाशीत केले व त्यामध्ये प्रथम गट हि संकल्पना मांडली. त्याचा पुरस्कार मात्र १९३० ते १९४० च्या सुमारास डॅनिएल टुमन, अर्ल लॅदम यांनी केला. बेंटले समाजाला गटांची रांगोळी (A Mosaic of Groups) मानतात. अर्ल लॅदमच्या मते, समाज गटांचे असे विश्व आहे की ज्यात तोडणे, जोडणे, संघ बनविणे आणि सतत बदलाची अस्थिर प्रक्रिया अशा संमिश्र अवस्थेत गटांचे आस्तित्व आढळते. राजकीय प्रक्रियेत या विविध गटामध्ये परस्पर विरोध असतो. सततचा संघर्ष असतो. गटबाजी, गटतट अशी प्रक्रिया सुरू असते. एक गट सतत दुसऱ्या गटाला बाजूला करण्याचा, त्याच्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत असतो. तसेच काही वेळा विरोध संपुष्टात आणण्याचाही प्रयत्न करीत असतो.

एखादा गट सामुहिक कृती करण्याला कशामुळे प्रवृत्त होतो, या प्रश्नाचे उत्तर शोधताना हे स्पष्ट होते की, हितसंबंध (Interest) हा गटनिर्मितीचा मुळ आधार असतो. तेंव्हा कोणताही गट हा मुळात हितसंबंधी गट असतो हे लक्षात घेतले पाहिजे. समान हितसंबंध असलेल्या व्यक्ती तशाच हितसंबंधीयांच्या शोधात असतात. विविध प्रकारच्या क्रिया-पक्रियांमधुन हे हितसंबंधी गट आपले कार्य चालूच ठेवतात. मुक्त समाजात (Open Society) अशा गट प्रक्रियांना पूर्ण वाव असतो. आर्थर बेंटले गटाकडे कृतींचा संच म्हणून पाहतो. त्यामुळे सामाजिक संदर्भातील कोणतीही कृती ही गटप्रक्रिया मानली जाते.

● **गटांचे सामान्यपणे तीन प्रकार आढळतात :**

१) केवळ हितसंबंधार आधारीत गट : उदा. विद्यार्थ्यांचा गट

२) वर्गात्मक गट : कामगारांचा गट

३) संघटनात्मक गट : शेतकरी संघटना, व्यापारी संघटना.

● **हितसंबंधी गट** (Interest Group) **:**

राजकीय हेतूंच्या पुर्तीसाठी लोकांना संघटित करण्याची प्रक्रिया म्हणून राजकीय संघटनाचा विचार

केला जातो. या राजकीय संघटन प्रक्रियेत समाजातील गटाना साहजीकच महत्व प्राप्त होते. सामाजिक स्तरीकरणाच्या संदर्भात जाती, वर्ग या स्वरूपाचे गट अस्तित्वात असतात किंवा व्यवसाय गटही असतात. सभासदांच्या हिताची पुर्तता करणे हा या गटांचा उद्देश असल्याने त्याना हितसंबंधी गट असे म्हटले जाते. या गटांच्या माध्यमातून लोक राजकारणात सहभागी होतात. म्हणुन राजकीय प्रक्रियेत गटांचा सहभाग मोठा असतो.

समाजातील गटांची संख्या, त्यांचे स्वरूप व परस्परातील संबंध यावर राजकारणाचे स्वरूप व तीव्रता अवलंबून असते. हितसंबंधी गटांची संख्या व त्यांचे स्वरूप आणि राजकीय पक्षांची संख्या व त्यांची कार्यपद्धती यांना राजकीय प्रक्रियेत महत्व असते. कारण हितसंबंधी गट आणि राजकीय पक्ष लोकांना राजकीय हेतुंच्या पुर्ततेसाठी संघटित करीत असतात. लोकांच्या राजकीय सहभागाचे माध्यम व राजकीय समावेशनाचे माध्यम म्हणुनही विविध प्रकारचे गट कार्य करीत असतात. हितसंबंधी गट हा त्यांतीलच एक प्रकार आहे.

अनेक व्यक्ती जेंव्हा एकत्र येतात व विशिष्ट हितसंबंधाच्या पुर्ततेसाठी प्रयत्न करतात तेंव्हा गट निर्माण होतात व राजकीय प्रक्रियेचे ते आधार ठरतात. याच संदर्भात हितसंबंधाची संकल्पना महत्वाची ठरते. राजकारणात हितसंबंध महत्वाचे असतात. खरे तर, समाजातील विविध गटांची निर्मिती विविध हितसंबंधांच्या अस्तित्वामुळे झालेली असते. एखाद्या विशिष्ट गोष्टीवर किंवा वस्तुवर स्वतःचा हक्क जेंव्हा एखादी व्यक्ती अथवा गट सांगतो तेंव्हा 'हितसंबंध' अस्वित्वात येतात.

एकाच वस्तुवर हक्क सांगणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन त्या वस्तुच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतात. यातुनच संघर्ष किंवा सहकार्य या प्रक्रिया अस्तित्वात येतात. तेंव्हा गट निर्माण होतात. म्हणजेच 'समान हितसंबंधाच्या पुर्तीसाठी जेंव्हा व्यक्ती एकत्र येतात' तेव्हा गट निर्माण होतात. समाजात हितसंबंध अनेक प्रकारचे असतात व त्यामुळे गट ही अनेक प्रकारचे असतात.

यावरून हे स्पष्ट होते की, व्यक्ती स्वतःच्या गरजा गटाच्या माध्यमातुन भागवत असते. हितसंबंधांची जोपासना गटाच्या माध्यमातून होते व एकत्रीकरण ही गटाच्या माध्यमातूनच होते. 'हितसंबंधाची सुरक्षितता' लोकांना महत्वाची वाटत असते व म्हणुन व्यक्त किंवा अव्यक्त हितसंबंधांच्या आधारे समाजातील लोकांना संघटित करणे व राजकीय शक्ती निर्माण करणे शक्य होते. लोकशाहीच्या विकासा बरोबर हितसंबंधांची अभिव्यक्ती करणे व संघटना निर्माण करणे याविषयीही लोकांना हक्क प्राप्त होतो. त्यामुळे लोकांचे राजकीय संघटन करण्याची प्रक्रिया आवश्यकही होते व सोपीही होते. साहजीकच हितसंबंधी गट व राजकीय पक्ष यांना महत्त्व प्राप्त झाले.

- **दबाव गट** (Pressure Group) **:**

**दबाव गट म्हणजे काय?**

जेव्हा प्रत्येक हितसंबंधी गटाला आपल्या हितसंबंधांचे सरंक्षण आणि संवर्धन व्हावे अशी इच्छा असते आणि त्यासाठी काही हितसंबंधी गट दबाव तंत्राचा वापर करू लागतात. तेंव्हा त्याना दबाव गट असे म्हणतात. असा दबाव आणुन आपल्या हितसंबंधाना अनुकूल असे धोरण शासन व्यवस्थेने स्वीकारावे यासाठी दबावगट प्रयत्नशील असतो.

**झिगलर यांनी केलेली दबाव गटाची व्याख्या :**

''दबाव गट हा असा गट असतो की, जो आपल्या सभासदांना शासकीय सत्तास्थानावर आणण्याचा प्रयत्न न करता शासनाच्या धोरणावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असतो.''

**व्ही. ओ. के. यांनी केलेली व्याख्या :**

''शासनाच्या धोरणावर प्रभाव पाडण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या खाजगी संघटना म्हणजे दबावगट होय.''

**दबाव गटाची वैशिष्ट्ये :**

दबाव गटाच्या व्याख्येच्या आधारे त्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे लक्षात घेता येतात.

१) दबाव गट हा समान हितसंबंधी लोकांचा गट असतो.

२) दबाव गटातील लोक कमी जास्त प्रमाणात संघटित असतात.

३) आपल्या गटातील लोकांच्या हितसंबंधांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे दबाव गटाचे उद्दिष्ट असते.

४) दबाव गट हा स्वतः शासनाची सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत नाही.

५) दबाव गट हा शासनावर किंवा शासकीय आधिकाऱ्यांवर दबाव आणुन आपल हितसंबंध जपण्याचा प्रयत्न करीत असतो.

- **दबाव गटांचे स्वरूप :**

'दबाव' हा शब्द सर्वप्रथम पीटर ओडेगार्ड यानी त्यांच्या १९२८ साली प्रकाशीत झालेल्या "Pressure Politics the Story of the Anti-Saloon League" या पुस्तकात वापरला. राजकीय समाजशास्त्रज्ञानी आता 'दबाव' हा शब्द सर्रास वापरला आहे. कारण आता दबावाचे राजकारणही जोरात चालु आहे.

दबाव गट म्हणविण्यासाठी किमान तीन वैशिष्ट्ये आवश्यक आहेत.

१) स्पष्टपणे लक्षात येईल अशी औपचारिक संरचना.

२) परस्परांशी समान दृष्टिकोन किंवा हितसंबंधावर आधारीत असे सदस्यत्व.

३) गटाच्या कार्याने सार्वजनिक प्रक्रियेवर प्रभाव पाडण्याचे उद्दिष्ट.

समाजात अनेक प्रकारचे हितसंबंध असतात आणि हितसंबंधी गट ही असतात. वेगवेगळे जाती समुह हे हितसंबंधी गटच आहेत. पण सर्वच हितसंबंधी गट हे दबाव गट नसतात. हितसंबंधी गट आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी जेंव्हा दबाव तंत्राचा वापर करू लागतो तेंव्हा त्याचे रूपांतर दबाव गटात होते. तेंव्हा प्रत्येक दबाव गट हा हितसंबंधी गट असतोच, पण प्रत्येक हितसंबंधीगट हा दबाव गट असतोच असे नाही. त्यामुळे हितसंबंधी गट ही अधिक व्यापक संकल्पना आहे.

भारतातील उद्योगपती, कामगार, शासकीय कर्मचारी, शिक्षक, बँक कर्मचारी इत्यादींच्या कायम स्वरूपी संघटना आहेत. यांना 'सुसंघटित दबाव गट' असे म्हणता येईल. हे सर्व गट कायमस्वरूपी संघटीत तसेच अधिक सुसंघटित असतात. सातत्याने आपल्या हितसंबंधाचे रक्षणाचे कार्य ते करीत असतात. याउलट समाजात असे काही हितसंबंधी गट असतात की त्यांच्या कायमस्वरूपी संघटना नसतात. समस्यानुरूप ते तात्पुरते संघटित होतात व कालांतराने लोप पावतात. अशा गटाना 'असंघटित दबाव गट' किंवा 'पारंपारिक दबाव गट' म्हटले जाते. उदा. दैनंदिन गरजपुर्तीच्या समाधानासाठी असणाऱ्या नागरिक संघटना. त्यांची विशिष्ट गरज पुर्ण झाली की, अशा संघटना लोप पावतात. असे गट समस्येपुरते क्रियाशील बनतात पण सर्वसाधारण परिस्थितीत ते असंघटित असतात. यातुनच 'संघटित क्षेत्र' आणि 'असंघटित क्षेत्र'अशी हितसंबंधी गटांची विभागणी केली जाते.

- **दबाव गटांचे वर्गीकरण (प्रकार) :**

आल्मंड आणि पॉवेल यांनी स्थुलमानाने दबाव गटांचे चार प्रकार सांगितले आहेत.

१) **मंडळात्मक गट** (Associational Group) **:**

या गटाना विशिष्ट अशी संरचना असते. विशिष्ट हितसंबंधाचे हे गट प्रतिनिधत्व करतात. हेतुंच्या पुर्ततेसाठी त्यांची निश्चित अशी कार्यपद्धती असते व राजकीय पक्ष, विधिमंडळे व नोकरयंत्रणा याकडे हे गट लोकांच्या मागण्या पोहोचवतात. मजुर संघटना, व्यापारी संघटना, नागरी संघटना यांचा यामध्ये समावेश होतो.

ब्लॉण्डेल यांनी मंडळात्मक गटात संवर्धनवादी (Promotional) व हितसंरक्षणवादी (Protective) गट असे दोन प्रकार सांगितले आहेत. हितसंवर्धनवादी गट धोरणात्क बदल घडवून आणतो. उदा. अण्वस्त्रविरोधी गट, दारूबंदी विरोधी गट, भेसळ विरोधी गट, भ्रष्टाचार विरोधी गट, हितसंरक्षण वादी गट हे विशिष्ट स्तराच्या किंवा गटांच्या हितांचे रक्षण करतात. उदा. मंजुर संघटना, निर्वासित संघटना, वांशिक गट इ.

२) **अ–मंडळात्मक गट** (Non-Associational Group) **:**

या प्रकारात नाते संबंधावर आधारित असे गट मोडतात. वांशिक, प्रांतिक, कौटुंबिक, धार्मिक, वर्गाधिष्टीत अशा गटांचा यात समावेश होतो. या गटांची कार्यपद्धती अनौपचारीक व प्रासंगिक स्वरूपाची असते. आपल्या नेत्यामार्फत ते मागण्या सादर करतात. भारतात भाषिक व धार्मिक नेते आपापल्या समुहाच्या हितरक्षणासाठी अशा मागण्या करतात.

३) **संस्थात्मक गट** (Institutional Group) **:**

असे गट हे विधिमंडळे, लष्कर, नोकरवर्ग, चर्च इत्यादी सारख्या संघटनात अस्तित्वात असतात. उदा. अधिकाऱ्यांचे गट (राजपत्रित अधिकाऱ्यांचा गट), विधिमंडळ सभासदातील गट, नोकर वर्गातील गट, भिन्न विचार सरणीचे (समाजवादी, भांडवलवादी, लोकशाहीवादी इ.) गट इत्यादी. या गटाना संस्थेचा आधार असतो किंवा त्यांची निर्मिती अधिकारपदावरील व्यक्तीकडून जाणीवपुर्वक झालेली असते.

४) **प्रमाणक शुन्य गट** (Anomic Group) **:**

समाजातून उत्स्फुर्तपणे निर्माण होणाऱ्या व राजकीय व्यवस्थेत प्रवेश करणाऱ्या गटांचा समावेश या प्रकारात केला जातो. संरचना कार्ये, नियम व कायदे याबाबतीत या गटात नियमितपणा नसतो. दंगली किंवा निदर्शने करणारे गट असे असतात. काही वेळा असंतोषातुन असे गट निर्माण होतात. अचानकपणे व कोणताही विधिनिषेध न ठेवता असे गट उदयास येतात.

आधुनिक काळात व विशेषतः लोकशाही व्यवस्थेत गटांची संख्या व गटातील विविधता मोठ्या प्रमाणात आढळते. साधन सामग्रीचा प्रभाव असण्याच्या बाबतीतही गटागटात फरक आढळतो. उदा. उद्योगपतींचे गट, विद्यार्थ्यांचे गट, शिक्षकांचे गट इ. तसेच अंतर्गत एकजिनसीपणा, सार्वजनिक धोरणविषयक क्षेत्राची व्याप्ती व महत्त्व, माध्यमांचा वापर इ. बाबतीतही गटागटात फरक आढळतो. हुकुमशाही, लोकशाही, राष्ट्रीय, प्रादेशिक, स्थानिक असेही गट असतात. तसेच गटांचा राजकारणातील अंतर्भाव हा कायम स्वरूपी किंवा तात्पुरताही असू शकतो. तसाच तो पुर्णतः किंवा अंशतः ही असू शकतो. संस्थात्मक गटांचा राजकारणातील अंतर्भाव नित्य व कायमचा असतो. तर जाती जमातींचा तो तात्पुरता असतो. लोकांच्या पाठिंब्यावर दबाव गटांचे यश अवलंबून नसते. तर ते शासकीय प्रकार व यंत्रणा यांच्या सुसंगतपणावर अवलंबुन असते.

- **दबाव गटांची कार्ये :**

**१) हितसंबंधाचे आविष्करण :**

आपल्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करणे हे दबाव गटांचे उद्दिष्ट असते. यासाठी दबावगट आपल्या हितसंबंधाना व्यक्त स्वरूप देण्याचे कार्य करत असतो. हितसंबंधाचे सुसुत्रीकरण करून आपल्या गटाच्या मागण्या स्पष्ट करण्याचे कार्य करत असतो. शासनाकडुन असणाऱ्या गटाच्या अपेक्षा व्यक्त करत असतो. आपल्या गटातील सदरस्यांच्या तक्रारींना वाचा फोडण्याचे कार्य करीत असतो.

**२) शासनाच्या धोरणावर प्रभाव :**

आपल्या हितसंबंधाना अनुकूल असे धोरण शासनाने स्वीकारावे यासाठी शासनाच्या विविध घटकावर तसेच प्रशासकीय आधिकाऱ्यावर प्रभाव पाडण्याचे कार्य दबाव गट करत असतो. त्यासाठी प्रत्येक दबाव गट त्याच्या दृष्टीने सोयीच्या अशा दबाव गटाचा वापर करत असतो.

**३) प्रचार :**

शासनावर दबाव आणण्यासाठी लोकमत जागृत करण्याचे कार्य दबाव गटाला करावे लागते. इतर संघटनांचा पाठिंबा मिळवणे, लोकमत मागण्यांना अनुकुल बनवणे या मार्गानी शासनावर अधिक प्रभाव पाडला जातो. यासाठी दबाव गट प्रसारमाध्यमांचा वापर करून लोकमताचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. जाहिरात, सभा, मेळावे, पत्रक प्रसिद्धी अशा मार्गानी लोकमत जागृत करण्याचा व संघटित करण्याचा प्रयत्न दबाव गट करीत असतात.

**४) राजकीय पक्षाना मदत :**

दबाव गट स्वतः निवडणुक लढवत नाहीत. कारण राजकीय सत्ता प्राप्त करणे हे त्यांचे उद्दिष्ट नसते. पण राजकीय पक्षांना दबाव गट अनेक प्रकारे मदत करत असतात. ज्या पक्षाचे धोरण आपल्या हितसंबंधाना

अनुकुल असेल त्या पक्षाच्या उमेदवारांना निवडणुकीत पाठिंबा देणे, त्यांचा प्रचार करणे, पक्षाला निधी देणे ही कार्ये दबाव गट करीत असतात. आपल्या हितसंबंधाचे रक्षण करतील असे उमेदवार विधी मंडळात निवडून आणण्याचा दबाव गटांचा प्रयत्न असतो.

**५) शासनाशी संपर्क :**

दबाव गटांच्या नेत्यांना आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासनाच्या विविध घटकांशी संपर्क साधावा लागतो. मंत्री, विधिमंडळाचे सभासद, प्रशासन वगैरेशी प्रत्यक्ष संपर्क साधुन दबाव गटाचे नेते त्यांच्यापुढे आपल्या मागण्या सादर करतात. तसेच त्यासंदर्भातील आवश्यक ती माहिती सादर करून मागण्या कशा योग्य आहेत ते पटवुन देण्याचा प्रयत्न करतात.

**६) आंदोलने :**

आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दबाव गट प्रसंगी वेगवेगळ्या स्वरूपाची आंदोलने करतात. संप, मोर्चे, हरताळ, बंद, सभा, मिरवणुका, घेराव, रास्तारोको, बहिष्कार अशा प्रकारे आंदोलने करून शक्ती प्रदर्शन करून शासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात.

- **दबाव गटाची तंत्रे व परिणामकारकता :**

दबाव गट प्रामुख्याने शासकीय धोरणावर प्रभाव पाडण्याचे व ती आपल्या हितसंबंधाना अनुकुल करून घेण्यासाठी प्रयत्नशील असतात. यासाठी दबाव गट वेगवेगळ्या तंत्राचा अवलंब करतात. दबाव गट ज्या तंत्राचा अवलंब करतात. त्या तंत्रांची परिणामकारकता अनेक घटकावर अवलंबुन असते. हे घटक पुढीलप्रमाणे विचारात घेता येतात.

**१) संघटना सामर्थ्य :**

दबाव गटाचे कार्य परिणामकारक होण्यासाठी तो संघटित असावा लागतो. प्रत्येक दबाव गटाला औपचारीक संघटनेची जरूरी असते. संघटनेविषयी सभासदांची निष्ठा व सहकार्य यावर त्या संघटनेचे यश अवलंबून असते, तसेच परिणामकारकताही अवलंबुन असते.

**२) आकार :**

दबाव गटाचे कार्य परिणामकारक होण्यासाठी त्याचा आकार महत्वाचा असतो. म्हणजे विशिष्ट हितसंबंधी लोकांची एकच संघटना असेल तर ती अधिक प्रभावी ठरते. अनेक संघटना, भिन्न भिन्न धोरणे, उद्दिष्टे असतील तर दबाव गटाची परिणामकारकता कमी होते. प्रभावी संघटना असेल तर ती अधिक परिणामकारक ठरेल. अन्यथा Too Many Cook Spoil the Food अशी परिस्थिती होईल.

**३) साधन सामग्री :**

दबाव गटाला आपले कार्य करण्यासाठी साधनसाम्रगीची आवश्यकता असते. उदा. आर्थिक पाठबळ, मनुष्यबळ, प्रचार साधने, नेत्यांची प्रतिष्ठा, सामाजिक दर्जा इ. साधन सामग्रीच्या दृष्टीने प्रत्येक दबाव गटाची काही बलस्थाने असतात. उदा. व्यापाऱ्यांचे आर्थिक सामर्थ्य हे बलस्थान असते, तर कामगार, शेतकरी यांचे मनुष्यबळ हे बलस्थान असते. बलस्थानाच्या जोरावर दबाव गट आपली दबाव तंत्रे निश्चित

करतो. उदा. कामगार संघटना संप, मोर्चे, बंद यांचा अवलंब करतील. तसेच सभा, संमेलनांच्या जोरावर दबाव गट आपली कार्ये प्रभावी करतो. वर्तनामपत्राच्या आधारे प्रभावी प्रचार करू शकतो, दबाव गटाची प्रतिष्ठा, सामाजिक मान्यता जितकी अधिक असेल तितके त्यांचे कार्य प्रभावी होते.

**४) राजकीय कौशल्य :**

नेत्यांच्या राजकीय कौशल्यावर दबाव गटाच्या कार्याचे बरेचसे यश अवलंबून असते. दबाव तंत्राचा योग्य आणि कौशल्याने वापर करणे, आंदोलनात इतर संघटनांचा पाठिंबा व मदत मिळविणे, शासनाशी यशस्वीरित्या वाटाघाटी करणे, आवश्यक तिथे तडजोड करणे, हे सर्व कुशल नेतृत्वावर अवलंबून असते. मागण्या मान्य करून घेण्यासाठी तडजोडीची तयारी करणे, संपासारखे आंदोलनाचे मार्ग कौशल्याने वापरणे, संघटनेतील सदस्याचा विश्वास संपादन करणे या सर्व गोष्टी नेत्यांच्या राजकीय कौशल्यावर अवलंबुन असतात.

**५) शासनाचे धोरण :**

दबाव गटांची परिणामकारकता शासनाच्या धोरणावरही अवलंबून असते. कारण ज्या परिस्थितीत दबाव गटाना कार्य करावे लागते त्या परिस्थितीवर शासनाच्या धोरणाचाही परिणाम होत असतो. शासन समाजवादी धोरणाचा पुरस्कार करणारे असेल तर श्रमजीवी वर्गाला त्याचा फायदा होतो. शासन जर भांडवलशाहीला प्रोत्साहन देणारे असेल तर उद्योगपतीना त्याचा फायदा होतो. आधुनिक काळात शासनाच्या अनेक कल्याणकारी योजनांमुळे अनेक प्रकारचे हितसंबंधी गट निर्माण होण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. तेव्हा संघटनेचे बळ हे शासनाकडून मिळणाऱ्या प्रतिसादावर अवलंबून असते.

**६) शासन व्यवस्थेचे स्वरूप :**

लोकशाही, हुकुमशाही, साम्यवादी अशा सर्वच राजकीय व्यवस्थामध्ये दबाव गटाचे अस्तित्व दिसून येते. शासन व्यवस्थेचे स्वरूप कसे आहे. त्यानुसार कोणत्या प्रकारच्या दबाव गटाना अधिक परिणामकारकरित्या कार्य करण्यास संधी मिळू शकेल हे अवलंबून असते. लष्करी हुकुमशाहीत लष्करी गटाना तर धर्माधिष्ठीत राज्यात विशिष्ट धर्म संघटनाना प्रभाव पाडण्याची संधी असते. लोकशाही व्यवस्था ही मुक्त व्यवस्था आहे. त्यामुळे अशा व्यवस्थेत दबाव गट अधिक मुक्तपणे कार्य करू शकतात.

- **भारतातील दबाव गट :**

हितसंबंधाचे आविष्करण (Interest Articulation) हे विकसनशील देशात निरनिराळ्या तऱ्हेने होते असे आल्मंड व कोलमन यांनी The Politics of the Developing Areas या त्यांच्या ग्रंथात म्हटले आहे. जन्मजात सभासद-त्यावर आधारित अशा वांशिक, भाषिक, धार्मिक गटामार्फत ते अधिक प्रमाणात होते. या पार्श्वभुमीवर भारतातील दबाव गटांचा विचार केल्यास आपल्याला संमिश्र परिस्थिती दिसुन येते. जाती, जमाती, भाषिक व धार्मिक गट यासारखे अनेक गट दबाव गट म्हणून कार्य करताना दिसतात. तसेच उद्योगपती, व्यापारी, कामगार, शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी, यांच्या संघटनाही कार्यरत आहेत. मंडळात्मक, अ-मंडळात्मक तसेच प्रमाणकशुन्य गटांचे प्रमाणही भारतात दिसुन येते.

स्वातंत्र्यपुर्व काळातही भारतात काही हितगट अस्तित्वात होते. इंग्रजी शिक्षणाचा व पाश्चात्य शासकीय पद्धतीचा प्रभाव पडून हितसंबंध हळुहळु संघटित होऊ लागले. जनगणनेमुळे जाती संघटित होऊ लागल्या. औद्योगिकरणातुन व व्यापारवृद्धीमुळे उद्योगपती व व्यापाऱ्यांचे गट निर्माण झाले. उदा. Federation of Indian Chambers of Commerce and Industry. ब्रिटिशांच्या हिंदू-मुसलमान संबंधविषयक विशिष्ट धोरणाच्या परिणामातून, मोठ्या प्रमाणात धार्मिक गटांची निर्मिती झाली. स्वातंत्र्यापुर्वी Indian National Congress नेही दबाव गट म्हणून प्रामुख्याने कार्य केले.

आज भारतात प्रामुख्याने पुढील प्रकारचे दबाव गट आढळतात.

### १) विशिष्ट हितसंबंधावर आधारित दबाव गट :

उद्योगपती, व्यापारी, कामगार, व्यावसायिक, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, सरकारी कर्मचारी इत्यादींचे हितसंबंध निरनिराळ्या पातळीवर संघटित झाल्याचे दिसतात. आल्मंड यांच्या मते हे गट मंडळात्मक गट असतात. संघटना कार्यालय, सभासदत्व व विशिष्ट कार्यक्रम या गोष्टी त्यात दिसून येतात. उदा. All India Manufacturers Organisation (लघु उद्योगांच्या हित रक्षणाचे कार्य करते) All India Organisation of Industrial Employees, All India Organisation of Bank Employees, All India Federation of College and University Teachers organisation, Maharashtra federation of college and University Teachers organisation, All India trade union congress, Indian National Trade Union Congress, National Railway Majdur Union, S.T. worker federation, संस्था चालक संघटना अशा अनेक हितसंबंधी दबाव गटांचा यामध्ये समावेश होतो. भारतातील विद्यार्थी संघटना मात्र पक्षप्रणित दिसतात व परस्पर विरोधी काम करताना दिसतात. उदा. National Students Union of India ही काँग्रेसप्रणित, अखिलभारतीय विद्यार्थी परिषद ही भाजपप्रणित, युवा जनता ही समाजवादी प्रणित इ. याशिवाय डॉक्टर्स, वकील व बांधकाम व्यावसायिक यांचेही दबाव गट आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ ही अतिशय प्रभावी संघटना कार्यरत आहे. शिक्षक व प्राध्यापक संघटना शिक्षकांची नोकरीतील. सुरक्षितता, वेतन, सेवा निवृत्ती वेतन व विद्यार्थ्यांच्या सवलती यासाठी विशेष जागरूकतेने काम करतात.

### २) जातीय व धार्मिक गट :

भारतातील प्रत्येक जात व धर्म खरे पाहता हितगट म्हणुनच कार्य करतात. स्वतःच्या मतशक्तीच्या आधारे राजकीय पक्ष व राजकीय नेते, यांच्यावर जात व धर्म प्रभाव टाकते. जाती व धर्माच्या संघटना व हितगट शिक्षण संस्थांच्या माध्यमातुन शैक्षणिक सवलती मिळविण्याचा प्रयत्न करतात. धार्मिक अल्पसंख्य तत्वानुसार अल्पसंख्य शिक्षण संस्था विकसित होत आहेत. त्यामध्ये जैन, मुस्लीम, खिश्चन, शीख, पारशी इत्यादींचा समावेश होतो. निरनिराळ्या जातींच्याही शिक्षण संस्था स्वातंत्र्यपुर्तीपासूनच कार्यरत आहेत. जाती जातींची संमेलने भरवून आपल्या मागण्यासाठी पाठपुरावा केला जात आहे. बनारस हिंदू विद्यापीठ स्थापन झाल्यावर लगेचच अलिगड मुस्लीम विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. हमीद दलवाई यांनी स्थापन केलेल्या मुस्लीम सत्यशोधक समाज या संघटनेने मुस्लीम स्त्रियांना जाचक ठरणारे विवाह व घटस्फोट विषयक मुस्लीम कायदे बदलण्यासाठी जाणीव पुर्वक प्रयत्न केले.

### ३) दृष्टिकोन गट :

काही गट हे त्यांच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे निराळे व महत्वाचे ठरले आहेत. गांधीवादी विचार सरणीचा या गटावर प्रामुख्याने पगडा दिसतो. सर्वोदय समाज, भारतसेवक समाज, गो-सेवा संघ, ग्रामोद्योग मंडळे अशा प्रकारच्या संघटना दिसतात. अशा गटांचा सत्ताधारी पक्षावरही प्रभाव दिसतो.

### ४) प्रमाणकशुन्य गट :

आल्मंड यांनी सांगितलेले प्रमाणकहीन गटही भारतात मोठ्या प्रमाणावर दिसतात. गो-वध बंदीसाठी साधुंचे मोर्चे व सत्याग्रह, दक्षिण भारतातील 'हिंदी हटाव' ची चळवळ, हिंदी भाषिक प्रभुत्वाला शिवसेना व आलिकडील काळात मनसेने दिलेले आव्हान त्यासाठी बंद, मोर्चे हे सर्व प्रमाणकहीन दबावगटाचे कृत्य ठरते.

शेतकरी संघटना हे महाराष्ट्रातील एका प्रभावी दबाव गटाचे उत्तम उदाहरण आहे. अगदी आलीकडील काळापर्यंत पुर्णपणे असंघटीत असलेल्या शेतकरी व शेतमजुरांचे महाराष्ट्रव्यापी संघटन शरद जोशी यांच्या पुढाकाराने झाले. शेतकऱ्यांच्या हितसंबंधाना प्रभावीपणे विविध स्तरावर त्यानी प्रकट केले. ग्रामीण स्त्रियांसह सर्व शेतकऱ्यांचा त्यात सहभाग आढळतो. शेतमालाला किफायतशीर भाव मिळावा, दलाली थांबावी यासाठी प्रामुख्याने शेतकरी आंदोनले मोठ्या प्रमाणात झाली. ऊस उत्पादक, कांदा उत्पादक, कापुस उत्पादक, दुध उत्पादक, यांच्यासाठी प्रामुख्याने शेतकरी संघटना कार्यरत राहिली. अलीकडील काळात स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन करून राजू शेट्टी यांनी अशी आंदोलने अधिक धारधार बनविली शिवाय संघटनेच्या जोरावर राजकारणातही आमदारकी, खासदारकी प्राप्त केली. अशीच संघटना उत्तर प्रदेशात महेंन्द्रसिंग टिक्केत यांनीही कार्यरत केली.

- **दबाव गटांची उपयुक्तता :**

बहुतेक सर्वच राजकीय व्यवस्थात आधुनिक काळात दबाव गट हे राजकीय व्यवस्थेचे आवश्यक व अविभाज्य भाग बनल्याचे दिसतात. परंतु लोकशाहीत लोकांच्या इच्छेनुसार कारभार चालावा, एखाद्या गटाच्या इच्छेनुसार चालु नये असे मानले जात असल्याने काही विचारवंत दबाव गट व त्यांची कार्यपद्धती यावर आक्षेपही घेतात. तरीही दबाव गट किंवा हितगट कसे उपयुक्त ठरतात ते पुढील प्रमाणे विचारात घेता येते.

रून्सीमन यांनी दबाव गट हेच आधुनिक लोकशाहीत शासिताना शासकापर्यंत पोहोचण्याचे प्रभावी माध्यम मानले आहे.

मीहान व रोके यांनी म्हटल्याप्रमाणे हितसंबंधी व दबाव गटांच्या अस्तित्वामुळे एक प्रकारे पुरक असे प्रतिनिधित्व लोकांना मिळत असते.

लोकांच्या इच्छा आकांक्षांची व मागण्यांची अभिव्यक्ती दबाव गट करत असतात व अशा मागण्यांच्य आविष्कारामुळे शासनास धोरण ठरविणे सोपे जाते. समाजातील विविध हितसंबंध व त्याबद्दल लोकांना वाटणारे कमी अधिक महत्व यांची माहिती शासनास दबाव गटामुळे मिळू शकते. ही माहिती विधी मंडळ सदस्यांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना मिळाल्यामुळे अधिक वास्तव धोरण ठरविता येते.

समाजातील प्रमुख हितसंबंधाचा धोरण प्रक्रियेत त्यामुळे समावेश घडवून आणणे शक्य होते. शासकीय उपाय योजनांची अंमलबजावणीही समाधानकारक होऊ शकते.

हितसंबंधी गटामुळे राजकारण व शासकीय प्रक्रिया यात विविध हितसंबंधा विषयी चर्चा सुरू राहते व अशा व्यवस्थेत शासन हे समन्वय किंवा एकमतावर अवलंबून राहते. शासनाला एखाद्या नवीन योजनेचे होणारे संभाव्य परिणाम व प्रतिक्रीया यांची आधीच माहिती मिळते व त्यामुळे अधिक वास्तववादी निर्णय घेणे शासनास शक्य होते.

व्यक्ती व शासन यांच्यातील प्रभावी माध्यम म्हणुन दबाव गट उपयुक्त ठरतात. शासकीय धोरणांची माहिती हे गट जशी व्यक्तीस करून देतात त्याचप्रमाणे व्यक्तींच्या इच्छा ही शासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करतात.

या संदर्भात रिचर्ड रोझ यांनी दबाव गट आणि शासन दोघेही परस्परपुरक असल्याचे म्हटले आहे.

### ३.३.३ राजकीय नोकरशाही (Political Bureaucracy) :

आधुनिक काळात समाज हा अतिशय गतिमान बनत चालला आहे. अशा गतिमान समाजात सामाजिक मान्यता हीच सामाजिक गतिशिलतेचा आधार असते. गतिशिलता आणि मान्यता यांच्यामध्ये सर्वात महत्त्वाची जबाबदारी परंपरेला पार पाडावी लागते. परंतु औद्योगिक प्रगती आणि वाढत्या अपेक्षेमुळे यांत्रिकतेचा विकास होऊन शासन व्यवस्थेस खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. देशाचा कारभार पाहण्यासाठी किंवा विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध अधिकारी वर्गाची दुय्यम नोकरवर्गाची आवश्यकता आलीच म्हणून नोकरशाहीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनावर विशेष प्रभाव नोकरशाही यंत्रणा पाडत असते. सामान्यत: प्रत्येक राजकीय व्यवस्थाही कल्याणकारी राज्याच्या निर्मितीचे उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न करीत असते. देशांतर्गत विकासाच्या विविध योजना ध्येयधोरणे आखण्यासाठी आणि त्याची तळागाळापर्यंत अंमलबजावणी करण्यासाठी राजकीय नेते व विविध नोकरवर्ग त्या त्या देशात कार्यरत असतो. राज्यकर्त्यांनी आखलेली विविध ध्येयधोरणे आणि योजना याची अंमलबजावणी करण्याचे कार्य विविध नोकरशाही वर्गाकडून चाललेले असते. या विविध नोकरवर्गाचे विविध वर्ग असतात. सरकारी नोकर या शब्दामध्ये सरकारी खात्याच्या सर्वोच्च विभाग प्रमुखापासून ते तळातील चतुर्थ श्रेणी नोकरवर्गाचा समावेश होतो. नोकरीशाहीकडून राज्याची ध्येयधोरणे आणि योजना यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होऊन जनतेचे कल्याण झाले तर ती नोकरशाही, जनतेला आदर्श असते. परंतु नोकरशाही यंत्रणेत अकार्यक्षम सेवक वर्ग असेल, त्यांच्याकडून सत्तेचा, अधिकाराचा गैरवापर होत असेल, त्यांच्यावर राज्यकर्त्यांचा दबाव असेल, तर अशी नोकरशाही जनतेसाठी बाधक ठरते.

नोकरशाही ही संकल्पना सर्वात पहिल्यांदा जर्मन विचारवंत मॅक्स वेबर यांनी मांडली. याच काळात पारंपारिक समाजाला संतुलित, व्यवस्थित आणि विकसित करण्यासाठी अनेक नवीन विचारसरणीचा उदय झाला. टेलरच्या वैज्ञानिक विचारसरणीपासून सुरू झालेली संघटनेसंबंधीच्या यांत्रिक विचारसणीला सुव्यवस्थित करण्याचे कार्य वेबरनी आपल्या नोकरशाही प्रारूपाच्या आधारे केले. अधुनिक युगात नोकरशाही व्यवस्था प्रशासन व्यवस्थेचे अभिन्न अंग बनले आहे. कोणत्याही देशातील नोकरवर्ग हा एकमेकांपासून अलिप्त राहून काम करत नाही. तर एकमेकांच्या मदतीने, सहकार्याने त्यांना काम करावे लागते. यंत्रणा व नियम यामुळे

नोकरवर्ग संघटित झालेलाअसतो. त्यामुळे नोकर यंत्रणेत विशिष्ठ्य प्रकारचे मानवी संबंध अस्तित्वात येतात व त्या त्या व्यवस्थेची कार्यक्षमता ठरवतात. म्हणून समाजशास्त्राच्या दृष्टीने नोकर वर्गातील या मानवी संबंधाचा अभ्यासही, महत्त्वाचा असतो. वेबरनी नोकरशाहीचे जे प्रारूप निर्माण केले ते आज राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू बनले आहे. म्हणून हर्बर्ट मॉरिसन्स यांनी नोकरशाहीला लोकशाही शासन व्यवस्थेचे मूल्य समजले आहे. तर मॅक्स वेबरनी तिला कोणत्याही प्रशासकीय संघटनेच्या अभ्यासासाठी एक प्रारूप समजले आहे. तर डॉमॉट व डीमॉक या विचारवंतांनी म्हटल्याप्रमाणे, ''नोकरवर्गामध्ये दुहेरी सामाजिक संबंध अस्तित्वात असतात. सामाजिक संदर्भात प्रशासकीय यंत्रणा काम करते व त्या संदर्भात ती नियंत्रित होते, पण प्रशासकीय नेतृत्व हे समाजास वळण देऊ शकते व समाजाच्या गरजा भागवण्यास समाजाला सहाय्यभूत ठरते. म्हणजेच कोणत्याही क्षेत्रात नोकरशाहीचा विकास आणि नोकराद्वारे त्या त्या क्षेत्रातील कार्याचे संचालन हे आधुनिक समाजातील एक अटळ सुत्र आहे. सरकारी क्षेत्रात तर प्रशासन कार्य हे नोकरांच्याच हातात असते. हे नोकर नियमाप्रमाणे कारभार करण्याचा प्रयत्न करतात आणि त्यातनूच लालफीतीची नोकरशाही अस्तित्वात येते.

थोडक्यात, आज कोणत्याही देशामध्ये नोकरशाहीला कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. नोकरशाही ही संकल्पना समाजात अतिशय पुरातन आहे. चीनमध्ये तर इ. स. पूर्व १८६ मध्ये प्रशासकीय कार्यालयाचा कारभार पाहण्यासाठी स्पर्धा परिक्षेद्वारे कर्मचाऱ्यांची भरती केली जात होती. त्यानंतर फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ विन्सेण्ट डी गार्ने यांनी सर्वप्रथम सन १७४५ मध्ये नोकरशाही शब्दाचा प्रयोग केला. गार्ने यांनी नोकरशाहीला तत्कालीन फ्रेंच अर्थव्यवस्थेच्या अपयशाचे कारण मानले होते. परंतु विशिष्ट प्रकारच्या नोकरशाही शिवाय कोणत्याही देशाचा कारभार पाहणे शक्य नसते. अशा प्रकारच्या जाणिवा झाल्याने नोकर यंत्रणेचा सामाजिक संदर्भात अभ्यास होणे आवश्यक मानले जाऊ लागले आहे.

**नोकरशाहीचा अर्थ (Meaning of Bureaurcy) :**

Bureaurcy या इंग्रजी शब्दाला मराठीमध्ये नोकरशाही म्हणतात. Bureaurcy हा इंग्रजी शब्द फ्रेंच शब्द Bureau पासून बनला आहे. ज्याचा अर्थ टेबल असा होतो. ज्याच्या भोवती बसून काम करणे किंवा लिहिणे म्हणजे ब्युरो होय. तर क्रेसी (Cracy) या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'Kratein' यापासून झाली आहे. तेव्हा क्रेसीचा अर्थ सशक्त होणे असा निघतो. म्हणून फॉयनर या विचारवंताने ब्युरोक्रेसीला (Desk Government) असे म्हटले आहे. ब्युरोचा दुसरा अर्थ पद असा होतो. तेव्हा ब्युरोक्रे सीचा अर्थ अधिकारी वर्गाचे शासन असा ही घेता येतो. मराठीमध्ये ब्युरो क्रेसीला अनेक पर्यायी शब्द वापरता येतात. उदा. नोकरशाही अधिकारी वर्ग, सेवक वर्ग इत्यादी. तेव्हा या सर्व शब्दांचा अर्थ अधिकारी वर्गाकडून प्रशासन करणे असा निघतो. आधुनिक युगामध्ये लोकसंख्येचा विस्फोट झाल्यामुळे कोणत्याही देशाचा राज्यकारभार पाहण्यासाठी प्रत्यक्ष शासनप्रणाली शक्य नाही. म्हणून आजच्या युगामध्ये प्रत्येक देशाचा राज्यकारभार पाहण्यासाठी नोकरशाही शासनप्रणाली महत्त्वाची ठरली आहे.

**व्याख्या (Definitions) :**

शासनापुरताच मर्यादित नसलेला पण आधुनिक समाजातील वैशिष्ट्यपूर्ण व सर्वव्यापी प्रशासनाचा नमुना म्हणजेच नोकरशाही होय.

**१) मॅक्स वेबर :** ''नोकरशाही ही मानवतारहीत अशी प्रशासकीय व्यवस्था असून, निपुणता व

नि:पक्षपातीपणा ही तिची वैशिष्ट्ये आहेत.''

**२) जॉन ए विग :** ''नोकरशाही अशा व्यक्तिंच्या सामुहिक पदाच्या स्वरूपात दिसून येते की, जे सरकारी सेवेत असतात.''

**३) पीटर एम. ब्लाऊ :** ''कोणतीही अशी संघटना की, जेथे प्रशासकीय कार्य क्रमबद्ध स्वरूपात संचलित करण्यासाठी अनेक व्यक्तींच्या कार्याद्वारे समन्वयीत होते, त्यास नोकरशाही असे म्हणता येते.''

**४) पॉल एव. ॲपलबी :** ''नोकरशाही तांत्रिकदृष्ट्या कुशल कर्मचाऱ्यांचा एक व्यवसायिक वर्ग आहे. ज्याची संघटना पदसोपानानुसार असते आणि नि:पक्षपणे राज्याची कार्ये करते.''

**५) मार्शल ई. डिमॉक :** ''नोकरशाही ही संस्थागत परिस्थितीच्या अवलोकनातूनच दिसून येते असे नाही, तर ती लोकजीवनातील रंगमंच्या समान दिसून येते.''

**६) पिफनर व प्रस्थस :** ''नोकरशाही कार्य आणि व्यक्तींची क्रमबद्ध संघटना आहे. जी सामुहिक स्वरूपात काही ध्येय प्रभावीपणे प्राप्त करू शकते.''

**७) लॉस्की :** ''नोकरशाही शासनाचा प्रयोग अशा शासनासाठी केला जातो की, ज्यामध्ये अधिकाऱ्यांच्या हातामध्ये असलेल्या पूर्ण नियंत्रणामुळे किंवा सत्तेमुळे सामान्य जनतेच्या स्वातंत्र्यावर संकट निर्माण होते.'

**८) ग्लंडन :** ''नोकरशाही अशी विनियमित प्रक्रिया आहे जी अंतर्गत संबंधाच्या पदसोपानिय श्रंखलेच्या स्वरूपात संघटित होते.''

**९) मर्टन :** ''प्राथमिक संबंधाच्या आधारावर जे कार्य समाधानकारकरित्या पूर्ण होऊ शकणार नाही, ते कार्य दुय्यम संबंधाच्या आधारावर पूर्ण करणाऱ्या संरचनेच्या आकृतीबंधाला नोकरशाही असे म्हणतात.''

**१०) मिलर फॉर्म :** ''संघटनेची मनोऱ्यासारखी रचना करणे म्हणजे नोकरशाही अधिकार तंत्र होय. यातील प्रत्येक भागात अधिकार व कार्य यांच्या विभाजनावर आधारित अशी सुव्यवस्थित योजना असते. याचा अर्थ असा की, असमान लोकांची संघटना म्हणजे नोकरशाही होय.''

**११) एनसायक्लोपिडीया ब्रिटानिका :** ब्युरो किंवा विभागामध्ये प्रशासकीय शक्ती केंद्रीत होणे तसेच राज्याच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर सुद्धा अधिकाऱ्यांचा होणारा अयोग्य हस्तक्षेप म्हणजे नोकरशाही होय.

थोडक्यात, अधिकाऱ्यांच्या हातात असलेल्या सर्व नियंत्रण शक्तीच्या आधारावर सर्वसामान्य लोकांचे स्वातंत्र्य नष्ट करणारी व्यवस्था म्हणजे नोकरशाही होय. समाजातील कोणत्याही प्रकारच्या क्षेत्रासाठी प्रशासनाची आवश्यकता असल्याने जाणीवपूर्वक निर्माण केलेले औपचारिक संघटन म्हणजे नोकरशाही किंवा अधिकार तंत्र हे प्रत्येक वैशिष्ट्यपूर्ण संघटनेच्या कार्यक्षम कार्यात कार्यभूत होत असतो. शिवाय प्रत्येक वैशिष्ट्ये दुसऱ्या वैशिष्ट्याशी सुद्धा कार्यात्मक रीतीने संलग्न झालेले असते. पण वास्तवात आज नोकरशाहीतील दोष आणि त्यांच्या भुमिकेमुळे नोकरशाही बदनाम झाली आहे. यामुळेच एफ. एम. मार्क्सने असे मत व्यक्त केले आहे की, लाखो, करोडे लोकांनी नोकरशाही शब्द ऐकला नाही आणि ज्यांनी नोकरशाही हा शब्द ऐकला आहे, त्यांच्या मनामध्ये निश्चितच शंका निर्माण होते की, नोकरशाही शब्द कोणत्या ना कोणत्या वाईट शब्दाशी संबंधीत आहे. सारांश रूपाने असे म्हणता येईल की, नोकरशाहीमध्ये अनेक वाईट प्रवृत्ती असल्या तरीही काही चांगल्या प्रवृत्ती सुद्धा आहेत. ज्या धोरण निर्मिती आणि विकास भुमिकेच्या स्वरूपात दिसून येतात. त्यामुळे

वाढत्या लोकसंख्येला अनुसरून नोकरशाही संपूर्ण जगाने आज स्वीकारली आहे.

**नोकरशाहीची वैशिष्ट्ये (Characteristics of Bureaucracy) :**

१९ व्या शतकाच्या शेवटी मॅक्स वेबर या जर्मन समाजशास्त्रज्ञाने नोकरशाही तिची रचना व कार्य सांगितले. वेबरची नोकरशाहीची विचारसरणी आदर्शवादापेक्षा वैधानिक आणि तार्किकतेवर आधारलेली आहे. वेबर हे एक मात्र असे विचारवंत आहेत की, ज्यांनी नोकरशाहीची सकारात्मक प्रतिमा जगासमोर उभी केली. साधारणत: कोणत्याही समाजाचा जसजसा विकास होऊ लागतो, तसतसे राज्यांची प्रशासकीय यंत्रणा निर्माण करून सनदी सेवकांची नियुक्ती केलेली आढळते. योग्य पात्रतेचा कुशल, कार्यक्षम असा सनदी नोकरवर्ग प्रशासकीय कार्ये पार पाडीत असतो. सनदी नोकरवर्गात विविध श्रेणी व वर्ग पाडून त्यांच्याकडे विविध कार्याची जबाबदारी सोपविली जाते. नोकरशाहीत प्रत्येक पदाचे अधिकार आणि कार्ये या आधारावर पदाची कर्मवारी लावली जाते. कारण त्या त्या देशाचे हेतू व उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सर्व नोकरवर्गाच्या प्रयत्नात समन्वय साधणे आवश्यक आहे. तेंव्हा नोकरशाहीची मॅक्स वेबरनी एकूण सहा वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ते म्हणजे विशेषीकरण, सत्ता विभाजन, नियम व कायद्याला महत्त्व देणारी, पदसोपानाच्या सिद्धांतावर आधारित, कार्य आणि नियमित पालन करणारी आणि भरती आणि प्रशिक्षणासाठी विशेष व्यवस्था असणारी इत्यादी तर समाजशास्त्रीय विचारवंत फ्रेडरिक यांच्या मतानुसार कार्य-विभाजन पदासाठी निश्चित योग्यता, पदसोपानावर आधारित संघटनेत शिस्त, नि:पक्ष कार्यप्रणाली, नियमांचे विधीवत पालन आणि स्वविवेकी सत्तेचा प्रयोग इत्यादी नोकरशाहीची विशेषता आहे. तर एल्ब्रोने सांगितलेल्या स्वरूपातून नोकरशाहीबाबत नवीन गोष्ट समजते ती म्हणजे नोकरशाही ही शासकाच्या स्वरूपात आहे आणि प्रशासकाच्या स्वरूपातही आहे. तसेच आधुनिक समाजाचे यथार्थ दर्पणसुद्धा नोकरशाहीच आहे. वेबरने नोकरशाहीलज्ञा आदर्श प्रारूपाच्या आधारे कार्यकुशलता प्राप्तीचे वर्णन केले होते. तर एल्बोनी नोकरशाहीला अकार्यकुशल संघटनेच्या स्वरूपात पाहिले आहे. तेव्हा वरील विविध विचारवंतांच्या मतावरून नोकरशाहीची काही प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. श्रेणी रचना :** नोकरशाहीत कर्मचाऱ्यांची त्यांचे अधिकार व कार्य या आधारावर उतरत्या किंवा चढत्या क्रमाने केलेली रचना म्हणजे श्रेणी रचना होय. नोकरशाहीतील सर्व कर्मचाऱ्यांची विभागणी अधिकार व कार्य या आधारावर केलेली असते. त्यामुळे अधिकार तंत्राची रचना एखाद्या मनोऱ्यासारखी असते. या मनोऱ्याच्या शिरोभागी सत्ता व अधिकार असलेला नोकरवर्ग कार्यरत असतो व मनोऱ्याच्या तळभागात सत्ता व अधिकार नसलेला सामान्य चतुर्थ श्रेणीतील नोकरवर्गाचे स्थान असते.

प्रत्येक संघटनेत कनिष्ठ सेवक वरिष्ठ सेवकास जबाबदार राहून कार्य करीत असतो. पदाच्या श्रेणी रचनेमुळे पदाधिकाऱ्याला आपल्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या व्यक्तींना उपदेश देणे मार्गदर्शन करणे शक्य होते. ही सर्व पदे एकमेकांशी संलग्नित असल्यामुळे परस्परांवर अवलंबून असतात. त्यामुळे नोकरशाहीत कोणकुणाचा अधिकारी आहे, हे लवकरच समजते. सहाजिकच संघटनेचे हेतू व उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नात समन्वय साधणे, शिस्त व सुसुत्रता प्रस्थापित करणे सहज शक्य होते.

**२) श्रम किंवा कार्य विभाजन :** नोकरशाहीत कार्याचे विभाजन महत्त्वाचे मानले जाते. नोकरशाहीत कार्याचे विभाजन केले नाही तर कर्मचाऱ्यांच्या कार्यात निव्वळ गोंधळ निर्माण होईल. जबाबदारी कशी टाळता येईल हे प्रत्येकजण विचार करेल. हे टाळण्यासाठी प्रत्येक कर्मचारी वर्गाला ठरवून कार्ये दिलेली असतात. त्याचे

पद, अधिकार आणि कार्य यांची निश्चित सांगड घातलेली असते. कोणत्याही प्रशासनात कर्मचाऱ्यांच्या भूमिका निश्चित केलेल्या असतात. म्हणून मॅक्स वेबर म्हणतो, ''संलग्न कार्याचे स्पष्ट विभाजन म्हणजे नोकरशाही. तंत्रातील प्रत्येक पदाची अंगभूत कर्तव्य मानलेली असतात. विधिनियमाच नियंत्रण व अधिकार यांची वेगवेगळी पद्धती नमूद केलेली असते. तांत्रिक पात्रतेप्रमाणे भूमिका नेमून दिलेल्या असतात व व्यक्तिनिरपेक्ष औपचारिक पद्धतीने त्या निश्चित केल्या जातात.

**३) व्यावसायिकता :** व्यावसायिकता नोकरशाहीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते. आधुनिक काळात प्रशासनाचे स्वरूप एवढे व्यापक झालेले आहे की, राज्याला सनदी विविध स्वरूपाची कार्ये पार पाडावी लागतात. त्यामुळे नोकरशाहीत विविध श्रेण्या पाडलेल्या असतात. जे. ए. कोरी म्हणतात, नागरी सेवेत विविध स्वरूपाचे वर्ग आणि श्रेणी पाडून राज्याचे प्रशासन कार्य चालविले जाते. म्हणून लोक प्रशासनातील कार्ये पार पाडण्यासाठी विविध स्वरूपाचे व्यावसायिक वर्ग आवश्यक असतात.

**४) तज्ज्ञांची नियुक्ती :** नोकरशाही पद्धतीत किंवा कार्य विभाजनामुळे अनेक प्रकारची पदे निर्माण केलेली असतात. काही विशिष्ट पदासाठी तज्ज्ञांची नियुक्ती केलेली असते. प्रशासनात उत्तम दर्जाची कार्यक्षमता निर्माण करण्यासाठी प्रत्येक पदावर विशेष तज्ज्ञांची नेमणूक करावी लागते. प्रशासन पद्धतीचे व देशाच्या विकासाचे महत्त्वपूर्ण ठिकाण नोकरशाही असल्याने तेथे योजनाबद्ध कार्य विभाजन आवश्यक असते. त्यासाठी व्यक्तीचे शिक्षण, अनुभव, कसब व पात्रता यासारख्या काही गुणांचा विचार केला जातो. आवश्यक ते गुण असणाऱ्या व्यक्तींची विशिष्ट पदावर नियुक्ती केली जाते.

**५) कायम स्वरूपाची सेवा :** नोकरशाहीत कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेची हमी दिलेली असते. कारण प्रशासनातील राजकीय प्रमुख ठराविक कालावधी नंतर बदलत असतात. त्यामुळे प्रशासनात अस्थिरता निर्माण होण्याचा धोका संभवतो. असे होवू नये म्हणून प्रशासनातील सनदी नोकरवर्ग सेवेत कायम केलेले असतात. त्यामुळे प्रशासनात स्थैर्य टिकून राहते व त्यांच्या अनुभवाचा फायदा प्रशासनाला होतो.

**६) लिखित नियमांचे महत्त्व :** नोकरशाहीत विविध पदांचे हक्क, अधिकार व कर्तव्ये लिखित असतात. त्यामुळे संघटनेचे संपूर्ण काम नियमानुसार चालत असते. व्यक्तिच्या आवडी-निवडी व्यक्तींच्या इच्छा, व्यक्तीचे पूर्वगृह यांना महत्त्व न देता, उद्योगधंद्यातील व्यक्तींचे आचरण हे नियमनाला धरून असते. नोकरशाहीत सर्व कारभार लेखी असतो. लेखी आदेश कामास लागणारा वेळ, साधनांची उपलब्धता, प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी व कर्तव्ये, निसंदिग्धता, संरक्षण इत्यादी महत्त्वाच्या बाबी लेखी आदेशाने स्पष्ट होतात. एवढेच नाहीतर कर्मचारी व अधिकारी यांच्यात तेढ निर्माण होऊन परस्परांबद्दल आकस, सुडबुद्धी निर्माण झाली तर लिखित नियमाप्रमाणे तिला पायबंद बसत असतो. नोकरशाहीत लिखित नियमामुळे एक विश्वसनीयता असते.

**७) संदेशवहन पद्धती :** नोकरशाही पद्धतीत संदेशवहनाशिवाय पर्याय नसतो. विविध प्रकारच्या विभागाशी संपर्क साधण्यासाठी संदेशवहन पद्धतीची गरज असते. संदेश वहनामुळे तात्काळ आणि सुलभ काम करणे सोपे जाते. नोकरशाहीचे यश हे संदेश वहनावरच अवलंबून असते. नोकरशाहीचे स्वरूप जितके विशाल, कार्य विभाजन जितके सूक्ष्म, तितके त्या नोकरशाहीत संपर्कासाठी संदेश वहनाची गरज असते. प्रशासनाचे यशस्वी संचालन, व्यवस्थापनातील कार्यक्षमता अधिकार व कर्मचारी यांचा सदृढ संबंध इत्यादी बाबी साध्य करण्यासाठी नोकरशाहीत सुव्यवस्थित संदेश वहन असणे आवश्यक आहे. म्हणून न्यूमन व समर म्हणतात. दोन किंवा

अधिक व्यक्ती मधील एकमेकांशी वस्तुस्थिती, कल्पना, मते किंवा भावना या बाबतीतील देवाण-घेवाण म्हणजेच संदेश वहन होय. संदेश वहनाचे अनेक प्रकार आहेत. तोंडी, लेखी, औपचारिक, अनौपचारिक इत्यादी प्रकार आढळतात.

**८) पद व पदाधिकारी यांचे संबंध :** नोकरशाहीत पद व पदाधिकारी यांचे संबंध जवळचे असले तरीसुद्धा पदाधिकाऱ्यांचे अस्तित्व पदावर अवलंबून असते. इतकेच नव्हे तर पदाधिकाऱ्याला लाभलेले हक्क, अधिकार, सवलती, मान-प्रतिष्ठा व दर्जा हा पदामुळेच त्याला लाभलेला असतो. पदाधिकाऱ्याला उपभोगावयास मिळणारे हक्क, अधिकार, मानप्रतिष्ठा हे त्याला न मिळता त्याच्या पदाला मिळत असतात. सर्व काही खुर्चीवर अवलंबून असते. उदा. एखादी व्यक्ती पंतप्रधान झाली म्हणून तिला मिळालेला मान, सन्मान, प्रतिष्ठा व इतर बाबी तिला स्वत:ला मिळत नाहीत, ते मिळते ते पंतप्रधान या खुर्चीला. त्यामुळे व्यक्ती कोणीही नसते. असलेच तर ते पद असते. हे पद म्हणजे खुर्ची असते. खुर्चीला जे नोकरशाहीत अधिकार प्राप्त झालेले असतात, ते माणसाला नसतात.

**९) बढती :** नोकरशाहीत पदांची सोपान परंपरा असते. या पदावर खालच्या पदांवरील व्यक्तींना त्याची योग्यता व सेवा पाहून बढती दिली जाते. बढतीने व्यक्तीच्या कामाला प्रेरणा मिळते. तिला आपले कौशल्य दाखविता येते. काही काळाने कामामध्ये बढती मिळणे ही नोकरशाहीतील आवश्यक बाब मानली जाते. दीर्घकाळ एकाच पदावर काम केल्याने व्यक्तीला त्या पदाचा उबग येतो. म्हणून नोकरशाहीमध्ये योग्य बढतीचे अवसर मिळणारे नियम नोकरशाहीची सफलता वाढवितात.

**१०) कायम स्वरूपीपणा :** नोकरशाहीतील कर्मचाऱ्यांना नोकरीची हमी देण्यासाठी त्यांची सेवा कायम स्वरूपी करावी लागते. नोकरशाहीतील कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी केले तरच त्यांना त्या कामाचा अनुभव येवून त्यांच्या अनुभवांचा व ज्ञानाचा फायदा प्रशासनाला होतो. लोकशाहीमध्ये लोकांनी निवडून दिलेले मंत्री ठराविक काळानंतर बदलत असतात. पण सनदी नोकरवर्ग हा कायमस्वरूपी सेवेत असल्याने प्रशासनाचा कारभार सुलभतेने चालत असतो.

**११) कार्याची गोपनियता :** नोकरशाहीत आणि प्रशासकीय सैनिकी विभागात कार्याची गुप्तता ठेवणे आवश्यक मानले जाते. एखाद्या विभाग प्रमुखाकडून गोपनियतेचा भंग झाल्यास ही अत्यंत वाईट गोष्ट मानली जाते. या भंगामुळे केव्हा केव्हा त्याची पदावनती किंवा नोकरीला मुकावे लागते.

**१२) क्षोभ वाढविणारी दिरंगाई :** नोकरशाहीमध्ये कार्यालयीन नियम आणि प्रत्यक्ष व्यवहार यात फारच अंतर पडत जातो. विशिष्ट कार्यपद्धतीमुळे निर्णयास वेळ लागतो. जसजसा वेळ वाढत जातो, तसतसा व्यक्तीचा राग वाढत जातो. उदा. एका अपंग व्यक्तीने आपल्या मुलीच्या शस्त्रक्रियेसाठी सरकारी मदतीची याचना केली होती, ही मदत मिळण्यास इतकी दिरंगाई झाली की, त्यापूर्वीच ती मुलगी हे जग सोडून निघून गेली. नोकरशाहीत होणारा हा विलंब मानवी मूल्य पायदळी तुडवीतो आणि नोकरशाही मानवता विरहित असते, असे म्हटले जाते.

**१३) तार्किक सत्ता :** नोकरशाहीतील प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या हातात तार्किक सत्ता असते. मॅक्स वेबरच्या मते, एका विशिष्ट विषययुक्त आदेशाचे व्यक्तींच्या विशिष्ट समूहाद्वारे पालन केले जाते. त्यास प्राधिकार किंवा आदेशात्मक नियंत्रण (सत्ता) असे म्हणतात. वेबरच्या दृष्टीने प्रशासन हे प्राधिकार

किंवा सत्ता आहे. त्यांनी सत्तेचे तीन प्रकार सांगितले. त्यामध्ये पारंपारिक सत्ता, दैवी सत्ता आणि कायदेशीर सत्ता या पैकी कायदेशीर सत्तेत नोकरशाही मोडते. त्यामुळे नोकरशाही ही कायद्याला अनुसरून असते.

**१४) संघटना :** कोणत्याही नोकरशाहीत प्रशासकीय कर्मचारी वर्गाचे हीतसंबंध जोपासण्यासाठी वेगवेगळ्या संघटना निर्माण झालेल्या असतात. ई. एन. ग्लेडन यांच्या मते, नोकरशाही अशी विनियमित प्रशासन व्यवस्था आहे जी अंतर्गत संबंधातून पदाच्या अखलेल्या स्वरूपात संघटीत होत असते.

तर रॉबर्ट मिशेल यांच्या मते, मोठ्या संघटनेमध्ये नोकरशाही संरचना विकसित करण्याची एक प्रवृत्ती असते. मोठ्या संघटनेत सत्तेचे विकेंद्रीकरण काही लोकांच्या हाती एकवटलेले असल्यामुळे अंतर्गत लोकशाही कोलमडते आणि संघटनेत अभिजात वर्गाचे प्रभूत्व निर्माण होते.

**१५) आदर्श प्रारूप :** मॅक्स वेबरने आदर्श प्रारूप संकल्पना मांडून नोकरशाहीला समजून घेण्यासाठी एक आदर्श प्रारूप विकसित केले पाहिजे असे सांगितले. आदर्श प्रारूपाची निर्मिती ही स्वत:ला पाहण्यासारखे असते. वेबरचा नोकरशाही दृष्टिकोण हा आदर्श प्रारूपाच्या खूपच जवळचा आहे. कारण नोकरशाहीचे वेबरियन मॉडेल अनेक वर्षापासून संघटनात्मक अभ्यासाचा आधार बनले आहे.

**सारांश :**

नोकरशाहीच्या वरील वैशिष्ट्याशिवाय नोकरशाहीचे इतरही अनेक वैशिष्ट्ये सांगता येतात. उदा. संघटनात्मक कार्यकुशलता, वाईट किंवा व्याधिच्या स्वरूपातील नोकरशाही, औपचारिक संबंधाचे प्राबल्य कायदे मंडळाला जबाबदार नसतात. निष्पक्षपातीपणा, तटस्थता, विशेषीकरण, कर्तव्य पालन व्यवस्था, सिद्धांत आणि व्यवहारात अंतर, प्रशिक्षण आणि नोकरशाही व्यक्तित्व इत्यादी.

नोकरशाही संदर्भात वेबर म्हणतात, ज्याप्रमाणे एखाद्या जुन्या यंत्राच्या ठिकाणी नविन यंत्र अधिक उत्पादन देते. अगदी त्याप्रमाणे नोकरशाही अधिक कार्यकुशल असते. त्रिटानो मोस्का यांनी आपल्या 'The Ruling Class' या पुस्तकात म्हटले आहे, मोठ्या साम्राज्यामध्ये नोकरशाही आधारभूत संरचना सिद्ध झाली आहे. आधुनिक लोकशाही आणि कल्याणकारी राज्यांमध्ये नोकरशाहीची आवश्यकता आहे. कारण या देशातील शासनाचे स्वरूप गुंतागुंतीचे आणि कार्यक्षेत्र व्यापक असते. तर लॉर्ड मोर्ले भारताच्या सचिव पदावर असताना नोकरशाहीविषयी म्हणतात, जर आपले प्रशासन काही प्रमाणात कुशल आणि काही प्रमाणात लवचिक असल्यास, निश्चितच लोकप्रिय ठरते. नोकरशाही स्वत: वाईट नाही. पण जेव्हा एक शुद्ध नोकरशाही काही प्रमाणात कार्यकुशल परिश्रमी असेल आणि काही प्रमाणात जीवनशून्य आणि सत्तेची हावी बनेल तेव्हा ती आपल्यासाठी खतरनाक बनू शकते, असे असले तरीही नोकरशाहीतील काही तत्त्वे आपल्यासाठी आवश्यक आहेत.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न –१ (Check your progress - 1) :**

**पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) नोकरशाहीची कोणतीही एक व्याख्या सांगा.

२) नोकरशाहीची वैशिष्ट्ये सांगा.

**नोकरशाहीचे प्रकार (Types of Bureaucracy) :**

स्थूल मानाने नोकरशाहीचे वैशिष्ट्ये नोकरशाहीच्या सर्व प्रकारात पाहावयास मिळातात. खऱ्या अर्थाने नोकरशाहीचे प्रकार नोकरशाहीतील पदावर आधारीत असतात. उदा. नोकरशाही मधील भरती जर योग्यता, गुणवत्ता इत्यादी कसोटीच्या आधारावर केली असेल तर अशा नोकरशाही प्रकाराला योग्यता नोकरशाही (Merit Bureaucracy) असे म्हणतात. आणि हिच भरती जर जातीच्या आधारावर केली असेल तर अशा नोकरशाहीला जातीय नोकरशाही (Caste Bureaucracy) असे म्हणतात. अशा प्रकारे नोकरशाहीचे वर्गीकरण अधिकार आचरण हा आधार घेऊन ही केले जाते. परंतु जर वरील आचरण एका पालकत्वाच्या रूपामध्ये व्यवहारिक आणि सर्वसामान्यांचे हीत लक्षात घेऊन समान न्यापूर्ण सामान्य जनतेचे हीत ध्यानात घेतले जात असेल तर अशा नोकरशाहीस अभिभावक नोकरशाही (Guardian Bureaucracy) असे म्हणतात. दुसऱ्या बाजूने अधिकारी वर्गाचे व्यवहार आश्रयदाता सारखे असतील. फक्त अशा अधिकारामध्ये संरक्षकासारखे आचरण पहावयास मिळत असेल तर अशा नोकरशाहीला संरक्षक नोकरशाही (Patronage Bureaucracy) असे म्हणतात. परंतु नोकरशाहीच्या वरील विविध प्रकारांमध्ये जातीय नोकरशाही पेक्षा योग्यता नोकरशाही आणि संरक्षक नोकरशाहीच्या तुलनेत अभिभावक नोकरशाही चांगली असलेली दिसते. नोकरशाही संघटनेचे स्वरूप, प्रक्रिया आणि दृष्टिकोनावर विविध देशातील परिस्थिती आणि काळाचा परिणाम दिसून येतो. तुलनात्मक दृष्ट्या नोकरशाही प्रक्रिया आधुनिक काळाची देणगी मानली जाते. वेगवेगळ्या देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक वातावरणाचा अभाव नोकरशाहीवर पडतो. त्यामुळे वेगवेगळ्या देशात नोकरशाहीचे वेगवेगळे स्वरूप दिसून येते. एफ. एम. मार्क्स यांनी नोकरशाहीला एक मोठे सरकार मानून तिच्या चार प्रकाराचे वर्णन केले आहे, ते पुढीलप्रमाणे -

**१) योग्यता किंवा गुणावर आधारित नोकरशाही (Merit Bureauracy) :** या नोकरशाहीमध्ये प्रशासकीय सनदी सेवकांची भरती त्यांच्या जवळ असलेल्या योग्यतेला, गुणवत्तेला अनुसरून जेव्हा केली जाते तेव्हा अशा नोकरशाहीला योग्यता किंवा गुणावर आधारित नोकरशाही असे म्हणतात.

आजवर संपूर्ण जगातील देशांमध्ये प्रशासकीय सनदी वर्गाच्या भरती प्रक्रियेमध्ये याच नोकरशाही पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. विशिष्ट पदासाठी विशिष्ट गुणवत्ता, पात्रता, कौशल्य आणि त्या त्या विषयातील विशेषीकरण आवश्यक असते. त्यामुळे प्रशासनामध्ये कार्यक्षमता आणि सुलभता निर्माण होते.

**२) जातीय नोकरशाही (Caste Bureauracy) :** प्राचीन कालखंडामध्ये अशा प्रकारची नोकरशाही सर्वात जास्त प्रमाणात कार्यरत होती. जातीय नोकरशाही म्हणजे कोणत्याही एका जातीच्या हाती सत्ता असते. त्या जातीतील पदाधिकाऱ्यांकडून प्रशासनात पदभरती करीत असताना जेंव्हा जातीचा विचार केला जातो, तेव्हा जातीय नोकरशाही अस्तित्वात येते. मार्क्सच्या मते, ''हा एक विशेष वर्ग असतो. जे लोक सत्तेवर असतात ते आपल्याच जातीतील लोकांची प्रशासनातील उच्च पदावर भरती करतात.''

अशा नोकरशाहीमध्ये उच्च पदस्थ जातीच्या लोकांना, उच्च अधिकारपदे दिली जातात. भारतामध्ये तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र असे चार वर्ग निर्माण करून ब्राह्मण आणि क्षत्रीय वर्णातील लोकांनाच उच्च अधिकारपदे दिली जात असत. अशी नोकरशाही मानवहीतासाठी हानीकारक असते.

**३) अभिभावक नोकरशाही (Guardian Bureauracy) :** अशी नोकरशाही इ. स. १६०० या

कालखंडात काही देशांमध्ये निर्माण झाली होती. या नोकरशाहीमध्ये प्रशासनातील सनदी सेवकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून सर्वसामान्य जनतेच्या हिताचे रक्षण केले जात असे. परंतु ही नोकरशाही लोकमताचा कोणत्याही प्रकारे आदर न करता किंवा लोकमताला जबाबदार न राहता, स्वत:च एक नवीन प्रशासन यंत्रणा बनली होती. तरीही अभिभावक नोकरशाही भ्रष्टाचाररहीत, परिपूर्ण, परोपकारी, कार्यक्षम आणि योग्य स्वरूपाची होती. अभिभावक नोकरशाही म्हणजे कोणताही एक असा वर्ग, जो राष्ट्राच्या सदस्यांच्या हिताचे संरक्षण करते. एफ. एम. मार्क्स यांच्या मते, ''अभिभावक नोकरशाहीमध्ये असे विद्वान अधिकारी गण असतात की, जे शास्त्रीय पद्धतीने आचरण करतात.' एकीकडे ही नोकरशाही न्यायपूर्ण सक्षम आणि परोपकारी स्वरूपाची असते, तर दुसरीकडे गैरजबाबदार आणि अधिकारयुक्त असते.

**४) संरक्षक नोकरशाही (Patronage Bureauracy) :** या नोकरशाहीला दुसऱ्या शब्दात आश्रय, लुट किंवा विश्वस्त नोकरशाही असेही म्हणतात. या नोकरशाहीत व्यक्तिगत किंवा राजकीय फायद्यासाठी प्रशासनातील अधिकारी सेवकांची पदे भरली जातात. म्हणजेच ही नोकरशाही पक्षपाती पद्धतीवर आधारित होती. भ्रष्टा प्रशासनाला उत्तेजन देऊन, बेशिस्त व तांत्रिक ज्ञानाचा अभाव, या नोकरशाहीत घुसल्यामुळे ही नोकरशाही आधुनिक काळात कुचकामी मानली गेली. एफ. एम. मार्क्स यांच्या मते, ''प्राविधीक कुशलतेचा अभाव, शिथिल अनुशासन, दोषपूर्ण कार्यपद्धती, पक्षपाती दृष्टिकोन आणि उत्साहाची कमतरता इत्यादी बाबींमुळे या संरक्षक नोकरशाहीला वेळावेळी टिकेचा सामना करावा लागतो.

**सारांश :**

सर्वसामान्य पद्धतीने एफ. एम. मार्क्स यांनी नोकरशाहीचे वरील चार मुख्य प्रकार सांगितले आहेत. शेवटी ते म्हणतात, ''नोकरशाहीला लोकशाहीच्या स्वरूपात विकसित केले पाहिजे. तसेच नोकरशाहीला प्रातिनिधिक नोकरशाही, संतुलित नोकरशाही आणि भागिदारी नोकरशाहीच्या स्वरूपात प्रस्थापित केले पाहिजे.'' आजच्या आधुनिक काळामध्ये वरील चार नोकरशाहीच्या प्रकारामध्ये योग्यता किंवा गुणावर आधारित नोकरशाही प्रकार हा सर्वोत्तम असलेला दिसतो.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २ (Check your progress - 2) :**

**पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) जातीय नोकरशाही म्हणजे काय ते सांगा.

२) योग्यता किंवा गुणावर आधारित नोकरशाही सांगा.

**नोकरशाहीचे महत्त्व (Significance of Bureaucracy) :**

सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कामकाजावरून असे दिसते की, सरकार सर्व कर्मचाऱ्यांना राजनितीपासून नेहमी दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत असते. कारण ते निष्पक्ष पद्धतीने देशाचे प्रशासन करावेत आणि सरकारी कायदे कानून जास्तीत जास्त अंमलात आणून देशाचे कल्याण करतील. वर्तमान परिस्थितीमध्ये सरकारची नवी ध्येय, धोरणे अंमलात आणण्याचे उत्तरदायित्व सर्वात जास्त नोकरशाहीवरच असते. कारण नोकरशाहीतील लोकांना देशातील समस्यांचे लोकांच्या प्रवृत्तीचे आणि वर्तमान जीवनाची कल्पना असते.

नोकरशाहीही नेते मंडळी आणि जनतेमधील मध्यस्त असते. नोकरशाही संदर्भात सरकारमार्फत नेहमी असे आदेश काढले जातात की, नोकरशाहीचे सदस्य जास्तीत जास्त जनतेच्या संपर्कात रहावेत, हा संपर्क जनतेपर्यंत

पोहोचविण्यासाठी आणि जनतेची मदत सरकारी कामकाजात घेण्यासाठी खूपच महत्त्वाची असते. दुसरीकडे नोकरशाहीतील सदस्यांना राजकीय नेत्यांच्या संपर्कात पण तेवढ्याच प्रमाणात रहावे लागते. कारण जनतेचे प्रश्न, समस्या नेहमी राजकीय नेत्यांपर्यंत नेवून मांडाव्या लागतात. प्रसंगी नेत्याला सल्ले देणे आणि त्यांचा निर्णय जनतेपर्यंत नेवून पोहोचविणे हे नोकरशाहीचेच काम असते. अशा प्रकारे एकीकडे राजकीय नेते आणि दुसरीकडे सर्वसामान्य जनता यांच्यातील प्रभावशाली आणि मजबूत कडी म्हणजे नोकरशाही होय आणि हीच नोकरशाही जनतेला पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वात महत्त्वाची असते.

लोकशाही प्रशासनामध्ये आज नोकरशाही एक आवश्यक संरचना आहे. राज्याचे संरक्षण, लोककल्याण आणि राष्ट्रीय विकासाचे संपूर्ण उत्तरदायित्व कुशल नोकरशाही व्यवस्थेवरच टिकून आहे. याच कारणामुळे नोकरशाहीत अनेक त्रुटी आणि दोष असले तरीही ती सर्व देशात विद्यमान आहे. तेव्हा नोकरशाहीचे महत्त्व खालील मुद्याआधारे स्पष्ट करता येते.

**१) व्यवस्थित प्रशासन :** नोकरशाहीच्या विविध व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, केवळ नोकरशाहीमुळे शासन व्यवस्थित रूपामध्ये कार्य करीत असते आणि नोकरशाहीत दफ्तर पद्धती असल्यामुळे संपूर्ण दस्तऐवज लिखित स्वरूपात प्राप्त होत असते.

**२) मोठ्या प्रमाणात उद्योगांची संभावना :** नोकरशाहीचे सर्वात जास्त महत्त्व उद्योगांसंदर्भात असलेले दिसते. नोकरशाही माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्याधुनिक मोठमोठे उद्योग चालविले जातात. नोकरशाहीमध्ये कितीही दोष असले तरी नोकरशाहीच्या गुणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. जर नोकरशाही अस्तित्वात आली नसती तर आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठमोठे उद्योग चालविणे शक्य झाले नसते. थोडक्यात, आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्यांमध्ये नोकरशाही अनिवार्य बनली आहे.

**३) प्रभावीशाली नियंत्रण :** नोकरशाही व्यवस्थेत नियमांना खूप महत्त्व दिले जाते आणि त्यामुळेच नोकरशाहीमध्ये व्यक्तिगत भाव-भावना, इच्छा-आकांक्षा, मत-प्रवत्ती इत्यादी गोष्टींना अजिबात थारा नसतो. सामाजिक दृष्टिकोणातून विचारकेला तर नोकरशाही व्यवस्थाही नियमांचे जाळे असल्यामुळे ती अमानवीय वाटेल. पण उद्योगधंद्याच्या कार्यावर जर प्रभावी नियंत्र ठेवावयाचे असेल, स्वच्छ प्रशासन चालवायचे असेल तर नोकरशाही व्यवस्थापन खूप महत्त्वाचे असते.

**४) योग्य व्यक्तिकडून प्रशासन :** नोकरशाहीमध्ये विविध विभाग, उप विभागांची निर्मिती करून प्रशासन कार्ये वाटून दिली जातात. प्रत्येक विभागामध्ये विशिष्ट कार्ये पार पाडण्यासाठी योग्य व्यक्तीची निवड केली जाते. आणि त्या पदावरील योग्य व्यक्तीकडून प्रशासनव्यवस्था चालविली जाते.

**५) अवैयक्तिक नियमांचे महत्त्व :** नोकरशाहीमधील सर्वच कामे नियमाला अनुसरूनच होत असतात. हे नियम अवैयक्तिक आणि पक्षपातरहित असतात. अशा प्रकारच्या प्रशासनात कायम स्वरूपीपणा आणि निरंतरता असते. नोकरशाहीमध्ये व्यक्तीविशेषतेला अजिबात महत्त्व नसते. सर्व व्यक्तींना निर्माण केलेल्या नियमानांचे समान स्वरूपात पालन करावे लागते. नोकरशाहीचे नियम तार्किक असतात. ते कोणत्याही पारंपारिकतेवर आधारित नसतात.

**६) स्पष्ट व निश्चित कार्यक्षेत्र :** नोकरशाहीमध्ये कितीही मोठ्या उच्च पदावरील अधिकारी असेल आणि शेवटच्या पदावरील कर्मचारी असेल तरीही प्रत्येक सदस्यांचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले असते. म्हणजेच

नोकरशाहीमध्ये श्रम विभाजन व्यवस्था स्पष्ट आणि निश्चित असते. थोडक्यात श्रम विभाजनाचा आधार कुशलता हेच असते.

**७) पदाचे संस्तरण :** नोकरशाही अंतर्गत उच्च आणि निम्नपद असते. तरीही ते एकमेकांवर अवलंबून असतात. म्हणून नोकरशाही व्यवस्थेत पदाचे संस्तरण असते.

**८) नोकरशाहीमध्ये नियंत्रणकारी नियम असतात :** नोकरशाहीतील पदाधिकारी वर्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही नियम असतात. हे नियम कायद्यावर आधारित असतात. उच्च पदाधिकारी वर्ग, निम्न अधिकारी वर्गावर नियंत्रण ठेवीत असतात. परंतु हे नियंत्रण व्यक्तिगत स्वरूपाचे नसते, तर नियमनावर आधारित असते. कायदेशीर ज्ञान, योग्यता किंवा प्रशिक्षण इत्यादी आधारावर व्यक्तिला सत्ता प्राप्त होत असते आणि सत्तेच्या आधारावरच नियंत्रण प्रस्थापित केली जाते.

**९) धोरणांची अंमलबजावणी आणि धोरण निश्चितीच्या कार्यात मंत्रीमंडळास मदत होते :** धोरण निश्चित करणे हे विधि मंडळाचे कार्य आहे. परंतु निर्धारित केलेल्या धोरणांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे हे प्रशासकीय नोकरवर्गाचेच काम आहे. मंत्रीमंडळ, विधिमंडळ आणि न्यायमंडळ ह्यांनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी नोकरवर्गास करावी लागते.

धोरण निश्चितीत राजकीय नेत्यांना निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविणे, धोरणविषयक विविध पर्याय सुचविणे, धोरण विषयक क्रिया आणि प्रतिक्रिया जाणून घेणे, त्यांची माहिती मंत्रीमंडळास देणे, कायद्याच्या अंमलबजावणीतील अडचणी मंत्र्यांना सांगणे आणि प्रतिक्रिया जाणून घेणे आणि कायदे करावयास लावणे इत्यादी महत्त्वाची कार्ये प्रशासकीय नोकरवर्गच करतो. कारण ते विशिष्ट विषयातील तज्ज्ञ अनुभवी आणि दीर्घकाळ सेवा केलेले पक्षनिरपेक्ष नोकर असतात.

**१०) हितसंबंधाचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण होते :** हितसंबंधाचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करणे हे नोकरशाहीचे महत्त्वाचे काम आहे. नोकरशाहीला घटनेने घालून दिलेल्या मर्यादांची कल्पना असते. तरीही तिचा समाजातील हितसंबंधातील गटांशी नित्य संपर्क येतोच. कोणत्या गटाच्या कोणत्या मागण्या आहेत. त्यांच्या एखाद्या धोरणासंबंधी कोणत्या प्रतिक्रिया उमटतील ह्याचा त्यांना अनुभव असतो. त्यामुळे त्यांच्या माहितीचा राजकीय नेतृत्वाला फार लाभ प्राप्त होतो.

**सारांश :**

नोकरशाहीच्या वरील महत्त्वाशिवाय तिचे अनेक बाबतीत ही महत्त्व सांगता येते. जसे की, सुचनांचे कार्य करणे, प्रशासकीय बाबतीत विधी स्वरूपाचे नियम तयार करणे, स्थैर्य प्रदान करणे, वाटाघाटीचे कार्य करणे, कामावरील लाकांचे संरक्षण करणे, कामावर असताना सुरक्षा देणे, अधिकार श्रेणी बघणे, कार्य पद्धती व्यवस्थित चालते की नाही हे पाहणे, गुणवत्तेवर आधारित नोकऱ्या देणे इत्यादी रीतींनी नोकरशाहीची स्थापना श्रमविभाजनाच्या सिद्धांतानुसार होत असते. त्यामुळे तिची कार्यक्षमता वाढते. आधुनिक नोकरशाही योग्यता आणि विशेषीकरणावर आधारलेली आहे. जी स्वत:च संघटनेची कार्यकुशलता तसेच संचलन प्रक्रियेत सुधारणा करण्यास सहाय्यक ठरते आहे. नोकरशाहीतील सदस्यांची भरती ही स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून होत असल्यामुळे नोकरशाहीत वरीष्ठ, कनिष्ठ संबंध आढळून येतात. नोकरशाहीमध्ये पद आणि पदाधिकारी वेगवेगळे असतात. लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या देशामध्ये नोकरशाहीवर राजकीय पदाधिकाऱ्यांचे नियंत्रण

असते. नोकरशाहीतील नियम, उपनियम, कायदा आणि आदेशानुसार कार्य करते. नोकरशाही आपल्या कार्यासंबंधी सर्व माहिती जमा करत असते आणि आपल्या विशेष ज्ञानाच्या आधारे आपली भूमिका पार पाडत असते. इत्यादी व्यवस्थांतर्गत नोकरशाहीचे महत्त्व असलेले दिसते. थोडक्यात, असे म्हणता येईल की, राजकीय व्यवस्थेतील सर्वच संरचना या नोकरशाहीवर थोड्या अधिक प्रमाणात अवलंबून असतात. नियम अंमलबजावणी संदर्भात नोकरशाहीचे खूप महत्त्व असते.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३ (Check your progress - 3) :**

**पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) नोकरशाहीचे कोणतेही दोन महत्त्व सांगा.

२) नोकरशाहीचे महत्त्व स्पष्ट करा.

### ३.३.४ राजकीय समावेशन आणि राजकीय संस्कृती

(Political Recruitment and Political Culture

**राजकीय समावेशन**

**प्रस्तावना :**

रॉबर्ट ढाल यांनी राजकीय व्यवस्थेत सामान्यपणे चार वेगवेगळे गट असतात असे सांगितले आहे. हे गट म्हणजे –

१) राजकारणात स्वारस्य असलेले. (Powerful)

२) राजकारणात स्वारस्य नसलेले. (A-Political)

३) सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्न करणारे. (Power Seekers)

४) सत्ताधारण करणारे. (Political)

यापैकी सत्ताधारी किंवा सत्ता धारण करणारे राजकीय क्षेत्रात उच्च पातळीवर असतात आणि राजकीय धोरण ठरविण्यात त्यांचा महत्वाचा सहभाग असतो. अर्थात कोणत्याही व्यवस्थेत फक्त एकच व्यक्ती सर्व कारभार करू शकत नाही. सत्तेच्या व्यवस्थित कार्यवाहीसाठी आधुनिक काळात शासनाच्या कार्याचे विकेंद्रीकरण करण्यात येते व त्यासाठी स्वतंत्र रचनाही निर्माण करण्यात येते. वैधानिक, प्रशासकीय व न्यायिक अशा तीन संरचना महत्वाच्या असतात व त्या संरचनातील विविध भुमिकांसाठी अनेक लोकांची निवड किंवा नेमणुक करावी लागते. म्हणजेच इतर तीन गटात मोडणाऱ्यांच्या बाबतीत भरती किंवा समावेशनाचा प्रश्न निर्माण होतो. प्रत्येक व्यवस्थेला अनुरूप अशी भरती होणे आवश्यक असते. एकदा भरती झाल्यावर चारही गटामध्ये स्थानांतर सुरू होते. खालच्या पातळीवरील व्यक्ती वरच्या पातळीवर तर कधी वरच्या पातळीवरील व्यक्ती खालच्या पातळीवर अशी प्रक्रिया सुरू होते या राजकीय प्रक्रियेत सतत वरच्या पातळीवर असणाऱ्या मंडळींचा राजकीय श्रेष्ठीजनात (Political elite) समावेश होतो.

**राजकीय समावेशन म्हणजे काय?**

कोणत्याही राजकीय व्यवस्थेतील सर्व प्रकारची व विविध पातळीवरील सत्तास्थाने ही महत्वाची

असतात. ती प्राप्त करण्यासाठी व्यक्ती अथवा गट प्रयत्नशील असतात. तसेच या पदांना राजकीय व्यवस्थेत महत्वाची भुमिका पार पाडावयाची असल्याने कोणत्या पद्धतीने या पदावर व्यक्तीची निवड व्हावी, कोणत्या दर्जाच्या, गुणवत्तेच्या व्यक्ती या पदावर याव्यात, किती काळ त्या पदावर रहाव्यात, त्यांच्यावर कोणती नियंत्रणे असावीत इ. विषयी काही तत्वे प्रत्येक राजकीय व्यवस्थेत असतात. यादृष्टीने, ''राजकीय व्यवस्थेतील विविध स्थानांवर/पदावर समाजातील एका किंवा विविध स्तरांतून व्यक्तींची निवड करणे व त्यांचा राजकीय व्यवस्थेत प्रत्यक्ष समावेश करून घेणे म्हणजे राजकीय समावेशन होय.'' म्हणजेच राजकीय व्यवस्थेच्या औपचारिक भागाशी राजकीय समावेशनाची प्रक्रिया संबंधीत असते. राजकीय समावेशनाकडे राजकीय व्यवस्थेतील 'पदस्थानांची भरती' या अर्थाने पाहिजे जाते. त्यानुसार तीन क्षेत्रातील पदस्थाने विचारात घ्यावी लागतात. १) राजकीय स्वरूपाचे क्षेत्र, २) प्रशासकीय क्षेत्र, ३) न्यायालयीन क्षेत्र.

राजकीय व्यवस्थेतील या विविध पदस्थानावर लोकसंख्येच्या मानाने फारच कमी लोक असतात. अर्थात व्यवस्थेनुसार हे प्रमाण कमी अधिक असते. लोकशाही व्यवस्थेत हे प्रमाण अधिक असण्याची शक्यता असते. कारण तिथे विकेंद्रीकरण व सत्तावाटप मोठ्या प्रमाणावर झालेले असते. त्यामुळेच भारत आणि अमेरिका या संघराज्यात घटकराज्यांच्या संख्येतील वाढीबरोबर राजकीय समावेशनाची व्याप्ती वाढत जाते. अमेरिकेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वामुळे व भारतात पंचायती राज्य संस्थांच्या अस्तित्वामुळे राजकीय समावेशनाची व्याप्ती वाढली आहे.

ज्या पदावर व्यक्ती निवडुन येतात त्यांची राजकीय व्यवस्थेत महत्वाची भुमिका असते आणि ती भुमिका पार पाडण्याच्या दृष्टिने योग्य व्यक्तींची भरती होणे आवश्यक असते. म्हणुन पात्रता आणि गुणवत्ता हा विचारही महत्वाचा ठरतो. त्यावर व्यवस्थेचे स्थैर्य अवलंबुन असते. यासंदर्भात ॲरिस्टॉटलने असे म्हटले आहे की, ''व्यक्तींच्या हाती आलेली सत्ता आणि व्यक्तीमध्ये असलेली सत्ता उपभोगण्याची पात्रता यात जितकेअंतर अधिक तितकी क्रांतीची शक्यता अधिक असते. त्यामुळेच पात्रताधारक व्यक्तींची भरती आवश्यक ठरते.

हे समावेशन राष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत होत असते. त्यामध्ये पुढील स्तरांचा आपल्याला विचार करता येतो. राष्ट्रीय किंवा संघराज्यात्मक स्तर, घटकराज्य किंवा विभागीयस्तर, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद ते ग्रामपंचायत असे श्रेष्ठ आणि कनिष्ठ स्तरापर्यंत हे समावेशन होत असते.

स्थुलमानाने समावेशनाचा विचार राजकीय व्यवस्थेतील दोन प्रकारच्या पदाबाबत केला जातो. १) राजकीय पदाधिकारी – राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री इत्यादी, यालाच खास राजकीय समावेशन म्हणतात. २) स्थायी पदाधिकारी – शासनाच्या सेवेतील उच्च पदाधिकारी, न्यायाधीश, जिल्हाधिकारी, आयुक्त, सेनाप्रमुख इत्यादी.

राजकीय सत्तापदावरील समावेशन हे निवडणुक प्रक्रियेतुन होत असते. त्यामुळे राजकीय पक्ष व विशेषतः बहुमताने निवडुन आलेला राजकीय पक्ष आणि त्या पक्षातील समावेशन हे महत्वाचे ठरते. राजकारणाविषयी आवड, गुणवत्ता, चारित्र्य या अनुषंगाने हे समावेशन होत असते. तसेच मतदारांचा

विश्वासही महत्वाचा ठरतो. राजकीय पक्षाच्या ध्येयधोरणांचा पाठपुरावा करण्याची क्षमता यावरही हे राजकीय समावेशन अवलंबुन असते.

नागरी अथवा स्थायी शासकीय पदावरील भरतीसाठी लोकसेवा आयोगासारख्या बिगर राजकीय स्वायत्त मंडळांची स्थापना झालेली असते. स्पर्धापरीक्षेच्या माध्यमातुन या नेमणुका होतात. त्यासाठी गुणवत्ता, पात्रता, अनुभव हे निकष असतात. अर्थात सर्वच नेमणुका गुणवत्तेच्या आधारे होतात असे नाही. त्यात कमी अधिक प्रमाणात राजकीय हस्तक्षेप हा होतच असतो.

प्रख्यात समाजशास्त्रज्ञ जी.एस.घुर्ये यांनी सत्तासंपादनाच्या बाबतीत महाराष्ट्रात पंचायत राज्यद्धती, सहकारी संस्था आणि शिक्षण संस्था हे तीन घटक महत्वाची भुमिका बजावतात असे म्हटले आहे. यातील सहकारी संस्था आणि शिक्षण संस्था जरी अराजकीय असल्या तरी त्यातील प्राप्त संपत्तीच्या आधारे राजकारणातील आपले स्थान अनेकांनी भक्कम केले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखानदारी हा राजकीय समावेशाचा महत्वाचा आधार मानला जातो.

निवडणुका हे राजकीय समावेशनाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. केवळ प्रौढ मताधिकाराच्या आधारे वयाची अठरा वर्षे पुर्ण केलेल्या कोणत्याही व्यक्तीस सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता येतो व आपला प्रतिनिधी निवडुन देता येतो. सर्वात व्यापक व वस्तुनिष्ठ अशी ही निवडणुक पद्धती असल्याने केवळ मतदारांच्या सद्सद्विवेक बुद्धीला अनुसरून हे राजकीय समावेशन होत असते. जागरूक मतदार हाच त्यातील खरा आधार असतो.

**● खास राजकीय समावेशनावर प्रभाव टाकणारे घटक :**

राजकीय प्रक्रियेतील किंवा व्यवस्थेतील कार्यकारी मंडळा पैकी राजकीय प्रमुख (राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री इ.) व विधि मंडळाचे सदस्य (खासदार – आमदार) यांचे समावेशन हे खास राजकीय समावेशन म्हणता येईल. या क्षेत्रातील पदस्थाने प्रशासकीय किंवा न्यायालयीन क्षेत्रातील पदस्थानाहुन अधिक महत्वाची असतात. कारण त्यांचे प्रशासकीय व न्यायालयीन पदस्थानावर नियंत्रण असते. एकुण राजकीय प्रक्रियेवर, धोरण निर्मितीवर त्यांचा अधिक प्रभाव असतो. खास राजकीय समावेशनावर प्रभाव टाकणाऱ्या घटकामध्ये संविधानात्मक यंत्रणा, राजकीय पक्ष पद्धती, राजकीय सहभाग, निवडणुक पद्धती, मतदान पद्धती, औपचारिक व अनौपचारिक माध्यमे यांचा प्रभाव पडत असतो. यालाच राजकीय समावेशनावर प्रभाव पाडणारे घटक म्हटले जाते. संक्षेपाने या घटकांची माहिती पुढीलप्रमाणे घेता येतो.

**१) संविधानात्मक यंत्रणा :**

ही यंत्रणा अध्यक्षीय लोकशाही स्वरूपाची (अमेरिकेप्रमाणे) किंवा संसदीय स्वरूपाची (ब्रिटन व भारताप्रमाणे) असू शकते. संघराज्यात्मक पद्धतीमुळे घटकराज्यातील विधिमंडळे व कार्यकारी मंडळे (विधान सभा व विधान परिषद) व केंद्रीय पातळीवर लोकसभा व राज्यसभा अशा दोन्ही पातळीवर समावेशनाची संधी उपलब्ध असते. भारतात पंचायत राज्य पद्धतीमुळे जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत पातळीवर अशी समावेशनाची संधी उपलब्ध होते. साहजीकच हे समावेशन अधिक व्यापक होते.

**२) राजकीय पक्ष पद्धती :**

आधुनिक काळात विधिमंडळात निवडुन येण्यासाठी राजकीय पक्षाचा पाठिंबा असणे, राजकीय पक्षाचे तिकिट मिळणे आवश्यक असते. अपक्ष उमेदवारांना निवडुन येण्यासाठी मात्र खुप धडपड करावी लागते. प्रबळ राजकीय पक्षाच्या पाठिंब्याशिवाय हे समावेशन कठीण असते. पक्ष जितके कमी तितके समावेशन सुलभ पण भारतासारख्या देशात बहुपक्षीय पद्धतीमुळे राजकीय समावेशनात अनिश्चितता निर्माण होते. संमिश्र मंत्रिमंडळे अस्तित्वात येत असतात. द्विपक्षीय पद्धती असेल तर सत्ता टिकवुन ठेवण्याचे सतत आव्हान असते. केंव्हाही सत्तांतर होण्याचा धोका असल्याने सतत सतर्क राहावे लागते. यामुळेच ब्रिटनमध्ये विरोधी पक्षाचे 'छाया मंत्रिमडंळ' (Shadow Cabinet) महत्वाचे ठरते.

**३) राजकीय सहभाग :**

लोकांचा राजकारणातील सहभाग आणि त्यांना मिळलेले राजकीय हक्क यांचाही राजकीय समावेशनावर प्रभाव असतो. अठरा वर्षावरील कोणतीही व्यक्ती भारतात राजकीय प्रक्रियेत सहभागी होऊ शकते. तसेच स्त्रियांसाठी –असणारे राजकीय आरक्षण त्यांचा राजकारणातील सहभाग वाढविण्यास उपयुक्त ठरले आहे. स्त्रिया अगदी राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचू शकल्या. तेंव्हा राजकीय सहभागातुन राजकीय समावेशनाला गती मिळते.

**४) निवडणुक पद्धती :**

प्रत्येक व्यवस्थेत असलेल्या निवडणुक पद्धतीचाही राजकीय समावेशनावर परिणाम होत असतो. बहुमताच्या जोरावर आणि अनेक उमेदवार रिंगणात असल्याने अल्पमतातील व्यक्तीही निवडुन येऊ शकते. विशिष्ट पक्षाचे उमेदवार निवडुन येणे, विधीमंडळात सर्वाधिक जागा मिळणे, सत्ता मिळणे यातुन हे समावेशन होत राहते. पक्षाला मिळालेल्या मतांची टक्केवारी जरी कमी असली तरी अधिक जागा मिळाल्याने एखादा पक्ष सत्तेवर येतो. उदा. काँग्रेस पक्ष. अर्थात हल्ली केवळ एकाच पक्षाचे संख्याबळ पुरेसे नसल्याने अनेक पक्षांचे मिळुन सरकार बनवावे लागते. उदा. पुलोद, राष्ट्रीय लोकशाही आघाडी, संयुक्त पुरोगामी दल, आघाडी सरकार इ. भारतात अल्पसंख्य, मागासवर्ग, स्त्रिया असे राखीव प्रतिनिधीत्व असल्याने राजकीय समावेशनाची प्रक्रिया संमिश्र बनते.

निवडणुकांचे सातत्यही महत्वाचे असते. ठराविक काळाने, भारतात दर पाच वर्षांने लोकसभा, विधानसभांच्या निवडणुका होतात. पण अलिकडील काही काळात बऱ्याच वेळा मध्यावधी निवडणुकाही घ्याव्या लागल्या. अल्पकाळ टिकणारी आघाडी सरकारे, वारंवार घ्याव्या लागणाऱ्या निवडणुका, पक्षांतर यामुळे समावेशनाची प्रक्रियाही गुंतागुंतीची बनते. भारताने केवळ एका मताने अविश्वास ठराव संमत झाल्याने लोकसभेत तेरा दिवसांचे अल्पमतातील सरकारही अनुभवले आहे. आणीबाणीमुळे निवडणुका पुढेही ढकलल्याचे भारताने अनुभवले आहे.

निवडणुकी संबंधीच्या अटीही राजकीय समावेशनासाठी महत्वाच्या असतात. नागरिकत्व, वय, पार्श्वभुमी इ. लोकसभेसाठी २५ वर्षे पुर्ण, राज्यसभेसाठी ३० वर्षे पुर्ण, राष्ट्रपती होण्यासाठी ३५ वर्षे पुर्ण अशा अटी भारतात आहेत. पण कोणालाही कितीही वेळा भारतात निवडणुक लढवता येते.

**५) मतदानाची पद्धती :**

मतदान करण्याची पद्धतीही महत्वाची असते. गुप्तमतदान पद्धतीमुळे स्वतंत्रपणे मतदान करता येते. भारतासारख्या मोठ्या लोकशाही यंत्रणेत हा घटक फार प्रभावी ठरला आहे. राजकीय समावेशनाचा दर्जा गुप्त मतदानपद्धतीमुळे उंचावतो.

**६) औपचाकि व अनौपचारिक साधने :**

राजकीय समावेशनात राजकीय पक्ष, हितसंबंधी गट, सामाजिक स्तर, राजकीय अनुभव यांचाही प्रभाव असतो. सर्वच जाती - धर्मांच्या लोकांना राजकीय प्रक्रियेत समाविष्ट केले जात असल्याने राजकीय समावेशनात एक प्रकारची सुसूत्रता येते. राजकीय पक्ष व दबाज गट ही औपचारिक माध्यमे तर जात, वर्ग, सार्वजनिक कार्याचा अनुभव ही अनौपचारिक माध्यमे म्हणुन विचारात घेतली जातात.

उमेदवारापेक्षा राजकीय पक्षाला मत देण्याची प्रवृत्ती, राजकीय पक्ष संघर्ष या गोष्टी राजकीय समावेशनाला जबाबदार ठरतात. मतदान पत्रिकेवर किंवा इलेक्ट्रानिक व्होटिंग मशिनवर पक्षाचे चिन्ह किंवा नाव टाकुन मतदान केले जाते.

राजकीय पक्षातील नेतृत्व निवडीवर जात, वर्ग व धर्माचाही प्रभाव असतो. जातीवर आधारित मतदान, विशिष्ट जातीना जवळ करण्याची राजकीय पक्षांची प्रवृत्ती, निवडणुकीत होणारा सोशल इंजिनियरिंगचा प्रयोग, जातींचे केले जाणारे राजकारण, सुशिक्षित बेकारांना जवळ करण्याची प्रवृत्ती यांचाही राजकीय समावेशनावर परिणाम होत असतो.

उमेदवारांची निवड ही पक्षांतर्गत बाब असते. केंद्रीय पातळीवर नेते त्याचा निर्णय घेतात. भारतात प्रादेशिक पक्षांची फार मोठी चलती सध्या सुरू आहे. आपले अस्तित्व त्यातुन दाखवुन देण्याचा प्रयत्न होत असतो.

हितसंबंधी गटांचे अस्तित्व व एकुण राजकीय प्रक्रियेवरील त्यांचा प्रभाव ही आधुनिक काळातील वस्तुस्थिती आहे. सत्ताधारी पक्षाकडुन हितसंबंधी गटांना देण्यात येणाऱ्या राजकीय महत्वामुळे राजकीय समावेशनाच्या बाबतीत हितसंबंधी गटांना बरेच महत्व प्राप्त होते व ते राजकीय समावेशनावर प्रभाव पाडतात. भारतात शिक्षक - पदवीधर मतदारसंघाचा असाच प्रभाव असलेला दिसतो व तसे प्रतिनिधित्व मिळते.

सामाजिक स्तरीकरणाचाही राजकीय समावेशनात प्रभाव पडतो. भारतात प्रामुख्याने ज्या प्रभावी जाती (Dominant Caste) आहेत. त्यांचे राजकीय समावेशन अधिक प्रमाणात झालेले आढळते. महाराष्ट्रात तर आपल्याला याचा पुरेपुर अनुभव येतो. कारण संपुर्ण मंत्रिमंडळावर व एकुणच विधिमंडळावरही मराठा जातीचे प्रभुत्व दिसते. मुस्लीमांना अल्पसंख्य म्हणुन व अनुसुचित जाती जमातींना वंचित समुहातुन पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. घटनेनुसार असे समावेशन करण्यात आले आहे. भाषा, धर्म, जात यांचा मतदानावर प्रभाव पडतो व त्यातुन स्तरीकरणाचे समावेशनातील महत्व लक्षात येते.

स्वातंत्र्य सैनिक, सार्वजनिक कामातील अनुभव, समाज सेवा यावरही राजकीय समावेशन ठरत असते. आपल्याकडे राज्यसभा व विधान परिषदेत असे प्रतिनिधित्व देण्याची परंपरा आहे. त्यात कलाकार,

क्रीडापटु, साहित्यीक, समाजसेवक, उद्योगपती, शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ यांना स्थान दिले जाते. असे समावेशन हे वरिष्ठ सभागृहात होत असते व अशा व्यक्तींच्या सामाजिक कार्यामुळे त्याला अनुकुलता प्राप्त होते.

- **राजकीय समावेशनाच्या पद्धती :**

राजकीय समावेशन हे विविध पद्धतींमार्फत होत असते. त्यातील काही पद्धती या प्राचीन काळी महत्वाच्या ठरल्या. उदा. चिठ्ठ्या टाकुन निवड करणे (Draw), लुट पद्धती किंवा खैरात पद्धती (Spoils), आळीपाळी पद्धती (Rotation), क्रांती, उठाव, युद्ध इत्यादी. आधुनिक काळात निवडणुका व औपचारिक शिक्षण या पद्धती महत्वाच्या ठरल्या आहेत. प्रत्येक व्यवस्थेत एकाच पद्धतीचा स्वीकार केला जातो असे नाही तर, विविध पद्धती कमी अधिक प्रमाणात स्वीकारल्या जातात.

**१) चिठ्ठी पद्धत :**

चिठ्ठ्या टाकण्याची पद्धत (Lots) ग्रीस पासुन सुरू झाली. उमेदवारांना समसमान मते पडल्यास चिठ्ठी टाकुन निवड केली जाते. त्यामुळे इतर आपोआपच बाद (eliminate) होतात.

**२) आळीपाळी पद्धत :**

आळीपाळी किंवा चक्राकार (Rotation) पद्धतीही पुर्वी प्रचलित होती. मक्तेदारी टाळण्यासाठी ही पद्धत उपयुक्त होती. आजही काही ठिकाणी या पद्धतीचा अवलंब केला जातो. उदा. अमेरिकेत दोन वेळाच राष्ट्राध्यक्षपद उपभोगता येते. या पद्धतीमुळे उच्च पातळीवर समावेशनात विशिष्ट मुदतीनंतर इतर व्यक्तींना उच्च पदाचा मान मिळु शकतो.

**३) सक्तीची पद्धत :**

सक्तीच्या मार्गाने पदस्थाने हिरावुन घेण्याची पद्धत पुर्वी पासुनच अस्तित्वात आहे. सध्याही काही ठिकाणी आहे. उदा. क्रांती, लष्करी उठाव (पाकिस्तान), हिंसक दंगली इत्यादी मुळे उच्च पदस्थ व्यक्ती बदलल्या जातात.

**४) पुरस्कार पद्धती :**

राजकीय समावेशनाच्या इतर पद्धतींचा शोध लागण्यापुर्वीच्या काळात 'पुरस्कार पद्धती' (Patronage System) महत्वाची ठरली होती. काही पदे विकत घेणे किंवा बक्षिसाच्या मोबदल्यात उच्च पदावरील व्यक्तीस ठराविक पद्धतीने वागावयास लावणे अशी ही पद्धती होती. पण या पद्धतीमुळे 'योग्य' व्यक्तीचीच उच्चपदी नेमणुक होईल याची खात्री नसे. हा एक 'लाच' देण्यातीलच प्रकार आहे.

**५) स्वीकृती पद्धत :**

आधीच निवडुन आलेल्या लोकांकडुन इतरांना समाविष्ट करून घेण्याची ही पद्धती आहे. ब्रिटन व भारतात ही पद्धती आढळते. स्थानिक स्वराज्य संस्थात ती आढळते. नगरपालिका, विधान परिषद या ठिकाणी अशा पद्धतीने सदस्यांची स्वीकृती (Cooption) केले जाते. अमेरिकेत राष्ट्रपतीना या पद्धतीने समावेशन करण्याचे अधिकार आहेत.

**६) नियुक्ती पद्धत :**

भारतात विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात (राज्यसभा व विधानपरिषद) साहित्य, कला, क्रिडा, संशोधन, समाजसेवा इत्यादी क्षेत्रातील व्यक्तींची अशी नियुक्ती (Nomination) करण्याचे अधिकार राष्ट्रपती व राज्यपाल यांना आहेत. अशी नियुक्ती विद्यापीठ स्तरावरही होत असते.

**७) निवडणुक पद्धत :**

ही पद्धती (election method) सार्वत्रिक आहे. लोकशाही यंत्रणेत ही पद्धती अपरिहार्य मानली जाते. प्रामुख्याने राजकीय समावेशनासाठी या पद्धतीचा वापर केला जातो. अर्थात या बाबतीत देशादेशात फरक आढळतो. निवडणुकांचे स्वरूप, मतदानाचे स्वरूप, वय, पात्रता असे अनेक बाबतीत भिन्न स्वरूप विविध ठिकाणी दिसुन येते. इतर सर्व पद्धती पेक्षा समावेशनाची ही पद्धत परिणाम कारक मानली जाते. कारण तिच्यात लोकांच्या इच्छांचे प्रतिबिंब उमटलेले असते.

**८) खास शिक्षण पद्धत :**

खास शिक्षण किंवा प्रशिक्षण देऊन व्यक्तींचे राजकीय समावेशन करण्याची ही पद्धत काही देशात प्रचलित आहे. उदा. सोव्हिएट रशियात या दृष्टीने प्रयत्न केले जातात. तसेच पक्षातील अभिजनाना राजकीय व शासकीय पदासाठी खास शिक्षणही दिले जाते. अभिजनाना शिक्षण देण्याची पद्धती नाझी जर्मनीत हिटलरनेही अस्तित्वात आणली होती. भारतातही स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाच्या अनुषंगाने असे प्रशिक्षण महत्वाचे मानले जाऊ लागले आहे.

- **समावेशनातील बदलाची प्रक्रिया :**

राजकीय समावेशनाची प्रक्रिया ही एक गतिमान प्रक्रिया आहे. तिच्यात बदल घडवुन आणण्यासाठी प्रत्येक देशात प्रयत्न चालु आहेत. हे बदल घडवुन आणणारे अनेक घटक महत्वाचे आहेत. ते पुढील प्रमाणे लक्षात घेता येतात.

**१) क्रांती व सत्तापालट :**

क्रांतीमुळे मुलभुत स्वरूपाचा सत्तापालट होऊ शकतो व सत्तेशी निष्ठा असणाऱ्या व्यक्तींची नेमणुक केली जाते. क्रांती अथवा सत्ताबदलामुळे एकदम नवीन विचार प्रणाली असलेली राजवट आल्यास नोकर वर्गही नवीन प्रवृत्तीचा नेमला जातो.

**२) घटनात्मक किंवा संस्थात्मक बदल :**

विधिमंडळाच्या सभासद संख्येत घटना दुरूस्तीमुळे बदल झाल्यास किंवा एकगृही विधिमंडळाऐवजी द्विगृही विधिमंडळ व्यवस्था स्वीकारल्यास राजकीय समावेशनाचे क्षेत्र विशाल बनते. लोकसंख्येतील बदलानुसार लोकसभेतील सभासदसंख्याही बदलते. पण भारतात १९७१ ची लोकसंख्या प्रमाण मानुन लोकसभेतील सदस्य संख्या निर्धारित करण्यात आली आहे.

**३) राजकीय सभागृहाचे वाढते प्रमाण :**

पुर्वीचे आणि आधुनिक काळातील राजकीय समावेशनाचे स्वरूप लक्षात घेतल्यास आधुनिक

काळातील राजकीय समावेशनाचे प्रमाण बरेच अधिक दिसते. प्रातिनिधीक लोकशाहीचा विकास व लोकांना वाढत्या प्रमाणात मिळत गेलेली राजकीय सहभागाची संधी यामुळे हे राजकीय समावेशन वाढलेले दिसते. त्यात केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक वाढ झाल्याचे दिसते. उपेक्षित घटकांचा समावेशही आता त्यात झालेला दिसतो. राजकीय समावेशनासाठी हितगट, राजकीय पक्ष, मोर्चे, निदर्शने या गोष्टी प्रयत्नशील दिसतात.

**४) समावेशन पद्धतीतील बदल :**

समावेशनाच्या पद्धतीत बदल झाल्याने समावेशनाच्या तपशीलातही बदल झालेला दिसतो. गुणात्मक व स्पर्धात्मक पद्धतीमुळे गुणवत्ताधारकांपुरतेच समावेशनाचे क्षेत्र मर्यादित झाले. विशेष करून प्रशासनाच्या बाबतीत हा बदल झालेला दिसतो. प्रशासनाची कार्यक्षमता वाढण्याच्या दृष्टीने हे बदल फायदेशीर ठरतात. निवडणुकीची पद्धती राजकीय क्षेत्रात स्वीकारण्यात आल्याने मतशक्ती अधिक असणाऱ्या गटाना राजकीय समावेशनाच्या दृष्टिने विशेष अनुकुलता प्राप्त झाली. साहजीकच समाजाच्या कनिष्ठ स्तरातुन राजकीय समावेशन मोठ्या प्रमाणात होऊ लागले.

**५) शासकीय कार्याचे बदलते स्वरूप :**

प्राचीन काळी राज्याचे स्वरूप 'कायदा-सुव्यवस्था' असे होते तर आधुनिक काळात ते 'कल्याणकारी' झाल्याने अधिक व्यापक बनले आहे. पदस्थाने वाढली आहेत. पदस्थानावरील व्यक्तीस तांत्रिक माहितीची गरज निर्माण झाली आहे. नवनवीन क्षेत्र शासकीय नियंत्रणाखाली येत आहेत. त्यामुळे नवीन ज्ञान संपादन व प्राविण्य आवश्यक बनले आहे. प्रशासकीय समावेशनाची गरज नव्याने निर्माण झाली आहे. क्षमताधिष्ठित समावेशन आवश्यक झाले आहे. विशेषित ज्ञानाचे समावेशनही आवश्यक बनले आहे आणि असा एक नवीन वर्ग निर्माण झाला आहे. विकसनशील देशात, विकासाची प्रेरणा असणारा व लोकानुवर्ती प्रशासकवर्ग नेमण्याकडे कल दिसत आहे. व्यवस्थेनुरूप गरज बदलत असल्याने समावेशनाच्या तपशीलातही बदल होत आहेत.

**६) सामाजिक – आर्थिक बदल :**

औद्योगिक क्रांतीमुळे पारंपारिक वर्ग रचना बदलली नवीन वर्ग अस्तित्वात आले. या वर्गानी स्वतःच्या हितसंबंधाच्या सुरक्षिततेसाठी राजकीय सहभागास महत्व दिले. तसेच नोकर वर्गाची आवश्यकता निर्माण झाली. नवीन वर्गातुन राजकीय समावेशन व प्रशासकीय समावेशनही मोठ्या प्रमाणात होऊ लागले. प्रामुख्याने भारतात असा बदल घडुन येण्याचे प्रमुख कारण म्हणुन नवीन वर्ग जबाबदार असल्याचे मायरन वीनर यांनी म्हटले आहे. पाश्चिमात्य शिक्षण, मातृभाषेच्या प्रभावातुन निर्माण झालेले प्रादेशिक नेतृत्व यांचाही यावर परिणाम झाला. तेंव्हा समावेशनाची प्रक्रिया ही अशा रितीने गतिमान बनते व या प्रक्रियेवर विविध घटकांचा प्रभाव जाणवतो.

अशा रीतीने राजकीय समावेशनाचा विचार विविध प्रकारे व विविध संदर्भात करता येतो.

**राजकीय संस्कृती :**

**प्रस्तावना**

संस्कृती हा शब्द तसा व्यापक असून त्यामध्ये आचार व विचार परंपरेचा अंतर्भाव होतो. संस्कृतीचा शब्दश: अर्थ संस्कार असा आहे. ज्यायोगे मनुष्य सुसंस्कृत होतो त्याला संस्कृती म्हणतात. तसेच ज्यामुळे जीवन समृद्ध होते त्याला संस्कृती असे नाव देण्यात येते. संस्कारीत वर्तन म्हणजे संस्कृती होय. लोकांचे आचारविचार, त्यांच्या चालीरिती, कला, तत्त्वज्ञान या सर्वांचा समावेश संस्कृतीत होतो. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, कौटुंबिक इत्यादी विविध क्षेत्रात होत असणाऱ्या प्रगतीलाही संस्कृती म्हटले जाते. संस्कृती हा मानवाचा विशिष्ट गुण व वैशिष्ट्य आहे. तो त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन आहे. संस्कृती ही जशी सामाजिक निर्मिती आहे. तशी ती मानवसमुहाची धारणाशक्ती आहे. मानवाच्या उदात्तीकरणाची प्रक्रिया संस्कृती म्हणून ओळखली जाते. टायलर याने संस्कृतीमध्ये श्रद्धा व ज्ञान, नीती व कायदा, रूढी व कला आणि समाजाचा घटक म्हणून व्यक्तीने संपादन केलेले गुण व सवयी या सर्वांचा समावेश होतो असे म्हटले आहे. राल्फ लिंटन याने संस्कृतीला सामाजिक वारसा म्हटले आहे. तर रॉबर्ट लुई याने संस्कृतीला 'सामाजिक परंपरांचा संग्रह' असे संबोधले आहे. संस्कृती हा एक शिक्षित वर्तनप्रकार आहे. संस्कृती ही सतत बदलत असते. तसेच ती संग्राहक असते. संक्रमणता हे तिचे वैशिष्ट्य असते. याप्रमाणे संस्कृती ही एक व्यापक व अर्थपूर्ण संकल्पना आहे.

संस्कृती हा समाजरचनेचा एक अविभाज्य भाग आहे. समाजरचनेचे ज्ञान होण्यासाठी समाजाची संस्कृती समजावून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे समाजशास्त्रात व राज्यशास्त्रातही संस्कृतीच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे.

संस्कृतीद्वारे विशिष्ट मूल्यव्यवस्था स्पष्ट होत असते. हा घटक अर्थातच राजकीय व्यवस्थेच्या विश्लेषणात महत्त्वाचा मानला जातो. त्यातूनच 'राजकीय संस्कृती' ही संकल्पना महत्त्वाचा अभ्यासविषय बनली.

- **राजकीय संस्कृती : अर्थ, स्वरूप व व्याख्या :**

'राजकीय संस्कृती' ही संकल्पना समाजशास्त्रातील 'संस्कृती' या संकल्पनेचाच एक भाग आहे. दोन्ही शास्त्रात समान अर्थानेच 'संस्कृती' ही संकल्पना वापरली जाते. समाजशास्त्रात संस्कृतीची जी व्याख्या करण्यात आली आहे. तिचा आशय लक्षात घेऊनच राज्यशास्त्रज्ञानी राजकीय संस्कृतीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी आधी समाजशास्त्रात संस्कृतीची जी व्याख्या करण्यात आली आहे ती लक्षात घेणे महत्वाचे ठरेल. या सदंर्भात दोन व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) एडवर्ड टायलर :**

''समाजाचा एक सदस्य या नात्याने मानवाने मिळविलेल्या ज्ञान, श्रद्धा, कला, नीतीतत्वे, कायदा, रूढी आणि इतर क्षमता व सवयी यांचा संकुल समुच्चय म्हणजे संस्कृती होय.''

**२) रॉबर्ट रेडफिल्ड :**

''कला आणि तंत्र यांच्याद्वारे आविष्कार केल्या जाणाऱ्या मानवी समुहाचे वैशिष्ट्य असणाऱ्या रूढ चालिरितींचा, समजुतींचा संघटित समुच्चय म्हणजे संस्कृती होय.''

राज्य शास्त्रज्ञानी या आधारावर राजकीय संस्कृतींची जी व्याख्या केली आहे ती पुढीलप्रमाणे लक्षात घेता येते.

**१) सिडने व्हर्बा :**

''राजकीय संस्कृती म्हणजे अशी व्यवस्था की जिच्यात अनुभवजन्य श्रद्धा, व्यक्त प्रतिके व मुल्ये यांचा अंतर्भाव होतो व ज्या परिस्थितीत अगर संदर्भात राजकीय कृति घडत असते तिचाही बोध होतो.''

(Political culture consists of the system of empirical beliefs, expresssive symbols and values which defines the situation in which political action takes place :- Sidney Verba)

**२) आल्मंड आणि पॉवेल :**

''राजकारणासंबंधीच्या विशिष्ट राजकीय व्यवस्थेतील व्यक्तींच्या प्रवृत्ती, स्थितीज्ञान व आकलन यांचा आकृतिबंध म्हणजे राजकीय संस्कृती होय.''

(Political culture is the pattern of individual attitudes and orientations towards politics among the members of a political system : Almond and Powell)

**३) मॅक्रिडिस :**

''राजकीय संस्कृती म्हणजे समाजातील घटकात राजकीय उद्दिष्टांच्या व नियमांच्या बाबतीत असणारी एकवाक्यता होय.''

(Political culture means commonly shared goals and commonly accepted rules - Macridis)

राजकीय व्यवस्था, राजकीय घटना किंवा राजकीय वस्तु (Object) इत्यादीकडे पाहण्याची लोकांची प्रवृत्ती किंवा दृष्टिकोन व मुल्ये यांचा समुच्चय म्हणुन राजकीय संस्कृतींचा विचार शास्त्रज्ञानी केला आहे.

राजकीय अंग म्हणजे लोकसमुहाच्या जीवनाची एक महत्वाची बाजु असते. प्रत्येक समाजाची स्वतःची अशी एक राजकीय संस्कृती असते. समाजानुरूप ती वेगवेगळी असते. राजकीय संस्कृती हा राजकीय व्यवस्थेच्या वर्गीकरणाचा एक महत्वाचा आधार असतो, तसेच राजकीय संस्कृतीत विशिष्ट समाजात तत्कालीन रूढ असलेल्या प्रवृत्ती, श्रद्धा, मुल्ये व कौशल्ये यांचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे राजकीय संस्था व व्यवहार राबविण्याची शैली यासारख्या गोष्टी, लोकशाही मुल्ये, धर्मालीतता या गोष्टीशी राजकीय संस्कृतीच्या आधारभुत असतात.

राजकीय संस्कृती हा राजकीय व्यवस्थेचा एक भाग असतो आणि राजकीय व्यवस्था ही संपूर्ण समाज व्यवस्थेचा (Total Social System) एक घटकभाग असतो. म्हणजेच ती समाज व्यवस्थेची उपव्यवस्था (Subsystem) असते. तसेच प्रत्येक राजकीय व्यवस्थेत राजकीय संस्कृती महत्वाची असते. ल्युसियन पाय यानीही नवीन उदयास येणाऱ्या राजकीय व्यवस्थांच्या संदर्भात राजकीय संस्कृतीच्या अध्ययनास बरेच महत्व दिले आहे. 'राजकीय विरोधाचे स्वरूप हे तेथील राजकीय संस्कृतीवर अवलंबुन असते.' असे रॉबर्ट ढाल यांनी म्हटले आहे.

● **राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण :**

या संदर्भात राजकीय संस्कृतीच्या स्वरूपाचे वर्गीकरण आल्मंड व पॉवेल यांनी तीन प्रकारे केले आहे.

१) **ज्ञानावर आधारित** (Cognitive) **:**

तंतोतंत माहिती व तर्क बुद्धीवर आधारित असा हा प्रकार आहे. श्रद्धा, राजकीय व्यवस्था, नेते, धोरणे, समस्या इत्यादीची माहिती हा अशा संस्कृतीचा आधार असतो.

२) **मनोभारित** (Affective) **:**

आत्मियता, ओढ, आकर्षण, सहभागाची भावना, विरोध, नकार, यावर आधारित राजकीय संस्कृती.

३) **मुल्यमापनात्मक** (Evaluative) **:**

राजकीय विचार सरणी, मुल्ये व त्यावर आधारित निर्णय हा राजकीय संस्कृतीचा आधार असतो. उदा. नैतिक मुल्ये, लोकशाही मुल्ये, धर्मनिरपेक्षता इ.

राजकीय व्यवस्थेतील घटक व्यक्ती राजकीय व्यवस्थांच्या उद्देशांकडे आणि कार्याकडे कशा व कोणत्या दृष्टीने पाहतात या संबंधी तीन प्रकार आल्मंड व व्हर्बा यांनी त्यांच्या The Civic Culture या पुस्तकात तीन प्रकार पाडले आहेत.

१) **संकुचित** (Parochial) **:**

लोकांना राजकीय व्यवस्थेबद्दल एकतर जाणीव नसते किंवा असली तरी अगदी अल्प स्वरूपाची असते.

२) **आज्ञांकित** (Subjects) **:**

राजकीय जाणीव असते पण ती कारणापुरतीच किंवा औपचारिकता म्हणुन राजकीय व्यवस्थेत उत्स्फूर्तपणे आपण सहभागी व्हावे असे त्यांना वाटत नसते.

३) **सहभागांकित** (Participant) **:**

या व्यवस्थेतील लोक आपण राजकीय संस्कृतीचा भाग आहोत. आपल्याला त्यासाठी योगदान दिले पाहिजे या भावनेचे असतात. आपला त्यातील सहभाग आवश्यक आहे. अशी यांची भावना असते.

● **फायनरप्रणित वर्गीकरण :**

लष्कराची राजकारणातील भुमिका अभ्यासुन एस.ई. फायनर यांनी राजकीय संस्कृतीचे वर्गीकरण केले आहे. राजकीय संस्कृतीची पातळी लक्षात घेऊन लष्करी हस्तक्षेपाविषयी लोकांची प्रतिक्रिया समजु शकते असे त्यांनी सुचविले, उच्च राजकीय संस्कृतीचे त्यांनी तीन निकष सांगितले आहेत. १) राज्याचा कारभार चालविण्याचा नैतिक अथवा कायेदशीर अधिकार सर्वानी मान्य केलेला असतो. २) राजकीय व्यवस्था ज्यातून बनलेली असते अशी मुलकी कार्यपद्धती व संरचना सर्वानी एकमताने स्वीकारलेली असते. ३) या मुलकी संस्थात लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो.

राजकीय संस्कृतीच्या पातळीचे निकष स्पष्ट करून त्यात वैविध्य असते असे फायनरनी स्पष्ट केले आणि राजकीय संस्कृतीचे चार प्रकार स्पष्ट केले.

**१) परिपक्व राजकीय संस्कृती** (Matured Political Culture) **:**

या संस्कृतीत लष्करी हस्तक्षेप हा ''अयोग्य आक्रमण'' मानला जातो. त्याचा तिटकारा केला जातो. अशा हस्तक्षेपांस लोक अनुमती देत नाहीत. उदा. ब्रिटन, अमेरिका इ.

**२) विकसित राजकीय संस्कृती** (Developed Political Culture) **:**

या व्यवस्थेत प्रभावी अशा संघटनात लोक एकत्रित आलेले असतात व शासकीय कार्यपद्धती आणि अधिकारी संघटंना लोकांत रूजलेल्या असतात. परंतु अशा व्यवस्थेत सार्वभौम कोण व ते कशात असावे या विषयी वाद असतात. या व्यवस्थेत लष्करी हस्तक्षेपास लोकांचा प्रखर विरोध असतो. उदा. जर्मनी, जपान, फ्रान्स.

**३) कनिष्ट राजकीय संस्कृती** (Low Political Culture) **:**

या व्यवस्थेत लोक कमी संघटित असतात व राज्यांतर्गत संस्था व कार्यपद्धती वादग्रस्त असतात. लष्करी हस्तक्षेपांस लोकमत प्रतिकुल नसते. उदा. तुर्कस्थान, इजिप्त, पाकिस्तान, इराण, सुदान इ.

**४) दुर्बल राजकीय संस्कृती** (Minimal Political Culture) **:**

या व्यवस्थेत लोक राजकीय दृष्टया जागरूकही नसतात व संघटितही नसतात. कोणतेही सरकार लोकमताकडे दुर्लक्ष करू शकते. उदा. मेक्सिको, अर्जेंटिना.

- **राजकीय संस्कृतीचे मुलाधार :**

राजकीय संस्कृती म्हणजे अनेक वर्षांच्या सामाजिक - राजकीय परंपरांचा पारिपाक असतो. ती काही एकदम किंवा अचानक निर्माण झालेली नसते. धर्म, सामाजिक संस्था, लोकसाहित्य, मुल्ये, श्रद्धा, तत्वज्ञान, समाजाचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन समस्या निवारण, युद्ध, व्यक्तींच्या प्रवृत्ती इ. सर्वांचा राजकीय संस्कृती विकसित होण्यावर परिणाम होत असतो. यासंदर्भात राजकीय संस्कृतीवर अधिक प्रभाव टाकणारे जे घटक आहेत, त्यांचा आपण विचार करणार आहोत.

**१) भौगोलिक परिस्थिती :**

हा घटक राजकीय संस्कृतीच्या विकासात विशिष्ट स्वरूपात कारणीभुत ठरतो. ब्रिटन हा देश चारही बाजूनी समुद्राने वेढलेला असल्यामुळे अनेक शतके परचक्रापासुन सुरक्षित राहिला व त्यामुळे अंतर्गत प्रश्नांकडे तेथील राज्यकर्त्यांना लक्ष केंद्रीत करता आले. त्यामुळे लोकशाहीच्या विकासाला अनुकूल परिस्थिती लाभली. तसेच अमर्याद भूमी, साधन संपत्तीची विपुलता यामुळे अमेरिकेत व्यक्तीस्वातंत्र्यवादी विचारसरणी रूजण्यास मदत झाली. सर्व प्रदेश डोंगरदऱ्यात विभागला गेल्याने व नैसर्गिक स्वरूपाच्या प्रादेशिक विभागणीमुळे स्वित्झर्लंड मध्ये प्रत्यक्ष लोकशाही विकसित होण्यास मदत झाली.

### २) इतिहास :

इतिहासकालीन घटनांचा मानवी मनावर जबरदस्त प्रभाव असतो. त्यातुन त्यांच्या अंतःप्रवृत्ती निश्चित होत असतात. लोकांची मुल्ये, दृष्टिकोन, प्रवृत्ती निश्चित होण्यात त्याना मिळालेला ऐतिहासिक वारसा महत्वाचा ठरत असतो. तेराव्या शतकापासून ब्रिटनमध्ये जे ऐतिहासिक स्वरूपाचे संघर्ष झाले, राजा व प्रजा या दरम्यान जे करार झाले, त्याचा प्रभाव आजही ब्रिटन मधील लोकांवर जाणवत आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतील स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रीसुत्रींचा प्रभाव केवळ फ्रान्सवरच नव्हे तर सर्व जगभर दिसुन येतो. अमेरिकेतील यादवी युद्ध, मेक्सिकोतील क्रांती, इटलीतील मुसोलोनीची राजवट या ऐतिहासिक घटनांचा प्रभाव त्या त्या देशाच्या राजकीय संस्कृतीवर झालेला दिसतो. वसाहतवादी राजवटीचा प्रभाव आशिया, आफ्रिका खंडातील देशांच्या बाबतीत झालेला दिसतो. भारतातही ज्या प्रांताचा कारभार प्रत्यक्षपणे ब्रिटीश पहात होते, ते प्रांत इतर प्रांताच्या तुलनेत सुधारले असल्याचे जाणवते. भारतीय नेत्यांना संसदीय शासनपद्धतीचा दिर्घकालीन अनुभव आल्याने भारतात ती रूजू शकली पण पाकिस्तानात मात्र ती रूजू शकली नाही. कारण मुस्लिम लिगच्या नेत्यानी नेहमीच अशा शासन पद्धतीवर बहिष्कार टाकला होता, असे मायरन वीनर यांनी म्हटले आहे.

### ३) वांशिक-धार्मिक भेद :

सांस्कृतिक विविधतेचे हे दोन घटक आहेत. वंशभेदामुळे ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिकेत राजकीय संस्कृतीतही विविधता आली. कॅनडा व दक्षिण आफ्रिकेत वांशिक समुहांनी स्वतःची भाषा टिकवून ठेवून भाषा आणि धर्माच्या सहाय्याने स्वतःचे स्वतंत्र अस्तित्वही जोपासले. ब्रिटन आणि अमेरिकेत मात्र वांशिक गटात मोठ्या प्रमाणात समन्वय साधला.

धार्मिक भेदही राजकीय संस्कृतीत महत्वाचे ठरतात. स्वतंत्र भारतात हिंदू-मुसलमान धार्मिक भेंदाचा प्रभाव धर्मनिरपेक्ष अशी राजकीय संस्कृती निर्माण होण्यात अडथळे आणू शकते. समान नागरी कायद्याची निर्मिती करणे, गोवधबंदी बाबत निश्चित भुमिका घेणे याबाबत शासनापुढे धार्मिक भेदामुळे अडचणी निर्माण होतात. राजकीय पक्षांची निर्मितीही विशिष्ट धर्माच्या विचारसरणीनुसार होत असते. भारतात हिंदू महासभा, मुस्लीम लिग हे त्यातुनच निर्माण झाले. भारतातील राजकीय संस्कृतीवर हिंदू-मुस्लीम, ख्रिश्चन अशा तीन्ही धर्माच्या विचारसरणीचा आणि त्या त्या कालखंडातील ऐतिहासीक गोष्टींचा प्रभाव पडलेला आहे. हिंदूस्थानच्या फाळणीचा परिणामही भारतातील राजकीय संस्कृतीवर झालेला दिसतो. धर्मनिरपेक्षतेचा भारताने केलेला स्वीकार म्हणजे भारतीय संस्कृतितील सहिष्णु वृत्तीचाच परिपाक आहे.

### ४) सामाजिक - आर्थिक रचना :

समाजातील आर्थिक व सामाजिक भेद हे विशिष्ट प्रकारची विचारसरणी समाजात निर्माण करतात. त्यामुळे जाती व वर्ग विषयक विविधता असणाऱ्या समाजात मुल्ये, आदर्श, विचारप्रणाली, राजकीय सहभाग इ. विषयी विविधता निर्माण होते. विविध सामाजिक आर्थिक घटकांचा प्रभाव प्रत्येक देशाच्या राजकीय संस्कृतीत कमी अधिक प्रमाणात पडत असतो व त्यामुळे देशादेशात राजकीय संस्कृतीच्या बाबतीत विविधता निर्माण होते.

आदिवासी, ग्रामीण व नागरी समाजाची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये भिन्न भिन्न असतात त्यामुळे त्यांचे दृष्टीकोनही भिन्न असतात. ग्रामीण समाज हा प्रामुख्याने स्थितीशील असतो. त्यात एकजिनसीपणा असतो पण बदल चटकन स्विकारण्यास तो तयार नसतो. त्यामुळे तेथील राज्य कारभारावर सनातनी प्रवृत्तीचा प्रभाव दिसतो. याउलट नागरी भाग हा संमिश्र लोकसंख्येचा, दुय्यम संबंधावर आधारीत, गुंतागुंतीचा असतो. शिक्षणाचा अधिक प्रसार झालेला असतो. त्यांच्यातील विचारांची देवाण घेवाण अधिक जलदगतीने होत असते. तो सुधारणेला अनुकुल असतो. त्यामुळे नागरी समाजाधिष्ठीत राजकीय संस्कृती वेगळीच असते.

सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा प्रभाव प्रचलित मुल्ये व दृष्टिकोन यावरही पडत असतो. औद्योगिक समाजात राष्ट्रीय निष्ठा अधिक प्रभावी असतात. राष्ट्रीय उत्पन्न, त्याचे वाटप, दरडोई उत्पन्न, राहणीमान या गोष्टींचा प्रभाव कृषी प्रधान देशाच्या राजकीय व्यवस्थेवर पडत असतो. अर्थ व्यवस्था बदलेल (समाजवादी, लोकशाही, भांडवलशाही) त्याप्रमाणे राजकीय संस्कृती बदलत असते. आर्थिक विषमता जितकी अधिक तितकी वेगळ्या प्रकारची राजकीय संस्कृती निर्माण होत असते. समाजातील वर्गभेद राजकीय दृष्ट्या महत्वाचे असतात. गरीब वर्गाची प्रवृत्ती डाव्या विचारसरणीला पाठिंबा देणारी असते. तर श्रीमंत, मध्यम वर्ग उजव्या विचारसरणीला पाठिंबा देतात. आर्थिक विषमता अधिक वाढत चालली व ती कमी करण्यात शासन असमर्थ ठरू लागले तर क्रांती किंवा अतिरेकी प्रवृत्ती निर्माण होते. भारतातील नक्षलवाद अशा आत्यंतिक आर्थिक विपन्नतेतुन निर्माण झाला आहे.

वर्गरचना ही लवचिकच असते. पण जाती रचना मात्र ताठर असते. पण दोन्हीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठता (Hierarchy) किंवा श्रेणीरचना असते आणि त्याचा परिणाम राजकीय संस्कृतीवर होत असतो. तसेच सामाजिक दर्जा, प्रतिष्ठा, वंचित-शोषित-अन्यायित आणि त्याचबरोबर श्रेष्ठीजनांचे वर्चस्व अशा सामाजिक गोष्टीही राजकीय संस्कृतीचे निर्धारण करीत असतात. त्याचप्रमाणे शिक्षित, अशिक्षित, साक्षर, निरक्षरांचे प्रतिबिंबही राजकीय संस्कृतीवर पडत असते. तसेच शिक्षणाचे व्यवस्थित नियोजन व नियमन करून राजकीय व्यवस्थेला पोषक असे वातावरण तयार केले जाते. तेव्हा एकुणच राजकीय संस्कृती दृढ करण्यात सामाजिक, आर्थिक घटकांचे योगदान लक्षणीय असते.

- **राजकीय उपसंस्कृती :**

राजकीय संस्कृती ही राजकीय व्यवस्थांतर्गत अशा विविध गटांच्या संस्कृतीची मिळुन बनलेली असते. म्हणजेच प्रत्येक गटाची निराळी अशी सांस्कृतिक धारणा असते व ती विशाल अशा राजकीय संस्कृतीची उपसंस्कृती म्हणून अस्तित्वात असते. अशा उपसंस्कृतीचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात.

**१) अभिजन संस्कृती** (Elite Culture) **:**

सर्वसाधारण जनतेच्या संस्कृतीहून निराळी अशी ही संस्कृती असते. ब्रिटन व अमेरिकेत लोकशाही राजकीय संस्कृती विशेषतः राजकीय अभिजन व राजकीय कार्यकर्ते यांच्यात आस्तित्वात असलेली दिसते. मायरन वीनर यांनी भारतात दोन उपसंस्कृती असल्याचे स्पष्ट केले आहे. एक म्हणजे राजकीय अभिजन विषयक संस्कृती की जी धर्मनिरपेक्ष आधुनिकतावादी व राष्ट्रीय स्वरूपाची आहे व दुसरी 'जनता संस्कृती' की जी संकुचित, भावनात्मक व लोकधार्जिणी आहे.

राजकीय अभिजनांची कार्यशैली ही संस्थात्मक यंत्रणा व संस्कृतीची चौकट यांनी मर्यादित होत असते. म्हणुनच विरोधी असणारा पक्ष किंवा पक्षनेते सत्ताधारी बनल्यावर त्यांच्या कार्यपद्धतीत व भाषेत बदल होत असल्याचे दिसते. मार्च १९७७ मध्ये लोकसभा निवडणुकात जनता पक्षात असणाऱ्या व आक्रमक भुमिका घेणाऱ्या नेत्यांना अधिकार पदे मिळाली. त्यामुळे नंतर त्यांच्या वर्तणुकीत व वक्तव्यात बराच फरक पडलेला दिसुन आला. अधिकारपदे मिळाली की आपोआपच राजकीय क्रियांशीलतेवर बंधने येतात.

२) **पिढी उपसंस्कृती** (Generational Subculture) **:**

वेगाने होणाऱ्या सामाजिक आर्थिक बदलामुळे प्रत्येक पिढीत वैचारिक अंतर निर्माण होते. अशा प्रकारच्या बदलामुळे तरूण नागरिकात राजकीय सहभागाची प्रवृत्ती वाढत असते हे आल्मंड आणि व्हर्बा यांनी The Civic Culture या पुस्तकात स्पष्ट केले आहे. बहुतेक जुलुमी किंवा जुनाट राज्यव्यवस्थात बंडाचा झेंडा तरूणांकडूनच फडकवला जातो. काँग्रेस पक्षात इंदिरा गांधींच्या कार्यकाळात असे 'तरूण तुर्क' होते. एक राजवट जाऊन दुसरी राजवट आली की वैचारिक बदल अपेक्षितच असतात. अर्थात यात वैचारिक अंतर, निर्माण होतच असते. तसेच शिक्षण आणि संसुचन (माध्यम) साधनांचा परिणाम तरूण पिढीवर मोठ्याप्रमाणात होत असतो. आताच्या लोकशाही व्यवस्थेत सर्वच पक्षातील तरूण वर्ग हा संसुचनाच्या मागे लागलेला दिसतो. ट्विटर, फेसबुक यांचा मोठ्या प्रमाणात त्यांच्याकडून वापर होताना दिसतो आहे. सोशल मिडिया हे तर आता नित्याचेच झाले आहे. त्यामुळे तरूण वर्ग अधिककाधिक सुधारणावादी बनत चाललेला दिसतो. पिढ्यातील हे अंतर जितके जास्त तितकी संस्कृतीमधील अलगताही अधिक असते.

३) **राजकीय पक्ष उपसंस्कृती** (Political Party Subculture) **:**

प्रत्येक राजकीय पक्षात मुल्यविषयक फरक असतात. भारतात शिवसेना व मुस्लीम लीग या राजकीय पक्षांच्या प्रवृत्ती व प्रेरणा एकमेकाहून अलग दिसतात. तसेच भारतीय जनता पक्ष, समाजवादी, साम्यवादी पक्षासारखे काही पक्ष विचारसरणीला अधिक महत्व देतात तर काँग्रेस सारखे काही पक्ष विविध गटांचे प्रतिनिधित्व करण्यास अधिक महत्व देतात. पक्षांतर्गत गट जेव्हा अतिरेकी स्वरूप धारण करतात तेंव्हा एखादा गट फुटून बाहेर पडतो व निराळा पक्ष स्थापन करतो त्यावेळी पक्षांतर्गत उपसंस्कृती अस्तित्वात येते. १९६९ मध्ये काँग्रेसमध्ये फुट पडली ती डावे व उजवे विचार सरणीचे गट परस्परविरोधी कारवाया करीत असल्यामुळेच. आणीबाणीचे समर्थक व विरोधक यामुळेही काँग्रेसमध्ये १९७८ मध्ये फुट पडून दोन स्वतंत्र गट निर्माण झाले. मार्क्सवादी कम्युनिस्ट व भारतीय कम्युनिस्ट अशीही विभागणी भारतीय राज्यकारणात दिसते.

राजकीय पक्षावर समाजातील विविध वर्ग व जाती यांचा प्रभावही असतो. अशा वर्गभेदांचे व जातीभेदांचे प्रतिबिंब राजकीय पक्षातही पडत असते. श्रीमंत वर्गाचा उजव्या विचारसरणीला तर गरीब, कष्टकरी वर्गाचा डाव्या विचारसरणीला पाठिंबा मिळत असतो. त्यातून राजकीय पक्ष उपसंस्कृतीचे अस्तित्व जाणवते. भारतातील प्रत्येक राजकीय पक्षाला विविध जाती व वर्गाचा पाठिंबा असलेला दिसतो. ब्रिटनमध्येही हुजूर व मजूर पक्ष समाजातील वरिष्ठ व कनिष्ठ वर्गांचे प्रतिनिधित्व करतात.

- **प्रतिके व राजकीय संस्कृती** (Symbols and Political Culture) **:**

समाजमनातील अव्यक्त भावना, मुल्ये, श्रद्धा यांना प्रकट स्वरूपात मांडणारी मूर्त साधने म्हणजेच प्रतीके होत. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, परंपरेने चालत आलेल्या राजकीय संस्था, राजकीय विधी किंवा संकेत इत्यादी प्रतिके असु शकतात. या प्रतिकांचा व्यक्ती व्यक्तीतील आंतरक्रियावर प्रभाव पडत असतो. सार्वजनिक इमारती, शताब्दी, जन्मतिथी, पुण्यतिथी या गोष्टीही संस्कृतीच्या घटक भाग असतात. भारतात १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन, २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणुन दरवर्षी राष्ट्रीय सण म्हणुन जगभर साजरा केला जातो. १ मे हा कामगार दिन म्हणुन सर्व जगभर साजरा करून साम्यवादी पक्ष मजुरांची कष्टकऱ्यांची एकजुट जगभर प्रदर्शित करतात. शालेय क्रमिक पुस्तकात सुरूवातीस नागरिकत्वाची असलेली शपथ म्हणजे राष्ट्रनिष्ठेचीच शपथ असते. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात म.गांधीनी टकळी, चरखा, खादी यांना राष्ट्रीय प्रतिकाचे स्थान दिले होते. संसद, जालियनवाला बाग, ऑगस्ट क्रांती मैदान, मणीभवन, राष्ट्रपती भवन ही सर्व राष्ट्रीय प्रतिके आहेत. तसेच राजकीय संस्कृतीची ती प्रतिके आहेत. त्यांचे जनमानसातील स्थान दृढ असते तसेच राष्ट्रीय अस्मितेचा तो केंद्रबिंदू मानला जातो. राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रीय अस्मिता यांचे ते प्रतिक असते. या प्रतिकांचा अवमान म्हणजे राष्ट्राचाच अवमान मानला जातो.

ब्रिटनमध्ये राजेशाही संकेत व परंपरा, ब्रिटीश साम्राज्य, राष्ट्रसमुह, संसदेचे सार्वभौमत्व इ. विषयी लोकात अतिशय आदराची व अभिमानाची भावना असते. या गोष्टी रिचर्ड रोझ यांनी ब्रिटनच्या राजकीय संस्कृतीतील महत्वाची प्रतिके मानली आहेत. नाझी जर्मनीचे स्वस्तिक तर हातोडा आणि कोयता ही सोव्हिएट रशियासारख्या कामगार व शेतकरी यांचे राज्य म्हणुन राजकीय संस्कृती जपणाऱ्यांची प्रतिके होत.

अशा या प्रतिकांचा उपयोग स्वतःची सनदशीरता वाढविण्यासाठी व राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्यासाठी शासनाकडून केला जातो. राष्ट्रविषयक निष्ठा नव्याने निर्माण करण्याचे प्रयत्न या प्रतिकातून होत असतात असे ॲलन बॉल यांनी म्हटले आहे. अशा प्रतिकांविषयी असणारे भावनांचे प्रमाण हे राज्यव्यवस्थेतील राजकीय मुल्ये व दृष्टिकोन यांच्याशी समरस होण्यास कारणीभूत ठरते.

- **राजकीय संस्कृतीतील बदल व विकास :**

एकूणच विचार करता राजकीय संस्कृती ही संमिश्र स्वरूपाची व गतिमान असलेली दिसते. ती स्थिर नसते. तिच्यात सातत्याने बदल होत असतो. राजकीय प्रक्रिया समजुन घेण्याच्या दृष्टीने राजकीय संस्कृतीतील बदल किंवा विकास लक्षात घेणे महत्वाचे ठरते.

- **बदलाची कारणे :**

**१) आर्थिक कारण :**

राजकीय संस्कृतीत मुलभुत बदल घडवुन आणण्यास बऱ्याच राजवटी क्रियाशील असतात. त्यासाठी बराच पैसाही खर्च केला जातो. आर्थिक विषमता वाढत गेल्यास किंवा युद्धामुळे अर्थ व्यवस्था कोलमडल्यास साम्यवादी विचारसरणी महत्वाची बनू लागते व लोकशाहीला धोका निर्माण होतो.

**२) सांस्कृतिक कारण :**

क्रांतीपुर्व किंवा स्वातंत्र्यपुर्व काळातील संस्कृतीचा प्रभाव कमी करणे आवश्यक मानले जाते व नवीन

व्यवस्थेस अनुकूल अशी मुल्ये व दृष्टिकोन यांची निर्मिती महत्वाची मानण्यात येते. तसेच नवीन व्यवस्थेला सनदशीरता प्राप्त कारायची असते. तिला स्थिर करायचे असते. तसेच समाज व राज्य यात एकवाक्यता निर्माण करावयची असते.

**३) समाजीकरण :**

राजकीय संस्कृती ही शिक्षित वर्तनप्रकारावर अवलंबून असते. बिगर राजकीय क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभवातून व्यक्तीचे विचार व दृष्टिकोन विकसित होत असतात. या माध्यमांच्या कार्यपद्धतीत बदल झाल्यास राजकीय संस्कृतीत बदल होतो.

**४) सामाजिक व संरचनात्मक :**

राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणण्याचे कार्य विविध पातळ्यावर हाती घेतले जाते. त्यासाठी निरनिराळे मार्ग अनुसरले जातात. त्यामध्ये सामाजिक व संरचनात्मक घटकांना महत्व दिले जाते. काहीवेळा हे आधारच बदलले जातात. पारंपारिक जातिभेदामुळे विषमतेला खतपाणी मिळते आणि त्याचा परिणाम लोकशाही, धर्मनिरपेक्षता निर्माण होण्यास अडथळे येतात. त्यामुळे जातिभेदा विरूद्ध जनमत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

- **बदल घडवुन आणणारी माध्यमे :**

पुढील माध्यमाद्वारे राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणला जातो.

**१) संसुचन (जनसंज्ञापन) माध्यमे :**

यामध्ये मुद्रित माध्यम व इलेक्ट्रॉनिक माध्यम अशा दोन्हींचा समावेश असतो. म्हणजे वर्तमानपत्रे, रेडिओ, टेलिव्हीजन यांचा यात समावेश होतो. राजकीय अभिजन या माध्यमाद्वारे जनतेशी संपर्क साधतात. तसेच जनतेचे राजकीय समाजीकरण करण्यासाठी अशा माध्यमांचा शासन संस्थेमार्फत उपयोग केला जातो. शासन या माध्यमांवर नियंत्रण ठेवुन विशिष्ट विचारसरणीच लोकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करते. ही माध्यमे राजकारणाविषयी लोकांचे ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न करतात. रेडिओ, दुरदर्शनवरून निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षाना त्यांची मते मांडण्यासाठी भारतात याचा वापर अलिकडे केला जात आहे. सामाजिक जाणीवांची लोकामध्ये निर्मिती करणे, एकात्मता वाढीस लावणे, लोकांना नवीन राजकीय संरचनांची माहिती करून देण्यासाठी या माध्यमांचा वापर केला जातो. या माध्यमावर फक्त शासनाचेच नियंत्रण असेल तर किंवा शासनाची मक्तेदारी असेल तर एकजिनसी राजकीय संस्कृती निर्माण करणे, नवीन व्यवस्थेला सनदशिरता प्राप्त करून घेणे सोपे जाते. भारतात आकाशवाणीवर शासनाचेच नियंत्रण आहे. पण असे नियंत्रण नसेल तर विविध मतांची जोपासना होते. अनेक नवीन दुरदर्शनच्या वाहिन्यामुळे लोकांच्या विविध मतप्रवाहाना समजुन घेणे लोकशाही प्रक्रियेत शक्य होते.

**२) विचारप्रणाली :**

आधुनिक काळात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्यासाठी विचारप्रणालीचा खुप वापर केला जातो. मागास समाजातील पारंपारिक अलगता व संकुचित गटनिष्ठा नाहीशी करण्यासाठी व लोकांना आकृष्ट करण्यासाठी एखादी नवीन विचारसरणी स्वीकारली जाते. ॲप्टर यांनी अशा विचार प्रणालीत

'राजकीय धर्म' असे म्हटले आहे. ही नवीन विचारसरणी समाजातील सर्व स्तरापर्यंत पोचविण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रम, वर्तमानपत्र, रेडिओ यांचा वापर केला जातो. लोकामध्ये परिश्रम व त्यागाची भावना वाढीस लावणे, लोकात सामुदायिकता निर्माण करणे, समानता निर्माण करणे, राजकीय संरचना निर्माण करणे, नैतिकता निर्माण करणे, असे अनेक उपयोग ॲप्टर यांनी राजकीय धर्माच्या बाबतीत सांगितले आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर, भारतात धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवादी समाजरचना यासारख्या प्रचलित राज्य व्यवस्थेत उपयुक्त अशा विचारप्रणाली शासनाकडून सादर करण्यात आल्या. तसेच परराष्ट्रधोरणाच्या बाबतीत अलिप्तता किंवा तटस्थता याचा अवलंब करण्यात आला.

**३) राजकीय संघटन :**

विशिष्ट राजकीय जाणीव निर्माण करण्यासाठी, राजकीय संस्कृती जोपासण्यासाठी लोकांना संघटित करणे आवश्यक असते. त्यासाठी महत्वाचे माध्यम म्हणुन निवडणुकांचा विचार केला जातो. संघटनामुळे राजकीय संस्कृतीच्या बदल प्रक्रियेस गती मिळते. भारतात १९५२ नंतर समुदायविकास योजनेसारखे देशव्यापी कार्यक्रम, १९६० नंतर स्वीकारलेली पंचायत राज्य पद्धती, कालबद्ध होणाऱ्या निवडणुका इ. मुळे लोकांचे राजकीय संघटन मोठ्या प्रमाणात झाले.

पारंपारिक किंवा जुन्या सांस्कृतिक चौकटी मोडून टाकण्यासाठी लोकांच्या राजकीय सहभागास साम्यवादी देशात महत्व दिले जाते. राजकीय क्रांतीचा लोकानी अनुभव घेतल्यास त्यांची विचारसरणी बदलेल हा विचार त्यामागे असतो. फॅगेन याने या सदंर्भात क्युबाचे उदाहरण दिले आहे. तिथे क्रांती घडवून आणण्यासाठी लोकांची निदर्शने, समारंभ आयोजित केले जातात. दुर्मिळ साधन संपत्तीचे वाटप केले. लोकांना क्रांतीचा अर्थ समजावुन दिला. केवळ नेतृत्व बदल नाही तर लोकांची वर्तणुक बदलण्याचाही त्यामागे हेतू होता.

**४) राजकीय पक्ष :**

राजकीय संस्कृतित बदल घडवून आणणारे हे महत्वाचे माध्यम आहे. नवीन विचारप्रणाली राजकीय धर्म म्हणुन पुढे मांडणाऱ्या राजकीय पक्षाना ॲप्टर यानी Parties of solidarity असे नाव दिले आहे. विचारांचे दलाल म्हणुन राजकीय पक्ष कार्य करतातच पण त्याच बरोबर आर्थिक, सामाजिक, राजकीय उद्दिष्टे निश्चिम करून त्याद्वारे नवीन मुल्ये व नियमन व्यवस्था ते निर्माण करतात. राजकीय संघटनाचेच हे एक प्रकारे कार्य असते. विशेषतः साम्यवादी देशात व नवीन राज्यात असे पक्ष आढळतात. भारतात जवळजवळ सर्वच पक्ष निवडणुकीच्या काळात व निवडणुकीनंतरही विशिष्ट प्रश्नावर लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतात. तसेच स्वतःची विचारप्रणाली समाजात रूजवण्याचा प्रयत्न करतात.

**५) बाह्य प्रभावशक्ती :**

दळणवळण साधनातील व वाहतूक साधनातील प्रचंड वाढी मुळे व सुविधामुळे बाहेरील घटनांचा प्रभाव एखाद्या देशावर त्वरित होऊ शकतो. वर्तमानपत्रे, दुरदर्शन वृत्तवाहिन्या, फेसबुक, इंटरनेट अशा माध्यमामुळे बाह्यप्रभाव कमालीचा गतिमान झाला आहे. बाहेरील देशातील चांगल्या वाईट गोष्टींचा परिणाम लगेचच आपल्या देशातील घटनांवर जाणवतो. तसेच लोकांच्या होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील स्थलांतरामुळेही मोठे सांस्कृतिक बदल घडून येऊ शकतात. ब्रिटीशांचा प्रभाव भारतावर तसेच अमेरिकेवरही

मोठ्या प्रमाणात झाला तो यामुळेच नवीन ज्ञान व जाणीवा अशा बाह्यशक्तीच्या प्रभावामुळेच होत असतात. तसेच यामुळे मुळच्या संस्कृतीतही बदल घडून येऊ शकतो.

**६) प्राथमिक समुह :**

कुटूंब, शाळा या सारख्या प्राथमिक समुहांचा राजकीय संस्कृतिविषयक बदलावर मोठा प्रभाव पडत असतो. राजकीय संस्कृतीचे लोकशाहीकरण करण्यासाठी प्रथम सामाजिक जीवनाचे लोकशाहीकरण करणे महत्वाचे असते असे आल्मंड यांनी म्हटले आहे. त्यांनी हे विधान जर्मनीतील प्रशियन प्रवृत्तीनुसार म्हणजेच अरेरावी वृत्ती-केले आहे. भारतातही 'सामाजिक समता' व 'सामाजिक न्याय' प्रस्थापित करण्यासाठी, लोकसंख्यावाढीच्या दुष्परिणामांची जाणीव करून देण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात त्याचा समावेश करण्यात आला व तेथूनच राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले.

तेंव्हा विविध माध्यमांद्वारे राजकीय संस्कृतीत बदल घडवून आणला जात असतो. आपण सतत लष्करसज्य व सतर्क असले पाहिजे याची जाणीव १९६२ च्या चीन आक्रमणानंतरच आपल्याला झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणात अण्स्त्रबंदी व नि:शस्त्रीकरणाची जाणीव किंवा त्यासंबंधी नवीन मुल्ये ही हिरोशिमा, नागासाकी वरील अणुबाँबच्या हल्यातील प्रचंडजीवित हानीतुनच निर्माण झाली.

- **मूल्यमापन :**

राजकीय संस्कृती हा राजकीय समाजशास्त्रातील एक महत्वाचा अभ्यास विषय ठरला आहे. व्यवस्थेच्या स्थिरतेसाठी व्यवस्थेत अनुकूल ठरतील अशी मुल्ये किंवा विचारप्रणाली समाजात व विशेषतः नवीन पिढीतील लोकांत निर्माण करण्याचा राज्यकर्त्यांचा कल असतो. यातुनच राजकीय संस्कृती परिपक्व बनत जात असते. अर्थात एकूणच राजकीय संस्कृतीवर आजवर करण्यात आलेल्या विचार विनिमयातून राजकीय संस्कृतीच्या स्वरूपावर दुरगामी असा प्रकाश पडला आहे. राजकीय संस्कृतीचे स्वरूप उलगडून दाखविण्यासाठी त्यासंदर्भात पुढील काही मुद्दे लक्षात घेणे गरजेचे आहे.

१) राजकीय संस्कृतीचा सामाजिक संस्कृतीची उपसंस्कृती म्हणुन विचार केला जातो. कारण राजकारण हे समाजातच जन्माला येते व समाजातील घटकानींच प्रभावित होत असते. त्यामुळे सामाजिक संस्कृतीचा म्हणजे एकूण समाजाचा राजकीय संस्कृतीवर खुप प्रभाव असतो. राजकीय संस्कृती ही सामाजिक संस्कृतीने प्रभावित झालेली एक उपसंस्कृती असते. समाजमान्य मुल्ये ही व्यक्तिमत्वाचा भाग बनलेली असतात. त्यामुळे समाजाचे राजकीय दृष्टिकोन व व्यक्तीचे राजकीय दृष्टिकोन यात बरेचसे साम्य असते. लोकांच्या सर्वसाधारण दृष्टिकोनांचा प्रभाव त्यांच्या राजकीय क्षेत्रासंबंधीच्या दृष्टिकोनावरही पडत असतो व या दृष्टिने राजकीय संस्कृती ही विशाल अशा सामाजिक संस्कृतीची उपसंस्कृती असते.

**२) राजकीय संस्कृतीचे अलगत्व :**

राजकीय संस्कृती ही सर्वसाधारण संस्कृतीशी संबंधित असूनही मोठ्या प्रमाणात अलग व स्वायत्त असले असे आल्मंड यांनी म्हटले आहे. म्हणुनच व्यक्तीची वैयक्तिक मते व वर्तणूक ही तिच्या सार्वजनिक अथवा राजकीय मताहुन निराळी असू शकतात. उदा. पक्षांतर हे अनैतिक आहे असे म्हणणारे सभासदर पक्षांतर बंदी विधेयक आल्यास मात्र नाराजी दाखवितात. द्विभार्या प्रतिबंधाचा कायदा असला तरी

खाजगी जीवनात मात्र ते त्यांचे उल्लंघन करतात. मतदार संघात भाषा व प्रांत यांना योग्य मानणारे नेते राष्ट्रीय धोरण आखताना मात्र भाषा व प्रांतीय निष्ठाना बाजुला करतात व राष्ट्रनिष्ठेला प्राधान्य देतात.

**३) संस्कृतीतील गतिमानता :**

संस्कृती ही परिवर्तनशील असते. तिच्यात सतत बदल होत असतो. त्यामुळे लोकांच्या विचारसरणीतही बदल होत असतो. संसदिय पद्धतीचा स्वीकार, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, लोकशाही समाजवाद हे नवीन बदल समाजात हळूहळू रूजतात. लोकशाही मूल्ये आणीबाणी लादल्यामुळेच विकसित झाली. रशियन राज्यक्रांतीही राजकीय संस्कृतीतील बदलाना कारणीभूत ठरली.

**४) अलिखित स्वरूप :**

राजकीय संस्कृती ही मोठ्या प्रमाणात अलिखित असते. देशाच्या संविधानात ती पूर्णपणे प्रतिबिंबित होतेच असे नाही. उदा. कायदा निर्माण करणारे राजकीय नेते हे कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या सनदी नोकरांपेक्षा श्रेष्ठ असतात. अलिखित स्वरूप म्हणजे एक प्रकारचे राजकीय संकेतच असतात. उदा. घटक राज्याचा मुख्यमंत्री कोणत्याही पक्षाचा असला तरी पंतप्रधान अथवा राष्ट्रपतींच्या भेटी दरम्यान राजकीय शिष्टाचार म्हणून त्यांच्या स्वागताला त्याने हजर रहावेच लागते. हे संकेत म्हणजे अलिखित नियमच असतात.

**५) एकजिनसीपणाचा अभाव :**

राजकीय संस्कृती कधीही पूर्णपणे एकजिनसी नसते. प्रत्येक राजकीय संस्कृतीत विविधता असते. ती 'एकच संस्कती' असे म्हणण्यापेक्षा 'विविध संस्कृतीचे एकत्रीकरण' असते असे हैन्स इलाऊ यांनी म्हटले आहे. अनेक सामाजिक-आर्थिक-पक्षीय-धार्मिक भेद विविध गट व त्यांचे हितसंबंध व दबाव आणि परस्पर विरोधी मुल्यांचे अस्तित्व व प्रभाव यामुळे एकजिनसीपणाचा अभाव असतो.

## ३.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (Check your Progress)

### अ) बहुपर्यायी प्रश्न (Multiple choice questions)

१) समाजाचे स्थैर्य आणि विकास हे कोणत्या व्यवस्थेचे उद्दिष्ट बनले आहे.

(अ) राजकीय (ब) धार्मिक (क) शैक्षणिक (ड) जाती

२) भारताच्या उत्तर सीमांचे रक्षण कोणत्या पर्वतामुळे झाले आहे.

(अ) सह्याद्री (ब) निलगिरी (क) हिमालय (ड) सातपुडा

३) चरखा आणि खादी यांना राष्ट्रीय प्रतीकाचे स्थान कोणी दिले.

(अ) लोकमान्य टिळक (ब) महात्मा गांधी (क) एम. एन. रॉय (ड) डॉ. आंबेडकर

४) शिक्षणाचे धोरण व शिक्षणपद्धती यांत कोणाची भूमिका महत्त्वाची असते.

(अ) कुटुंब (ब) शाळा (क) शिक्षक (ड) शासन

५) राजकीय समाजीकरणाचे मूळचे, महत्त्वाचे व सामर्थ्यवान माध्यम कोणते आहे.

(अ) कुटुंब (ब) शेजारी (क) शाळा (ड) जनसंपर्क माध्यमे

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) चीन व ब्रह्मदेशात कोणत्या धर्माचा प्रभाव दिसून येतो.

२) कोणत्या राजकीय संस्कृतीमध्ये समाजात तीव्र स्वरूपाचे राजकीय मतभेद असतात.

३) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आधुनिक भारताची जडणघडण करण्यासाठी कष्ट घेतलेले पंतप्रधान कोण होते.

४) सर्वच राजकीय पक्षांचे कोणते उद्दिष्ट असते

५) राजकीय समाजीकरणाचे अत्याधुनिक प्रभावी आणि व्यापक माध्यम कोणते आहे

## ३.५ सारांश:

या तिसऱ्या घटकात आपण राजकीय संस्कृतीच्या व्याख्या व त्या आधारे अर्थ याचा अभ्यास केला आहे. राजकीय संस्कृतीचे प्रमुख आधारभूत घटक म्हणून ऐतिहासिक विकास, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, शिक्षण व्यवस्था, राजकीय पक्ष व प्रतीके याबाबतचा अभ्यास केला आहे तसेच राजकीय संस्कृतीचे प्रकारही अभ्यासले आहेत. राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाचे महत्त्व जाणून घेताना तर्कशुद्धता व प्रगल्भता, परिवर्तनाचे विश्लेषण, आधुनिकीकरण, नवीन आव्हाने तसेच व्यक्ती व राजकीय व्यवस्था यातील समन्वय अशा अनेक मुद्द्यांचा परामर्श घेतला आहे.

राजकीय समाजीकरणाचा अभ्यास करताना व्याख्या व अर्थ समजून घेतला आहे. राजकीय समाजीकरणाचे महत्त्व जाणून व्यक्तीचे राजकीय वर्तन व राजकीय सहभाग, लोकमताची जडणघडण तसेच विकसनशील देशांच्या दृष्टीने तसेच सामाजिक शास्त्रातील आंतरसंबंधाच्या अभ्यासात या प्रक्रियेचे महत्त्व जाणून घेतले आहे.

तसेच राजकीय समाजीकरणाची माध्यमे किंवा साधने म्हणून कुटुंब, शिक्षणसंस्था, राजकीय पक्ष, समवयस्क मित्र, जनसंपर्क माध्यमे यांची भूमिका समजून घेतली आहे.

## ३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**अ)**

१) अ – राजकीय

२) क – हिमालय

३) ब – महात्मा गांधी

४) ड – शासन

५) इ – कुटुंब

ब)

१) चीन व ब्रह्मदेशात बौद्ध धर्माचा प्रभाव दिसून येतो.

२) खंडित राजकीय संस्कृतीत समाजात तीव्र स्वरूपाचे राजकीय मतभेद असतात.

३) पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आधुनिक भारताची जडणघडण करण्यासाठी कष्ट घेतलेले पंतप्रधान होते.

४) सत्ता मिळवणे हे सर्वच राजकीय पक्षाचे उद्दिष्ट असते.

५) जनसंपर्क व प्रसारमाध्यमे हे राजकीय समाजीकरणाचे अत्याधुनिक, प्रभावी व व्यापक माध्यम आहे.

## ३.७ स्वाध्याय :

अ)

१) राजकीय संस्कृतीचे आधारभूत घटक स्पष्ट करा.

२) राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाचे महत्त्व विशद करा.

३) राजकीय समाजीकरणाचे साधने स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा** :

१) राजकीय संस्कृतीचे प्रकार

२) राजकीय समाजीकरणाचे महत्त्व

## ३.८ चिंतन व कार्य :

विविध राजकीय पक्षांच्या निवडणूक जाहीरनाम्यांची माहिती घ्या.

## ३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. डॉ. दि. का. गर्दे - आधुनिक राजकीय विश्लेषण,
डॉ. वि. मा. बाचल कॉन्टीनेन्टल प्रकाशन

२. बी. वाय. कुलकर्णी - राजकीय समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर

३. प्रा. बी. बी. पाटील - राजकीय संकल्पना, फडके प्रकाशन

४. दाने-ढोबळे - प्रमुख राजकीय विचारप्रणाली, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

५. इनामदार, पुराणिक - राजकीय समाजशास्त्र, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे.

❑❑❑

घटक – ४

# समकालीन प्रश्न आणि आव्हाने

## (Contemporary Issues and Challanges)


४.१ प्रस्तावना

४.२ उद्दिष्ट्ये

४.३ विषय विवेचन

- ४.३.१ बहुल समाजातील राजकारण
- ४.३.२ राजकीय पक्ष : वैशिष्ट्ये, रचना आणि कार्ये
- ४.३.३ भारतातील राजकीय सहभाग
- ४.३.४ भारतातील कल्याणकारी राज्य आणि लोकशाही

४.४ सारांश

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उतरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ४.१ प्रस्तावना (Introduction) :

जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ख्याती आहे. तसेच भारतातील लोकशाही इतर लोकशाही देशापेक्षा खूपच वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. इथे खऱ्या अर्थाने लोकांची, सर्वसामान्यांची सत्ता आहे. शासनव्यवस्थेवर लोकांचा अंकुश आहे. अर्थात लोकशाही जिवंत ठेवण्यामागे इथले राजकीय पक्षही तितकेच मोलाचे योगदान देतात. अगदी मोजकेच प्रमुख राजकीय पक्ष सोडले तरी इतर अनेक लहानलहान राजकीय पक्ष भरपूर आहेत. हे सर्व लहान–मोठे राजकीय पक्ष भारतातील राजकारणावर आपला ठसा उमटवितात. पण सर्वांचे ध्येय मात्र एकच असलेले दिसते आणि ते म्हणजे भारतातील लोकशाही प्रगल्भ झाली पाहिजे. विकसित झाली पाहिजे आणि जगात एक आदर्श लोकशाही म्हणून तिचा गौरव झाला पाहिजे.

भारतातील राजकारणावर अनेक जाती–धर्माचा जसा प्रभाव आहे, तसाच प्रदेशवाद आणि भाषेचाही त्यावर फार मोठा प्रभाव आहे. भारतातील सामाजिक–सांस्कृतिक वातावरण भारतीय राजकारणाला सतत गतिमान ठेवत आले आहे. तसेच हे विविधतापूर्ण वातावरण सातत्याने भारतीय राजकारणाला प्रवाही ठेवण्यात व वेगळी दिशा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

प्रस्तुत प्रकरणात आपण भारतातील राजकारण, त्यावर प्रभाव टाकणारे विविध सामाजिक घटक,

भारतातील राजकीय पक्ष, त्यांची वैशिष्ट्ये, रचना व कार्ये, तसेच भारतातील राजकीय सहभाग, राजकीय विचारसरणी व सद्यःस्थितीत भारतातील राजकारणाचे स्वरूप कसे आहे या गोष्टींचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

## ४.२ उद्दिष्ट्ये (Objectives)

प्रस्तुत प्रकरणात आपल्याला पुढील गोष्टी लक्षात घ्यावयाच्या आहेत व त्यादृष्टीने उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली आहे.

१. भारतातील राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या विविध सामाजिक व सांस्कृतिक घटकांचे अध्ययन करणे.

२. भारतातील राजकीय पक्ष, त्यांची वैशिष्ट्ये, रचना व कार्ये यांची माहिती घेणे.

३. भारतातील राजकीय सहभागाचे स्वरूप समजावून घेणे.

४. भारतातील राजकारण, सद्यःस्थितीत त्याचे स्वरूप आणि एकूणच राजकीय विचारसरणी यांचा उहापोह करणे.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

प्रस्तुत प्रकरणाची प्रस्तावना व उद्दिष्ट्ये या अनुषंगाने आपल्याला प्रामुख्याने भारतीय राजकारणाविषयीची सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये घ्यावयाची आहे. भारतातील राजकारणाचे स्वरूप कसे आहे, राजकारणावर प्रभाव पाडणारे सामाजिक-सांस्कृतिक घटक मुख्यतः कोणते आहेत; त्यांची भूमिका काय आहे, राजकीय पक्षांची रचना कशी आहे, सत्तापरिवर्तनात राजकीय पक्षांची भूमिका कशी बदलत रहाते, लोकांचा राजकारणात सहभाग कितपत आहे व त्याचे स्वरूप कसे आहे आणि सद्यःस्थितीत भारतीय राजकारण कोणत्या दिशेने जात आहे, त्याचे बदलते स्वरूप कसे आहे अशा अनेक गोष्टींचा परामर्श आपण या प्रकरणामध्ये घेणार आहोत.

### ४.३.१ बहुल समाजातील राजकारण (Politics in Plural Societies)

या चौथ्या घटकात तुम्ही बहुल समाजातील राजकारणासंबंधीचे वादाचे विषय (issues) आणि तेथील राजकारणासमोरील आव्हाने (challenges) यांचा अभ्यास करणार आहात. त्यासाठी प्रथम राजकारण (Politics) आणि बहुल समाज (Plural Society) या दोन संकल्पना थोडक्यात समजावून घेणे उचित ठरते.

**राजकारण :** राजकारण ही सार्वत्रिक, सर्वसमावेशक, संकीर्ण, अखंडपणे चालणारी व परिवर्तनशील अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे राजकारण या संज्ञेचा सर्वमान्य होईल असा अर्थ सांगणे किंवा राजकारणाची व्याख्या करणे अवघड जाते. त्यामुळे विविध विद्वानांनी राजकारणाच्या केलेल्या व्याख्या अभ्यासणे योग्य ठरते.

१) **ॲरिस्टॉटल :** राज्यशास्त्राचा जनक असलेल्या ॲरिस्टॉटलने ''नगरराज्यांतील व्यवहारांचा अभ्यास म्हणजे राजकारण होय.'' असा अर्थ स्पष्ट केलेला आहे. आज सर्वत्र मान्य असलेले राज्याचे १) सार्वभौमत्त्व, २) निश्चित भूप्रदेश, ३) लोकसंख्या, ४) शासनसंस्था (सरकार) हे चार घटक त्याने नगरराज्यापुरते मान्य केलेले होते.

२) **थॉमस हॉब्ज :** पुढे राज्यांचा आकार (भौगोलिक कक्षा) व लोकसंख्या वाढत गेल्याने नगरराज्याची संकल्पना मागे पडली. राज्यांना राष्ट्र-राज्याचा (Nation-State) नवा संदर्भ प्राप्त झाला. या बदललेल्या संदर्भात हॉब्जने ''राज्याच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या व्यवहारांचा अभ्यास म्हणजे राजकारण.'' अशी व्याख्या केली.

राजकारण हे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, निवडणुका, राजकीय पक्ष इत्यादीपुरते मर्यादित असते व मानवी जीवनाच्या इतर क्षेत्रांशी राजकारण संबंधीत नसते असा दृष्टिकोन दीर्घकाळ प्रचलित होता. परंतु आधुनिक विचारवंतांनी विशेषतः राजकीय समाजशास्त्रज्ञांनी अधिक व्यापक अर्थाने व वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून राजकारणाचा अर्थ स्पष्ट केलेला आहे.

३) **मॅक्स वेबर :** या समाजशास्त्रज्ञाने शारीरिक बळाचा वापर करण्याच्या म्हणजेच सक्ती करण्याच्या अधिकाराची मक्तेदारी असणारा मानवी समूह म्हणजे राज्य अशी राज्याची व्याख्या केली. शारीरिक बळाच्या वापरातून सत्ता व्यक्त होते व ही सत्ता हस्तगत करणाऱ्या व्यक्तिच्या वा समूहाच्या आज्ञा सर्वश्रेष्ठ ठरतात. म्हणून ''सत्तेत सहभागी होण्यासाठी व सत्तेच्या वाटपावर प्रभाव टाकण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे राजकारण होय.'' असा अर्थ घेतला जाऊ लागला.

सत्तेत सहभागी होण्यासाठी व्यक्तीव्यक्तीत व समूहांसमूहात संघर्ष होत असतो. म्हणून आज कांहीजण ''सत्ताप्राप्तीसाठी होणारा संघर्ष म्हणजे राजकारण'' असा अर्थ घेतात. याउलट सत्ताप्राप्तीसाठी संघर्ष करणाऱ्या विविध शक्तींमध्ये समन्वय साधण्यासाठी व व्यवस्था टिकविण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे राजकारण असा अर्थ कांहीजण घेतात.

४) **मॉरिस डुवर्जरच्या** मते राजकारण हे संघर्ष व समन्वय या दोन्ही अर्थाने अस्तित्वात असते. संघर्षातच समन्वय अभिप्रेत असतो. सत्तासंघर्षांतून योग्य नेतृत्व पुढे येते व ते समन्वय साधण्याचा प्रयत्न करते. आज निवडणुकीत परस्परांना विरोध करणारे समूह (राजकीय पक्ष) हे निवडणुकीनंतर सत्ता स्थापण्यासाठी (सरकार बनविण्यासाठी) एकमेकांना सहकार्य करतात. त्यामुळे ''राजकारण म्हणजे सत्ताप्राप्तीसाठी होणारा संघर्ष व त्या संघर्षात समन्वय साधण्यासाठी केला जाणारा प्रयत्न होय.'' असा अर्थ घेतला जातो. यासंदर्भात लिओनार्ड फीन म्हणतात की, राजकारणाचा इतिहास म्हणजे संघर्षाच्या निराकरणासाठी प्रभावी मार्ग शोधण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न होय.

५) **डेव्हिड इस्टनच्या** मते ''मुल्यवाटपासंबंधी सर्वांना बंधनकारक ठरणारे निर्णय घेणारी प्रक्रिया म्हणजे राजकारण होय.'' भौतिक साधनसंपत्ती, सामाजिक स्थान, विशेष हक्क इत्यादींचा मूल्यांमध्ये समावेश होतो. या सर्वांचे समाजात वाटप कसे करावे याबाबत मतभेद वा संघर्ष असू शकतो. हा संघर्ष न मिटविल्यास समाजात गोंधळ उद्भवू शकतो. हा गोंधळ टाळण्यासाठी सर्वांना बंधनकारक असे निर्णय घेणारी प्रक्रिया आवश्यक असते. या प्रक्रियेसच इस्टन राजकारण म्हणतो. मानव समाजात ही मूल्य वाटपाची आवश्यकता सर्व स्तरावर व सर्व काळात अस्तित्वात असते. त्यामुळे राजकारण ही सार्वत्रिक व सर्वकालीन अशी प्रक्रिया ठरते. थोडक्यात इस्टनच्या मते सर्व समाजासाठी एखादे धोरण ठरविण्याशी (निर्णय घेण्याशी) संबंधित हालचालींना राजकारण म्हणतात. या अर्थाने राजकारण हे सार्वजनिक धोरण असते.

आधुनिक काळात राजकारण हे सार्वत्रिक व सर्वव्यापी बनले आहे. दैनंदिन जीवनाचा ते अविभाज्य भाग बनले आहे. व्यक्तीचे सर्व प्रकारचे प्रश्न राजकारणाच्या माध्यमातून सोडविले जात आहेत. व्यक्तिगत-कौटुंबिक स्तरापासून ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंतच्या सर्व प्रश्नांची उत्तरे ही राजकारणाच्या व्यासपिठावरून दिली जात आहेत. म्हणूनच आजचे मानवी जीवन हे राजकारणमय बनलेले आहे. थोडक्यात लोकांच्या मागण्या व त्यांच्यासंदर्भात असलेले मतभेद, या मतभेदातून उद्‌भवणारा संघर्ष व त्या संघर्षात समन्वय साधण्याची गरज या बाबी समाजात नेहमीच अस्तित्वात रहात असतात. त्यामुळे राजकारण हे देखील नेहमीच अस्तित्वात असते. इतकेच नव्हे तर संघर्षाचे निराकरण करून समाजात सुव्यवस्था टिकविण्यासाठी राजकारण आवश्यक असते व त्यामुळे ते इष्टही ठरते. म्हणूनच आज प्रत्येक मानवी संघटनेला राजकारणाचा पैलू असलेला दिसतो. ज्यांना आपण बिगर राजकीय संघटना म्हणतो (उदा. व्यावसायिक संघटना, ऐच्छिक मंडळे, शिक्षणसंस्था, धार्मिक संस्था इ.) त्या पूर्णपणे बिगरराजकीय राहिलेल्या नाहीत. त्यांच्यामध्येही राजकारण शिरलेले आहे. म्हणूनच राजकारण सार्वत्रिक व सर्वव्यापी प्रक्रिया मानली जाते.

**बहुल समाज :**

राजकारण म्हणजे काय हे समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही बहुल समाज ही संकल्पना समजावून घेणार आहात. त्यास प्रथम समाज म्हणजे काय हे थोडक्यात समजावून घेऊ. समाज ही केवळ समाजशास्त्राच्याच नव्हे तर सर्वच सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या समाज या संज्ञेत व्यक्तिव्यक्तीतील कोणत्याही प्रकारच्या व स्थितीच्या संबंधांचा (relations) समावेश होतो. अनेक व्यक्ती एकमेकांच्या संपर्कात आल्या की, त्यांच्यात अनेक प्रकारचे परस्परसंबंध निर्माण होतात. त्यांनाच सामाजिक संबंध म्हणतात. हे सामाजिक संबंध अधिक अर्थपूर्ण, सुसंघटीत व स्थायी स्वरूपाचे व्हावेत म्हणून त्यांच्यात एक व्यवस्था (System) निर्माण केली जाते. अशा या सामाजिक संबंधाच्या व्यवस्थेलाच समाजशास्त्रज्ञ समाज असे म्हणतात. **राईट** या समाजशास्त्रज्ञाच्या मते 'समाज म्हणजे केवळ लोकांचा समूह नव्हे, तर त्या समूहातील व्यक्तिंच्या संबंधांची ती व्यवस्था आहे. **डेव्हिड ड्रेसलरच्या** मते ज्यांना आपण सर्व एक आहोत असे वाटते आणि ज्यांची इतराहून वेगळी व सातत्यपूर्ण जीवनपद्धती (म्हणजे संस्कृती) असते अशा लोकांचा मिळून समाज बनतो. **हॉर्टन व हंट** यांच्या मते समान श्रद्धा, प्रथा, मूल्ये व क्रिया यावर आधारलेल्या आंतरक्रिया करणाऱ्या लोकांचा समाज बनतो. मॉरिस गिन्सबर्ग यांच्या मते ''विशिष्ट संबंध व वर्तनाचे प्रकार यांनी एकत्र बांधलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज होय. त्यामुळे अशाऱ्हेचे संबंध न ठेवणाऱ्या किंवा वेगळे वर्तनप्रकार आचरणात आणणाऱ्या व्यक्तींपासून त्या समाजातील व्यक्ती वेगळ्या दिसतात.

वरील विविध व्याख्यांवरून समाज या संकल्पनेविषयी पुढील मुद्दे लक्षात येतात.

- समाज हा व्यक्तींचा मिळून बनलेला एक समूह असतो.
- या समुहातील व्यक्तींच्या परस्परसंबंधात म्हणजेच सामाजिक संबंधात व्यवस्था निर्माण झालेली असते.
- समाजातील व्यक्तींमध्ये ऐक्यभावना असते.

- समाजाची स्वतःची अशी वेगळी जीवनपद्धती असते.
- समाजातील व्यक्ती समान श्रद्धा, प्रथा, मूल्ये व क्रिया यांच्याआधारे एकमेकांशी आंतरक्रिया करीत असतात.
- सामाजिक संबंध, जीवनपद्धती, वर्तनप्रकार इत्यादींच्यामुळे एक समाज इतर समाजांहून वेगळा ठरतो.

थोडक्यात जगात अनेक समाज असून एका समाजातील सर्व व्यक्तींचे सामाजिक संबंध, वर्तनप्रकार व एकंदर जीवनपद्धती (संस्कृती) ही बहुतांशी समान असते. आणि त्यामुळे त्यांना आपण सर्व एक आहोत असे वाटत असते. ही समानता व ऐक्यभावना या आधारे एक समाज इतर समाजांहून वेगळा ठरत असतो.

समाजाच्या स्वरूपाविषयीचे वरील विवेचन हे पारंपरिक समाजाला लागू पडणारे आहे. पारंपरिक समाज हे एकसंघ किंवा एकविध स्वरूपाचे होते. कारण एका समाजातील सर्व सदस्यांमध्ये वंश, धर्म, भाषा, प्रदेश, प्रथा, परंपरा, जीवनपद्धती इत्यादीबाबत मोठ्या प्रमाणावर समानता होती. त्यामुळे त्या समाजात ऐक्यभावना निर्माण होऊन ते समाज टिकून राहिले. तथापि, आधुनिक काळात वाहतुकीची व संप्रेषणाची प्रगत साधने उपलब्ध झाल्याने एका समाजातील व्यक्ती दुसऱ्या समाजात स्थलांतर करून तेथे कायमस्वरूपी वास्तव्य करू लागल्या आहेत. त्यामुळे समाजाचे पूर्वीचे एकसंघ स्वरूप नष्ट होऊन एकाच समाजात विभिन्न प्रकारचे समूह निर्माण झालेले आहेत. या समुहांसमुहामध्ये वंश, धर्म, भाषा, संस्कृती, प्रथा व परंपरा इत्यादीबाबतीत भिन्नता दिसून येते. त्यामुळे आजचे समाज हे खूपच संमिश्र, संकीर्ण व बहुविध स्वरूपाचे बनलेले आहेत. अशा समाजांनाच बहुल समाज (plural societies) म्हटले जाते. बहुल समाजाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या विचारात घेऊ.

**बहुल समाजाची व्याख्या :**

१) **लेखक :** जो समाज विभिन्न वंशाच्या, धर्माच्या, भाषेच्या वा संस्कृतीच्या लोकांचा मिळून बनलेला असतो त्यास बहुल समाज असे म्हणतात.

२) **डिक्शनरी ऑफ सोशिऑलॉजी :** भिन्न भिन्न अशा भाषिक, धार्मिक किंवा वांशिक समुहांमध्ये आणि समुदायांमध्ये विभागलेल्या समाजांना बहुल समाज असे म्हणतात.

३) **ऑक्सफोर्ड डिक्शनरी :** विभिन्न मनुष्यजातीय (ethanic) समुहांनी किंवा सांस्कृतिक परंपरांनी किंवा जिच्यामध्ये मनुष्यजातीय किंवा सांस्कृतिक भेद प्रतिबिंबीत झालेले आहेत अशा राजकीय संरचनेनी बनलेला समाज म्हणजे बहुल समाज होय.

४) **फ्रेडरिक बर्थ :** मनुष्यजातीय भेद असलेल्या लोकांचे एकत्रीकरण म्हणजे बहुल समाज होय.

**बहुल समाजाची उदाहरणे :**

आज जगात अनेक समाज हे बहुल समाज या प्रकारचे आहेत. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, बल्गेरिया, नेदरलँड, सर्बिया, इंडोनेशिया, मॉरिशस, मेक्सिको, फिलिपाईन्स, सिंगापूर, भारत इत्यादी बहुल समाजाची ठळक उदाहरणे आहेत. ऑस्ट्रेलिया व कॅनडा या देशात हिंदू, बौद्ध, इस्लाम, ज्यू, शीख, ख्रिस्ती इत्यादी धर्माचे लोक आहेत. बल्गेरियात विविध वंशाचे व धर्माचे (इस्लाम, ज्यू, ख्रिस्ती, रोमन कॅथॉलिक,

पूर्वेकडील आर्थोडॉक्स) समूह सातव्या शतकापासून आढळतात. सर्बियामध्ये नोंदणीकृत असे १९ वांशिक समूह व सहा भाषिक समूह आढळतात. इंडोनेशियात सुमारे ३०० वांशिक व ७०० भाषिक समूह आहेत. मॉरिशसमध्ये हिंदू, इस्लाम, बौद्ध, रोमन कॅथालिक या धर्माचे लोक आहेत. भारतातही विविध वंशाचे, धर्माचे, भाषेचे, जातीचे, जमातीचे, लोकसमूह असून त्यांच्या जीवनपद्धतीत म्हणजेच संस्कृतीत भिन्नता आढळते.

बहुल समाजात विभिन्न वांशिक, धार्मिक, भाषिक व सांस्कृतिक समूह असून त्यापैकी प्रत्येक समूह आपली स्वतंत्र ओळख (अस्मिता) टिकविण्याचा प्रयत्न करीत असतो. असे असले तरी या विविध समूहात किमान ऐक्य व एकात्मता (Unity and Integraty) निर्माण करण्यावर भर दिला जातो. त्यासाठी आवश्यक त्या घटनात्मक व कायदेशीर उपाययोजना केल्या जातात. उदा. सर्व समूहातील व्यक्तिंना नागरिकत्व, मूलभूत हक्क, स्वातंत्र्ये, विकासाची समान संधी इत्यादी गोष्टी दिल्या जातात. विशेषतः अल्पसंख्यांक समुहांना विशेष सवलती देऊन त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्याची काळजी घेतली जाते. त्यामुळे बहुल समाजात विविधता असूनही 'राष्ट्र' ही संकल्पना साकार झालेली दिसते.

**बहुल समाजातील राजकारण :**

राजकारण व बहुल समाज या दोन संकल्पना समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही बहुल समाजातील राजकारणविषयक वादाचे विषय (Issues) आणि राजकारणासमोरील आव्हाने (challanges) यांचा अभ्यास करणार आहात. हे वादाचे विषय व आव्हाने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) परस्परविरोधी हितसंबंधात समन्वय साधणे :** बहुल समाजातील राजकारणापुढील एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे या समाजातील परस्परविरोधी हितसंबंधात समन्वय कसा साधावयाचा हे आहे. बहुल समाजात वंश, धर्म, भाषा, सांस्कृतिक प्रथा व परंपरा इत्यादीच्या आधारे विविध राजकीय समूह, हितसंबंधी समूह, दबाव गट इ. निर्माण होतात. या समुहांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक हितसंबंध हे केवळ वेगवेगळेच नसतात तर अनेकदा ते परस्परविरोधीही असतात. आपल्या हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी हे समूह प्रयत्नशील असतात. आपल्या मागण्या व अपेक्षा यांच्या आधारे ते राजकीय वर्तन म्हणजेच राजकारण करीत असतात. अशा राजकारणामुळे समाजात संघर्ष निर्माण होत असतो. हा संघर्ष सोडविण्यासाठी राज्यकर्त्यांना विभिन्न समूहांच्या परस्परविरोधी हितसंबंधात समन्वय साधण्याचे कार्य करावे लागते. आणि हे कार्य हे एक मोठे आव्हान असते. यासंदर्भात भारतीय समाजाचे उदाहरण देता येईल. भारतात हिंदू, इस्लाम, ख्रिस्ती, जैन, बौद्ध, शीख, पारशी इत्यादी धर्माचे अनुयायी आहेत. या धार्मिक समूहांच्या श्रद्धा, मूल्ये, आचारविचार यामध्ये भिन्नता आहेच शिवाय कांहीबाबतीत परस्परविरोधही आहे. उदा. हिंदू लोक गाईला पवित्र मानतात व गोहत्त्या करणे व गोमांस खाणे निषिद्धच नव्हे तर पाप मानतात याउलट कांही धार्मिक समूहात या गोष्टी निषिद्ध मानल्या जात नाहीत. यातूनच भारतात अलिकडील काळात राजकारण तापलेले दिसून येते. भारतात हिंदू हे बहुसंख्यांक असून त्यातील कांही व्यक्ती, समूह व संघटना ह्या भारतास हिंदू राष्ट्र बनविण्याची मागणी करतात. याउलट कांही व्यक्ती, समूह व संघटना ह्या भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेली 'धर्मनिरपेक्ष राज्य' ही संकल्पना टिकून रहाण्यासाठी प्रयत्न करतात. अशा या परस्परविरोधी हितसंबंधावर आधारलेले राजकारण संघर्षास कारणीभूत ठरते. हा संघर्ष सोडविण्यासाठी विविध समूहांच्या हितसंबंधात समन्वय साधण्याचे मोठे आव्हान येथील राजकारणासमोर असेल.

**२) संघटन करणे :** बहुल समाजातील विविध समूहात सामाजिक-सांस्कृतिक बाबतीत भिन्नता असते. त्यामुळे कोणत्यातरी एकाच सामाजिक/सांस्कृतिक घटकाच्या आधारे लोकांना संघटीत करणे हे एक मोठे आव्हान ठरते. समजा, धर्माच्या आधारे लोकांना संघटीत करावयाचे ठरविले तरी त्या धर्माच्या अनुयायांमध्ये कितीतरी विविधता (diversity) किंवा विजातियता (heterogeneity) असते. उदा. भारतात हिंदू धर्मियांना संघटीत करावयाचे म्हटले तरी त्यांच्यात शहरी व ग्रामीण, श्रीमंत व गरीब, बुद्धिजीवी व श्रमजीवी, उच्चवर्णिय व निम्नवर्णिय असे कितीतरी भेद आहेत. या भेदांवर मात करून सर्व हिंदूना संघटीत करणे मोठे आव्हान ठरते. धर्म या घटकाप्रमाणेच वंश, भाषा, व्यवसाय, प्रदेश संस्कृती इत्यादी घटकांच्या आधारेही संघटन बांधणे आव्हानात्मक ठरते. त्यामुळे बहुल समाजात लोकांचे संघटन विशेषतः राजकीय संघटन करणे हे एक मोठे आव्हान असते. त्यामुळेच भारतातील प्रत्येक राजकीय संघटनांमध्ये (पक्षांमध्ये) आपणास विविध सामाजिक-सांस्कृतिक घटकांच्या आधारे वेगवेगळे कक्ष (गट) तयार झालेले असतात. उदा. कामगार कक्ष, महिला कक्ष, विद्यार्थी कक्ष, उद्योजकांचा कक्ष, इत्यादी आणि हे विविध कक्ष एकाच संघटनेत राहूनही आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी परस्परांशी स्पर्धा व कांहीवेळा संघर्षही करीत असतात. आणि या संघर्षावर नियंत्रण ठेवणे व सर्व कक्षांमध्ये समन्वय साधून आपले संघटन टिकविणे हे नेतृत्वाच्या दृष्टीने मोठे आव्हान असते. भारतातील काँग्रेस व भारतीय जनता पक्ष यांच्यासह बहुतेक सर्वच राजकीय पक्षांमध्ये असे कक्ष किंवा गटतट आढळतात आणि या गटातटांच्या राजकारणांमुळे राजकीय संघटन टिकविणे अवघड ठरते.

**३) ऐक्य व एकात्मता निर्माण करणे :** बहुल समाजात जे विभिन्न वांशिक, धार्मिक, भाषिक वा सांस्कृतिक समूह असतात त्यांचे परस्परसंबंध कसे असणार हा एक वादग्रस्त व आव्हानात्मक असा प्रश्न ठरतो. कारण कांही वेळा एखादा समूह स्वतःस इतरांपेक्षा श्रेष्ठ मानतो. अशा श्रेष्ठत्वाच्या गंडाने पछाडलेला समूह इतरांपेक्षा वरचढ होण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे विविध समूहात स्पर्धा निर्माण होते. ही स्पर्धा अधिक तीव्र झाल्यास त्यातून संघर्ष उद्‌भवतो. शिवाय श्रेष्ठत्त्वाच्या दाव्यामुळे समाजात विषमता निर्माण होते. ही विषमता नष्ट करून सर्व समूहात ऐक्य, एकात्मता, समता व सलोखा निर्माण करणे व टिकविणे हे एक मोठे आव्हान ठरते. उदा. भारतातील हिंदू समाजात जातीच्या आधारे अनेक समूह निर्माण झालेले आहेत. यातील कांही जातीसमूह स्वतःस इतरांपेक्षा श्रेष्ठ किंवा उच्च मानतात. जातीजातीतील या श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाच्या भावनेमुळे हिंदू समाजात मोठी सामाजिक विषमता निर्माण झालेली आहे. बहुसंख्यांक हिंदुंच्या संपर्कात राहिल्याने भारतातील इतर धार्मिक समूहांतही जातीसदृश्य अनेक समूह निर्माण झालेले आहेत आणि त्या समुहांमध्येही श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना निर्माण झाल्याने सामाजिक विषमतेत आणखीन भर पडलेली आहे. ही सामाजिक विषमता नष्ट करून सर्व समूहांमध्ये राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता निर्माण करणे हे एक मोठे आव्हान आहे.

**४) सत्ता वाटप करणे :** बहुल समाजातील विविध समुहांमध्ये सत्तेचे वाटप कसे करावयाचे हा ही एक मोठा वादग्रस्त विषय व आव्हान ठरते. बहुल समाजातील विविध समुहांमध्ये सत्तेचे वाटप कसे करावयाचे हा ही एक मोठा वादग्रस्त विषय व आव्हान ठरते. बहुल समाजातील विविध समूह हे सत्तेत वाटा मिळविण्यासाठी परस्परांशी स्पर्धा करू लागतात. अशा वेळी जर संपूर्ण सत्ता ही किंवा सत्तेची सूत्रे ही कोणत्या तरी एकाच समूहाच्या हाती गेली तर ते न्याय ठरत नाही. त्यामुळे सत्तेत सर्व समूहांना वाटा

मिळाला पाहिजे. तर विविध समुहातील संबंध सलोख्याचे राहतात. लोकशाहीमध्ये बहुसंख्यांक समुहाकडे सत्तेची सूत्रे जातात. अशावेळी बहुसंख्यांक समूहाकडून अल्पसंख्यांक समूहावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी अल्पसंख्यांक समुहांनाही सत्तेत थोडाफार वाटा दिला गेला पाहिजे. तरच राजकीय व्यवस्था टिकून रहाते. मात्र या विविध समुहांना सत्तेत कशा पद्धतीने सहभागी करून घ्यावयाचे हे एक मोठे आव्हान असते.

**५) व्यक्तिस्वातंत्र्य टिकविणे :** बहुल समाजात व्यक्ति स्वातंत्र्य टिकविण्याचे मोठे आव्हान असते. बहुल समाजात विभिन्न समूह असतात. या समूहांना समाजात सामावून घेण्याचे उद्दिष्ट ठेवावे लागते. त्यामुळे समाज हा एकजिनसी (homogeneous) स्वरूपाचा रहात नाही. समाजातील विविध समूह आपली वेगळी ओळख टिकविण्याचा प्रयत्न करतात. यामुळे समुहास महत्त्व प्राप्त होते व व्यक्तीचे स्थान दुय्यम/गौण बनते. शिवाय समाजातील इतर घटकांपासून आपले रक्षण व्हावे म्हणून हे समूह आपल्या सदस्यांवर अनेक निर्बंध लादतात. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात येते. म्हणून बहुल समाजात व्यक्तिस्वातंत्र्य टिकविण्याचे मोठे आव्हान असते. व्यक्तिस्वातंत्र्य टिकून रहावे म्हणून अनेक बहुल समाजात व्यक्तीला (नागरीकास) अनेक हक्क दिलेले आहेत. कांही समाजात तर व्यक्तिचे हे हक्क राज्यघटनेतच नमूद केलेले आहेत व त्या हक्कांना घटनात्मक संरक्षण दिलेले आहे. असे असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र कांही विशिष्ट व्यक्तिंनाच (किंवा समुहानांच) हे हक्क उपभोगावयास मिळतात आणि दुर्बल/वंचित/उपेक्षित व्यक्तिंना (किंवा समुहांना) मात्र हे हक्क उपभोगावयास मिळत नाहीत. त्यामुळे समाजातील सर्वच व्यक्ती व समूहांना घटनात्मक हक्क कसे उपभोगता येतील व त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्य कसे टिकून राहील हा बहुल समाजातील एक महत्त्वाचा वादाचा विषय ठरतो.

## ४.३.२ राजकीय पक्ष : वैशिष्ट्ये, रचना आणि कार्ये

### ४.३.२.१ राजकीय पक्ष : अर्थ व स्वरूप :

इंग्रजीतील Party हा शब्द Partire (विभाजन) या लॅटिन शब्दापासून बनला असला तरी Part (भाग) या अर्थाने वापरण्यात आला. संपूर्ण व्यवस्थेचा 'भाग' व इतर भागाबरोबर 'सहभाग' या अर्थाने तो रूढ झाला व राजकीय क्षेत्रात विशिष्ट गटांच्या संदर्भात तो वापरण्यात येऊ लागला.

१६ व्या शतकापर्यंत राजकीय पक्ष (Political Party) हा शब्द वापरला जात नव्हता. बोलिंगब्रोक यांनी १८ व्या शतकात राजकीय पक्षासंबंधी केलेले लिखान हे राजकीय पक्षांसंबंधीचेपहिले लिखाण होते. त्यानंतर ह्यूम, बर्क यासारख्या विचारवंतांनी यासंबंधी विस्तृत लिखाण केले. आधुनिक काळात राजकीय पक्षाचा अभ्यास महत्त्वाचा बनू लागला व रॉबर्ट मिचेल्स, ऑस्ट्रोगॉरस्की, मॉरिस दुबर्नर, न्यूमन यांनी या संबंधी अभ्यासपूर्ण लिखाण केले.

राजकीय व्यवस्थेच्या अंतर्गत एक महत्त्वाची उपव्यवस्था या नात्याने राजकीय व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करून देणे, तिच्यातील विसंगतीला सुसंगतीत व परिवर्तीत करण्याचा प्रयत्न करणे, तिच्यातील विविध अंगांचा समन्वय साधण्याचे कार्य करणे हे राजकीय पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

लोकशाही शासन यंत्रणेतील एक महत्त्वाचा घटक म्हणून राजकीय पक्षाला स्थान आहे. शासन यंत्रणा गतीमान ठेवण्यासाठी राजकीय पक्षही एक महत्त्वाची शक्ती असते.

● **व्याख्या** (Definition) :

**१. एडमंड बर्क :**

''सर्वांना मान्य अशा विशिष्ट तत्त्वानुसार संघटितरित्या प्रयत्न करून राष्ट्राचे हितसंवर्धन करण्याच्या हेतूने एकत्र आलेल्या व्यक्तींची संघटना म्हणजे राकीय पक्ष होय.''

(A Poltiical party is a body of men, united for the purpose of promoting by their joint endeavour, the public interest upon same principles on which they are agreed - Edmand Burke)

**२. मॅक्स वेबर :**

''औपचारिकदृष्ट्या मुक्त अशा भरतीवर सदस्यत्व असलेला, सामाजिक संबंधात्मक असलेला, सामाजिक संघटनाचा प्रकार म्हणजे राजकीय पक्ष होय.''

(Political arty means an associative type of social relationship, membership in which rests on formaly free recruitment - Max Weber)

**३) ली कॉक :**

''राजकीय पक्ष हा कमी अधिक प्रमाणात नागरिकांचा एक संघटित समूह असतो. की जो एक राजकीय घटक म्हणनू एकत्रित कार्यरत असतो. लोकांच्या प्रश्नावर ते सहभागी होतात अथवा काही प्रतिक्रिया देण्याचा आव आणतात. तसेच शासनावर नियंत्रण ठेवण्याच्या समान हेतूने आपल्या मत शक्तीचा वापर करतात त्याला राजकीय पक्ष म्हणतात.''

(A political party is a more or less organised group of citizens who act together as a political unit. They share or prefers to share the same opinions on public questions and by exercising their voting power towards a common end seek to obtain control of government – Lea cock)

**४) सिग्मंड न्यूमन :**

''राजकीय पक्ष म्हणजे आधुनिक राजकारणाऱ्या जीवन वाहिन्या आहेत.''

(Political Parties are the life lines of modern politics – Sigmund Newman)

लोकशाही व्यवस्थेमध्ये एक पक्षीय पद्धतीवर आधारीत राजकीय व्यवस्था कधीच स्वीकारली जात नाही. म्हणनूच मन्रो यांनी असे म्हटले आहे की, No party, No Democracy - Munro)

**५) मॅक आयव्हर :**

''राजकीय पक्ष म्हणजे असे एक संघटित मंडल असते की, जे काही तत्त्वांच्या अथवा धोरणांच्या आधारे घटनात्मक मार्गाने शासनाचा एक निर्धारक म्हणून प्रयत्नशील असते.''

(Political party as an association organised in support of some principles Policy which by constitutional means it ___________ to make the determinant, of government - Mac Iver)

थोडक्यात राजकीय पक्ष हा सत्ता प्राप्त करून सार्वजनिक हितपुर्तीचा प्रयत्न करणारा एक गट समजला जातो. जेव्हा सार्वजनिक हिताच्या मुद्यावर समान दृष्टिकोन बाळगणाऱ्या व्यक्ती एकत्र येतात. राजकीय क्षेत्रात काम करतात व आपली समान ध्येय-धोरणे अंमलात आणण्याच्या दष्टीने सत्ता ताब्यात घेण्याचा किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा अशा गटाला राजकीय पक्ष म्हणतात हे वरील सर्व व्याख्यावरून स्पष्ट होते.

### ४.३.२.२ राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये :

एक राजकीय पक्ष म्हणून राजकीय पक्षाची दोन ठळक वैशिष्ट्यो स्पष्ट होतात.

१) व्यक्ती व्यक्ती मधील परस्परसंबंधी कार्य आणि परस्परावलंबी अशा कार्याचा आकृतिबंध.

२) पूर्वनिश्चित अशा ध्येय व उद्दिष्टांचे प्रति बांधिलकी ठेवून त्यांच्याशी तर्कसंगत अशा पद्धतीने कार्य करणाऱ्या सदस्यांच्या माध्यमातून होणारे कार्य.

सर्वसाधारणपणे राजकीय पक्षांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे लक्षण घेता येतात.

१) लोकसमूह अथवा समान हितसंबंधांच्या पाठींराख्याच्या आधारावर राजकीय पक्ष आधारलेला असतो.

२) स्वत:ची निश्चित विचारसरणी आणि कार्यक्रम राजकीय पक्षाकडे असतो.

३) राजकीय पक्ष अशा पद्धतीने संघटीत झालेला असतो की, योग्यवेळी निवडणूक लढविण्यास आणि सत्ता हस्तगत करण्यातत तो सज्ज असतो.

४) निश्चित कालखंडाने होणाऱ्या निवडणुका घटनात्मक मार्गाने जिंकून सत्ता हस्तगत करण्याचे कार्य राजकीय पक्ष करीत असतो.

५) सर्वच राजकीय पक्ष राष्ट्रीय हितसंबंध व राष्ट्रीय कल्याण साधण्याचा ते जोपासण्याचा प्रयत्न करीत असतात.

### ४.३.२.३ राजकीय पक्षाची रचना (पक्षरचनेचे घटक) :

'Political Parties' या पुस्तकात मॉरिस ड्युव्हर्जर यांनी पक्षरचनेचे विश्लेषण करून चार आंतरिक संरचना सांगितल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

**१) अंतरवर्तुळ** (Caucus) :

ही एक प्रभावी समिती असते. त्यान फार थोडे सदस्य असतात. गुणवत्ता व स्थानिक प्रभावाच्या आधारावर हे सदस्य या वर्तुळात सहभागी झालेले असतात. यातील सदस्यत्व मोठ्या प्रमाणात स्थायी स्वरूपाचे असते. प्रामुख्याने निवडणूकीवर त्यांचे लक्ष केंद्रीत होत असते. संख्येने कमी असले तरी पक्षात तेच खऱ्या अथार्ने पक्षश्रेष्ठी (high command) असतात. स्वत:चा प्रभाव व पात्रता यामुळे ते पक्षात सर्वश्रृत व सर्वमान्य असतात. सर्व सदस्य त्यांचे म्हणणे मानतात. बहुधा सर्वच राजकीय पक्षात अशी अंतरवर्तुळे असतात.

२) **शाखा** (Branches) :

पक्षशाखा हा लहान मर्यादित गट नसून तो संख्या बळावर आधारीत असतो. जास्तीत जास्त सदस्यांची त्यात भरती होत असते. या सदस्यातील सर्वच जण सत्ता हस्तगत करण्यासाठी पक्षात आलेले नसतात. बरेचसे कार्यकर्ते, राजकारणाकडे व्यावसायिक दृष्टीने पाहतात (Politicial career) आपल्याला समाजात व राजकारणात काही दर्जा प्राप्त व्हावा म्हणून असे सदस्य अथवा कार्यकर्ते प्रयत्नशील असतात. सत्ता असो अथवा नसो, असे सदस्य पक्षाशी एकनिष्ठ आणि खंबीरपणे पक्षाच्या पाठीशी असतात. केवळ निवडणुकीच्या वेळीच नव्हे तर एरव्हीही पक्ष शाखा कार्यरत असतात. अशा शाखा म्हणजे पक्षाच्या जन्माभिमुख शाखा असतात. शाखेचे कार्य अव्याहतपणे सुरू असते. तिच्यातील अधिकारपरंपराही स्पष्ट असते. मतदार संघातील पक्षरचना व शाखा यांचाही परस्पराशी संबध असतो.

३) **गाभा किंवा पेशी** (Cell) :

सर्वात प्राथमिक पण अत्यंत महत्त्वाचा असा हा पक्षाचा घटक प्रामुख्याने साम्यवादी पक्षानी निर्माण केला. त्याचा रचनात्मक आधार भौगोकिल नसून व्यावसायिक स्वरूपाचा असतो. या घटकाच्या आधारे पक्षाची पाळेमुळे व डोळे हे विविध व्यवसायापर्यंत जाऊन पोहोचतात. कारखाने, दुकाने, वर्कशॉप, ऑफीस इ. ठिकाणी ही रचना असते. एकाच व्यवसायातील व्यक्ती त्यात असतात. त्यमाळे ते रोज परस्पराना भेटतात. यांचा सतत एकमेकांशी संपर्क असतो. पक्षरचनेतील वरिष्ठाकंडून आलेल्या आदेशांचे त्यानां पालन करावे लागते. यातील एखादी पेशी अडचणीत आल्यास इतरांवर त्याचा परिणाम होणार नाही याचीही व्यवस्था हाते असते. लोकशाही केंद्रीकरणाच्या कार्यपद्धतीनुसार वरिष्ठ स्तरावरून सर्वांचे मार्गदर्शन व संसूचन होते या बाबतीत आंतरवर्तुळ व पक्षशाखा या प्रकारापेक्षा पेशी हा प्रकार एकदम वेगळा असतो. पेशींचे कार्य गुप्त स्वरूपाचे असून ते राजकीय स्वरूपाचे असते. त्याचा बराचसा भार कार्यकर्त्यांवर असतो. त्यांना, प्रचार, शिक्षा, आंदोलने, गुप्त कारवाया इ. गोष्टी कराव्या लागतात.

४) **पक्षसैनिक** (Militia) :

आघाडी अथवा पक्षसैनिक हे पक्षातील लढाऊ कार्यकर्ते असतात. अशा पक्षामध्ये सैन्याप्रमाणे श्रेणी रचना असते. सेनेप्रमाणे त्याची विविध घटकामध्ये रचना केलेली असते. सेनेपेक्षाही याना निवडणूका, संसदीय कार्य यात रूची कमी असते. कारण त्यांचा उद्देश व्यवस्था उलथून लावण्याचा असतो. हिटलरची Storm Troopen व मुसोलीनीची Facist Militia ही अशा रचनेची उत्तम उदाहरणे आहेत.

कोणत्याही पक्षाची रचना वरीलपैकी कोणत्या प्रकारावर आधारीत असेल हे त्या पक्षाच्या ध्येयधोरणावर व उद्दिष्टावर आधारीत असते. पक्षाची पायाभूत विचारसरणी ही त्यासाठी विचारात घ्यावी लागते. कोणत्या सामाजिक व राजकीय वातावरणात पक्ष कार्य करतो याचाही रचनेवर प्रभाव पडत असतो. सामान्यत: लोकशाही व्यवस्थेत पक्ष शाखाप्रधान पक्षरचना आढळते. पक्षाच्या घटनेप्रमाणे विविध स्तरातील पदाधिकाऱ्यांची / मंडळांची निवडणूक किंवा नेमणूक देखील होत असते. तसेच त्यांचे परस्पर संबंधही निश्चित होत असतात. परंतु 'लोकशाही व्यवस्थेच्या व बदलत्या परिस्थितीच्यार गरजेनुसार त्यात तडजोडीही होत असतात. त्यामुळे एकाच पक्षात कधी पक्षश्रेष्ठी अंतरवर्तुळ प्रभावी असते. तर कधी पक्षशाखाना प्राधान्य

देण्यात येते. कधी कधी वरीष्ठांच्या म्हणण्यानुसार नेमणुका व निर्णय होतात व पक्षातील निवडणुका पुढे ढकलल्या जातात. लोकशाही पक्षातही काहीवेळा स्थानिक कार्यकर्ते गुंडागर्दी अथवा हिंसक मार्गाचा अवलंब करतात. साहजीकच एकाच पक्षाच्या अंतर्गत विविध रचनांच्या स्वरूपाचे प्रतिबिंब उमटते.

- **राजकीय पक्षपद्धती :**

मतदानाचा अधिकार विस्तृत होत गेल्यानंतर राजकीय पक्षांची संख्याही वाढत गेली व विविध राजकीय पक्षातील परस्पर संबंध निश्चित अथवा नियमित होत गेले. समाजशास्त्रीय दृष्ट्या पाहिल्यास, प्रत्येक राजकीय पक्ष ही एक पद्धतीच असते व जेव्हा अनेक पक्ष अस्तित्वात येतात. तेव्हा या पक्षांच्या परस्पर संबंधातून पुन्हा एक पद्धती अस्तित्वात येते व तिलाच आपण राजकीय पक्ष पद्धती म्हणतो.

राजकीय पक्षांचे कार्य कोणत्या पक्षपद्धतीत ते अस्तित्वात असतात यावरही अवलंबून असते. साम्यवादी पक्षाचे कार्य व भूमिका रशिया सारख्या एकपक्षीय सर्वकष पद्धतीत निराळ्या प्रकारची होती तर ब्रिटन व भारतासारख्या अनुक्रमे द्विपक्ष व एकपक्षीय प्रभुत्व पक्ष पद्धतीत निराळ्या प्रकारची असते. म्हणजेच पक्षपद्धतीचा संदर्भ हा महत्त्वाचा ठरतो. तसेच पक्षपद्धती नेहमी स्थिर नसतात व त्यात बदल होण्याचीही शक्यना असते. लोकशाही व्यवस्थेचे रूपांतर हुकूमशाही व्यवस्थेत झाल्यास एकपक्ष पद्धती अस्तित्वात येऊ शकते. उदा. बांगला देशातशेख मुजिबुररेहमान, जर्मनीत हिटलर, इटलीत मुसोलोनी कारकिर्दीत पक्षपद्धतीत बदल घडून आला.

पक्षपद्धतीचा प्रकार ठरविताना, सर्वसाधारणपणे राजकीय व्यवस्थेत अस्तित्वात असणाऱ्या पक्षांची संख्या तर लक्षात घेतली जातेच पण त्याही पेक्षा सत्तेवर येण्याची कुवत असणाऱ्या किंवा सत्ताधारी पक्षास सत्तेवरून दूर करण्याची क्षमता असणाऱ्या पक्षांचीची संख्या विचारता घेतली जाते. म्हणजेच विशिष्ट पक्षपद्धती वरून त्या व्यवस्थेतील राजकीय पक्षांची संख्या, सत्तेवर येण्याची क्षमता असणाऱ्या पक्षांची संख्या व पक्षातील परस्परसंबंधाचे स्वरूप इ. गोष्टींची कल्पना येणे शक्य होते.

सर्वसाधारणत: पक्षपद्धतीचे पुढील प्रकार आहेत :

१) **द्विपक्षपद्धती** (Bi-party system) :

या पद्धतीत दोन राजकीय पक्ष असतात व ते जवळजवळ तुल्यबळ असतात. त्यामुळे सत्तांतर सहज शक्य असते. आपआपल्या सामर्थ्यानुसार सत्ता हस्तगत करण्याची स्पर्धा त्यांच्यात असते. अनेक लहान सहान पक्ष किंवा मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र अथवा अपक्ष उमेदवार उभे करण्याची पद्धती अशा देशामध्ये नसते. पक्षांतर्गत एकजूट पक्की असल्याने व्यक्तीगत सत्तासंघर्ष अभावनिय असतो, आणि जरी तो असला तरी पक्षशिस्तीच्या अंतर्गत असतो. संसदीय शासनप्रणालीसाठी आदर्श अशी ही पद्धती आहे. इंग्लंड व अमेरिकेत हा प्रकार आढळतो. अमेरिकेतील पक्षपद्धती ही संदिग्ध द्विपक्षपद्धती (Indistinct, Two party system) म्हणून ओळखली जाते. कारण तिथे डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन हे दोन प्रमुख राजकीयपक्ष बऱ्याच प्रमाणात व विशेषत: राष्ट्रीय पातळीवर असंघटित दिसतात. स्थानिक शाखांचे प्रतिनिधी, राष्ट्राध्यक्ष निवडणूकीच्या वेळी एकत्रित येतात व निवडणूकीनंतर पुन्हा घटकराज्यात लक्ष केंद्रित करतात. प्रतिनिधी गृहासाठी स्थानिक पातळीवर पक्ष क्रियाशील असतात. म्हणजेच पक्षात केंद्रीकरण नसते. पक्षांचा विचार सरणीवर फारसा भर नसतो.

२) **बहुपक्ष पद्धती** (Multiparty system) :

या पद्धतीला अनेक पक्ष पद्धतीही म्हणतात. अनेक पक्ष तर असतातच पण त्यापैकी कोणत्याही पक्षास इतर पक्षाच्या सहकार्याने सत्ता संपादनाची संधी असते. या अर्थाने नॉर्वे, स्वीडन, स्वित्झर्लंड, फ्रान्स, इटली इत्यादी देशात अनेक पक्ष पद्धती दिसते. पण यातही शशसनसंस्था स्थिर राहते की, नाही म्हणजेच पक्षापक्षातील सहकार्य स्थिर पायावर असते की, नाही या आधारावर दोन प्रकार पडतात. उदाहरणार्थ, स्वीडन व नॉर्वे या देशात दिसून येणारी स्थिर बहूपक्ष पद्धती (Working or stable multi party system) फ्रान्स व इटली या देशातील बहुपक्ष पद्धतीचा उल्लेख बऱ्याचदा 'अस्थिर बहुपक्ष पद्धती' (unstable multi party system) म्हणून केला जातो.

मतमतांतरे, वैचारिक धृवीकरणाचा अभाव व सत्ता हस्तगत करण्यासाठी एकच विचार सरणी असलेल्या अनेक व्यक्तींचा संघर्ष जिथे असेल तिथे बहुपक्ष पद्धती निर्माण होते. एकेकाळी फ्रान्समध्ये चौतीस पक्ष होते व शासन पद्धती अत्यंत अस्थिर झाली होती. स्वातंत्र्योत्तर भारतात हीच पद्धती अस्तित्वात आली. पण तिच्यातून पक्षांतर, पक्ष विलीनीकरण, पक्ष फूट ही तडजोडपण झाली. राष्ट्रीय ऐक्य व मूल्यापेक्षा विभागीय व स्वार्थ प्रेरित मुल्याना आपण जास्त महत्त्व दिले. त्यामुळे ही पक्षपद्धती आपल्या पदरात पडली. भारतातील बहुपक्ष प्धतीचे वर्णन एक प्रबळपक्ष पद्धती असे करता येईल. काँग्रेस हा एक प्रबळ (Monolitic) पक्ष असल्याने व त्याला सातत्याने निवडणूकामध्ये बहुमत मिळत गेल्याने संसदीय शासन पद्धती असूनही केंद्रात अस्थिरता निर्माण झाली नाही. पण अलिकडे आघाडी युतीची सरकारे भारतात केंद्रात व राज्यात आली. कारण कोणत्याच पक्षाला सत्ता स्थापनेसाठी स्पष्ट बहुमत मिळू शकले नाही. अर्थात पुन्हा २०१४ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे केंद्रात भाजपचे सरकार स्थिर झाले.

३) **एकपक्ष पद्धती** (One party system) :

एक पक्ष पद्धती हा शब्द प्रयोग काही अभ्यासक चुकीचा मानतात. कारण राजकीय पक्ष पद्धती म्हटले की 'अनेक पक्षांचे अस्तित्व' हाच अर्थ अभिप्रेत असतो. एक पक्ष पद्धतीस 'पक्षराज्य' पद्धती (Party-state system) म्हणावे असे त्यामुळेच सास्तोरी यांनी सुचविले आहे.

घटनेनुसार एकच पक्ष अस्तित्वात असतो. उदा. पूर्वीचा सोव्हिएत रशिया. त्यामुळे इतर पक्षाना बंदी असते. तेव्हा सर्वकष पक्ष पद्धती अस्तित्वात असते. तसेच काही वेळा अनेक पक्ष अस्तित्वात असले तरी एकच पक्ष कायमचा सत्तेवर राहतो. एरिक रोई याने अशा पद्धतीला मक्तेदारी पक्ष पद्धती (Monopoly party system) म्हटले आहे. तर दुबर्जर यांनी याला 'शासकीय पक्ष पद्धत' असे म्हटले आहे. भारतात स्वातंत्र्यानंतर बरीच वर्षे अशा प्रकारची व्यवस्था होती. कारण पक्ष अनेक असले तरी सरकार बहुतांश वेळा काँग्रेसचेच होते. अर्थात सत्ताधारी पक्ष विरोधी पक्षाकडून पराभूतही होऊ शकतो. भारतात पण असे घडले.

एक पक्ष पद्धतीत पक्षापक्षातील स्पर्धा किंवा संघर्ष दिसून येत नाही. तसेच सर्वंकष पद्धतीत सामाजिक-आर्थिक-राजकीय इत्यादी सर्वच पक्षाचे संपूर्ण नियंत्रण असते. विशिष्ट विचारसरणीवर पक्षाचा विशेष जोर असतो व शासकीय आणि राजकीय अभिजनांची निवड किंवा समावेश यावर पक्षाचे संपूर्ण नियंत्रण असते.

फॅसिस्ट किंवा नाझी पक्ष किंवा सोव्हिएट रशिया अथवा चीनमधील कम्युनिस्ट पक्ष याला जरी आपण पक्षपद्धती म्हणत असलो तरी लोकशाही अर्थाने ही पक्ष पद्धती नसते. कारण अशा ठिकाणी दडपशाहीच जास्त असते. चीनमधील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दडपशाही व त्यासाठी कम्युनिस्ट नेतृत्वात केलेले बदल ही अगदी अलिकडची घटना आहे.

- **राजकीय पक्षांची कार्ये :**

राजकीय पक्षांचे स्वरूप, त्यांच्या निर्मितीमागील कारणे, त्यांची रचना, वैशिष्ट्ये, कार्यपद्धती याबाबतीत देशादेशात फरक दिसत असले तरी राजकीय व्यवस्थेत विशिष्ट कार्येच राजकीय पक्ष पार पाडताना दिसतात. ही कार्ये सत्ताप्राप्त करण्याच्या उद्देशाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या संबधीत असतात. ही कार्ये सर्वसाधारणपणे पुढील स्वरूपाची असतात.

**१) हितसंबंधांचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करणे :**

प्रत्येक समाजात विशिष्ट प्रकारचे हित संबंध असतात. तसेच हितसंबंधी समूहही असतात. अशा विविध हितसंबंधातील संघर्ष कमी करणे व परस्पर विरोधी हितसंबंधांत समन्वय घडवून आणण्याचे कार्य राजकीय पक्ष करीत असतात. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्याचे शासनाचे कार्य सुकर होते. समाजात व्यापार, उद्योग, शिक्षण, शेती तसेच जात, धर्म, वंश, भाषा, प्रांत इत्यादी अनेक बाबतीत विविध हितसंबंध असतात. त्यातून परस्परविरोधी मागण्या होत असतात. राजकीय पक्ष हे समाजाच्या विविध समूहातून आपल्याला पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे विविध हितसंबंधांचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करण्याचे कार्य राजकीय पक्ष करतात.

**२) मागण्यांच्या परिपूर्तीसाठी लोकांना संघटित करणे :**

लोकांच्या विविध स्वरूपाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी स्वत:कडे सत्ता यावी या उद्देशाने लोकांना संघटित करण्याचे कार्य राजकीय पक्षांना करावे लागते. त्यासाठी ते हितसंबंधी गटाचा पाठींबा मिळवितात. तसेच स्वत:च्या संघटनाही स्थापन करतात. उदा. मजूर संघटना, विद्यार्थी संघटना, शेतकरी संघटना इ. स्वत:ची ध्येय धोरणे यशस्वी व्हावीत म्हणून सत्ताधारी पक्ष लोकांना संघटित करीत असतात. तसाच प्रकार विरोधी पक्षही करीत असतात. स्वत:च्या योजना लोकांपर्यंत जाण्यास व लोकांना न्याय मिळावा म्हणून ते प्रयत्नशील असतात. तसेच सरकार विरुद्ध लोकांना ते संघटित करीत असतात. ज्या मागण्यांच्या मागे दबाव आहे अशा मागण्यांना पुढे रेटण्याचे कार्य राजकीय पक्ष करतात. राजकीय पक्षांच्या या कार्यक्रमामुळेच त्यांना राजकीय संघटक म्हटले जाते.

**३) राजकीय नेतृत्वाची निवड करणे :**

अनेक प्रकारचे निकष लावून राजकीय पक्ष उमेदवारांची निवड करतात व त्यामुळे साहजीकच नेतृत्व निवडीचा समाजाचा प्रश्न सुटण्यास मदत होते. कोणत्याही देशात निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करणे हे कार्य राजकीय पक्षच करीत असतात. अध्यक्ष, पंतप्रधान, मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सदस्य यांची निवड राजकीय पक्षच सगळीकडे करीत असतात.

सनदी नोकर वर्गाच्या नेमणूकीतही राजकीय पक्षाचा सहभाग असतो. ज्या पक्षाची सत्ता असते त्यांच्या

इच्छेनुसार सनदी नोकरवर्गाची नेमणूक करण्याचा अधिकार त्या पक्षाना असतो. अशा नेमणुका किंवा समावेश हे खैरात पद्धतीने केले जाते. परंतु या कार्याला अलिकडे मर्यादा येऊ लागल्या आहेत. कारण अशा नेमणूका प्रामुख्याने गुणवत्तेच्या आधारे केल्या जातात. परंतु राजकीय समावेशनाच्या बाबतीत मात्र राजकीय पक्षांचे महत्त्व वाढले आहे.

**४) राजकीय व्यवस्थेत विशिष्ट मूल्ये टिकवून ठेवणे :**

राजकीय स्थैर्याच्या दृष्टीने मूल्यव्यवस्था महत्त्वाची असते. ही मूल्यव्यवस्था टिकवून ठेवणे किंवा बदलाच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीशी सुसंगत अशी मूल्ये मांडून ती समाजात रुजवणे हे महत्त्वाचे कार्य राजकीय पक्षाला करावे लागते. यासाठी काही राजकीय पक्ष कल्पना व मूल्ये लोकांच्या मनावर सातत्याने बिंबवण्याचे कार्य करीत असतात. विविध प्रकारची मूल्ये ही राजकीय व्यवस्थेचा भागच असतात. उदा. लोकशाही मूल्य, धर्मनिरपेक्षता, साम्यवाद, उदारमतवाद, यासारखी मूल्ये समाजात पसरविण्याचे कार्य राजकीय पक्ष करीत असतात.

**५) राजकीय एकात्मता निर्माण करणे :**

राजकीय पक्ष समाजातील विविध व परस्पर विरोधी हितसंबंधात राष्ट्रहिताच्या दृष्टीने एक वाक्यता निर्माण करण्याचे कार्य करतात असे न्यूमन यांनी म्हटले आहे. काही मूलभूत बाबतीत एक वाक्यता असणे हे राजकीय पक्षाच्या अस्तित्वाच्या दृष्टीने आवश्यक असते. तसेच समाजात कायदा व सुव्यस्था राखण्याच्या दृष्टीनेही आवश्यक असते. हे राजकीय पक्षामुळेच शक्य होते. विविध सामाजिक गटांशी संपर्क साधून त्यांच्यातील मतभेद कमी करण्याचे प्रयत्न राजकीय पक्षच करीत असतात. ते एक प्रकारे राजकीय एकात्मता निर्माण करणारे एजंटच असतात.

**६) शासक व शासित यांच्यातील माध्यम म्हणून काम करणे :**

लोकांच्या इच्छा शासनामार्फत पोहोचविण्याचे माध्यम म्हणजेच मध्यस्थ म्हणूनच राजकीय पक्षांचा १९ व्या व २० व्या शतकात विकास झाला. यामुळेच शासनसंस्था केवळ जबाबदार (Responsible) न राहता प्रतिसादक्षम (respomsive) सुद्धा बनली. लोकांच्या मागण्या शासनापुढे मांडणे, शासकीय धोरणावर लोकांची अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहोचविणे हे कार्य राजकीय पक्ष करीत असतात. शासनाच्या योजना लोकांपर्यंत नेणे व लोकांच्या प्रतिक्रिया, मागण्या शासनापर्यंत पोहोचविणे यासाठी राजकीय पक्ष मध्यस्थांची भूमिका पार पाडतात. हे कार्य राजकीय संप्रेषण (Political communication) म्हणून ओळखले जाते.

**७) लोकांना राजकीयदृष्ट्या क्रियाशिल बनविणे :**

सार्वजनिक हिताच्या अनेक महत्त्वाच्या गोष्टींची माहिती राजकीय पक्ष मतदाराना करून देत असतात. त्यासाठी ते रेडिओ, वर्तमानपत्र, दूरदर्शन, जाहीर सभा, भाषणे, प्रचार मोहिम, पत्रकबाजी अशा माध्यमांचा अवलंब करतात. व लोकांना क्रियाशील बनविण्याचे कार्य करतात. याद्वारे मतदानाचे राजकीय व्यक्तीमत्त्व तयार करण्याची ही प्रक्रिया म्हणजे राजकीय समाजीकरणाचीच प्रक्रिया असते. हे कार्य अर्थातच राजकीय पक्ष करतात.

राजकीय पक्षांच्या या कार्याबाबत मॅक्रिडीस व वॉर्ड यांनी असे म्हटले आहे की, हितसंबंधांचे प्रतिनिधीत्व करणे, त्यांचे एकसूत्रीकरण करणे, ध्येयधोरणे निश्चित करणे, ध्येयपूर्ती साधणे अशी विविध कार्ये राजकीय पक्षाला पार पाडावी लगातात. या सर्व दृष्टिकोनातून राजकीय पक्षाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते.

### ४.३.३ भारतातील राजकीय सहभाग

#### ४.३.३.१ राजकीय सहभाग : अर्थ व स्वरूप :

राजकीय प्रक्रिया ही लोकांच्या सहभागानेच साकारत असते. परंतु लोकांचा हा सहभाग सर्वत्र सारखा मात्र नसतो. तो जसा कमी–अधिक प्रमाणात असतो तसाच निरनिराळ्या स्वरूपाचाही असतो. विशेषत: २० व्या शतकात 'राजकीय सहभाग' सर्वच लोकशाही व्यवस्थात महत्त्वाचा ठरला आहे. तसेच राजकीय समाजशास्त्रातील तो महत्त्वाचा अभ्यास विषयही ठरला आहे.

कमी–जास्त प्रमाणात प्रत्येक व्यवस्थेत सहभाग अभिप्रेत असतो. लोकशाही व्यवस्थेत त्याला जास्त प्राधान्य असते. हुकूमशाही अथवा सर्वकष व्यवस्थेतही सत्ताधाऱ्यांना सहभागाची अपेक्षा असते. पण हे सहभागीत्व केवळ टाळ्या वाजवणे, मान हलविणे एवढ्यापुरतेच मर्यादित असते.

ज्या तत्त्वानुसार लोकशाही व्यवस्थेत संमती मिळते किंवा काढून घेण्यात येते आणि राज्यकर्ते ज्यांच्यावर राज्य करतात त्यांना उत्तरदायी ठरतात. या तत्त्वावर राजकीय सहभाग निश्चित हाते. ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इ. देशात तो अधिक आहे. भारतातही हा राजकीय सहभाग मोठ्या प्रमाणात वाढतो आहे.

वुडवर्ड आणि रोपर यांनी राजकीय सहभागाच्या दृष्टीने काही कृती नागरिकांकडून केल्या जाणे अपेक्षित मानले आहे त्या कृती म्हणजे –

१) निवडणूकीच्या वेळी मतदान करणे.

२) शक्य असेल किंवा इच्छा असेल अशा दबाव गटांचे सदस्यत्व स्वीकारून त्यांना पाठींबा देणे.

३) व्यक्तिगतरित्या, विधिमंडळातील आपल्या प्रतिनिधींकडून सरळ संसुचन करणे.

४) राजकीय पक्षांच्या कार्यात भाग घेऊन आपला विधीमंडळातील सदस्यावर दबदबा निर्माण करणे.

५) राजकीय विचारांचा सतत उच्चार व प्रसार करणे.

रॉबर्ट डाल यांनी राजकीय सहभाग विषयी असे म्हटले आहे की, सत्ताधारी वर्गाशिवाय इतर तीन प्रकारचे लोकही असतात. ते म्हणजे सत्तेसाठी प्रयत्न करणारे, राजकारणात स्वारस्य असणारे व राजकारणात स्वारस्य नसणारे.

राजकीय सहभाग हा केवळ मतदाना पुरता मर्यादित नसतो. मतदाना व्यतिरिक्त सभा, निदर्शने, चळवळी, चर्चा, वादविवाद यासारख्या अनेक गोष्टीतून व्यक्ती राजकारणात सहभागी होत असतात. मतदान हा तसा तात्पुरता राजकीय सहभागाचा प्रकार असतो. साहजीकच राजकीय सहभाग ही एक व्यापक संकल्पना आहे.

आधुनिक काळात, निवडणुक पद्धती, विधीमंडळ व मंत्रिमंडळ पद्धतीचा विकास, राजकीय पक्षांची निर्मिती व वाढ, हितसंबंधी गटांची निर्मिती व दबावाच्या राजकारणाची सुरूवात, वर्तमानपत्रे व रेडीओ तसेच दूरदर्शन अशा प्रसार माध्यमांची मोठ्या प्रमाणातील उपलब्धता व राजकीय सहभागासंबधीचे मिळालेले विविध हक्क इत्यादी कारणामुळे राजकीय सहभागाची गुणात्मक व संख्यात्मक व्याप्ती वाढत गेली व राजकीय सहभाग ही संकल्पना अधिक व्यापक बनली.

लेस्टर मिलब्रॅथने राजकीय सहभागाचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

१) **सराईत कृती** (Gladiatorial activities) :

राजकीय पक्षातील अशा थोड्यांचा यात समावेश होतो. जे पक्षाच्या कार्यात घनिष्ठ असतात. उदा. पदे सांभाळणे, निवडणूकीला उभे राहणे, निधी गोळा करणे, प्रचारात सहभागी होणे, थोडक्यात क्रियाशील लोकांचा यात समावेश होतो.

२) **स्थित्यंतर कालीन कृती** (Transitional activities) :

सभांना हजर असणारे, ऐकून घेणारे पण क्रियाशील नसणारे अशांचा यात समावेश होतो. असे लोक हे पक्षनिधीला पैसे देतात व पक्षातील नेते व अधिकारी यांच्याशी संपर्क ठेवतात.

३) **प्रेक्षक कृती** (Spectator activities) :

हे लोक मतदान करतात. तसेच विशिष्ट प्रकारे मतदान करा, विशिष्ट पक्षाला अगर उमेदवाराला मत द्या, म्हणनू आग्रह धरतात व आपल्या छातीवर राजकीय पक्षाचा बिल्ला लावून आपल्या राकीय हालचालींचे प्रदर्शन करतात.

म्हणजेच या प्रकारावरून हे स्पष्ट होते की, लोकांचा सहभाग हा क्रियाशील स्वरूपाचा (active) तर काहींचा स्थितीप्रिय (Passive) असतो. कारण वेळ, शक्ती अणि पैसा खर्च कणे सर्वांनाच सारख्या प्रमाणात शक्य नसते. काहीनी सहभागीत्वाचे वर्गीकरण त्यांच्या उद्दिष्टानुसार साधनात्मक (Instrumental) व भाव प्रकटनात्मक (Expressive) असे केले आहे.

- **राजकीय सहभागाशी संबंधीत घटक :**

राजकीय सहभाग चार घटकांशी संबंधित असतो असे मिलब्रॅथ यांनी म्हटले आहे.

१) **राजकीय चेतनेचे प्रमाण :**

सामाजिक संपर्काचे प्रमाण व राजकीय चेतना यांचा जवळचा संबंध आहे. जेवढा राजकीय संपर्क जास्त तेवढी सहभागाची चेतना अधिक होत जाते.

२) **व्यक्तींची व्यक्तिगत गुणवैशिष्ट्ये :**

व्यक्तीचा स्वभाव, क्षमता, ज्ञान, दृष्टिकोन या सर्वांचा परिणाम व्यक्तींच्या राजकीय सहभागावर होत असतो. एकूण व्यक्तीमत्त्व व्यक्तीचा राजकीय सहभाग ठरवित असतो. व्यक्तीचे होणारे राजकीय समाजीकरण या बाबतीत महत्त्वाचे ठरते.

**३) व्यक्तींची सामाजिक गुणवैशिष्ट्ये :**

व्यक्तीची समाजप्रियता, मोकळेपणा यावर राजकीय सहभाग अवलंबून असतो. शिक्षण, उत्पन्न, व्यावसायिक दर्जा, सामाजिक स्थान, यावर राजकीय सहभाग ठरत असतो.

**४) राजकीय व्यवस्थेचे स्वरूप :**

व्यक्ती ज्या राजकीय व्यवस्थेचा घटक असते त्या व्यवस्थेचे स्वरूप व व्यवस्थांतर्गत एकूण परिस्थिती यांचाही व्यक्तीच्या राजकीय सहभागावर परिणाम होतो. कारण व्यवस्थांतर्गत अनुकूलता, राजकीय सहभागाला प्रेरित करीत असते. लोकशाही व्यवस्थेत अशी अनुकूलता अधिक असल्याने राजकीय सहभागाचे प्रमाण अधिक असते. प्रौढ मतदानाचा हक्क हा लोकशाहीतील राजकीय सहभाग वाढविणारा महत्त्वाचा घटक आहे.

**५) इतर घटक :**

वर्गरचना, प्रादेशिक भेद, मतदान विषयक अटी, शिक्षण, उत्पन्न, व्यवसायिक दर्जा, राजकीय चर्चा, निदर्शने, ऐच्छिक संघटना, कार्यकर्त्यांची गर्दी, परिस्थितीजन्य घटक अशा अनेक गोष्टींचा परिणाम व्यक्तींच्या राजकीय सहभागावर होत असतो.

**४.३.३.२ राजकीय सहभाग आणि भारत :**

भारतासारख्या नवोदित लोकशाही देशात व विकसनशील राष्ट्रातील राजकीय सहभाग विविधांगी स्वरूपाचा आहे. इथे सक्रीय राजकारणात रस असणारे, सक्रीय राजकारणात रस नसणारे पण राजकारणाबद्दल आस्था असणारे, आणि राजकारणात अजिबात रस नसणारे व राजकारणापासून अलिप्त असणारे अशा अनेक प्रवृत्ती आहेत. राजकारण हा ज्यांचा पेशा आहे असे सक्रीय राजकारण सातत्याने प्रवाही, जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करतात. राजकीय सहभाग सातत्याने वाढविण्याचा प्रयत्न करतात. पण एकूणच भारतातील राजकीय सहभाग हा संमिश्र स्वरूपाचा आहे. कारण अतिसहभाग असणारा सध्या एक वर्ग राजकारात आहे; आणि राजकारणात सहभाग वाढावा म्हणून इतर लोकांना उद्युक्त करावे लागते ही दुसरी बाजू आहे. पण जो सहभाग आहे तो स्त्री-पुरुष, ग्रामीण-नागर, शिक्षित, अशिक्षित, नोकरदार व बेकार, विविध जाती वर्ग-धर्म-भाषिक समूह इत्यादी सर्वांमध्येच कमी जास्त प्रमाणात आहे. त्यात सुसूत्रता अथवा सारखेपणा दिसत नाही. काही घटकांच्या बाबतीत हा सहभाग अधिक तर काही घटकांच्या बाबतीत तो काळजी करण्यासारखा चिंतनीय स्वरूपाचा आहे.

राजीव गांधी पंतप्रधान सअताना प्रौढ मतदानाचे वय २१ वरून १८ वर्षे करण्यात आले. त्यामुळे तरूणांना एकदमच आपला हक्क बजावण्याची संधी मिळाली. त्यातून तरूणांचा राजकीय सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला. तरूणांच्यात एकदमच राजकीय जागृती झाली. साठी पार केलेले लोकही मोठ्या आस्थेने मतदानाला बाहेर पडतात. पण मध्यमवर्गीय व प्रामुख्याने नोकरदार यांना मात्र राजकीय सहभागाबद्दल तशी अनास्थाच जाणवते. पण स्त्रियांचा सहभाग वाढतो आहे हे पण एक आशादायक चित्र भारतीय राजकीय सहभागांच्या बाबतीत आढळते.

७३ व्या घटना दुरुस्तीने स्त्रियांचा प्रत्यक्ष राजकारणातील सहभाग वाढविण्यास मदत झाली. त्यांना

३३ टक्के आरक्षण मिळवून दिले. ग्रामपंचायत ते विधीमंडळ व पार्लमेट अशा व्यापक स्वरुपात स्त्रिया राजकारणात सक्रीय बनल्या. पुरुषांच्या बरोबरीने त्यांचा राजकीय क्षेत्रातील वावर वाढला.

प्रसारमाध्यमे, सोशल मिडीया यामुळेही लोकांचा राजकीय सहभाग वाढण्यास मदत झाली. वेगवेगळी न्यूज चॅनेल्स केवळ राजकीय जागृतीसाठीच प्रयत्न करताना दिसतात. निवडणुकविषयक ताज्या घडामोडी, त्याविषयी चर्चा, परिसंवाद, भाषणे, मुलाखती यांचे आयोजन करून लोकांच्यात मोठ्या प्रमाणात राजकारणाविषयी जागृती घडवून आणण्याचे व राजकीय सहभाग वाढविण्याचे काम करतात.

एकमेकांना नामोहरम करण्यासाठी आणि आपलीच सत्ता स्थापन करण्यासाठी वेगवेगळे धर्म, जाती, भाषिक समूह, प्रादेशिक पक्ष यांच्यातही राजकीय सहभागाच्या बाबतीत स्पर्धा वाढताना दिसत आहे. पण त्याच बरोबर निवडणुकीच्या वेळी सुट्टी घेऊन सहलीला जाणाऱ्या नोकरदार वर्गाची संख्या वाढते आहे हा मात्र चिंतेचा तसेच राजकीय अनास्थेचा विषय बनत आहे.

भारतीय राजकारणातील सहभागाविषयी एक कळीचा मुद्दा म्हणजे इथला राजकीय सहभाग हा संधिसाधू  स्वरूपचा आहे. आपले हित जोपासणे अशी स्वार्थ प्रवृत्ती त्यामुळे राजकारणात बोकाळत आहे.

राष्ट्रनिष्ठा, समाजाच्या कल्याणाची व विकासाची भावना शासन व्यवस्थेतील दोषांचे निराकरण, जुलम व अन्याय, अत्याचारापासून नागरिकांना मुक्ती इत्यादी विविध कारणांनी तत्कालीन सहभाग वाढू शकतो. सामान्यपणे, राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आंदोलन, राजकीय सुधारणा, न्याय्य हक्क व समानता, धर्म निरपेक्षता, दारिद्र निरक्षरता, बेकारी निर्मूलन इत्यादी बाबीसाठी राजकीय सहभाग निर्माण होतो तेव्हा त्याची कारणे होकारात्मक व आदर्शात्मक असतात.

सद्य:स्थितीत गुंड प्रवृत्तीच्या, बळाचा व अपशब्दांचा राजरोसपणे वापर करणाऱ्या मद्यधुंत असणाऱ्या नेत्यांची हुजरेगिरी करणाऱ्या आणि राष्ट्रहित व समाजहिताच्या कल्पनांचा केवळ मुखाने उच्चार करून त्या भांडवलावर स्वत:चे उखळ पांढरे करून घेणाऱ्यांचे सहभागित्व हीच राजकीय सहभागित्वाची जाहीर निशाणी ठरते. असा राजकीय सहभाग लोकशाहीला व राजकीय विचाराला हानिकारक ठरतो. महात्मा गांधीनी संसदीय लोकशाहीत कोणते संभाव्य दोष निर्माण होऊ शकतात याचे स्वातंत्र्यापूर्वी काही वर्षे केलेले विवेचन हे यासंदर्भात महत्त्वाचे ठरते.

### ४.३.४ भारतातील कल्याणकारी राज्य आणि लोकशाही (Welfare State & Democracy in India)

याठिकाणी तुम्ही प्रथम कल्याणकारी राज्याची संकल्पना समजावून घेणार आहात. भारतातील कल्याणकारी राज्यासमोर कोणती आव्हाने आहेत याचा अभ्यास करणार आहात, आणि त्यानंतर लोकशाही ही संकल्पना व भारतातील लोकशाहीसमोरील आव्हाने समजावून घेणार आहात.

**कल्याणकारी राज्य** (Welfare State) :

कल्याणकारी राज्य ही एक आधुनिक संकल्पना आहे. आधुनिक राज्ये ही कल्याणकारी राज्ये मानली जातात. पारंपरिक समाजात आपल्या प्रजेचे परचक्रापासून (परकीय आक्रमणापासून) संरक्षण करणे व समाजात शांतता व सुव्यवस्था राखणे ही राज्याची दोन प्रमुख कार्ये मानली जात. आधुनिक काळात मात्र,

राज्याने वरील दोन कार्याशिवाय आपल्या प्रजेच्या कल्याणाचेही कार्य पार पाडले पाहिजे, किंबहुना हेच राज्याचे प्रधान कार्य आहे हा विचार प्रबळ बनला व त्यातूनच कल्याणकारी राज्य ही संकल्पना रूढ झाली. आज जगातील बहुतेक सर्वच राज्ये ही स्वतःला कल्याणकारी राज्य मानतात व आपल्या नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी स्वीकारताना दिसतात. भारतानेही कल्याणकारी राज्यांची संकल्पना स्वीकारलेली असून भारतीय जनतेचे सर्वांगिण कल्याण करण्याचे, तिला सुखी समाधानाचे जीवन उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न भारतातील राज्यसंस्था वा शासनसंस्था करीत आहे. तथापि, कल्याणकारी राज्य या संकल्पनेची अंमलबजावणी करताना भारतासमोर अनेक आव्हाने आहेत. ही आव्हाने समजावून घेण्यापूर्वी प्रथम कल्याणकारी राज्य ही संकल्पना संक्षिप्त स्वरूपात तुम्ही समजावून घेणार आहात.

**कल्याणकारी राज्याचा अर्थ व व्याख्या :** कल्याणकारी राज्य ही संकल्पना अत्यंत संकीर्ण, व्यापक, सर्वसमावेशक व लवचिक अशी आहे. त्यामुळे तिचा नेमका अर्थ स्पष्ट करणे कठीण होते. स्थलमानाने जे राज्य आपल्या जनतेच्या सर्वांगिण कल्याणाची जबाबदारी स्वीकारते त्यास कल्याणकारी राज्य असे म्हणता येते. कल्याणकारी राज्य हे जनतेच्या गरजांची पूर्तता करणे, तिला सामाजिक सुरक्षा पुरविणे, समाजात शांतता व न्याय प्रस्थापित करणे, इत्यादी कार्यास प्राधान्य देत असते. कल्याणकारी राज्याचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी अभ्यासकांनी या संकल्पनेच्या केलेल्या व्याख्या विचारात घेणे उचित ठरते. कांही व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) **लेखक :** आपल्या नागरिकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, परिवहन, संप्रेषण, मनोरंजन इत्यादी गरजांची किमान पातळीवर पूर्तता करण्याची व त्यांना आपला विकास घडवून आणण्याची समान संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या राज्यास कल्याणकारी राज्य म्हणता येते.

२) **आर्थर श्लेसिंगर :** कल्याणकारी राज्य ही अशी व्यवस्था आहे की, जिच्यामध्ये शासनसंस्था ही आपल्या सर्व नागरिकांना निश्चित पातळीपर्यंत रोजगार, उत्पन्न, शिक्षण, वैद्यकीय मदत, सामाजिक सुरक्षा, आणि निवारा उपलब्ध करून देण्याशी सहमत असते.

३) **जी. डी. एच. कोल :** कल्याणकारी राज्य म्हणजे असा समाज की ज्यामध्ये प्रत्येक नागरिकास किमान जीवनमानाची व प्रगतीची संधी उपलब्ध असते.

४) **टी. डब्लू. केंट :** आपल्या नागरिकांना विविध प्रकारच्या सामाजिक सेवा उपलब्ध करून देणाऱ्या राज्यास कल्याणकारी राज्य म्हणतात.

वरील व्याख्यांवरून हे लक्षात येते की, जे राज्य आपल्या नागरिकांच्या किमान गरजांची पूर्तता करण्यासाठी व त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध असते त्यास कल्याणकारी राज्य म्हटले जाते.

**कल्याणकारी राज्याची कार्ये :**

वरील विवेचनावरून कल्याणकारी राज्याची पुढील कार्ये सांगता येतात.

**१) गरजापूर्ती :** कल्याणकारी राज्य आपल्या नागरिकांच्या विविध गरजांची पूर्तता करून त्यांना किमान जीवनमान उपलब्ध करून देते. त्यासाठी त्यांना विविध सेवा व सोयी सुविधा पुरविते. अन्न व पाणीपुरवठा, ऊर्जा, वाहतूक, संप्रेषण, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादी पायाभूत सुविधांचा विकास घडवून आणते.

**२) रोजगार वृद्धी :** नागरिकांना आपल्या गरजा पूर्ण करता याव्यात म्हणून त्यांना रोजगार उपलब्ध करून देऊन पर्याप्त उत्पन्न मिळवून देते. बेरोजगारांना भत्ता देण्याची व्यवस्था करते. रोजगार वृद्धी व्हावी म्हणून नैसर्गिक व मानवी साधनसंपत्तीच्या विकासाचे प्रयत्न करते.

**३) दुर्बल घटकांवर विशेष लक्ष :** कल्याणकारी राज्य हे दुर्बल वा वंचित घटकांच्या कल्याणावर विशेष लक्ष देते. त्यांना विविध सामाजिक सेवा निशुल्क वा अल्पशुल्कात पुरविण्याची व्यवस्था करते. त्यांचे इतर घटकांकडून शोषण होणार नाही याची काळजी घेते. त्यासाठी विविध सामाजिक कायदे (Social Legislations) करून त्यांची अंमलबजावणी करते व दुर्बल घटकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करते. दुर्बलना अशा सुविधा मिळणे हा त्यांचा न्याय हक्क आहे अशी कल्याणकारी राज्याची भूमिका असते.

**४) आर्थिक विषमता कमी करणे :** कल्याणकारी राज्य हे समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी प्रयत्नशील असते. त्यासाठी समाजात संपत्तीचे विकेंद्रीकरण करण्यावर भर देते. दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी लागणारा पैसा उपलब्ध व्हावा म्हणून श्रीमंतावर विविध कर (Taxes) बसविते. त्यांच्याकडून अर्थसाहाय्यही मिळविते. श्रीमंताना कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत सहभागी करून घेते. उदा. उद्योजकांना कामगार कल्याणांच्या योजना राबविण्यासाठी भाग पाडते, प्रोत्साहन देते. कल्याणकारी कार्यासाठी श्रीमंताकडून देणग्या व निधी मिळविते.

**५) श्रीमंतासाठीही कार्ये :** कल्याणकारी राज्य केवळ दुर्बल वा गरिब घटकांच्या कल्याणाचेच कार्य करते असे नसून ते श्रीमंताच्या लाभाचीही कांही कार्ये पार पाडते. उदा. ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या वास्तू, स्मारके, शिलालेख, लेण्या, गुहा, इत्यादींचे संरक्षण व संवर्धन करते. कला, क्रीडा, साहित्य, गीत संगीत, नाट्य इत्यादींना प्रोत्साहन देते. उद्याने, क्रीडांगणे, वस्तुसंग्रहालये, ग्रंथालये, सभागृहे, प्राणीसंग्रहालये इ. उभारते. याचा लाभ गरिबांबरोबरच श्रीमंतानाही होतो. समाजकल्याणासाठी विशेष कार्य करणाऱ्यांना पदव्या/किताब देऊन त्यांचा गौरव/सन्मान करते. गरिबांबरोबरच श्रीमंतांनाही व्यक्तिविकासाची संधी देते.

**६) इतर कार्ये :** कल्याणकारी राज्य समाजात शांततेचे, सुव्यवस्थेचे, न्यायाचे वातावरण प्रस्थापित करण्याचे कार्य करते. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करते. त्यांच्या ठिकाणी कर्तव्यभावना, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रनिष्ठा निर्माण करण्यावर भर देते. विविध सामाजिक समस्यांच्या/अनिष्ट प्रथापरंपरांच्या निराकरणाच्या योजना राबविते. त्यासाठी आर्थिक-सामाजिक जीवनाचे नियमन (regulation) करते. अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्यक्रम/योजना राबविते. इत्यादी.

**कल्याणकारी राज्याच्या उदयाची कारणमीमांसा :** कल्याणकारी राज्याची संकल्पना उदयास येण्यास पुढील घटक कारणीभूत ठरले.

**१) कामगार वर्गाची दयनिय स्थिती :** औद्योगिक क्रांतीनंतर समाजात भांडवलदार व कामगार हे दोन नवे वर्ग उदयास आले. भांडवलदार वर्ग अधिकाधिक नफा मिळविण्याच्या हेतूने कामगारांचे शोषण करू लागला. त्यामुळे कामगार वर्गाची स्थिती अत्यंत दयनिय झाली. आपली ही दयनिय स्थिती सुधारण्यासाठी भांडवलदार वर्ग व त्याची पाठराखण करणारी राज्यसंस्था यांच्या विरोधात लढा उभारला पाहिजे अशी जाणीव कामगार वर्गात झाली. यातूनच कामगार संघटना स्थापन झाल्या व त्यांनी कामगाराबरोबरच इतरही वंचित घटकांच्या उन्नतीसाठी संघर्ष सुरू केला. पुढे १९३० मध्ये आलेल्या जागतिक मंदीमुळे कामगार वर्गाचा राज्यसंस्थेवरील विश्वास उडाला. त्यामुळे कामगार संघर्षाची/लढ्याची धार कमी करण्यासाठी व कामगार वर्गाचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी भांडवलदारांना व राज्यकर्त्यांना कामगार कल्याणासाठी कांहीतरी उपाय योजना केली पाहिजे याची जाणीव झाली. यातूनच कामगार कल्याणाचे कायदे व योजना अंमलात येऊ लागल्या व कल्याणकारी राज्याचा उदय झाला.

**२) समाजवादास अटकाव करणे :** जर्मन तत्त्वज्ञ कार्ल मार्क्स याने भांडवलशाही व्यवस्था ही अन्यायकारक व शोषण करणारी असल्याने जगातील सर्व कामगारांनी एकत्र येऊन क्रांतीद्वारे भांडवलशाही व्यवस्था व भांडवलदार वर्ग नष्ट करावा व उत्पादन साधने व राज्यसंस्थेवर वर्चस्व मिळवून समाजवादी समाजरचना निर्माण करावी असे तत्त्वज्ञान मांडले. या तत्त्वज्ञाने प्रभावित होऊन रशिया, चीन व इतर कांही पूर्व युरोपियन राष्ट्रात क्रांती होऊन समाजवादी व्यवस्था प्रस्थापित झाली. या राष्ट्रांनी जगातील इतर राष्ट्रांत समाजवादाचा प्रसार व प्रचार व्हावा म्हणून प्रयत्न सुरू केले. त्यामुळे भांडवलशाहीस धोका निर्माण झाला म्हणून अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इत्यादी भांडवलशाही राष्ट्रांनी समाजवादास अटकाव करण्यासाठी कामगार वर्गांचा अनुनय करण्यास प्रारंभ केला. त्याच्या कल्याणाचे कार्यक्रम सुरू केले. कामगारांना वेतनवाढ, बोनस, भत्ते, रजा, सुट्ट्या, घरे, शिक्षण, आरोग्य, विमा इ. सुविधा देण्यास सुरुवात केली. परिणामी, कल्याणकारी राज्य ही संकल्पना उदयास आली.

**३) तात्त्वीक घटकाचा प्रभाव :** १९ व्या शतकात जेरिमी बेंथम, जे. एस. मिल्ल इ. उपयुक्ततावादी विद्वानांनी जनकल्याण करणे हे राज्याचे कर्तव्य मानले. २० व्या शतकात हॉबहाऊस, बेकर, कोल, मॅकायव्हर, लास्की, लिंडसे इत्यादी समाजवादी विचारवंतांनी हाच विचार कल्याणकारी राज्याच्या रूपात मांडला.

**४) कल्याणकारी अर्थशास्त्राचा उदय :** आर्थिक मंदीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय सुचविण्याचा प्रयत्न केन्स व इतर अर्थशास्त्रज्ञांनी केला. यातूनच कल्याणकारी अर्थशास्त्र उदयास आले. या शास्त्राने व्यक्तिगत कल्याणाप्रमाणेच सामाजिक कल्याणही साध्य होईल अशी आर्थिक धोरणे राबविण्याचा पुरस्कार केला. श्रीमंताकडील संपत्तीचे गरिबांकडे हस्तांतरण करून आर्थिक विषमता कमी करण्याचा पुरस्कार कल्याणकारी अर्थशास्त्राने केला. या शास्त्राने विकसित राष्ट्रांतील अर्थव्यवस्थेतील दोष दाखवून ते दूर करून समाजाचे कल्याण करणारे उपाय सूचविले. कल्याणकारी अर्थशास्त्राचे हे कार्य कल्याणकारी राज्याच्या उदयास कारणीभूत ठरले.

## कल्याणकारी राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

कल्याणकारी राज्य या संकल्पनेस मूर्त रूप १९४५ नंतर (म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर) मिळाले असले तरी तिची मूळे प्राचीन आहेत. ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो व ॲरिस्टॉटल, चीनी तत्त्वज्ञ कन्फ्युशिअस यांनी व भारतातील प्राचीन साहित्यात (उदा. रामायण व महाभारत, कौटिल्याचे अर्थशास्त्र इ.) राज्य व राज्यकर्ते यांनी प्रजेच्या कल्याणाची कशी काळजी घ्यावी याबाबतचे विचार मांडलेले आढळतात. प्रजेचे कल्याण करणे हाच खरा राजधर्म आहे असे विचार अनेक विद्वानांनी मांडलेले आढळतात. या विचारानुसार अनेक राजांनी (उदा. प्राचीन काळात सम्राट अशोक व मध्ययुगात छत्रपती शिवाजी) कल्याणकारी राज्यकारभार करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. इंग्लंडमध्ये पहिल्या एलिझाबेथच्या कारकिर्दीत गरिबांसाठी अनेक कायदे केले. धडधाकट भिकाऱ्यांसाठी कार्यगृहे उभारली तर अपंगासाठी अनेक सोयीसुविधा उभारल्या. १९ व्या शतकाच्या मध्यावर फ्रान्समध्ये तिसऱ्या नेपोलियनने कामगारांना मतदानाचा हक्क दिला. कामगार संघटना स्थापण्यास संमती दिली. तसेच कामगारांना वेतनवाढ, घरे, आजारपणात साहाय्य इ. सुविधा पुरविल्या. नेपोलियनपासून प्रेरणा घेऊन बिस्मार्कने जर्मनीत समाजकल्याणाचे अनेक कायदे केले व आजारपण, अपघात, अपंगत्त्व, म्हातारपण अशा असाहाय्यतेच्या काळात शासकीय मदत पुरविण्याची व्यवस्था केली. यातूनच कल्याणकारी राज्य ही संकल्पना १९ व्या शतकाच्या शेवटी रूढ झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र या संकल्पनेस मूर्त रूप देण्याचे काम इंग्लंडमधील मजूर पक्षाने केले. सर बिल्यम ब्रेव्हरीज या विचारवंताने लिहिलेल्या Social Assurance and Allied Services या प्रबंधास प्रमाण मानून मजूर पक्षाने कल्याणकारी धोरणे आखली. बेरोजगारी व आजारपणाच्या स्थितीत व्यक्तीस मदत देणे, सेवानिवृत्तीवेतन देणे, स्त्रियांना प्रसूतीकाळात रजा व अन्य सवलत देणे. कुटुंबातील अवलंबी व्यक्तीच्या संख्येनुसार कामगारास भत्ते देणे इत्यादी योजना ब्रेव्हरीजने सुचविल्या होत्या. या योजना मजूर पक्षाने स्वीकारल्या. पुढे अनेक पाश्चिमात्त्य राष्ट्रांनी विशेषतः श्रीमंत राष्ट्रांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारून कामगारांबरोबरच सर्वच नागरिकांच्या कल्याणाचे कार्यक्रम राबविण्यास प्रारंभ केला. याचाच प्रभाव पडून गरीब वा विकसनशील राष्ट्रांनीही विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या नवोदित राष्ट्रांनीही कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली व जनकल्याणाच्या अनेक योजना व कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली.

## कल्याणकारी राज्याचे फायदे व तोटे

कल्याणकारी राज्य या संकल्पनेचा आज बहुतेक राष्ट्रांनी स्वीकार केलेला आहे. त्याचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत.

१) कल्याणकारी राज्यांमुळे भांडवलशाहीतून उद्‌भवणाऱ्या कांही गंभीर समस्यांची तीव्रता कमी झाली आहे.

२) भांडवलदार वर्ग कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी पुढाकार घेऊ लागला आहे. त्यामुळे वर्गसंघर्षाची धार कांहीसी बोथट झाली आहे.

३) प्रचलित आर्थिक व सामाजिक व्यवस्था टिकून राहण्यास मदत झाली आहे.

४) दुर्बल घटकांनाही आपल्या गरजांपूर्तीची किमान हमी मिळू लागली आहे.

कल्याणकारी राज्याचे हे फायदे असले तरी त्याचे कांही तोटे संभवतात. या तोट्यानांच कल्याणकारी राज्याच्या मर्यादा असेही म्हणता येते. त्या पुढीलप्रमाणे :

१) या संकल्पनेमुळे राज्याच्या हाती आर्थिक, सामाजिक व राजकीय सत्तेचे मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण होते. जनकल्याणाच्या नावाखाली राज्य मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात अवाजवी हस्तक्षेप करू शकते.

२) कल्याणकारी राज्यामुळे लोकांना प्रत्येक बाबतीत राज्यावर/सरकारवर अवलंबून राहण्याची सवय लागते. परिणामी, त्यांच्यातील उपक्रमशिलता कमी होते. ते परावलंबी, आळसी, निष्क्रिय बनतात.

३) जनकल्याणाची तळमळ नसलेल्या शासकीय नोकरवर्गावर कल्याणाच्या योजना राबविण्याची जबाबदारी असते. त्यामुळे या नोकरांना अवाजवी महत्त्व येते. त्यांचे समाजावरील वर्चस्व वाढते. ते केवळ पाट्या टाकण्याचे काम करतात.

**भारतातील कल्याणकारी राज्य**

भारतात प्राचीन काळापासून राजेशाही होती. वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळी राजघराणी राज्य करीत होती. प्रजेचे कल्याण करणे हा राजधर्म मानला जात होता. तथापि, कांही थोडे अपवाद वगळता बहुतेक राजांनी 'पोलीस राज्य' या संकल्पनेतूनच आपला राज्यकारभार चालविला. म्हणजे बाह्य आक्रमणापासून प्रजेचे संरक्षण करणे, राज्यांतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे, कर गोळा करणे, प्रशासन चालविणे, न्यायदान करणे इ. पारंपरिक कार्ये राजे लोक पार पाडीत असत. कांही राजांनी जनकल्याणाची कामे पार पाडली असली तरी आजची 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना मूर्त स्वरूपात त्यावेळी रूढ नव्हती. ब्रिटिश राजवटीत आपल्या सत्तेला पाठिंबा मिळविण्याच्या उद्देशाने ब्रिटिश सत्तेने जनकल्याणाच्या कांही किरकोळ तरतूदी/उपाययोजना अंमलात आणल्या. त्यामुळे भारतीयांना कल्याणकारी राज्य या संकल्पनेचा परिचय झाला. यातूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात कल्याणकारी राज्य स्थापन करण्याची प्रेरणा स्वातंत्र्य लढ्यातील नेतृत्त्वास मिळाली. त्यानुसार स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात कल्याणकारी राज्य स्थापन करण्याची प्रेरणा स्वातंत्र्य लढ्यातील नेतृत्त्वास मिळाली. त्यानुसार स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली. म्हणजेच संरक्षण व शांतता व सुव्यवस्था राखणे या पारंपरिक कार्याबरोबरच भारतीय नागरिकांचे कल्याण साध्य करणे हे देखील राज्यसंस्थेचे एक प्रधान कार्य मानले. कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी स्वतंत्र भारतात अनेक तरतूदी व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्या थोडक्यात पुढीलप्रमाणे :

**अ) राज्यघटनेतील तरतूदी :** भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात ३६ ते ५१ या कलमांतर्गत राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे नमूद केली असून केंद्र सरकार व राज्य सरकारे यांनी आपला राज्यकारभार या तत्त्वांना प्रमाण मानून चालवावा व कायदे करतानाही तत्त्वे लागू करणे हे राज्याचे कर्तव्य असेल असे स्पष्ट केलेले आहे. कल्याणकारी राज्य प्रस्थापित करण्याच्या संदर्भातील घटनेतील कांही प्रमुख कलमे पुढीलप्रमाणे आहेत.

**कलम ३८** (१) ज्या समाजव्यवस्थेत सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, राष्ट्रातील सर्व संस्थांमध्ये संचरून राहील अशी समाजव्यवस्था संघटित करून व परिणामकारकपणे तिचे संरक्षण करून राज्य लोककल्याणाची वाढ करण्याचे प्रयत्न करील.

(२) राज्य केवळ व्यक्तीव्यक्तीच नव्हे तर विविध क्षेत्रातील व व्यवसायातील समूहात उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्याचे व दर्जा, सुविधा व संधी यांच्या संदर्भात असलेली विषमता नष्ट करण्याचे प्रयत्न करील.

**कलम ३९** नुसार (१) नागरिकांना निर्वाहाची पर्याप्त साधने मिळविण्याचा हक्क आहे. (२) भौतिक साधनांवरील मालकी व नियंत्रण असे विभागले जावे की, ज्यामुळे सर्वांचे जास्तीत जास्त कल्याण होईल. (३) समाजाचे अहित होईल अशाप्रकारे संपत्तीचे व उत्पादन साधनांचे केंद्रीकरण होईल अशी अर्थव्यवस्था अंमलात नसावी. (४) स्त्री व पुरुषांना समान कामास समान वेतन मिळावे. (५) कामगारांचे आरोग्य व शक्ती आणि मुलांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग केला जाणार नाही व नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा शक्ती यांना न पेलवणारा व्यवसाय पत्करण्यास भाग पाडले जाणार नाही. (६) बालकांना विकासाची संधी व सुविधा दिल्या जाव्यात व त्यांचे शोषणापासून व नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षांपासून संरक्षण व्हावे.

**कलम ३९ अ** नुसार आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना कायद्याच्या बाबतीत मोफत मदत मिळावी व कायद्याच्या पद्धतीमुळे समान संधीच्या आधारे न्याय मिळावा असा प्रयत्न राज्य करील.

**कलम ४०** नुसार राज्य ग्रामपंचायती स्थापून त्यांना स्वराज्याचे घटक म्हणून काम करण्यासाठीचे अधिकार व सत्ता देईल.

**कलम ४१** नुसार राज्य आपली आर्थिक शक्त व विकास यांच्या मर्यादेत, काम मिळवून देण्याचा, शिक्षणाचा व बेकारी, वार्धक्य, आजारपण, पंगुत्त्व व स्वतःचा दोष नसताना प्राप्त झालेली हलाखिची स्थिती याबाबतीत सार्वजनिक मदत मिळविण्याचा हक्क मिळवून देण्याची परिणामकारक योजना करील.

**कलम ४२** नुसार राज्य कामधंद्याच्या बाबतीत न्याय व माणुसकीचे वातावरण ठेवण्याची व बाळंतपणात मदत देण्याची व्यवस्था करील.

**कलम ४३** नुसार कामगारांना काम, निर्वाहवेतन, योग्य दर्जाचे राहणीमान, विश्रांती, सामाजिक-सांस्कृतिक संधी मिळेल असे वातावरण राज्य कायद्याद्वारे, संघटनेद्वारे व अन्य मार्गाने उपलब्ध करून देईल. ग्रामीण भागात वैयक्तिक वा सहकारी ग्रामोद्योग वाढविण्याचा प्रयत्न राज्य करेल.

**कलम ४३ अ** नुसार उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांना सहभाग मिळेल यासाठी राज्य कायदे व इतर उपाय करेल.

**कलम ४४** नुसार राज्य समान नागरी कायदा लागू करण्याचा प्रयत्न करेल.

**कलम ४५** नुसार १४ वर्षापर्यंतच्या मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची योजना राज्य सुरू करेल.

**कलम ४६** नुसार दुर्बल वर्षांचे विशेषतः अनुसूचित जाती व जमातीच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांची राज्य काळजी घेईल व सामाजिक अन्याय व शोषणापासून त्यांचे रक्षण करील.

**कलम ४७** नुसार राज्य जनतेच्या आहाराच्या पौष्टिकतेचा व राहणीमानाचा दर्जा वाढविणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे आपले कर्तव्य मानील व आरोग्यास अपायकारक ठरणाऱ्या मादक द्रव्यांच्या औषधी उपयोगाशिवाय सेवनास बंदी घालील.

वरील सर्व घटनात्मक तरतुदींचा विचार करता हे स्पष्ट होते की घटनाकारांनी स्वतंत्र भारतात कल्याणकारी राज्याची प्रस्थापना होण्यासाठी आवश्यक त्या तरतूदी केलेल्या आहेत.

**ब) कायदेशीर उपाययोजना :** राज्यघटनेतील वरील मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करून त्याद्वारे कल्याणकारी राज्य प्रस्थापित करता यावे म्हणून केंद्र व राज्य सरकारांनी अनेक पुरोगामी कायदे संमत करून त्यांची अंमलबजावणी सुरू केलेली आहे. उदा. सार्वजनिक क्षेत्रात स्त्री पुरुषांना समान कामास समान वेतन देणे, कामगारांना पुरेसे वेतन, भत्ते, रजा, विश्रांती, प्रसूतीकालात सवलती, व्यवस्थापनात सहभाग इत्यादी देणे, १४ वर्षांपर्यंतच्या मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे, गरिबांना मोफत कायदेशीर मदत व सल्ला देणे, महिला व बालके यांचे शोषण होऊ न देणे, अनुसूचित जाती जमातींना सामाजिक अन्याय-अत्याचारापासून संरक्षण देणे, त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी शिक्षणसंस्थात व शासकीय नोकऱ्यात राखीव जागा देणे, महिलांचा अनैतिक व्यापार थांबविणे, मादक द्रव्यसेवनावर बंदी घालणे इत्यादीसंबंधीचे कायदे केलेले आहेत. एवढेच नव्हे तर कल्याणकारी योजना राबविण्यात येणारे अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक तेंव्हा घटनादुरुस्त्याही केलेल्या आहेत. त्यामुळे कल्याणकारी राज्याच्या स्थापनेसाठी घटनात्मक व कायदेशीर अधिष्ठान प्राप्त झालेले आहे.

**क) कल्याणकारी योजना :** भारतात कल्याणकारी राज्याची प्रस्थापना व्हावी म्हणून केंद्र व राज्यसरकारांनी असंख्य कल्याणकारी योजना व कार्यक्रम सुरू केलेले आहेत. दुर्बल घटकांचे कल्याण व विकास करण्यासाठी सरकारने विविध विभाग (मंत्रालय) (उदा. सामाजिक न्याय विभाग (पूर्वीचा समाजकल्याण विभाग), आदिवासी कल्याण विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, अपंग कल्याण विभाग, कामगार कल्याण विभाग इ.) सुरू केले आहेत. या विभागामार्फत संबंधित घटकांच्या कल्याणाच्या योजना व कार्यक्रम राबविले जात आहेत. उदा. निराधार महिला व भिकारी इ. साठी आधार किंवा आश्रय गृहे उभारली आहेत. ग्रामीण जनतेस रोजगार पुरविणारी रोजगार हमी योजना (सध्याची मनरेगा) देशभर राबविली जात आहे. गरिबांना अन्नधान्य, रॉकेल, गॅस सवलतीच्या दराने (अनुदान देऊन) उपलब्ध करून दिले जात आहे. सार्वजनिक वैद्यकीय केंद्रातून जनतेस मोफत वा अल्प दराने वैद्यकीय सेवा व मदत उपलब्ध करून दिली जात आहे. जनतेचे आरोग्य चांगले राहावे म्हणून स्वच्छतेचे कार्यक्रमही (सद्याचे स्वच्छ भारत अभियान) राबविले जात आहेत. मादकद्रव्य सेवनास प्रतिबंध कधण्यासाठी प्रचार मोहिम राबविली जाते. ग्रामीण तसेच शहरी जनतेस सत्ता अधिकार विकासाची साधने प्राप्त व्हावीत म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्या आहेत. तसेच कृषी, उद्योग, सेवा, वित्तपुरवठा, गृहनिर्माण इ. क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिले जात आहे. जनकल्याणाचे उपक्रम राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्था व व्यक्तिंना सरकार आवश्यक ती मदत व सल्ला देते. शिवाय त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा पारितोषिक

देऊन सन्मानही करते. थोडक्यात विविध प्रकारच्या योजना राबवून सरकार जनकल्याणाचे प्रयत्न करीत आहे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली असून असे प्रत्यक्षात साकार करण्याचे प्रयत्न येथील सरकार करीत आहे.

**भारतातील कल्याणकारी राज्यासमोरील आव्हाने**

भारतात कल्याणकारी राज्याच्या स्थापनेसाठी आवश्यक ते प्रयत्न केले जात असले तरी भारतात कल्याणकारी राज्याची सर्व उद्दिष्टे अद्याप साध्य झालेली दिसत नाहीत. देशाला दारिद्र्याचे निर्मूलन करण्यात अद्याप यश आलेले नाही. सुमारे ३० ते ४० टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली असून तिच्या मूलभूत गरजाही धडपणे पूर्ण होत नाहीत. बेरोजगारी वाढत चालली आहे. सरकारद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सामाजिक सेवा अत्यंत अपुऱ्या व निम्न गुणवत्तेच्या (दर्जाच्या) आहेत. महिला, अनुसूचित जाती व जमाती यांच्यावरील अन्याय अत्याचार वाढतच चालले आहेत. श्रीमंत व गरीब यांच्यातील दरी रुंदावत चालली असून आर्थिक विषमता कमी करणे सरकारला अद्याप शक्य झालेले नाही. औद्योगिक कामगार व भूमिहीन मजूरांची स्थिती फारसी सुधारलेली नाही. समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित झाला आहे असे म्हणता येत नाही. प्रबळ घटकांकडून दुर्बल घटकांचे होणारे शोषण थांबलेले नाही. एकंदरीत दारिद्र्य, बेकारी, भूक, कुपोषण, अज्ञान, निरक्षरता, अनारोग्य, अस्वच्छता, सामाजिक अन्याय, शोषण इत्यादी समस्या सोडविण्यात सरकारला अपेक्षित यश मिळालेले नाही. परिणामी, कल्याणकारी राज्याची संकल्पना भारतात अद्याप पूर्णपणे साकार झालेली नाही असेच म्हणावे लागते. असे होण्याचे कारण म्हणजे भारतात कल्याणकारी राज्याच्या मार्गात अनेक अडथळे किंवा आव्हाने आहेत. त्यातील कांही प्रमुख आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत.

**१) वाढती लोकसंख्या :** सतत वाढत जाणारी लोकसंख्या हे भारतासमोरील एक मोठे आव्हान आहे. लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी शासकीय स्तरावर कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम स्वीकारणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला असूनही सरकारला नियोजनकाळात लोकसंख्या वाढ रोखण्यात अपेक्षित यश आले नाही. १९५१ मध्ये आर्थिक नियोजनास प्रारंभ झाला तेंव्हा भारताची लोकसंख्या सुमारे ३६.१० कोटी इतकी होती. ती आज सुमारे १३० कोटीवर पोहचली आहे. नियोजनाने जो कांही विकास झाला आहे त्याची आहुती लोकसंख्या वाढीच्या यज्ञात पडलेली आहे. कल्याणकारी/विकास कार्यक्रमाची फळे वाढत्या लोकसंख्येमुळे सामान्य जनतेच्या पदरात पुरेशा प्रमाणात पडत नाहीत. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, वीज, वाहतूक संप्रेषण, मनोरंजन इत्यादी क्षेत्रात कितीही सुविधा पुरविल्या तरी वाढत्या लोकसंख्येमुळे त्या अपुऱ्याच पडत आहेत. त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे कल्याण वा विकास घडवून आणणे कठीण होत आहे. एकंदरीत कल्याणकारी कार्यक्रमांचा गाडा वाढत्या लोकसंख्येमुळे खूपच अडखळत चालला आहे. म्हणून लोकसंख्या नियंत्रणाचे मोठे आव्हान देशापुढे आहे.

**२) अपर्याप्त निधी :** कल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी देशाकडे प्रचंड निधी उपलब्ध असावा लागतो. तथापि, भारत हा अद्यापही विकसनशिल असा देश आहे. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, जपान, कॅनडा यासारख्या विकसित देशांच्या तुलनेत भारताचे दरडोई तसेच राष्ट्रीय उत्पन्न आजही बरेच

कमी आहे. त्यामुळे भारतात अद्यापही दारिद्र्य, बेकारी, यासारख्या समस्या तीव्र आहेत. सुमारे ३०% जनतेच्या मूलभूत गरजाही धडपणे पूर्ण होत नाहीत. तिला भूक, उपासमार, कुपोषण या समस्यांना तोंड द्यावे लागते. राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी औद्योगिकीकरणाची गती वाढवावी लागते. शेतीचेही आधुनिकीकरण करावे लागते. आणि यासाठी प्रचंड निधीची/भांडवलाची गरज असते. मात्र भारतात भांडवल अपूरे तर आहेच शिवाय भांडवल निर्मितीचा वेगही मंद आहे. राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न कमी असल्याने बचतीचे प्रमाणही कमी आहे. शिवाय ज्यांच्याकडे पैसा आहे असे बरेच लोक आपला पैसा बचतीच्या रुपात बँकेन ठेवण्याऐवजी दागदागिने, जमीनजुमला, गाड्या, बंगले, अशा अनुत्पादक गोष्टीत गुंततात. म्हणून देशांतर्गत भांडवल निर्मितीस वेग येत नाही. थोडक्यात अपर्याप्त भांडवल असल्याने आर्थिक विकासावर विपरित परिणाम होतो व राष्ट्रीय उत्पन्न म्हणावे तसे वाटत नाही. परिणामी कल्याणकारी राज्याची उद्दिष्टे साध्य करणे अवघड होते. त्यामुळे भांडवल/निधी वाढविणे हे एक देशासमोर मोठे आव्हान आहे.

**३) नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर :** देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त विकास घडवून आणणे व वापर करणे हे देखील भारतासमोरील एक मोठे आव्हान आहे. कल्याणकारी राज्याला आपल्या जनतेचे जीवनमान उंचवावे लागते. त्यासाठी जनतेस पर्याप्त उत्पन्न मिळावयास हवे. त्यासाठी जनतेस रोजगार पुरवावा लागतो. रोजगार वाढविण्यासाठी देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करणे, तिचा विकास करणे गरजेचे ठरते. भारतात जमीन, नद्या, पर्वत, खाणी, जंगले, समुद्रकिनारपट्टी, जैवविविधता मोठ्या प्रमाणावर आहे. पण अपुऱ्या भांडवलामुळे या सर्वांचा पुरेसा उपयोग करून घेता येत नाही. कांही साधनसंपत्तीचा अविवेकी वापर होतो. त्यामुळे आर्थिक विकासाची गती वाढत नाही. तात्पर्य नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर विकास वापर करून राष्ट्रीय उत्पन्न वाढविणे व या वाढीव उत्पन्नाचा कल्याणकारी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वापर करणे हे ही एक आव्हान आहे.

**४) मनुष्यबळाचा विकास :** नैसर्गिक साधनसंपत्तीप्रमाणेच मानवी साधन संपत्तीचा म्हणजेच मनुष्यबळाचा विकास घडवून आणणे हे ही एक देशापुढील मोठे आव्हान आहे. कल्याणकारी कामे करण्यासाठी पैसा उपलब्ध झाला पाहिजे. त्यासाठी आर्थिक विकास पुरेसा झाला पाहिजे. देशाच्या आर्थिक विकासासाठी भांडवल व नैसर्गिक साधनसंपत्तीप्रमाणेच उत्तम गुणवत्ता असलेल्या मनुष्यबळाची गरज असते. सुशिक्षित, प्रशिक्षित, सृजनशील, कौशल्ययुक्त, विकासाभिमुख, धाडसी, महत्त्वाकांक्षी, राष्ट्रप्रेमी, निरोगी, उद्योगी इत्यादी गुणांनी युक्त असलेले मनुष्यबळ उपलब्ध असणे विकासासाठी आवश्यक असते. भारतात मनुष्यबळ विपूल आहे. पण त्याची गुणवत्ता मात्र अत्यंत निम्न दर्जाची आहे. अनेक लोक हे अडाणी, निरक्षर दैववादी, अंधश्रद्ध, रूढीप्रिय, दरिद्री, बेकार, आळसी, रोगट आहेत. त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणेही अवघड जाते. वैज्ञानिक व तांत्रिक शिक्षणाच्या सोयी अपुऱ्या असल्याने मनुष्यबळाचा पर्याप्त विकास होत नाही. अत्यंत बुद्धीमान, कुशल व उच्चशिक्षित असलेल्या अनेक व्यक्ती परदेशात जाऊन वास्तव्य करतात. त्यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा देशाला उपयोग होत नाही. केंद्रात स्वतंत्र असे मनुष्यबळ विकास मंत्रालय (खाते) अनेक वर्षापासून कार्यरत आहे. तथापि, मनुष्यबळाच्या विकासाच्या दृष्टीने विशिष्ट प्रगती झालेली नाही. थोडक्यात मनुष्यबळाचा योग्य विकास घडवून आणणे हे एक मोठे आव्हान आहे.

**५) भ्रष्टाचारास आळा घालणे :** सद्या भारतात भ्रष्टाचाराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. सरकारी यंत्रणाही कनिष्ठ स्तरापासून (शिपाई-क्लार्क पासून) वरिष्ठ स्तरापर्यंत (मंत्र्यापर्यंत) भ्रष्टाचाराने पाय पोखरून निघालेली आहे. भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनला आहे. राजकीय पदाधिकारी व शासकीय नोकर हे देशाचा विकास, जनतेचे कल्याण, सामान्यांचे हित याकडे दुर्लक्ष करून स्वतःचे व आपल्या नातलगांचे हित साधण्यास प्राधान्य देतात. ते कधी स्वतंत्रपणे तर कधी संगनमताने कल्याणकारी कार्यासाठी असलेला पैसा हडप करतात आणि कल्याणाची उद्दिष्टे केवळ कागदोपत्री पूर्ण केल्याचे दाखवितात. उच्चपदस्थांचे अब्जावधी रुपयांचे आर्थिक घोटाळे सामान्यांना चक्रावून टाकणारे आहेत. भ्रष्टाचाराने किडलेले राजकीय नेतृत्व व नोकरशाही ही कल्याणकारी राज्य प्रस्थापित करण्याच्या मार्गातील मोठाच अडथळा आहे. हा अडथळा नष्ट करणे म्हणजेच भ्रष्टाचारास आळा घालणे हे एक मोठे आव्हान आहे.

**६) विकासेत्तर खर्च व उधळपट्टीस आवर :** विकासेत्तर खर्चात होत असलेली वाढ व सरकारी यंत्रणेकडून होणारी सार्वजनिक पैशाची उधळपट्टी यास आवर घालणे हे एक मोठे आव्हान आहे. विकासाच्या व कल्याणाच्या कामापेक्षा विकासेतर व कल्याणातेर कामावर (उदा. कर्जावरील व्याज, करवसुली, इमारती बांधणे, नोकरशाहीचे वेतन, भत्ते व इतर सोयी सुविधा, सेवानिवृत्ती वेतन, ऑडीट, नोटा व नाणी छापणे, मंत्र्यांचे दौरे, भत्ते, मानधन, सुरक्षा व्यवस्था, निवडणूका, शस्त्रास्त्रांची निर्मिती व खरेदी इत्यादी अफाट खर्च होतो. यातील कांही खर्च आवश्यक आहे हे खरे. परंतु राज्यकर्ते व नोकरशाही आपल्या पदांचा दुरुपयोग करून सार्वजनिक पैशाची प्रचंड उधळपट्टी करताना दिसते. हा विकासेत्तर खर्च व उधळपट्टी थांबवून पैसा वाचवणे व हा वाचलेला पैसा कल्याणकारी कामाकडे वळविणे हे देखील एक आव्हानच आहे.

**७) उदासिनता :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या काळात (साधारणतः १९४७ ते १९८० पर्यंत) देशसेवेने भारलेले राजकीय नेते, सरकारी नोकर, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था-संघटना व व्यक्ती मोठ्या प्रमाणावर होत्या. त्यांना देशाच्या विकासाची व लोककल्याणाची मोठी तळमळ होती. त्यानंतर मात्र अशी तळमळ असणाऱ्यांची संख्या उत्तरोत्तर कमी होत चालली आहे. त्यांच्या जागी स्वार्थी व सत्तालोलूप लोकांची संख्या वाढत चालली आहे. राजकारण, जनकल्याण व समाजसेवा हा सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, मानसन्मान मिळविण्याचा एक धंदा मानला जाऊ लागला आहे. सद्याचे राज्यकर्ते व नोकरशाही ही जनकल्याणाबाबत प्रचंड उदासिन आहे. त्यांच्याकडे कल्याणकारी राज्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असणारी तळमळ, निष्ठा व प्रामाणिकपणा नाही. (कांही थोडे सन्माननीय अपवाद आढळतात.) तसेच अनेक स्वयंसेवी संस्था ह्या जनकल्याणाच्या नावाखाली स्वकल्याण साधण्यासाठी स्थापन झालेल्या आहेत. बहुसंख्य भारतीय जनताही समाजकल्याणाविषयी उदासिनच आहे. आपल्या हक्क व कर्तव्याची तिला फारसी जाणीव नाही. तसेच जनकल्याणविषयी उदासिन असलेल्या राज्यकर्त्यांवर व नोकरशाहीवर नियंत्रण ठेवण्यास जागृत नागरिक म्हणून भारतीय जनता कमी पडत आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी राज्यकर्ते, नोकरशाही स्वयंसेवी संस्था व सामान्य जनता या सर्व घटकांनी सामूहिकपणे व निष्ठेने कार्य केले पाहिजे. परंतु, हे सर्व घटक याबाबतीत मोठ्या प्रमाणावर उदासिन आहेत. त्यांची ही उदासिनता दूर करून त्यांना कल्याणकारी कार्यास प्रवृत्त करणे हेही देशापुढील एक मोठे आव्हानच आहे.

**८) पक्षीय राजकारण :** भारतात लोकशाही असल्याने राजकीय पक्षांचे अस्तित्व अनिवार्य आहे. त्यानुसार भारतात अनेक राजकीय पक्ष असून त्यांच्या ध्येयधोरणात मोठी तफावत आहे. सुरुवातीस अनेक वर्षे काँग्रेसची सत्ता होती. पुढे मात्र अधून मधून वेगवेगळ्या पक्षांची सरकारे येऊ लागली. त्यामुळे आर्थिक-सामाजिक ध्येयधोरणात वारंवार बदल होऊ लागला. केंद्रात व राज्यांत वेगवेगळ्या पक्षांची सरकारे येऊ लागल्याने त्यांच्यात विरोधाचे वातावरण निर्माण होऊ लागले. सत्तारूढ पक्षांच्या विधायक व कल्याणकारी धोरणास विरोधी पक्ष केवळ विरोधासाठी विरोध करू लागले. तसेच विरोधी पक्षांच्या विधायक सूचनांकडेही सत्तारूढ पक्ष दुर्लक्ष करू लागले. परिणामी देशाचा विकास, जनकल्याण, समाजाचे हित यापेक्षा पक्षीय राजकारण महत्त्वाचे मानले जाऊ लागले. ही स्थिती लोककल्याणकारी राज्यासाठी हानिकारक ठरत आहे. म्हणून पक्षीय राजकारणावर मात करणे हे एक मोठे आव्हान ठरते.

**९) जागतिकीकरणाचे आव्हान** : १९९०-९१ मध्ये उद्‌भवलेले आर्थिक संकट निवारण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्याकडे कर्ज मागितले. कर्ज देताना या संस्थांनी भारतास जागतिकीकरणाचे उदारिकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारण्यास भाग पाडले. या धोरणाची अंमलबजावणी करताना भारताने समाजवादी व कल्याणकारी धोरणाकडे पाठ फिरविली आहे. जागतिक वित्त संस्था व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दबावामुळे शासकीय उद्योगांचे खाजगीकरण करणे, करारपद्धतीने कर्मचारी नेमणे, कामगार कपात करणे, स्वेच्छानिवृत्ती घेण्यास कामगारांना भाग पाडणे, पेन्शन, विमा यासारख्या सुविधात कपात करणे वा त्या बंद करणे, वेगवेगळी अनुदाने बंद करणे, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता इत्यादी सेवांवरील शासकीय खर्चात कपात करणे इत्यादी धोरणे सरकार राबवू लागले आहे. परिणामी महागाई वाढून सामान्य जनतेस जगणे अवघड होऊ लागले आहे. सरकारच्या या धोरणामुळे गरिबांना कोणी वाली राहिला नसून त्यांच्या विकासाचे/कल्याणाचे स्वप्न, स्वप्नच राहणार अशी स्थिती निर्माण झाली आहे. एकंदरीत जागतिकीकरणाने भारतातील कल्याणकारी राज्यासमोर मोठेच आव्हान उभे ठाकले आहे.

**भारतातील लोकशाही** (Democracy in India)

भारतातील कल्याणकारी राज्य व त्याच्यासमोरील आव्हाने समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही भारतातील लोकशाही व तिच्यासमोरील आव्हाने अभ्यासणार आहात. त्यासाठी प्रथम लोकशाहीचा अर्थ व स्वरूप थोडक्यात समजावून घेणे आवश्यक ठरते.

**लोकशाहीचा अर्थ :** मूलतः लोकशाही म्हणजे लोकांच्या हाती राजकीय सत्ता असलेली राजकीय व्यवस्था किंवा शासनव्यवस्था होय. मात्र आज लोकशाही ही संज्ञा विभिन्न अर्थाने वापरली जाते.

**१) लोकशाही एक शासन प्रकार :** Democracy हा शब्द ग्रीक भाषेतील Demos म्हणजे लोक आणि Kratia म्हणजे सत्ता या दोन शब्दांपासून बनला आहे. यावरून लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता वा शासन असलेली व्यवस्था असा अर्थ होतो. अनेक विद्वानांनी याच अर्थाने लोकशाहीची व्याख्या दिलेली आहे. उदा. **अब्राहम लिंकन** यांच्या मते 'लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी व लोकांकडून चालविलेले शासन होय. **प्रा. सिली** यांच्या मते ''ज्या शासनव्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीचा वाटा असतो ती लोकशाही होई. लॉर्ड ब्राईस म्हणतात की, लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की, ज्यामध्ये राज्यकारभाराची सत्ता ही कोण्या एका विशिष्ट व्यक्तिच्या किंवा वर्गाच्या हातात नसते तर ती समुदायाच्या

सर्व सदस्यांच्या हातात असते. वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, लोकशाही हा एक शासनाचा प्रकार असून त्यामध्ये सार्वभौम सत्ता लोकांच्या हातात असते व अंतिम निर्णय लोकच घेत असतात.

**२) लोकशाही एक समाजव्यवस्थेचा प्रकार :** लोकशाही केवळ एक शासनप्रकार नसून ती समाजव्यवस्थेचाही एक प्रकार आहे. लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी लोकशाही समाजव्यवस्था निर्माण व्हावी लागते. म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय यासारख्या मूल्यांवर समाजव्यवस्थेची उभारणी झालेली असावी लागते. कोणत्याही एका व्यक्तीस वा वर्गास विशेष हक्क वा सवलती दिलेल्या नसतात आणि जर त्या दिल्या असतील तर त्या जनतेच्या हितासाठी दिलेल्या असतात. या समाजव्यवस्थेत व्यक्तीचा दर्जा जन्म, वंश, धर्म, संपत्ती इत्यादीवरून न ठरता व्यक्तीच्या गुणकर्तृत्वाधारे ठरत असतो.

**३) लोकशाही एक अर्थव्यवस्थेचा प्रकार :** लोकशाही हा केवळ शासनाचा व समाजव्यवस्थेचा प्रकार नसून तो अर्थव्यवस्थेचाही एक प्रकार आहे. लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित व्हावयाची असेल तर आर्थिक क्षेत्रातही लोकशाही असली पाहिजे. त्यासाठी कोणत्याही एका व्यक्तीस वा वर्गास संपत्तीच्या जोरावर इतरांचे शोषण करता येऊ नये, सर्वांच्या गरजांची पूर्तता होईल अशापद्धतीने संपत्तीचे समाजात वितरण झाले पाहिजे. उत्पादन-वितरण क्षेत्रात लोकशाही मूल्यांचा स्वीकार झाला पाहिजे.

**४) लोकशाही एक जीवनविषयक दृष्टिकोन :** लोकशाही हा एक जीवनविषयक दृष्टिकोन आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात हा दृष्टिकोन स्वीकारलेला असावा लागतो. तरच लोकशाही प्रस्थापित होते. लोकशाही दृष्टिकोन हा सहिष्णुता, उदारमतवाद, मानवता इत्यादीस प्राधान्य देणार असतो. आपल्याप्रमाणेच इतरांनाही आचारविचाराचे स्वातंत्र्य आहे अशा प्रकारचा समंजसपणा प्रत्येक व्यक्ती दाखवित असते. इतरांच्या मनांचा अगदी विरोधी मताचाही आदर केला जातो. हिंसेऐवजी शांततामय मार्गाने संघर्ष सोडविला जातो. थोडक्यात लोकशाही हा जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन आहे. ते एक जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे असा व्यापक अर्थ आज लोकशाही या शब्दाचा घेतला जातो.

वरील विवेचनावरून असे म्हणता येते की, लोकशाही हा एक शासनाचा प्रकार (वा पद्धती) असून या प्रकारात सामाजिक व आर्थिक क्षेत्रातही लोकशाही स्वरूपाचा दृष्टिकोन स्वीकारलेला असतो. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** म्हणतात त्याप्रमाणे ''लोकशाही हा शासनाचा असा प्रकार व पद्धती आहे की, ज्याद्वारे लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात रक्तपाताशिवाय क्रांतिकारी बदल घडवून आणले जातात.''

**लोकशाहीचे प्रकार**

लोकशाहीचे १) प्रत्यक्ष लोकशाही व २) अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रकार पडतात.

**१) प्रत्यक्ष लोकशाही :** कायदे करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व कायद्यानुसार न्यायदान करणे या तीनही कार्यात जेंव्हा सर्व नागरिक सहभागी होतात तेंव्हा त्यास प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. प्राचीन ग्रीक नगरराज्यांमध्ये प्रत्यक्ष लोकशाही होती. ही नगरराज्ये आकाराने व लोकसंख्येने अत्यंत लहान होती. आणि परकीय, स्त्रिया, गुलाम इत्यादींना नागरिक मानले जात नसे. त्यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग शक्य होत असे. आधुनिक राज्ये खूपच मोठी असल्याने प्रत्यक्ष लोकशाही शक्य नाही. तथापि, स्वित्झर्लंडसारख्या देशात प्रत्यक्ष लोकशाहीचे फायदे मिळविणारे कांही उपाय उदा. जनमतप्रदर्शन

(Referendum), उपक्रम (Initiative), सार्वमत (Plebiscite) आणि प्रत्यावाहन (Recall) अवलंबिले जातात.

**२) अप्रत्यक्ष लोकशाही** : कायद्याची निर्मिती व अंमलबजावणी करण्याचे काम जेंव्हा प्रौढ नागरिकांनी मतदानाद्वारे निवडून दिलेले प्रतिनिधी करतात तेंव्हा त्यास अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधीक लोकशाही असे म्हणतात. या प्रकारात लोकांनी निवडलेले प्रतिनिधी शासन चालवितात (राज्यकारभार पाहतात) व हे प्रतिनिधी लोकांना जबाबदार असतात. ठराविक काळानंतर लोकांना आपले प्रतिनिधी बदलण्याचा अधिकार असतो. आधुनिक राज्यांत अप्रत्यक्ष लोकशाही आहे. अप्रत्यक्ष लोकशाहीचे अध्यक्षीय लोकशाही व संसदीय लोकशाही असे दोन उपप्रकार पाडता येतात. अध्यक्षीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळास जबाबदार नसते. अमेरिकेत हा प्रकार असून तेथील कार्यकारी मंडळाचा प्रमुख म्हणजेच राष्ट्राध्यक्ष हा तेथील कायदेमंडळास म्हणजे काँग्रेसला जबाबदार नसतो. याउलट संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळास जबाबदार असते. इंग्लंड व भारतात हा प्रकार असून तेथील कार्यकारी मंडळ (पंतप्रधानाच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळ) हे कायदेमंडळास (संसदेस) जबाबदार असते.

**लोकशाही शासनाची वैशिष्ट्ये**

**१) जनतेचे सार्वभौमत्त्व :** लोकशाहीत जनता सार्वभौम असते. शासन निर्माण करणे, त्यावर अंकूश ठेवणे, शासन बदलणे इत्यादी अधिकार जनतेस असतात. म्हणून जनता ही सार्वभौम म्हणजेच सत्तेचे अंतिम व सर्वश्रेष्ठ केंद्र असते.

**२) संमती हा आधार :** लोकशाहीत शक्तीऐवजी जनतेची संमती हा शासनाचा आधार असतो. जनतेच्या इच्छेनुसार शासन बदलते. शासनाचे निर्णय हे लोकसंमतीवर आधारलेले असतात. लोकसंमत नसलेले निर्णय शासनास मागे घ्यावे लागतात.

**३) प्रतिनिधीमार्फत शासन :** आजच्या मोठ्या आकाराच्या राज्यात सर्व जनता एकत्र येऊन निर्णय घेऊ शकत नाही. त्यामुळे जनता निवडणुकीद्वारे आपले प्रतिनिधी निवडते व हे प्रतिनिधी शासन चालवितात.

**४) निवडणूका :** लोकशाहीत निवडणूका अनिवार्य असतात. ठराविक मुदतीनंतर मुक्त व निर्भय वातावरणात निवडणूका घेऊन प्रतिनिधी निवडले जातात. त्यासाठी स्वतंत्र अशी निवडणूक यंत्रणा असते. निवडणुकांमुळे जनतेस हवे ते शासन निवडणे व नको असलेले शासन बदलणे शक्य होते.

**५) शांततामय मार्ग :** लोकशाहीत शांततामय व घटनात्मक मार्गाने शासन निवडता व बदलता येते. त्यासाठी हिंसेचा/क्रांतीचा अवलंब करावा लागत नाही. त्यामुळे शासन बदलले तरी राज्यात फार मोठे अस्थैर्य निर्माण होत नाही.

**६) राजकीय पक्ष :** लोकशाहीत लोकांना संघटना स्वातंत्र्य असते. समान विचाराचे लोक एकत्र येऊन राजकीय संघटना वा पक्ष स्थापन करतात व हे पक्ष निवडणूका लढवितात आणि बहुमत प्राप्त करणारा पक्ष शासन स्थापन करतो. बहुमत गमावल्यास सत्तारूढ पक्षास सत्ता सोडावी लागते म्हणजेच त्याचे शासन (सरकार) बरखास्त होते.

७) **चर्चा व विरोधास स्थान** : लोकशाहीत चर्चा व विचारविनिमय करण्याचे, शासनाच्या धोरणास विरोध करण्याचे व त्यावर टीका करण्याचे स्वातंत्र्य असते. विरोधकांच्या टिकेमुळे शासनावर अंकूश (नियंत्रण) राहतो, ते जागरूक व जबाबदार बनते.

८) **सत्ताविभाजन :** लोकशाहीत कायदेशीर, कार्यकारी व न्यायीक सत्तेचे वेगवेगळ्या गटात/मंडळात विभाजन केले जाते. पण शासकीय कारभारात समन्वय साधण्यासाठी 'समतोल व नियंत्रण' या तत्त्वाचाही अवलंब केला जातो. सत्ताविभाजनामुळे कोणाही गटास/मंडळास निरंकुशपणे वागता येत नाही. परिणामी व्यक्तिस्वातंत्र्य टिकून राहते.

९) **व्यापक मताधिकार :** लोकशाहीत मताधिकार अधिकाधिक व्यापक करण्यावर भर दिला जातो. संपत्ती, शिक्षण, धर्म, वंश, लिंग इत्यादी निकषांवर मतदानाचा हक्क दिल्यास ती मर्यादित लोकशाही ठरते. याउलट सर्व प्रौढ नागरिकांना कोणत्याही भेदभावाशिवाय मताधिकार दिला असेल तर ती व्यापक लोकशाही ठरते. आज विशिष्ट वयोमर्यादा पूर्ण केलेल्या नागरिकांस मताधिकार देणे हे आदर्श वा योग्य मानले जाते. वेगवेगळ्या देशात ही वयोमर्यादा वेगवेगळी आढळते.

**१०) जनतेच्या हक्कास संरक्षण :** लोकशाहीत जनतेच्या हक्कांस मान्यता दिलेली असते व त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायसंस्थेवर टाकलेली असते. नागरिकांना जितके जास्त हक्क निर्भयपणे उपभोगता येतात तेवढी ती लोकशाही उच्च दर्जाची मानली जाते. आणिबाणीच्या स्थितीखेरीज इतर वेळी नागरिकांच्या हक्कांवर शासनाकडून गदा आणली जात नाही. अनेक लोकशाही राज्यांत नागरिकांच्या मूलभूत हक्कांची नोंद राज्यघटनेत करून त्यांना संरक्षण दिलेले आढळते.

**भारतातील लोकशाही**

लोकशाहीचा अर्थ, प्रकार व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही भारतातील लोकशाहीचे स्वरूप व तिच्यापुढील प्रश्न व आव्हाने समजावून घेणार आहात.

भारतात प्राचीन काळापासून ते ब्रिटिश राजवट स्थापन होईतोपर्यंत वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळे राजे राज्य करीत होते. साम्राज्यविस्तारासाठी त्यांच्यात सतत युद्धे होत असत. आपल्या प्रदेशात ज्या कोण्या राजाची सत्ता असेल त्यास जनता कर देत असे व त्याबदल्यात राजा जनतेचे संरक्षण करते व समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असे. पुढे व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या ब्रिटिशांनी भारतातील राजांचा पराभव करून भारतावर आपली एकछत्री राजवट प्रस्थापित केली. या राजवटीविरोधी १८५७ मध्ये भारतीयांनी मोठा उठाव केला. त्यामुळे भारतीयांना राज्यकारभारात सहभागी करून घेतल्याशिवाय आपली राजवट टिकणार नाही हे जाणून ब्रिटिश सत्तेने भारतीयांना टप्प्याटप्प्याने राजकीय अधिकार दिले. कायदेमंडळाची निर्मिती करून त्यावर भारतीयांना निवडणुकीद्वारे प्रतिनिधित्त्व दिले. यातूनच भारतीयांना प्रातिनिधिक/संसदीय लोकशाहीची ओळख झाली. याचाच परिणाम म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रातिनिधिक लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार केला. केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रातही लोकशाही प्रस्थापित व्हावी म्हणून राज्यघटनेत अनेक तरतूदी केल्या. भारतातील लोकशाहीचे स्वरूप पुढील मुद्यांच्या आधारे आपणास समजावून घेता येईल.

**१) राज्यघटनेची उद्देशपत्रिका :** भारताच्या राज्यघटनेस प्रारंभीच एक उद्देशपत्रिका (प्रास्ताविका) जोडवी असून तिच्यात भारताचे एक 'सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक' घडविण्याचा निर्धार केलेला आहे. भारत हे सार्वभौम राज्य आहे याचा अर्थ भारताची सत्ता ही सर्वश्रेष्ठ असून या सत्तेवर अंतर्गत वा बाह्य अशा कोणत्याही शक्तीचे वर्चस्व वा प्रभुत्त्व नाही असा आहे. भारत समाजवादी आहे याचा अर्थ भारताने समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्याचे ध्येय स्वीकारलेले आहे. भारत धर्मनिरपेक्ष राज्य आहे, म्हणजे भारत या देशाचा कोणताही एक अधिकृत असा धर्म नाही. तथापि, भारतीय नागरिकांना आपल्या आवडीचा धर्म स्वीकारण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र देशहिताच्यादृष्टीने धार्मिक स्वातंत्र्यावर कांही बंधने घालण्याचा हक्क राज्याला असणार आहे. भारत हे लोकशाही राज्य आहे म्हणजे येथे अंतिम सत्ता ही लोकांच्या हातात आहे. लोकांनी दर पाच वर्षानी प्रौढ मताधिकाराद्वारे निवडून दिलेले प्रतिनिधी हे शासन चालवितात. म्हणून येथील लोकशाही प्रतिनिधिक प्रकारची लोकशाही आहे. ही प्रातिनिधिक लोकशाही ही संसदीय स्वरूपाची आहे. कारण येथील कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळास जबाबदार आहे. म्हणजेच केंद्रीय मंत्रीमंडळ हे लोकसभेस तर राज्यातील मंत्रीमंडळ हे विधानसभेस जबाबदार आहे. लोकसभा व विधानसभा ही लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींची बनलेली सभागृहे आहेत व या गृहांनी मंत्रीमंडळास दिलेला पाठिंबा काढून घेतला की मंत्रीमंडळास राजीनामा द्यावा लागतो. याचाच अर्थ अंतिम सत्ता ही लोकांची आहे असा अर्थ होतो. भारत हे प्रजासत्ताक (गणराज्य) ही आहे. म्हणजे येथील सर्वोच्च शासनप्रमुख (राष्ट्रपती) हा लोकांकडून अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडला जातो. अशाप्रकारे भारतीय राज्यघटनेने भारतात लोकशाही शासनपद्धती स्वीकारलेली असल्याचे उद्देशपत्रिद्वारे लक्षात येते.

**२) लोकशाही मूल्ये :** भारतीय राज्यघटनेने भारतात खरी लोकशाही प्रस्थापित व्हावी म्हणून उद्देशपत्रिकेत न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुता या लोकशाही मूल्यांचा स्वीकार केलेला आहे.

**३) मूलभूत हक्क :** लोकशाही राज्यात नागरिकांना मूलभूत हक्क दिलेले असतात व त्याचे राज्याकडून संरक्षण होईल अशी हमी दिलेली असते. त्यानुसार भारतीय राज्यघटनेने नागरिकांना १) समतेचा हक्क, २) स्वातंत्र्याचा हक्क, ३) शोषणविरुद्धचा हक्क, ४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, ५) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आणि ६) घटनात्मक उपाययोजण्याचा हक्क असे सहा मूलभूत हक्क दिलेले आहेत. या हक्कांवर आक्रमण झाल्यास भारतीय रागरिक न्यायालयात दाद मागू शकतात. मात्र आणिबाणीच्या काळात हे हक्क स्थगित ठेवता येतात.

**४) मार्गदर्शक तत्त्वे :** राजकीय क्षेत्राप्रमाणेच आर्थिक व सामाजिक क्षेत्रातही लोकशाही प्रस्थापित व्हावी म्हणून राज्यघटनेत राज्यांच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे नमूद केलेली आहेत. केंद्र व राज्य सरकारांनी राज्यकारभार करताना या तत्त्वांनुसार करावा अशी अपेक्षा आहे. मात्र तसे न झाल्यास न्यायालयात दाद मागता येत नाही. असे असले तरी येथील सरकारने यातील अनेक तत्त्वांची अंमलबजावणी करणारे कायदे संमत केले असून जनकल्याणाच्या अनेक योजना व कार्यक्रम राबविले आहेत. (याची चर्चा 'कल्याणकारी राज्य' या घटकाच्या विवेचनात आलेली आहे.)

**५) संघराज्य पद्धती :** लोकशाही राज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण होणे अपेक्षित असते. त्यानुसार भारतात संघराज्यपद्धती स्वीकारलेली असून केंद्र व घटकराज्ये यांच्यात सत्तेचे वाटप केलेले आहे. हे वाटप

कायदेविषयक, प्रशासकीय व वित्तीय बाबींच्या संदर्भात केलेले आहे. याशिवाय नागर तसेच ग्रामीण समुदायात स्थानिक स्वशासन यंत्रणा स्थापन करून स्थानिक लोकांना सत्ता व विकासाची साधने उपलब्ध करून दिलेली आहेत. त्यामुळे लोकशाही राज्यकारभार अगदी खेड्यापाड्यापर्यंत पोहचण्यास मदत झालेली आहे. शहरातील नगरपालिका व महानगरपालिका आणि ग्रामीण भागातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्थानिक स्वशासन संस्थांमुळे लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्त्व अंमलात येण्यास मदत झालेली आहे.

६) **निवडणूक आयोग :** लोकशाहीत नागरिकांचा राजकीय सहभाग महत्त्वाचा असतो. त्यासाठी नागरिकांना, मतदान करणे व निवडणूक लढविणे हे हक्क द्यावे लागतात. भारतात हे हक्क नागरिकांना धर्म, जात, वंश, लिंग, संपत्ती, शिक्षण इत्यादीचा विचार न करता दिलेले आहेत. नागरिकांच्या राजकीय सहभागाचा सर्वात महत्त्वाचा व निर्णायक मार्ग निवडणूक हा आहे. निवडणूका निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडता याव्यात म्हणून भारतात स्वतंत्र निवडणूक आयोग स्थापन (२५ जानेवारी १९५०) केलेला आहे. संसद व राज्याचे कायदेमंडळ यांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व त्या निवडणुकांचे संचालन करणे, निवडणुकांच्या कामावर देखरेख व मार्गदर्शन करणे, तसेच राजकीय पक्षांना निवडणूक चिन्हांचे वाटप करणे, त्यांना मान्यता देणे, त्यांची असलेली मान्यता रद्द करणे, एखादा पक्ष राष्ट्रीय आहे की प्रादेशिक आहे याचा निर्णय घेणे इत्यादी कार्ये निवडणूक आयोग करतो. एकंदरीत प्रातिनिधीक लोकशाही व्यवस्थेसाठी आवश्यक ती कार्ये पार पाडण्याचे काम निवडणूक आयोग करतो.

**भारतातील लोकशाहीपुढील आव्हाने**

भारतात लोकशाहीचा प्रयोग सुरू होऊन ७० वर्षाहून अधिक काळ झाला आहे. या काळात भारतात विशेषतः राजकीय क्षेत्रात लोकशाही यशस्वीपणे रुजलेली आढळते. भारताप्रमाणेच पाकिस्तानातही १९४७ पासून लोकशाहीचा प्रयोग सुरू झाला होता. मात्र तेथील लोकशाही प्रक्रिया अनेक वेळा खंडित झालेली आढळते. कारण मध्येच एखादा लष्करप्रमुख लोकशाहीस डावलून राजकीय सत्ता ताब्यात घेताना दिसतो. भारतात मात्र अद्याप असे घडलेले नाही. भारतीय जनतेने लोकशाहीस स्वीकारलेले आहे. तथापि, भारतात लोकशाहीची वाटचाल एकदम सुरळीत आहे असे मात्र म्हणता येत नाही. कारण तिच्यापुढे आजही अनेक आव्हाने आहेत. त्यापैकी कांही प्रमुख आव्हाने पुढीलप्रमाणे :

**अ) लोकशाही मुल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे आव्हान**

लोकशाही ही समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्व व न्याय या मूल्यांवर आधारलेली असते. लोकशाही व्यवस्था असलेल्या समाजात ही मूल्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रात खोलवर रुजणे अपेक्षित असते. त्यासाठी नागरिकांना कांही मूलभूत अधिकार दिलेले असतात व त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारलेली असते. भारतीय राज्यघटनेने आपल्या उद्देशपत्रिकेत ही चार मूल्ये स्वीकारून ती जनतेस प्राप्त होतील अशी हमी दिलेली आहे. त्यासाठी नागरिकांना समतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्धचा, धार्मिक स्वातंत्र्याचा, सांस्कृतिक व शैक्षणिक आणि घटनात्मक उपाय योजण्याचा असे सहा मूलभूत हक्क दिलेले आहेत. आणि या हक्कांवर आक्रमण झाल्यास त्याविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तरतूद केलेली आहे. म्हणजेच या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायसंस्थेवर टाकलेली आहे. तसेच भारतीय समाजात बंधुत्त्वाचे

व न्यायाचे मूल्य रुजावे म्हणून अनेक मार्गदर्शक तत्त्वेही राज्यघटनेत समाविष्ट केलेली आहेत. लोकशाही यशस्वी होण्यासाठी भारतीय राज्यघटनेत केलेल्या या तरतूदी नक्कीच स्वागतार्ह आहेत. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र वरील चार मूल्यांचे संरक्षण व संवर्धन होताना फारसे दिसत नाहीत. विविध स्थळी व काळी ही मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. त्यामुळे या मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करणे हे भारतीय लोकशाहीपुढील मोठे आव्हान आहे. या आव्हानाची चर्चा पुढील मुद्यांच्या आधारे करता येईल.

**१) समता प्रस्थापित करण्याचे आव्हान** : भारतीय लोकशाहीपुढे समता प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान आहे. समता प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक त्या घटनात्मक व कायदेशीर तरतूदी करूनही त्यांची अंमलबजावणी व्यवस्थित होत नसल्याने भारतात अद्यापही सामाजिक, आर्थिक व प्रादेशिक अशा तीन प्रकारची विषमता मोठ्या प्रमाणावर आढळते.

**अ) सामाजिक विषमता :** भारतात विविध धर्माचे, जातीचे, जमातीचे, वर्गाचे, प्रांताचे, भाषेचे लोकसमूह असून त्यांच्यामध्ये अलगतेची भावना आहे. कारण व्यक्तीची समूहनिष्ठा ही राष्ट्रनिष्ठेपेक्षा अधिक प्रबळ आहे. त्यामुळे भारतीय लोक हे स्वतःच्या धर्माच्या, जातीच्या, वर्गाच्या, प्रांताच्या, भाषेच्या व्यक्तीकडे आपलेपणाच्या व सहकार्याच्या भावनेतून पाहतात. आपल्या समूहाचे हित साध्य करण्यासाठी इतर समूहांवर अन्याय-अत्याचार करतात. त्यामुळे समूहासमूहांत वैमनस्य/विद्वेष निर्माण होतो. परिणामी, धर्मभेद, जातीभेद, वर्गभेद, प्रांतभेद, भाषाभेद निर्माण होऊन सामाजिक विषमता टिकून राहते. याशिवाय भारतात लिंगभेद म्हणजेच स्त्री-पुरूष भेदही मोठ्या प्रमाणावर आहे. पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही समान हक्क दिले असले तरीही येथे पुरुषप्रधान व्यवस्था टिकून आहे. सर्वच क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व असून स्त्रियांना समानतेची वागणूक दिली जात नाही. पुरुषांकडून स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारास अन्याय-अत्याचाराचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहे. भारतीय स्त्री कुटुंबात व कुटुंबाबाहेरही अद्याप पूर्णपणे सुरक्षित नाही. थोडक्यात, भारतात सामाजिक भेदभाव मोठ्या प्रमाणावर असल्याने सामाजिक विषमता निर्माण झालेली आहे.

**ब) आर्थिक विषमता :** सामाजिक विषमतेप्रमाणेच आर्थिक विषमताही भारतात मोठ्या प्रमाणावर आहे. मुठभर लोकांच्या हाती केंद्रीत झालेली आहे. उदा. शेती हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. पण ७० टक्के ग्रामीण कुटुंबे भूमिहीन असून ज्या ३० टक्के कुटुंबाकडे जमीन आहे, त्यापैकी बहुसंख्य कुटुंबे ही अल्प व अत्यल्प भूधारक आहेत. अलिकडेच फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ **थॉमस पिकेटो** यांनी शंभरहून अधिक देशांच्या आर्थिक उत्पन्नाच्या आकडेवारीवरून असा निष्कर्ष काढला आहे की, आर्थिक विषमता भारतात सर्वात जास्त आहे. इंडिया अनइक्वॅलिटी रिपोर्ट २०१८ नुसार २०१७ मध्ये भारतात जेवढे राष्ट्रीय उत्पन्न निर्माण झाले, त्यापैकी ७३ टक्के वाढीव उत्पन्न केवळ १ टक्का श्रीमंत लोकांकडे गेले. याचाच अर्थ असा की, ९९ टक्के लोंच्या वाट्याला केवळ २७ टक्के उत्पन्न आले. थोडक्यात, विविध सामाजिक वर्गाच्या आर्थिक स्थितीत मोठीच तफावत आहे. औद्योगिक कामगार, शेतमजूर, अल्पभूधारक, अनुसूचित जाती-जमाती, शहरी झोपडपट्टीवासी इ. वर्ग दारिद्र्यात खितपत पडलेले आहेत. त्यांच्या मूलभूत गरजाही धडपणे पूर्ण होत नाहीत. याउलट उद्योगपती, बडे बागाईतदार, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील उच्चपदस्थ इ. मूठभर मंडळी ऐषोरामात लोळत आहेत. आर्थिक विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी अशापद्धतीने होत

आहे की, ज्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होत आहेत. परिणामी श्रीमंत व गरीब वर्गांमध्ये कटुता वाढत आहे.

**क) प्रादेशिक विषमता :** भारतात प्रादेशिक विषमताही मोठ्या प्रमाणावर आहे. स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून जो आर्थिक विकास झाला, त्यामध्ये प्रादेशिक असमतोल आढळतो. कांही प्रदेशांचा किंवा राज्यांचा (उदा. पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू) अधिक विकास झाला आहे तर कांही राज्यात (उद. बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान) विकासाची गती मंद आहे. एकाच राज्यातील वेगवेगळ्या विभागांचाही कमीजास्त प्रमाणात विकास झालेला आहे. उदा. महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कोकण व मराठवाडा या विभागांचा विकास कमी झालेला आहे. शहरांच्या तुलनेने खेड्यांचा विकास अल्प प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे अल्प विकसित प्रदेशातील लोक विकसित प्रदेशाकडे स्थलांतर करीत आहेत. यातूनच विकसित प्रदेशातील मूळचे लोक व बाहेरून आलेले लोक यांच्यात वाद सुरू होऊन एकात्मतेस तडे जात आहेत.

अशाप्रकारे भारतात सामाजिक, आर्थिक, प्रादेशिक विषमता प्रचंड आहे. ही विषमता नष्ट करून समता प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान येथील लोकशाहीपुढे आहे. या संदर्भात **पंडित नेहरू** म्हणतात की, लोकशाही म्हणजे समता होय. मात्र केवळ मतदानाच्या हक्काबाबत समता नव्हे, तर आर्थिक व सामाजिक समता होय. भारतीय लोकशाही पुढील विषमतेचे आव्हान स्पष्ट करताना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** म्हणतात की, भारतात भारतात आर्थिक व सामाजिक क्षेत्रात मोठी विषमता असून, ती नष्ट झाली पाहिजे. अन्यथा विषमतेने गांजलेले लोक राजकीय व्यवस्था उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाहीत.

**२) व्यक्तिस्वातंत्र्य टिकविण्याचे आव्हान :** लोकशाही व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करते. त्यानुसार भारतीय राज्यघटनेने भारतीय नागरिकांना १) भाषण व मतप्रदर्शनाचे (अभिव्यक्तीचे), २) शांततेने व निःशस्त्रपणे एकत्र येण्याचे, ३) संस्था-संघटना स्थापन करण्याचे, ४) भारतात कोठेही संचार करण्याचे, ५) भारतात कोठेही वास्तव्य करण्याचे व ६) कोणताही व्यवसाय/धंदा करण्याचे अशी सहा स्वातंत्र्ये दिलेली आहेत. तथापि, व्यवहारात सर्वांनाच ही स्वातंत्र्ये मुक्तपणे उपभोगता येत नाहीत. कारण व्यक्तिस्वातंत्र्यावर पुढील तीन मर्यादा पडताना दिसतात.

**अ) सामाजिक दडपण :** भारतात रूढी-परंपरांचा अद्यापही मोठा प्रभाव आहे. अनेक अनिष्ट रूढी-परंपरा कायद्याने नष्ट केल्या असल्या तरी व्यवहारात त्यांचा पगडा टिकून आहे. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येते. उदा. व्यक्तीला आंतरजातीय विवाह करण्याचे कायदेशीर स्वातंत्र्य आहे. तथापि, अशा विवाहास, कुटुंब, नातलग, जात पंचायती इत्यादी संस्थाकडून विरोध होतो. असा विवाह करणाऱ्या जोडप्यास बहिष्कृत करणे, अर्थदंड देणे, क्वचीत ठार मारणे (ऑनर किलींग) अशा शिक्षा या संस्थाकडून सुनावल्या जाताना दिसतात. स्त्रीला शिक्षण घेण्याचे, नोकरी-व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे पण अनेक रूढीप्रिय मंडळी याला विरोध करतात. वेठबिगारीची प्रथा कायद्याने नष्ट केली असली तरी श्रीमंत व उच्चवर्णिय मंडळी दरिद्री लोकांना विशेषतः अनुसूचित जातीजमातींना वेठीस धरून राबवून घेतात. रूढी परंपरांचे हे सामाजिक दडपण व्यक्तीस्वातंत्र्याच्या मार्गातील मोठा अडथळा आहे.

**ब) असहिष्णूता :** व्यक्तिस्वातंत्र्य टिकून राहण्यासाठी समाजात सहिष्णुतेचे वातावरण असावे लागते. भारतात मात्र अद्यापही पुरेसे सहिष्णुतेचे वातावरण नाही. भारतीय लोक विभिन्न जातीधर्मात, वर्गात, प्रांतात

विभागलेले असून ते इतरांच्या आचारविचारांचा आदर करीत नाहीत. बहुसंख्यांक लोक अल्पसंख्यांकावर आपले आचारविचार लादू इच्छितात. बहुमतवाली मंडळी अल्पमतवाल्यांच्या विधायक गोष्टीसही विरोध करतात. उच्चवर्णिय लोक निम्नवर्णातील लोकांवर अन्याय अत्याचार करतात. पुरुष मंडळी स्त्रियांच्या आचारविचारावर निर्बंध लादू इच्छितात. अशी ही असहिष्णू वृत्ती व्यक्तीस्वातंत्र्यास मारक ठरते आहे.

**क) असुरक्षितता :** अलिकडे भारतात अतिरेकी, दहशतवादी व नक्षलवादी कारवाया तसेच सांप्रदायिक व जातीय दंगली आणि संघटीत गुन्हेगारी यांचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. तयामुळे देशात असुरक्षितता प्रचंड वाढली आहे. ही असुरक्षितता नष्ट करण्यासाठी विविध उपाय योजावे लागत आहेत. आणि त्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्यावर अनेक निर्बंध घालावे लागत आहेत.

थोडक्यात लोकशाही व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली असते पण भारतात व्यक्तिस्वातंत्र्यावर सामाजिक दडपण, असहिष्णूता व असुरक्षितता या तिन्हीच्या मर्यादा पडत आहेत. त्यामुळे या मर्यादांवर मात करून व्यक्तिस्वातंत्र्य टिकविण्याचे अवघड आव्हान येथील लोकशाहीपुढे आहे.

**३) बंधुत्त्व व न्याय प्रस्थापित करण्याचे आव्हान :** समता व स्वातंत्र्य यांच्याप्रमाणेच लोकशाही, बंधुत्त्व व न्याय या मुल्यांचाही पुरस्कार करते. त्यानुसार भारतीय राज्यघटनेने या दोन्ही मुल्यांचा स्वीकार केलेला आहे. तथापि, ही मूल्ये समाजात पुरेसी प्रस्थापित झालेली नाहीत. त्यांना समाजात प्रस्थापित करण्याचेही आव्हान येथील लोकशाहीपुढे आहे.

''भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.'' अशी प्रतिज्ञा दररोज शाळेत आपण घेत असलो तरी खऱ्या अर्थाने भारतीय लोकांमध्ये बंधुत्त्वाची भावना आहे असे म्हणता येत नाही. भारतीय लोक धर्म, जात, प्रांत, भाषा इत्यादींच्या आधारे विविध समूहांत विभागलेले असून एका समुहाचे सदस्य एकमेकांस बंधु मानतात व इतर समूहातील सदस्यांना परके मानतात. धर्मबंधू, जातीबांधव यासारखे शब्द हेच दर्शवितात. धर्म, जात, प्रांत, भाषा इत्यादींचे पलिकडे जाऊन सर्व भारतीय माझे देशबांधव आहेत अशी भावना निर्माण झालेली नाही. भारतातील विविध समूह हे कमीजास्त प्रमाणात जातीयता, सांप्रदायिकता, प्रादेशिकता जोपासतात आणि आपणास 'भारतीय' म्हणण्याच्या अगोदर ब्राह्मण, मराठा, रजपूत, दलित, आदिवासी इत्यादी किंवा हिंदू, मुस्लिम, ख्रिस्ती, शीख, बौद्ध, जैन इत्यादी किंवा पंजाबी, बंगाली, गुजराती, बिहारी इत्यादी म्हणवून घेणे अधिक पसंत करतात. ही संकुचित मनोवृत्ती बंधुत्त्वाच्या आड येते. म्हणूनच डॉ. आंबेडकर म्हणतात की, भारतात बंधुत्त्वाची भावना निर्माण होणे कठीण गोष्ट आहे. ही गोष्ट साध्य होण्यासाठी प्रत्येकाने ''मी प्रथम भारतीय आहे व नंतरही भारतीयच आहे.'' अशी भावना जोपासली पाहिजे. डॉ. आंबेडकरांचा हा विचार सर्वांनी आचरणात आणला पाहिजे.

बंधुत्त्वाप्रमाणेच न्याय प्रस्थापित करण्याचे आव्हानही लोकशाहीपुढे आहे. ''समाजातील सर्व घटकांचे हित साध्य होईल अशी सुसंवादी वा समतोलाची स्थिती निर्माण होणे म्हणजे न्याय प्रस्थापित होणे होय.'' असे आपणास म्हणता येईल. भारतीय समाजात अशी न्यायाची स्थिती अद्याप प्रस्थापित झालेली नाही. कायद्यापुढे सर्वांना समान मानले असले, सर्वांना मूलभूत हक्क व स्वातंत्र्य दिले असले, तरीही व्यवहारात मात्र कांही मोजक्या घटकांचेच हितसंबंध साध्य होत असून इतर घटकांना आपले हितसंबंध साध्य करण्यासाठी झगडावे लागत आहे. दलित, आदिवासी, भूमिहीन, श्रमिक, महिला इत्यादी घटक अद्यापही शोषीत, वंचित व उपेक्षित आहेत. त्यांच्यावरील अन्याय-अत्याचार संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्यात

असंतोष आढळतो. परिणामी, भारतीय समाजात न्यायाला अपेक्षित असलेली सुसंवादी वा समतोलाची स्थिती निर्माण झालेली नाही. त्यामुळे अशी स्थिती निर्माण करण्याचे म्हणजेच न्याय प्रस्थापित करण्याचे आव्हान येथील लोकशाहीपुढे आहे.

अशाप्रकारे समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्व व न्याय या मूल्यांची प्रस्थापना करणे हे भारतीय लोकशाहीपुढील महत्त्वाचे आव्हान आहे.

**४) राजकीय सहभाग वृद्धिंगत करण्याचे आव्हान :** एक शासन प्रकार या अर्थाने लोकशाहीचा विचार करता भारतातील लोकशाहीपुढे लोकांचा राजकीय सहभाग वृद्धिंगत करण्याचे (वाढविण्याचे) मोठे आव्हान आहे. लोकशाहीत लोकांच्या हाती अंतिम सत्ता असते. लोकांची सत्ता प्रस्थापित होण्यासाठी लोकांनी सतत जागृत राहून राजकीय प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे. त्यांचा हा सहभाग जेवढा अधिक असेल तेवढी अधिक लोकशाही शासनव्यवस्था यशस्वी होऊ शकते. ''राजकीय व्यवहारात भाग घेण्यासाठी केल्या जाणाऱ्या कृतींना राजकीय सहभाग म्हटले जाते.'' राजकीय सहभाग हा सनदशीर (अहिंसक/शांततामय) तसेच असनदशीर (हिंसक) अशा दोन्ही प्रकारचा असतो. लोकशाहीमध्ये सनदशीर प्रकार मान्य केला जातो. निवडणुकीत मतदान करून प्रतिनिधी निवडणे, निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या कामावर लक्ष ठेवणे, स्वतः निवडणूक लढविणे, प्रचारकार्य करणे, देशाची ध्येयधोरणे ठरविण्याच्या प्रक्रियेत भाग घेणे, चुकीच्या ध्येयधोरणावर टीका करणे व ती बदलण्यासाठी कायदेशीर मार्गाने प्रयत्न करणे, इत्यादी कृतींचा सनदशीर राजकीय सहभागामध्ये समावेश होतो. भारतात लोकांचा हा राजकीय सहभाग हळूहळू वाढत चालला असला तरी त्याची गती बरीचशी मंद आहे. ही गती वाढविणे गरजेचे आहे. भारतातील राजकीय सहभागाच्या संदर्भात पुढील मर्यादा जाणवतात.

**अ) मर्यादित मतदान :** भारतात लोकशाही शासनव्यवस्था सुरू होऊन जवळपास ७० वर्षे होत आली आहेत. तरीही अद्याप मतदानाचे प्रमाण कमीच आढळते. सुमारे ५० ते ६० टक्के लोकच मतदानात भाग घेतात. निवडणुकीच्या दिवशी सुट्टी देऊनही असंख्य मतदार मतदानाचे पवित्र राष्ट्रीय कर्तव्य बजावत नाहीत. याचे एक प्रमुख कारण निरक्षरता आहे. आजही सुमारे ३० टक्के भारतीय लोक निरक्षर आहेत. त्यांना मतदानाचे महत्त्व कळत नाही. जे साक्षर आहेत त्यापैकी अनेक जन आळसाने मतदान करीत नाहीत. मी एकट्याने मतदान न केल्याने काय फरक पडणार आहे अशी बेपर्वा दाखविणारेही पुष्कळ आहेत. अनेकांना एकही उमेदवार पसंत नसतो. कांही असंतुष्ट मंडळी मतदानावर सामूहिक बहिष्कार घालतात. त्यामुळे मतदानाचे प्रमाण कमी राहते. लोकांचा राजकीय सहभाग मर्यादित राहतो.

**ब) धंदेवाईक राजकारण :** भारतातील राजकीय प्रक्रिया म्हणजेच राजकारण हे उत्तरोत्तर धंदेवाईक, गलिच्छ, संधीसाधुपणाचे बनत चालले आहे. लोकशाहीतील राज्यकारभार यशस्वी होण्यासाठी राज्यकर्ते/लोकप्रतिनिधी हे सज्जन, सदाचारी, सचोटीचे, निःस्वार्थी, राष्ट्रप्रेमी, सामाजिक बांधिलकी मानणारे असावे लागतात. प्रारंभीच्या काळात बहुसंख्य मंडळी अशी होती. आज मात्र राजकारण हे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा मिळविण्याचा एक धंदा बनला आहे. धंदेवाईक राजकारणी ही सत्ताप्राप्तीसाठी लोकशाही मूल्ये व संकेत पायदळी तुडवून धर्म, जात, भाषा, प्रांत इत्यादीच्या आधारे मते मागतात व मतदारही त्यांना निवडून देतात. असे निवडून आलेले लोक राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष करून आपल्या जातीधर्माच्या, प्रांताच्या, भाषेच्या संकुचित

हितांना प्राधान्य देतात. त्यामुळे इतरांच्या मनात राजकीय प्रक्रियेविषयी तिटकारा निर्माण होऊन ते राजकीय सहभागापासून अलिप्त राहू लागले आहेत.

**क) राजकारणाचे गुन्हेगारीकरण :** भारतातील राजकारणाचे मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारीकरण झालेले आहे. अनेक धंदेवाईक राजकारणी मंडळी आपल्या पदरी गुंड, मवाली, गुन्हेगार यांची फौज बाळगतात. त्यांच्यामार्फत निवडणुकीत सामान्य मतदारांना धमकावून, दहशत माजवून मते मागतात. विरोधकांना मारहाण करून निवडणुकीतून माघार घेण्यास भाग पाडतात. एवढेच नव्हे तर आज गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक स्वतःच निवडणुकीस उभे राहत असून राजकीय पक्षदेखील त्यांना उमेदवारी देत आहेत. बहुतेक सर्वच राजकीय पक्षातील बहुसंख्य लोक प्रतिनिधी हे गंभीर गुन्हे केलेले वा तसा आरोप असलेले आढळतात. दुर्दैवाने भारतीय मतदारही त्यांना निवडून देतात. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याने सज्जन, चारित्र्यवान, प्रामाणिक लोक राजकारणापासून दूर फेकले जात आहेत म्हणजेच त्यांचा राजकीय सहभाग कमी होत आहे.

**ड) अकार्यक्षम कारभार :** भारतातील लोकांचा राजकीय सहभाग मर्यादित राहण्याचे आणखीन एक कारण म्हणजे येथील लोकशाही कारभार हा अत्यंत अकार्यक्षम बनला आहे. राज्यकर्ते व नोकरशाही सामान्य जनतेशी कशी वागते यावर लोकांचा राजकीय सहभाग अवलंबून असतो. दुर्दैवाने त्यांचा जनतेला येणारा अनुभव अत्यंत वाईट व कटू आहे. लालफित, वशिलेबाजी, लाचलुचपत, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, जनतेविषयी बेपर्वाई इत्यादी दोषांनी येथील राज्यकारभार अक्षरशः किडलेला आहे. जनहिताकडे दुर्लक्ष करून राज्यकर्ते व प्रशासकीय नोकर कधी संगनमताने तर कधी स्वतंत्रपणे करोडो रुपयांचा भ्रष्टाचार (आर्थिक घोटाळे) करीत आहेत. त्यामुळे सामान्य जनतेचा लाकशाहीवरील विश्वास उडाला आहे. (अनेकजण हुकूमशाही बरी असे उघडपणे म्हणू लागले आहेत.) त्यामुळे लोक राजकीय सहभागाविषयी उदासिन होत चालले आहेत.

**इ) राज्यकारभाराची संकीर्णता :** भारतात संघराज्य पद्धती असल्याने केंद्राचे केंद्र सरकार व घटकराज्यांची राज्य सरकारे अशी द्विस्तरीय शासकीय यंत्रणा आहे. शिवाय नागर व ग्रामीण विभागात स्वतंत्र अशा स्थानिक स्वशासनसंस्था आहेत. या सर्वांची प्रशासकीय यंत्रणा, कार्यपद्धती, नियमावली यामध्ये तफावत आहे. त्यामुळे भारतातील राज्यकारभार अत्यंत संकीर्ण (गुंतागुंतीचा) बनला आहे. वेळोवेळी होणाऱ्या घटनादुरुस्त्या, कायदे, नियम व उपनियम, इत्यादीमुळे राज्यकारभार कमालीचा औपचारिक व तांत्रिक बनला आहे. ही संकीर्णता, औपचारिकता व तांत्रिकता अशिक्षितच नव्हे तर सुशिक्षित लोकांनाही सहजपणे कळत नाही; ते गोंधळून जातात. त्यातूनच दर पाच वर्षांनी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूका, अधूनमधून होणाऱ्या पोटनिवडणूका, मुदतपूर्व निवडणुका व त्यामुळे होणारा सत्ता बदल आणि त्यातून बदलणारी राजकीय-प्रशासकीय ध्येयधोरणे यामुळेही लोकांच्या गोंधळात भर पडते. परिणामी, हे गोंधळलेले लोक राजकीय सहभाग देण्यास नाखूष असतात.

अशाप्रकारे, भारतीय लोकांच्या राजकीय सहभागावर विविध मर्यादा पडत असल्याने त्यांचा सहभाग खूपच कमी आहे. ही गोष्ट लोकशाहीच्या स्थैर्यास मारक ठरू शकते. म्हणून लोकांचा राजकीय सहभाग वाढविणे हे भारतीय लोकशाहीपुढील एक आव्हान आहे.

### ५) आर्थिक–सामाजिक आव्हाने

वरील दोन प्रमुख आव्हानांशिवाय भारतीय लोकशाहीपुढे कांही आर्थिक व सामाजिक आव्हानेही आहेत. अर्थात यातील कांही आव्हाने बिगरलोकशाही राजकीय व्यवस्था असलेल्या देशापुढेही असू शकतात. अशी आव्हाने पुढीलप्रमाणे–

**अ) विविध समस्या** : भारतीय समाजात लोकसंख्या वाढ, बेकारी, दारिद्र्य इत्यादी समस्या अत्यंत तीव्र आहेत. लोकसंख्या वाढ रोखण्यात देशाला अपयश आलेले आहे. १९५१ मध्ये सुमारे ३६ कोटी असलेली लोकसंख्या आज १३० कोटीच्या जवळपास पोहचली आहे. पंचवार्षिक योजनांद्वारे झालेल्या विकासाची फळे वाढत्या लोकसंख्येमुळे सामान्य जनतेस चाखावयास मिळत नाहीत. लोकसंख्या वाढीमुळे बेकारी, दारिद्र्य वाढत आहे. सामान्यांच्या मूलभूत गरजाही भागत नाहीत. रोजगार, शिक्षण, आरोग्य, दळणवळण, मनोरंजन इत्यादी क्षेत्रातील कितीही सुविधा पुरविल्या तरी वाढत्या लोकसंख्येमुळे त्या कमीच पडत आहेत. त्यामुळे दरिद्री, बेकार, निरक्षर, अकुशल, रोगट अशी निम्न गुणवत्तेची लोकसंख्या वाढून ती देशाला भारभूत ठरत आहे. अशी ही लोकसंख्या धंदेवाईक व पक्षीय राजकारणास बळी पडते. राजकारण्यांच्या खोट्या आश्वासनास भूलते. अयोग्य उमेदवारास पैसे घेऊन मतदान करते. त्यामुळे अयोग्य लोकांच्या हाती राजकीय सत्ता जाते. आणि ते सत्तेचा वापर स्वार्थ साधण्यासाठी करतात. परिणामी, लोकशाही म्हणजे स्वार्थी, नालायक व बेजबाबदार लोकांचा कारभार असा समज होतो. भारतीय लोकशाहीबाबतही असाच समज झाला आहे. हा समज दूर करण्यासाठी विविध समस्यांचे निर्मूलन होणे गरजेचे आहे. आणि ते एक मोठे आव्हान आहे.

**ब) लोकजागृती :** लोकशाहीचे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी लोक जागृत असावे लागतात. त्यांना आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्याचीही जाणीव असावी लागते. लोकशाही शासन हे जनतेस जबाबदार असते. चुकीचे निर्णय घेणाऱ्या शासनावर/लोकप्रतिनिधीवर अंकुश ठेवण्याचे कामही जनतेस करावे लागते. हे साध्य होण्यासाठी जनता ही राजकीय शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या जागृत असली पाहिजे. दुर्दैवाने भारतातील बहुसंख्य लोक हे जागृत नाहीत. देशापुढील आर्थिक–सामाजिक प्रश्नांची त्यांना पुरेसी जाणीव नाही. ज्यांना ही जाणीव आहे ते त्या प्रश्नांची चर्चा करण्यास, त्यावर लोकमत संघटीत करण्यास, ते प्रश्न सोडविण्यासाठी सरकारवर दबाव टाकण्यास उत्सुक नाहीत. जे थोडेफार त्यासाठी उत्सुक असतात त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून सत्ताधारी वर्ग आपल्या बाजूला वळवितो. एकंदरीत सामान्य लोक जागृत नसल्याने धुर्त, चलाख पण संधीसाधू लोकांचे फावते. संपूर्ण देशाचे/समाजाचे हित बाजूला ठेऊन हे लोक सत्तेचा उपयोग व्यक्तिगत हितासाठी करतात. आणि सामान्य माणूस मात्र लोकशाहीला दोष देतो. भारतात लोकशाही यशस्वी होण्यासाठी लोक जागृत होणे अत्यावश्यक आहे. म्हणून लोकांना जागृत करणे हे येथील लोकशाहीपुढील एक आव्हान ठरते.

## ४.४ सारांश

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की भारतातील राजकारण व एकूणच राजकीय प्रक्रिया ही विविधांगी स्वरूपाची आहे. भारतातील शासनयंत्रणा ही धर्म निरपेक्षतावादी तत्त्वावर आधारलेली आहे. पण प्रत्यक्षात इथले राजकारण मात्र अनेक सामाजिक–सांस्कृतिक घटकानी प्रभावित झालेले आहे. हा एक

विरोधाभासच आहे. जात, धर्म, प्रदेशवाद, भाषिक ताठरता इत्यादी – शिवाय भारतातले राजकारण पुढे सरकूच शकत नाही ही एक वास्तवता आहे. मुलतत्त्ववादी, प्रदेशवादी, भाषाभिमानी अशा विभिन्न घटकामुळे भारतातील राजकारणावर कायमच प्रभुत्व संपादन केलेले आहे. तसेच बहुपक्षीय लोकशाहीमुळे राजकीय समिकरणेही सातत्याने बदलताना दिसत आहेत. आघाडी अथवा युती यावरच सत्तासमिकरणे अवलंबून होताना दिसत आहेत. अपक्षांनाही मोठ्या भावात खरेदी करून सत्तेत त्याना वाटा दिला जात आहे. सत्तेसाठी होणारा घोडेबाजार तर सर्वश्रुतच आहे. लोकांचा राजकीय सहभाग वाढत आहे. विशेषतः तरूण वर्ग राजकीय प्रक्रियेत विशेष रस दाखवत असल्याचे जाणवते. परंतु निवडणुकीच्या वेळी मध्यमवर्ग व विशेषकरून पांढरपेशीय लोक उदासीन राहतात ही एक चिंतेची बाब बनत आहे. तरीही भारतातील एकूणच राजकीय प्रक्रिया फार मोठ्या उलथापालथीची तर बनलेलीच आहे पण तितकीच ती गतिमानही होत आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. ही गतिमानता अर्थातच लोकांच्या जागरूकतेतून निर्माण झाली आहे. आणि तेच लोकशाही समृद्ध करण्याचे एक साधन आहे.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress)

**अ) बहुपर्यायी प्रश्न** (Multiple Choice Questions)

१. 'जात हा भारतातील मोठा राजकीय पक्ष आहे' असे कोणी म्हटले आहे?

अ) मधु दंडवते ब) रजनी कोठारी क) जयप्रकाश नारायण ड) राम मनोहर लोहिया

२. घटनेतील कलम २५ ते २८ नुसार कोणता हक्क मान्य करण्यात आला आहे?

अ) मुद्रणस्वातंत्र्याचा हक्क ब) धर्म स्वातंत्र्याचा हक्क

क) मतदानाचा हक्क ड) भाषण स्वातंत्र्याचा हक्क

३. १९६३ मध्ये स्वतंत्र आणि पूर्ण राज्याचा दर्जा असणारे कोणते राज्य अस्तित्वात आले?

अ) मिझोराम ब) महाराष्ट्र क) मेघालय ड) नागालँड

४. इंग्लंड व अमेरिकेत प्रामुख्याने कोणती पक्षपद्धती आढळते?

अ) द्विपक्षपद्धती ब) बहुपक्षपद्धती क) एकपक्ष पद्धती ड) अपक्षपद्धती

५. सत्तेसाठी प्रयत्न करणारे, राजकारणात स्वारस्य असणारे व राजकारणात स्वारस्य नसणारे असे राजकीय सहभागाविषयीचे वर्गीकरण कोणी केले आहे?

अ) मॅकआयव्हर ब) वुडवर्ड व रोपर क) रॉबर्ट डाल ड) मिलब्रॅथ

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) इरावती कर्वे यांनी जातीची व्याख्या कशी केली आहे?

२) भारतातील राज्यांच्या राजकारणात कोणता घटक प्रभावी ठरत आहे?

३) कोणत्या प्रकारची विचारसरणी धार्मिक विविधतेतील कठोरपणा स्पष्ट करते?

४) भारतीय संघराज्यातून फुटून निघण्याच्या प्रवृत्तीला काय म्हणतात?

५) अंतरवर्तुळ हा कशाचा भाग असतो?

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) १) क – जयप्रकाश नारायण

२) ब – धर्मस्वातंत्र्याचा हक्क

३) ड – नागालँड

४) अ – द्विपक्षपद्धती

५) क – रॉबर्ट डाल

ब) १) विस्तृत संबंध असणारा अंतर्विवाही समूह म्हणजे जात होय.

२) भारतातील राज्यांच्या राजकारणात जात हाच घटक सर्वात प्रभावी ठरत आहे.

३) धार्मिक संप्रदायवाद आणि धार्मिक मूलतत्त्ववाद ही विचारसरणी धार्मिक विविधतेतील कठोरपणा स्पष्ट करते.

४) भारतीय संघराज्यातून फुटून निघण्याच्या प्रवृत्तीला फुटीरतावादाची चळवळ असे म्हणतात.

५) आंतर वर्तुळ हा राजकीय पक्षरचनेचा घटक असतो.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) भारतीय राजकारणातील भाषेची भूमिका स्पष्ट करा.

२) जात आणि भारतीय राज्यघटना याविषयीचे विवेचन करा.

३) भारतातील वेगवेगळ्या राज्यनिर्मितीचा आढावा घ्या.

४) राजकीय पक्षांची रचना स्पष्ट करा.

५) भारतातील राजकीय सहभागाचे विश्लेषण करा.

**ब) टीपा लिहा.**

१) जात व राजकारण

२) धर्मनिरपेक्षतावाद

३) अधिकृत भाषा कायदा

४) राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये

५) बहुपक्ष पद्धती

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) राजकीय समाजशास्त्र : श. गो. देवगावकर, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) शासन यंत्रणा : र. घ. वराडकर, विद्या प्रकाशन, नागपूर.

३) Indian Political System : U.G. Ghai and K. B. Ghai; New Academic Publishing Co. Jalandhar, 2012.


❑❑❑